# निजाम-पेशवे संबंध

१८ वें शतक

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ११७२

लेखक

**प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर**

पुणें विद्यापीठातर्फें
कै. न. चिं. केळकर
स्मारक व्याख्यानमाला
१ लें १९५४

REFBK-0010264

मूल्य : २ रुपये.

पुणें विद्यापीठ



# कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला

१

व्याख्याते - प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर

पुणें विद्यापीठातर्फें

कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला

पुष्प १ लें १९५४

# निजाम-पेशवे संबंध

१८ वें शतक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम २४८९९ वि: १२९६५
नों दि: २५।५।५५
REFBK-0010264
१०२६४

लेखक

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर

प्रकाशक :
श्री. व. ह. गोळे,
कार्यवाह,
पुणें विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणें ७.

मुद्रक :
श्री. रं. श्री. सरदेशपांडे,
उप-कार्यवाह,
पुणें विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणें ७.

मुद्रणस्थळ : पुणें विद्यापीठ मुद्रणालय, पुणें ७.

या ग्रंथासंबंधीचे सर्व हक्क पुणें विद्यापीठाच्या आधीन ठेवले आहेत.

प्रथमावृत्ति
जानेवारी १९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 28511 वि. 1965
क्रमांक 9162 नों. दि. 15-5-65

# प्रास्ताविक

पुणें विद्यापीठातर्फे होणाऱ्या व्याख्यानमालांचा प्रारंभ मराठींत श्री. न. चिं. केळकर स्मारकव्याख्यानमालेनें सन १९५४ च्या ऑक्टोबरांत तात्यासाहेबांच्या श्राद्धदिनीं ता. १४ रोजीं झाला. तन्निमित्त मी दिलेलीं सहा व्याख्यानें आतां चार वर्षांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत. व्याख्यानांचा विषय 'निजाम-पेशवे संबंध' असा असून त्यांत पेशवाईतील मराठ्यांच्या इतिहासाचा एक उभा छेद घेण्यांत आलेला आहे. शिवछत्रपतींनीं मराठ्यांचें स्वतंत्र राज्य या खंडप्राय देशातील हिंदु-मुसलमानांचा शतकानुशतक चालत आलेला कठीण प्रश्न सोडविण्यासाठीं स्थापिलें. त्यांनीं घालून दिलेली पद्धति त्यांच्यानंतर पुरी एक पिढी तशीच चालु राहिली. पण नंतर तिला उलटी कलाटणी मिळून स्वतंत्र राज्याचें साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत रूपांतर झालें. त्याचा परिणाम दक्षिणेंत त्या मोगल साम्राज्याचा प्रतिनिधि जो निजाम तो कायम होण्यांत झाला. हा इतिहास या सहा व्याख्यानांत मांडण्यांत आला आहे. ही गोष्ट राजवाड्यांनीं अर्धशतकामागेंच आपल्या दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत स्पष्टपणें मांडली होती, पण याच सुमारास आलेल्या देशभक्तीच्या पुरांत हा खरा इतिहास दृष्टिआड झाला व महाराष्ट्रांत अशी चुकीची समजूत दृढ झाली कीं पेशव्यांचें राज्य सार्वभौम होतें. प्रसिद्ध व अप्रसिद्ध हजारों मराठी अस्सल पत्रांच्या आधारानें हें मत कसें चुकीचें आहे हें या व्याख्यानांत साधार दाखविण्यांत आलेलें आहे.

या व्याख्यानांपैकीं पहिलीं पांच व्याख्यानें लिहून काढून वाचण्यांत आलीं होतीं व शेवटचें उपसंहाराचें व्याख्यान तोंडींच देण्यांत आलें होतें. पांचव्या व्याख्यानाच्या वेळीं फळयावर नकाशे काढून खर्ड्याची लढाई वर्णिली होती. पण त्यावेळीं मी स्वतः खर्डें गांव पाहिलेलें नसल्यामुळें चांचपडतच युद्धाचें वर्णन केलें होतें. तदनंतर सन १९५४ च्या डिसेंबरांत खर्ड्यास जाऊन व तेथें तीन दिवस राहून रणांगणाचें डोळ्यांनीं अवलोकन केलें. त्यामुळें मूळ लेखांत ज्या

त्रुटी राहिल्या होत्या त्या भरून काढण्यास सवड मिळाली व आतां दिलेलें खर्ड्याच्या लढाईचें वर्णन बहुधा निर्दोष वठलेलें आहे. सहाव्या प्रकरणांतील व्याख्यानाचें स्वरूप मुळांतच चर्चेचें ठेविलें होतें. त्या निमित्तानें तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या 'मराठे व इंग्रज' या ग्रंथांत मराठ्यांच्या पातशाही धोरणावर जी अत्यंत उद्बोधक चर्चा चाळीस वर्षांपूर्वी केली होती तिचें नवीन संशोधनाच्या प्रकाशांत साधार परीक्षण करतां आलें. ही एक स्मारकमालेच्या दृष्टीनें सुयोग्य गोष्ट झाली व तीमुळें आपण फेकलेला चेंडू अजून अडविला जात आहे हें पाहून तात्यासाहेबांच्या खेळाडू मनाला स्वर्गांतहि आनंद होईल असें आम्हांला वाटतें. तसेंच त्यांच्या स्मारकार्थ सुरू झालेल्या या व्याख्यान मालेंत पहिल्यानेंच मला हार गुंफिता आला ही मी मोठी सुदैवाची गोष्ट समजतों व मला अशी संधि दिल्याबद्दल विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे आभार मानतों.

या व्याख्यानांचें सामान्य स्वरूप विवेचनाचें असून इतिहासकथनावर मुख्य भर त्यांत दिलेला नाहीं. तरी जेथें अप्रकाशित मूळ पत्रांवर लेखन करतां आलें तेथें आजवर अज्ञात माहितीचें कथन आपोआप झालेंच. विशेषतः पांचव्या व अंशतः सहाव्या व्याख्यानांत असा प्रकार झालेला वाचकांच्या नजरेस येईल. मेणवली येथील नाना फडणीस दप्तराचे जे शेष आतां डेक्कन कॉलेजांत ठेवलेले आहेत त्यांतील निजाम-पेशवे संबंधांचीं दोन हजारांवर निवडक पत्रें याचा आधार आहेत. एकट्या खर्ड्याच्या लढाईवर यांत पांचशेंवर पत्रें आहेत, व तीं रणांगणावरील दहापंधरा बातमीदारांचीं आहेत. नाना व मुषीरउल्मुल्क यांचे संबंध यांत उत्तम दिग्दर्शित झालेले आढळतात. यांत आतां त्रुटि एकच दिसते व ती हैदराबाद येथें अप्रकाशित राहिलेल्या विस्तीर्ण फारसी पत्रव्यवहाराची. त्यांत निजामाचें म्हणणें जास्त साधार व अस्सल करारमदारांच्या रूपाचें सांपडणें शक्य आहे. त्यांचा उपयोग इतिहासकारास करतां येईल तेव्हां या संबंधांचें अखेरचें सत्य स्वरूप वाचकांच्या दृष्टीस पडेल. मात्र असें होईपर्यंत या व्याख्यानांतील विवेचन प्रमाण मानावयास हरकत नाहीं.

# सारांश

**व्याख्यान पहिलें—पृष्ठें १-२८**

मराठेशाहीचें राजकारण—शिवाजीची राज्यपद्धति, तिचा संभाजी व राजाराम यांच्या कालांत विस्तार—न जिंकलेल्या प्रदेशांत मराठ्यांची वतनें. बाळाजी विश्वनाथ दौलताबादेचा सरसुभेदार—अवरंगजेबानंतर मोगलबादशाहीचें धोरण बदललें—बाळाजीचें पूर्वचरित्र—निजामउल्मुल्काचें पूर्वचरित्र—कोल्हापूरची राज्यक्रांति—मराठेशाहीचीं तीन छकलें—निजामाचा मोगल बादशाही टिकविण्याचा निर्धार—बाजीरावाची आरंभींची दुबळी परिस्थिति व त्यामुळें मराठी राज्याला घडलेला अपाय—राजवाड्यांचें देशभक्तिपूर्ण इतिहासविवेचन.

**व्याख्यान दुसरें—पृष्ठें २९-५६**

निजाम दक्षिणेंत कायम झाला—मुसलमानांचा राजकीय पक्केपणा—बाजीरावाचा त्यांबद्दल न्यूनगंड—बाजीराव व चिमाजीआप्पा यांचें गैर धोरण—संधिसाधुपणा हेंच त्यांचें मुख्य सूत्र—सर्व सत्ता स्वतःच्या हातीं केंद्रित करण्याचा डाव—त्यामुळें इतर प्रधान विरुद्ध राहिले व नष्ट झाले—मोडलेल्या बादशाहीची उजागरी—नागपुरकर भोसल्यांशीं वैर व त्यामुळें दक्षिण हिंदुस्थान गमावणें—निजामाचा धूर्तपणा व भारतीय राजकारणाचें पक्कें ज्ञान—त्याचा मृत्युसमयीं नासिरजंगास केलेला उपदेश.

**व्याख्यान तिसरें—पृष्ठें ५७-७९**

पेशव्यांचे सरदार शिंदे होळकर स्वतःच्याच लहरीप्रमाणें व स्वार्थानुसार उत्तरेंतील राजकारण चालवितात—त्यामुळें मराठेशाहीचें धोरण एकसूत्री रहात नाहीं—ध्येयाचा अभाव व क्षुद्र घरगुती हेवेदावे—रामदासपंताचें कारस्थान व ताराबाईशीं संगनमत—हिंदु संस्थानिकांशीं वैर व मुसलमानांशीं सलोखा—वकील हिंगण्यांचा विचित्र व्यवहार—राजघातकी गाजीउद्दिनाचें चरित्र—पेशवाईत कोणतेंही प्रकरण अखेरपर्यंत तडीला

पोंचविण्यांत आलें नाहीं—तींच तीं खेकटीं पुनः पुनः हाताळावीं लागलीं—मराठ्यांचा सांस्कृतिक मागसलेपणा—इंग्रज-फ्रेंचांचें पाऊल दक्षिणेंत पुढें पडून त्यांच्या मदतीनें निजाम कायम झाला—महाराष्ट्रांत जातीयतेची वाढ व मुख्य ध्येयाचा विसर—मुसलमानांच्या सत्तेंत वाढ व हिंदु संस्थानिकांचा अपकर्ष.

## व्याख्यान चौथें—पृष्ठें ८०-१०७

माधवरावाच्या पराक्रमामुळे पेशवाईचा जोर वाढतो—निजामाशीं सख्य करून पेशवा घरच्या प्रतिस्पर्ध्यांना चोपतो—त्यामुळें एकंदरींत मराठेशाहीचें बळ कमी होतें—नारायणरावाचा खून आकस्मिक नव्हे—घरच्या अडचणींमुळें निजाम वाढतो व इंग्रज उठाव करितात—हैदराच्या मदतीनें नानास पेशवाई राखावी लागते—टिपूशीं सख्य ठेवून इंग्रजांस पायबंद देण्याऐवजीं नाना चुकीनें त्या उलट डाव खेळतो—त्यामुळें मुषीर-उल्मुकाचा उदय—पेशव्यांचे वकील निजामांचे हितचिंतक बनतात—नानाच्या मनाची संकुचितता व कृपणपणा—कॉर्नवॉलिसला मिळून महादजीच्या सल्ल्याविरुद्ध टिपूचा बळमोड केल्यामुळें दक्षिणेंतील सत्तेचा तोल जातो—निजाम अगतिक करून आपल्याकडे ओढण्यासाठी इंग्रज त्याचा पराभव होऊं देतात व गर्विष्ठ मुषीराचा पारा उतरवितात—खर्ड्यामुळें मराठ्यांचा फायदा झाला नाहीं—इंग्रज बुद्धिबळाचा डाव अतिशय चतुराईने खेळतात.

## व्याख्यान पांचवें—पृष्ठें १०८-१३९

नानांच्या कारस्थानाचा परमोच्चबिंदु—हरिपंत फडक्याची त्यास मदत—मुषीरउल्मुल्क—त्यासारखा चांडाळ नाहीं—मीर आलमची वकिली—निजाम बेदर सोडतो व पश्चिमेचा रस्ता धरतो—मराठी फौजांची जुळवाजुळव व तिचें पुण्याहून प्रयाण—शिंदे होळकर व भोसले; पटवर्धन फडके, विंचुरकर व राजेबहाद्दर-मराठ्यांच्या सैन्याची स्वारींतील रीत—प्रदेश उजाड करण्याची पद्धत—निजाम घाट उतरतो—खर्ड्याचा भूगोल व युद्धाचा आरंभ—ता. ११ मार्चची मुख्य चकमक—निजाम खर्ड्यास परततो—पेशव्यांची छावणी व दिनचर्या—ता. २७ मार्च, मुषीर पेशव्यां-

कडे येतो---तहाच्या वाटाघाटी---मुषीराचा अंदाज चुकला---मराठ्यां-बद्दलची चुकीची समजूत---मुषीराचे शत्रू---निजामाचा पाणउतारा---त्यामुळें तो इंग्रजांच्या गळ्यांत पडतो---शिंदेशाही मुत्सद्यांचें वेगळें मत---मराठ्यांच्या छावणींतील धर्म---कटकचें सैन्य खर्ड्यास---खर्ड्याचा दुष्काळ---निजाम तहाआधींच पळून जातो---१५ एप्रिल १७९५ चा तह---पेशव्याची परत स्वारी व पुणें प्रवेश.

**व्याख्यान सहावें—पृष्ठें १४०-१६२**

पेशवाईतील अखेरचा जय—तरुण पेशव्याच्या मनांत विक्षेप—त्याचीं कारणें गूढ—शिंद्यांच्या भीतीनें निजाम राखला—सवाई माधवरावाच्या मृत्यूनें नानाची सद्दी संपली—व्यक्तिस्वार्थ हें त्याचें कारण—मुषीराच्या आगमनानें पुणें बिघडतें—याच वेळीं निजामाचा युवराज बंड करून मरतो—त्यामुळें मुषीराचें पारडें जड होतें—गोविंदराव काळ्याबद्दल अवास्तव समजूत—राष्ट्राच्या ध्येयाची अस्पष्टता व अनिश्चितता—शिवाजीचा पाया सुटल्यानें पेशवाईचें पंगुत्व—तात्यासाहेब केळकरांचें "पातशाही धोरण"—त्यांचें १८ व्या शतकांतील हिंदुस्थानबद्दल अज्ञान-जन्य चुकीचें मत—मोगलांच्या मदतीनें शाहू स्थिरपद झाला ही महान् आपत्ति—पेशव्यांचा सत्तामोह मराठेशाहीला बाधला—दिल्लीपतीची सेवा करून मराठ्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें—शिवाजीची राज्यपद्धति—इंग्रजांना सनदशीर राजकारण जास्त समजलें---निजामालाहि तें जास्त समजत होतें---रानडे, राजवाडे व केळकर यांच्या मनांतील ऐतिहासिक गोंधळ---इंग्रजांचें स्वतंत्र धोरण---पेशवाईतील ध्येयाचा अभाव---कामचलाऊ राजकारण---दिल्लीचे नोकर असल्याचा बहाणा---त्यामुळें इंग्रजांचें फावतें---१८५७ सालींहि "मुलुख बादशहाका"---यांतूनच पाकिस्तानचा उगम---राजवाड्यांची चुकीची विचारसरणी---तिचे महाराष्ट्रास बाधलेले दुष्परिणाम---शिवकालीन हिंदुपदपादशाही---तिच्या अनुरोधानें मराठ्यांचा उठाव---काळाची संधि गमावल्यामुळें न सुटलेले प्रश्न---आतां ते सोडविण्याचे मार्ग सर्वस्वी बदलले व हिंदवासियांस कठीण झाले---पण या सर्व प्रकारांची यथातथ्य समजूत पडल्यास यापुढील मार्ग सुकर होण्याचा संभव.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 90268 वि: १
नों: दि:

श्री. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला १९५४

# निजाम-पेशवे संबंध—१८वें शतक

## व्याख्यान पहिलें—प्राक्कथन

श्रीशिवछत्रपतींनीं स्वतंत्र मराठी राज्य स्थापन केलें व अखिल हिंदुस्थान यवनाक्रांत झालेला असतां त्याची तमा न धरतां कटाक्षानें त्याचें स्वातंत्र्य पुढेंहि राखितां येईल अशी राज्यपद्धति निर्माण करून ठेविली याबद्दल आतां कोणालाहि संशय राहिलेला नाहीं. या राज्याचा जोम एवढा मोठा व राज्यपद्धति इतकी नामांकित होती कीं "या राज्यांतील नीति व राज्यांतील बुद्धि व राज्यांतील मर्यादा सर्वांनीं शिकोन जाव्या" व याच युक्तीच्या आधारावर आपापल्या देशांचें रक्षण करण्यास समर्थ व्हावें [१] असें रामचंद्रपंत अमात्य म्हणतात. शिवाजीच्या राजनीतीबद्दलचा पंतांचा हा अभिमान व आत्मविश्वास प्राचीन काळच्या मनुस्मृतींत फक्त दृष्टीस पडतो :—

> " एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
> स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥ [२]

पृथ्वींतील सर्व मानवांनीं शिकून जाण्यासारखें आपल्याजवळ कांहीं आहे असा आत्मविश्वास ज्या नीतींत असतो तीच नीति मानवजातीवर कायम ठसा उठविण्यास समर्थ असते. ही पद्धति किती चांगली होती याचा अनुभव राजारामाच्या कारकीर्दींत प्रत्ययास आला.

---

(१) अमात्यांची राजनीति (१९२६) पृ. ५

(२) मनुस्मृति अ २ श्लो. २०

मोंगलांनीं राज्य घेतलें व राजा मारला तरी या राज्याच्या आधारानें जो नूतन महाराष्ट्रधर्म मराठ्यांच्या अंगांत संचरला होता तो आपत्तींत सुद्धां, किंबहुना आपत्तीमुळेंच, वाढीस लागला. राजकारण हा शब्द रामदासांच्या दासबोधांतच न राहतां आबालवृद्धांच्या तोंडीं खेळूं लागला. इतका कीं, या शब्दाचा उपयोग मराठ्यांशीं संबंध येणारे अधिकारी मुसलमानहि आपल्या फारसी पत्रांत करूं लागले. औरंगजेबपुत्र अकबर यानें कविकलशाला लिहिलेल्या एका पत्रांत "तुमच्या येण्याने अनेक **राजकारणें** सिद्धीस जातील व पावसाळा हाच राजकारणांचा खरा हंगाम"[३] असें लिहिलें आहे. तेव्हां पावसांत मोहिमा आटोपून परत घरीं आल्यावर पावसाळयानंतर सुरू करावयाच्या राजकारणाचा विचार मराठे करीत असत व त्याची माहिती त्यांच्यांत पाहुणा• म्हणून येऊन राहिलेल्या पातशहापुत्र अकबरासहि होती हें स्पष्ट होतें. दर पावसाळयांत असें नवें राजकारण मराठे काय रचीत होते? तर आपल्या महाराष्ट्रधर्माचें क्षेत्र वाढवीत जाण्याचें. आपल्या आधारभूत स्वतंत्र राज्याचें स्वातंत्र्य कोणतीहि आपत्ति आली तरी यापुढें गमावावयाचें नाहीं; कारण त्याच एका आधारावर अखिल हिंदुमात्रांच्या आशा आकांक्षांची इमारत उभी राहणार होती. या आशाआकांक्षा कोणत्या व त्यांचे क्षेत्र किती विस्तीर्ण असावयाचें याचा उल्लेख शिवाजीच्या कोणत्याहि अस्सल लिखाणांत नाहीं. पण जेव्हां महाराष्ट्रांतील राज्य सोडून स्वातंत्र्यरक्षणासाठीं जिंजीस जाऊन राहणें भाग पडलें तेव्हां या आशाआकांक्षांचा स्पष्ट उच्चार घोषित करावाच लागला, कारण त्यांखेरीज सर्व मराठ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव उत्पन्न झाली नसती.

असा उच्चार प्रथमच अगदीं निःसंदिग्धरीतीनें छत्रपति राजारामाच्या वजारतमाब हणमंतराव घोरपडे यांना ता. ४ जून १६९१ रोजी लिहिलेल्या पत्रांत आढळतो. हें पत्र एवढ्या महत्त्वाचें आहे कीं तें सर्व महाराष्ट्रीय मुलांनीं मुखोद्गत करावें. या एका पत्रानें राजवाड्यांपासून तात्यासाहेब केळकरांपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं मराठी साम्राज्याच्या पातशाही धोरणाचा विचार केला त्यांचें विवेचन काल्पनिक व फोल टरविलें आहे. जिंजीला

(३) House of Shivaji by Sarkar. (1948) p. 211.

झुल्पिकारखानाचा सक्त वेढा बसलेला असतांना राजारामाच्या प्रधानांनीं—व बहुधा प्रतिनिधि प्रल्हाद निराजी[४] यानें हें पत्र—व बहुशः अशींच अनेक दुसरीं न सांपडलेलीं पत्रें—लिहिलीं असावींत. या अव्वल दर्जाच्या पत्रावरून शिवाजीच्या मनांतील योजना स्पष्ट होते असें आम्हांस वाटतें. या पत्रांत ज्यांना सैन्य सरंजाम जमवून मोंगलापासून महाराष्ट्रराज्य परत घेण्याचें काम सांगितलें आहे त्यांना त्यांच्या कार्याचें अवाढव्य स्वरूप समजावून देऊन कार्यप्रवण करण्याचा हेतु साधण्यांत आला आहे. अनेक पराक्रमी मराठे घराण्यांची महत्वाकांक्षा यावेळीं उसळून आलेली होती. मोंगलांची मनसब व जहागीर मिळवून आपला उदय करून घेणें त्यांना सहजसाध्य होतें. पण त्यांच्या मोठेपणाच्या समजुतीस लायक असें भाग्य त्यांस देण्याचें कबूल करून व त्या रूपानें त्यांस उत्साहित करून कामास लावण्याचें धोरण प्रल्हाद निराजीनें अवलंबिलें. त्याच्या पत्राच्या दुसऱ्या भागांत भाग्य मिळविण्याचा अनुक्रम सांगितला आहे. हणमंतरावाला पांच लाख होन कबूल केले, पण ते एकदम द्यावयाचे नाहीत तर ते भागशः हप्त्याहप्त्यानें कार्याच्या सिद्धतेवर अवलंबून ठेवले आहेत. या हप्त्यांचा अनुक्रम सुद्धा अत्यंत महत्वाचा, शिवकालीन मुत्सद्यांच्या दूरदर्शीपणाचें व पद्धतशीर उपक्रमाचें संपूर्ण दर्शन घडविणारा आहे. पाच लाखांपैकीं अडीच लाख प्रथम दक्षिण जिंकण्यावर अवलंबून ठेविले आहेत व त्याचे चार सारखे हप्ते कार्याच्या महत्वाच्या अनुक्रमानें सांगितले आहेत. शिवाजीच्या राज्याला या पत्रांत रायगड प्रांत असें म्हटलें आहे व तो काबीज झाल्यानंतर साडेबासष्ट हजार होनांचा सरंजाम द्यावयाचा आहे. दुसरा हप्ता त्याच्या पूर्वेकडील विजापूरचें राज्य हस्तगत झाल्यानंतर. नंतरचा तिसरा हप्ता भागानगर म्हणजे पूर्वसमुद्रापर्यंतचा प्रदेश जिंकल्यानंतर द्यावयाचा आहे. याबाबत लक्षांत ठेवावयाचें तें हें कीं मोंगली सुभ्यांच्या गणनेंत विजापूर व भागानगर म्हणजे भीमा व मांजरा या नद्यांच्या दक्षिणेकडील कन्याकुमारीपर्यंतचा सर्व दक्षिण प्रदेश अंतर्भूत आहे. अशी कोंकणापासून मच्छलीपट्टणापर्यंत सलग प्रदेशाची मजबूत पायारूप भिंत तयार झाली कीं नंतर औरंगाबाद म्हणजे सर्व दक्षिणेंतील मोगल प्रदेश

---

(४) राजारामचरित - प्रथम सर्ग - श्लोक ३९ ४६

घ्यावयाचा आहे व त्यावर चौथा हता अवलंबून ठेविला आहे. पण एवढ्याने जवळ जवळ सर्वस्व गमावून बसलेल्या राजाराम छत्रपतीचें समाधान नाहीं. त्याची आशाआकांक्षा दिल्लीचें राज्य घेण्याचीहि, म्हणजे सबंध उत्तर हिंदुस्थान महाराष्ट्रधर्माच्या कक्षेंत आणण्याची आहे आणि हें कार्य सिद्धीस गेल्यानंतर व गेल्यास बाकीचे अडीच लाख होनांचा सरंजाम[५] हणमंतराव घोरपड्यास मिळावयाचा आहे. या सर्व अटींत मराठ्यांचें ध्येय शिवकालीं किती वृद्धिंगत झालें होतें तें दिसून येतें. आणि हें ध्येय केवळ शेखमहमदी नव्हतें याची ग्वाही पुढील इतिहास देत आहे.

मुसलमानांनीं व्यापिलेलें अखंड भारतवर्ष सोडविण्याचें भव्य ध्येय उत्कट शब्दांत सांगण्याचा तडाखा शिवकालीन मुत्सद्यांनीं चालू ठेवला होता. महाराष्ट्रधर्म हा वरील ध्येय सिद्ध करण्याचें साधन होतें. आपलें ध्येय सतत कार्यकर्त्यांसमोर उद्घोषित करण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा हा मार्ग पेशवाईत बंद पडला व त्यामुळें कार्यालाहि उणेपणा आला व धक्का बसला. राजारामानें काढलेल्या वरील पत्रानुसार अनेक मराठे घराणीं उपरिनिर्दिष्ट कार्यक्रमांत सामील झालीं व त्यांनीं पंधरा वर्षांत दक्षिणेंतील मोगली राज्य खिळखिळें करून नर्मदापार होण्याचाहि उपक्रम नेमाजी शिंदे, केसोपंत पिंगळे व चिमणाजी दामोदर मोघे यांच्या नेतृत्वाखालीं सुरू केला. वरील पत्रांत सांगितल्याप्रमाणें जागीर कोणास दिली किंवा नाहीं अशी शंका येण्याचे कारण नाहीं. "राजश्री नागोजी माने यानी स्वामीकार्यावरी एकनिष्ठता धरून आपले सर्व शक्तीनसी साहेता करून स्वामीच्या राज्याचा मामला थाटिला याकरितां स्वामी याजवरी कृपाळु होऊन या स्वतंतर मामला सांगोन औरंगाबाद प्रांते व सरकार नांदेड वराडदेश पावेतो नामजाद पाठविले आहेती तिकडील देश कबज करणें अगर खंडणिया घेऊन कमाविस करणें ते मशारनिले आपल्या जमावाने करितील तुम्ही यांकडील अनकूलता करून देऊन यांचा मामला नीटनेटका सजून देणें यांच्या बिराजरीचे लोकांस देशाकडे सनदा करून दिधल्या आहेती त्याप्रमाणें सरंजाम करून दऊन हे जमावें स्वामीकार्य करीत यैसे करणें याचे अनकुलतेस

---

५. शिव–चरित्र–साहित्य खंड ५, १९४२ ले. ६, पृ. ११

काही अनमान न करणें याचा मामला सतंतर करून दऊन यांचे बहुता रीतीनें चालवावे हे स्वामिस अगत्य असे तुम्हीं यांची अनकुलता बरी करून देणें व हे मामलियावरी गेलिया यांची मदत करूं ये तैसी करीत जाणें हे देश कबज करतील तो देश यांचेच स्वाधीन करून देऊन तिकडील पारपत्य यांजकडेच लाऊन देणें व यांचा खासा व बिराजरीचा सरंजाम करून सनदा दिधल्या असेती त्यास बिगजरीच्या सनदांप्रमाणें सरंजाम निरालाच करून देऊन चालवणें ".[६]

सन १६९३ त नागोजी मान्याला या कार्याबद्दल अकलूजपासून ब्रह्मपुरीपर्यंतचा सोलापूर जिल्ह्याचा प्रदेश सरंजामादाखल देण्यांत आलेला आहे व तो देण्याचे कारण त्यानें धनाजी जाधवाबरोबर जिंजीस जाऊन तिचा वेढा मारून काढला हें आहे. जिंजीचा पहिला वेढा ऑक्टोबर १६९० पासून फेब्रुवारी १६९३ पर्यंत म्हणजे जवळ जवळ अडीच वर्षें चालला. मोगल यावेळीं सर्वस्वीच बुडावयाचे पण राजारामानें झुल्पिकार-खानाशीं गुप्त तह केल्यामुळें मराठी सैन्याच्या पहाऱ्यांत झुल्पिकारखान व आसदखान वजीर जिवानिशीं परत गेले. यावेळीं मराठ्यांची भालाईत फौज दीड लाख स्वार होती असें पाँदिचेरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्तिन आपल्या दैनंदिनींत म्हणतो.[७] यावेळींच गोळा झालेले मराठे सरदार व राजारामाचे प्रधान यांमध्यें वितुष्ट आलेलें दिसतें. लांच खाऊन प्रधान युद्धतहकुबी घडवून आणतात व आम्ही लढून मरतों पण आम्हांस एका शब्दानें त्याबाबत विचारीत नाहींत असें म्हणून संताजी घोरपडे रुसून यावेळीं जिंजी सोडून थोड्या अंतरावर जाऊन राहिला. त्याचा रुसवा घालविण्यास राजारामानें आपल्या गुप्त कराराचीं कलमें त्यास सांगितलीं कीं औरंगजेब बादशहा फार दिवस जगत नाहीं. त्याचे पश्चात् गोवळकोंड्याचें राज्य झुल्पिकारखानानें घ्यावें व विजापूरचें राजारामाला द्यावें असें ठरलें आहे. मोगल साम्राज्यांतून फुटून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न यावेळे-पासून मोगल सरदारांत असा सुरू झाला त्याचीच परिणति निजामाचें पुढील राज्य होय.

---

६. शिवचरित्र साहित्य खंड ५ पृष्ठ ९८.

७. ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड ५ पृष्ठें ९१–१०२.

जिंजीहून महाराष्ट्रांत परतणाऱ्या सरदारांस नागोजी मान्याप्रमाणें दक्षिणेंतील स्वतंत्र प्रदेश सोपवून देऊन तो मराठ्यांच्या अंमलाखालीं आणण्याची कामगिरी सागण्यांत आली. गोदा उत्तरतीरचा वऱ्हाडापर्यंतचा प्रदेश त्याकडे नामजाद सुभा सांगोन त्यास नवीन सनदा देऊन महाराष्ट्रांत पाठविण्यांत आलें. त्यानें शंकराजीपंत सचिव यांच्या अनुमतानें वर्तावयाचें व त्याहून जास्ती कठीण प्रसंग येईल तर रामचंद्रपंत अमात्य याकडे हुकमतपन्हा म्हणून साह्य व सल्ला मागावयाची. आपल्या हाताखाली सेनासप्तसहस्री व पंचसहस्री नेमण्याचा अधिकार या नागोजी मान्यास दिलेला आहे. तसेंच जिंकलेल्या प्रदेशांत देशाधिकारी व हस्तगत झालेल्या किल्ल्यावर मुद्राधारी व सेनाधर व लेखक ठेवावयाचा अधिकार मान्यालाच देण्यांत आलेला आहे. नवीन प्रदेशांच्या सनदा तयार करून शंकराजीपंत पाठवितील त्यावर राज्याची मुद्रा रामचंद्रपंतानें करावयाची आहे.[८] यावरून असें दिसतें कीं, एकच सेनापति संताजी घोरपड्याप्रमाणें वरचढ होऊन छत्रपतीचें राज्यच गुंडाळून बसेल म्हणून स्वतंत्र अधिकार देऊन सुभेदार पाठविण्याचा क्रम या वेळेपासून सुरू झाला. याप्रमाणें मराठी राज्यांत दुहीच निर्माण झाली. त्यांत ब्राह्मण प्रधानांचा स्वार्थ व मराठे सरदारांची स्वतंत्रवृत्ति व शिरजोरपणा यांचा संघर्ष सुरू झाला व तो मराठेशाहींत पुढें कधीहि मिटला नाहीं.

न जिंकलेल्या प्रदेशांत आपली वतनें सुरू करण्याचा तडाखा राजारामानें अवलंबिला. मामले परेंडा येथील सरदेशमुखीचें वतन याच वेळीं राजारामानें नागोजीस दिलें.[९] यापूर्वींच १६९१ त अवधूत तुकाजी याला भागानगरचा सरसुभेदार नेमण्यांत आलेले असून मल्हार दादाजीला मोघम सरसुभेदार प्रांत मोगलाई म्हणून नेमून पाठविण्यांत आलेलें आहे.[१०] संताजी घोरपड्यांचें पुढें याचबाबत नागोजी मान्याशीं व रामचंद्रपंत अमात्याशीं भांडण सुरू झालें[११] व त्यांत पुढें संताजीचा खून झाला.

---

८. शिवचरित्रसाहित्य खंड ५ पृष्ठ १००-१०१.
९. शिवचरित्रसाहित्य खंड ५ पृष्ठ १०२-१०३.
१०. राजवाडे खंड ८ ले. ४२
११. राजवाडे खंड ८ ले. ४७

आपसांतील वैमनस्यामुळें चुरस वाढविण्याचा व राजसत्तेस न जुमानतां खून पाडण्याचा हा मराठ्यांचा स्वभावधर्म बहामनी राज्यापासून मोडी कागदपत्रांत दृष्टीस पडतो. महाराष्ट्रसमाजांतील हें एक कायमचें न्यून होय. राजे व त्यांचे प्रधान सकारण म्हणजे न्यायतः किंवा अकारण म्हणजे व्यक्तिप्रेमामुळें जे हुकूम फर्मावीत ते न मानण्याचा व पटण्याचा गुण मराठ्यांत पूर्वापार दिसतो. यांना शिस्तींत ठेवण्यास व त्यांकडून हुकुमाप्रमाणें काम करून घेण्यास शिवाजी व माधवराव याप्रमाणें करडे राज्यकर्ते लागतात. पण तरीहि हे फारसे बधत नाहींत व कह्यांतून सुटतात असें इतिहास सांगतो. या राष्ट्रीय दुर्गुणावर उपायहि तसाच जालीम पाहिजे हें उघड आहे.

वर हणमंतराव घोरपडे वजारतमाब यास ज्याप्रकारें दौलत उर्फ भाग्य देण्यांत आलें आहे त्याप्रमाणेंच अनेक ब्राह्मणांनांहि भाग्य करार करून कार्यप्रवण करण्याचा मार्ग स्वीकारण्यांत आल्याचा दृष्टीस पडतो. वाईकर देशपांड्यांचे गुमास्ते अंताजी उद्धव साबणे यांनाहि हणमंतराव घोरपड्यांच्या शिफारशीवरून दोन लक्ष होनाचें भाग्य देण्यांत आलेलें आहे.[१२] स्वतःच्या खर्चानें व हुषारीनें सैन्य सरंजाम जमवून राज्यांतील सरदारी मिळविण्याचा मार्ग जो या वेळीं सुरू झाला तो पुढें १०० वर्षें तसाच चालला. मुलकींतून लष्करी अधिकाऱ्यांच्या या शाळेंत नांवें घालूनच पुढें केसो त्रिमल पिंगळे, चिमणाजी दामोदर मोघे, बाळाजी विश्वनाथ भटप्रभृति ब्राह्मणहि पुढें सरकले व त्यांनीं कांही अंशीं मराठ्यांच्या राखीव कुरणांत प्रवेश करून त्यांवरहि कडी केली. शिवछत्रपतींनीच हा मार्ग ब्राह्मणांस उपलब्ध करून दिला होता तो पुढें पेशवाईत तसाच चालला. पण ब्राह्मणांच्या या सैन्यप्रवेशामुळें मराठ्यांची सुधारणा करण्यांत त्यांना फारसें यश आलेलें दिसत नाहीं. उलट ब्राह्मणच कांही अंशी खालच्या पायरीवर उतरले असा पुरावा पेशवाईतील इतिहासांत आहे. या गोष्टीचा संबंध पुढील विवेचनांत सतत अंतर्ग्रथित असल्यामुळें येथें त्याचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

---

१२. शि. च. सा. खंड ५ पृष्ठें १७२-१७४

वर केलेल्या विवेचनावरून बाळाजी विश्वनाथ भट हा दौलताबादचा व पुण्याचा सरसुभेदार कसा नेमला गेला असला पाहिजे याची कल्पना येते. संपूर्णपणें न जिंकलेल्या मुलखांत आपले कर वसूल करणारे अधिकारी नेमण्याची पद्धत मराठ्यांनीं शिवाजीपासूनच सुरू केलेली दिसते. राजारामाच्या कारकिर्दीत या गोष्टीला ऊत आला व सबंध दक्षिणचें अफाट क्षेत्र सापडलें. अशा अधिकारावर जे इसम नेमण्यांत येत त्यांची महत्त्वाकांक्षा व स्वातंत्र्यलालसा साहजिकच वाढत गेली, पण त्यामुळें शिवाजीच्या करड्या राज्यपद्धतींत बांधा उत्पन्न झाला. अनेक इसम मोघम सनदा देऊन अधिकारी नेमले, कीं त्यांच्यांत आपापसांत चुरस लागणें व सीमा ठरलेल्या नसल्यामुळें भांडण उत्पन्न होणें अपरिहार्य झालें व या वेळीं सुरू झालेला हा प्रकार अखेरपर्यंत मराठेशाहीस भोवला. माने व घोरपडे, पेशवे व दाभाडे, कवडे व भोसले, कदम व गायकवाड, शिंदे व होळकर, बुंदेले व बर्वे. नारो शंकर व महादाजी गोविंद काकिर्डे, यांची भांडणें व दावे याच प्रणालींतून निर्माण झालेले आहेत व मराठेशाहीचा अर्धाअधिक इतिहास या चुरशींतून व भांडणांतून बनलेला आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांत भांडणें उत्पन्न झालीं व त्यांत पातशाहींतील सरदारांना आपापल्या लाग्याबांध्याप्रमाणें भाग घ्यावा लागला. त्यांत जसे अनेक पातशाही पुत्र पौत्र बळी पडले तसाच अनेक सरदारांचाहि चुराडा झाला. दक्षिणेंत स्वतंत्र राज्य स्थापिण्याची इच्छा मनांत बाळगणारा झुल्पिकारखान प्रथम आझमशहाच्या बाजूस होता. उत्तरेंत जातांना त्यानें शाहूस सोडून देऊन मराठ्यांच्या राजकारणांत नवीन पवित्रा टाकला. त्याचा परिणाम छत्रपतींची मध्यवर्ती सत्ता कायम दुभंगण्यांत व कमकुवत होण्यांत झाला हें स्पष्ट आहे. पुढें आझमशहा युद्धांत मेला तेव्हां झुल्पिकारखानानें जय पावलेल्या बहादुरशहाशीं मिळतें घेतलें व आपली दक्षिणची सुभेदारी कायम ठेविली. स्वतः बादशाही दरबारांत राहिल्यामुळें त्यानें आपला नायब म्हणून दाऊदखान पन्नीस सुभेदार नेमलें. जेव्हां बहादुरशहा दक्षिणेंत कामबक्षावर चालून आला तेव्हां त्याबरोबर झुल्पिकारखानहि दक्षिणेंत आला. तत्पूर्वी त्यानें दक्षिणेंत आपल्या अधिकारास अडचणींचे वाटणारे तुराणी सरदार गाझीउद्दिन,

त्याचा मुलगा चिन्किलिचखान व पुतण्या महमद अमीनखान यांना त्यांच्या दक्षिणेंतील जागांवरून बदलून उत्तरेंत आणण्याची व्यवस्था वजीर मुनीमखान याच्या मदतीनें करविली होती. दक्षिणेंत कामबक्षाविरुद्ध झालेल्या लढाईंत झुल्पिकारखानाकडे डावी बाजू संभाळण्याचा अधिकार दिलेला होता. कामबक्ष हा जिंजीच्या वेढ्यापासून झुल्पिकारखानाचा दावेदार झाला होता म्हणून त्यावर हल्ला करून त्याला प्राणांतिक जखमी करण्यांत झुल्पिकारखानानें कसूर केली नाहीं. कारण तो जगता तर दक्षिणचा सुभा त्याला मिळण्याचा संभव होता. बहादुरशहाची इच्छा आपले भाऊ मारण्याची नसून त्यांना फक्त आपल्या सत्तेखालीं आणण्याची होती. कामबक्षाबरोबरच्या लढाईंत शाहूकडून नेमाजी शिंदे मदतीस आला होता. तो पुढें कां व कसा कोणास ठाऊक, मोगलांकडेच नोकरीस राहून पातशाही मनसबदार बनला. त्याला व त्याच्या मुलास मोठ्या मनसबा व जागिरी मिळाल्या असें ख्राफीखान[१३] सांगतो. पण याचा वंश पुढील काळांत अधिकारावर राहिलेला दिसत नाहीं. झुल्पिकारखानाच्या व सय्यदांच्या बाजूचा म्हणून कदाचित् त्यास पुढें निजामानें बडतर्फी दिली असावी. अशा रीतीनें स्वातंत्र्ययुद्धांत फार मोठा भाग घेतलेला एक पराक्रमी मराठा सरदार मोगलांच्या बाजूस गेल्यामुळें शाहूची बाजू तितकीच खचली. यापूर्वीच नागोजी माने संताजीचा वध करून मोगलांच्या बाजूस जाऊन पुनः परत मराठेशाहींत सामील झाला होता, तसा नेमाजी शिंदे पुनः परत आलेला दिसत नाहीं. बाजीरावाच्या कारकिर्दीत याचा मुलगा महिपतराव[१४] पुनः मराठेशाहींत परत येण्याच्या विचारांत दिसतो.

आपल्या व्याख्यानांचा विषय निजाम–पेशवे संबंध हा असून वरील प्रस्तावनारूप विवेचन अशासाठीं केलें कीं कोणत्या परिस्थितींत या दोन घराण्यांचे संस्थापक वाढले व त्यामुळें त्यांना स्वतंत्र कर्तृत्व करण्याची संधि मिळाली हें कळावें. बाळाजी विश्वनाथ भट व मीर कमरुद्दिन चिन्किलिचखान हे बहुधा समवयस्क असावे. म्हणजे त्यांचा जन्म सन १६७१

---

१३. Elliot and Dowson, History of India, Vol. VII pp. 362, 408, 432, 499.

१४. पेशवे दप्तर ३०, ले. ३०१.

च्या सुमाराचा असून बाळाजीचें वय मृत्युसमयीं ५० हून जास्त नसावें असे आम्हांस त्या काळांतील सामाजिक परिस्थितीचा विचार करतां वाटतें. बाळाजीचें पूर्वायुष्य कोंकणांत गेलें असलें तरी तो स्वराज्यांत लौकरच सामील झालेला दिसतो. श्रीवर्धनास फार तर त्याचें बालपण गेलें असेल, सन १६९६ च्या पूर्वींच तो चिपळुणास घरबांधून छत्रपतींच्या राज्यांत प्रतिष्ठित अधिकारी म्हणून नांदत होता. अर्थात् त्याला मराठेशाहीचें अंतरंग कळण्यास पुरा वाव होता. यानंतर लवकरच किंवा कांहीं काळ पूर्वींहि तो सासवडच्या परिसरांत येऊन राहिला असावा. त्याला सिद्दीच्या राज्यांत राहिल्यामुळें व देशमुखांच्या वतनदार कुळांत जन्मल्यामुळें मुलकी कामकाज तर माहीत होतेंच पण बहुधा थोडा फारशी, उर्दू भाषांशीं परिचय असावा. मराठ्यांचा स्वभाव व त्यांतील व्यंगें त्यास सुपरिचित होतीं असें दिसतें. त्यामुळें या धामधुमीच्या काळांत तो आपला उदय करून घेण्यास लायक असा पुरुष सहजच बनला होता. त्याचें नोकरीनिमित्त पुणे प्रांतीं राहणें त्याच्या चांगलेंच पथ्यावर पडलें. पन्हाळा व सातारा या राजधान्यांच्या परिसरांत न राहतां मोगलाईच्या सीमेवर त्याची स्थापना झाल्यामुळें त्याचा मोगल अधिकाऱ्यांशीं घरोबा व घसट वाढण्यास मदत झाली. यांतूनच त्याचा अडचणींत सांपडलेल्या येसूबाईशीं व शाहूशीं संबंध आलेला दिसतो[१५] व त्यांना उपकृत करून आपल्या विषयीं त्यांच्या मनांत अनुकूल भाव निर्माण करण्याची संधि त्याला सहजच मिळाली. शिवाजीचें ध्येय व त्याची राज्यपद्धति जशी प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिवप्रभृति पुरुषांच्या डोक्यांत पूर्णपणें उतरली होती तशी ती पूर्वायुष्यांत बाळाजीच्या गळीं उतरलेली नव्हती. खेरीज प्रस्थापित राज्ययंत्रांत नव्यानें पुढें येऊन भाग्योदय करून घेऊं इच्छिणाऱ्यास थोडा तरी संधिसाधुपणा करावाच लागतो व तसा तो करण्यास बाळाजीस मनाची आडकाठी मुळांतच असण्याचें कारण नव्हतें, कारण तो पिढीजात नोकर नव्हता. औरंगजेबाच्या या भागांतील संचाराच्या वेळीं तो पुण्याचा सरसुभेदार असल्यामुळें शाहूचें ताराबाईशीं व तिच्या अधि-

---

१५. सनपुरीची बखर पृ. ९–१४. भा. इ सं. मं. तृतीय संमेलनवृत्त बाळाजी विश्वनाथाविषयी नवीन माहिती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28515 वि: 10445 क 9202 नों: दि: 9515166


काऱ्यांशीं होणारे बोलणें सहजच त्याच्या प्रदेशांतून व कदाचित् त्याच्या मार्फतीनेंहि चालू असेल. त्यामुळें शाहूची बाजू व त्याची परिस्थिति तसेंच त्याचा स्वभाव त्याच्या पूर्ण ध्यानांत आला असला पाहिजे. या सर्व गोष्टींचा फायदा त्यास शाहू परत आला तेव्हां मिळाला. राज्याचा वडील वारस म्हणून शाहूस कांहीं लोक सामील होणें क्रमप्राप्तच होतें, त्याप्रमाणें त्यास नेमाजी शिंदे, चिमणाजी दामोदर, अमृतराव कदम बांडे. परसोजी भोसले, हैबतराव निंबाळकर खानदेशांतच येऊन भेटले. त्याचप्रमाणें पुरंदरे व बाळाजी विश्वनाथ यांचेहि संधान शाहूकडे या सुमारास लागलें. मावळांतील प्रभु देशपांडे, शंकराजी नारायणानें त्यांच्या वतनावर आक्रमण चालविल्यामुळें ताराबाईची बाजू सोडून शाहूकडे जमा झाले. एवंच ज्यांना ज्यांना म्हणून कोणत्या ना कोणत्या कारणाने ताराबाईच्या पक्षांत स्थान नव्हतें व तें मिळविण्याची महत्त्वाकांक्षा तर होती, ते सर्व शाहूला मिळाले.

ज्याप्रमाणें शाहूच्या येण्यानें मराठी राज्यांत कायम दुही निर्माण करून ठेवण्याचा मोगलांचा बेत सिद्धीस गेला व मराठे चाकर व्हावयास तयार नव्हते ते पातशाही चाकर बनले[१६] त्याप्रमाणेंच शिवछत्रपतींच्या राज्याचा स्वतंत्र राहून अखिल हिंदुस्थान सोडविण्याचा उद्देशहि मागील वाटेस पडला. आणि त्या ऐवजी मूळ हेतूस बाधक असें संधिसाधुपणाचें व तात्कालिक फायद्याचें धोरण मराठेशाहींत रूढ झाले. तात्यासाहेब केळकरांनी म्हटलें आहे त्याप्रमाणें स्वतः पातशहा होण्याचें धोरण सुटून दिल्लीच्या पातशाहीशीं नोकरीचें नातें कायम ठेऊन कसें वागावयाचें हेंच मराठ्यांचे पातशाही धोरण ठरलें कारण शाहू व्यक्तिशः मनानेंच मोगलांचा उपकारी झाला होता. आजोबांचें ध्येय, धोरण, आकांक्षा यांचा त्याला मुळांतच पत्ता नव्हता व कमकुवत मनाचा असल्यामुळें कोणतेंहि हिंमतीचें डोईजड कार्य स्वतः अंगावर घेण्यास असमर्थ झालेला होता. या त्याच्या दुबळ्या मनाला रियासतकारांनी अहिंसाधर्मांचा पोषाख उगाच

---

१६. मल्हार रामराव चिटणीस, संभाजी व राजाराम चरित्रें—तिसरी आवृत्ति—पृ. ७६-७९

चढविलेला आहे.[१७] अशा यजमानाला योग्य नोकर ताराबाईच्या पक्षांत सांपडणें कठीण होतें. ती जागा बाळाजी विश्वनाथानें भरून काढली. बाळाजीचा पहिला उपकार म्हणजे त्यानें धनाजी जाधवाला परशुरामपंत प्रतिनिधीपासून फोडून शाहूच्या बाजूस आणलें हा होय. राज्याच्या सेनापतीला फितविण्याचा हा पराक्रम मोठा तर खराच, पण त्यामुळें राज्यनिष्ठा सोडून स्वार्थनिष्ठा स्वीकारण्याचा राष्ट्रहानिकारक मार्ग मराठेशाहींत राजरोस व सर्हा सुरू झाला.

बाळाजीनें शाहूचा पक्ष कां धरला? ताराबाईच्याच पक्षाला तो चिकटून का राहिला नाहीं याची चर्चा वृथा आहे. राजवाड्यांनी ५० वर्षांपूर्वीच या गोष्टीची चर्चा एका लेखांत केली आहे.[१८] त्यांत स्पष्टपणें शाहूपेक्षां ताराबाईच्या शिवाजीचा हक्क मराठी राज्यावर अधिक असें जगाच्या इतिहासांतील उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे व विरुद्ध बाजूचे सरदार फितवणें, प्रतिस्पर्धी वारसाला सोयीस्कर रीतीनें वेडसर ठरविणें, हे प्रकार अशा प्रकरणांत नेहमींच अवलंबिलें जातात तेव्हां ते शाहूनें व बाळाजीनें अनुसरले यांत विशेष कांहीं नाहीं असें म्हटलें आहे. पण त्यांच्यानंतर झालेले बाळाजीचे व पेशव्यांचे पाठीराखे बाळाजीच्या या कृत्यांत दूरदृष्टि, राष्ट्राचें हित वगैरे गोष्टींचा अंतर्भाव करितात याचें आश्चर्य वाटतें! तसेंच ताराबाईनें पुढें आपली बाजू घसरत चाललेली पाहून बहादुरशहाकडे तडजोडीसाठीं वकील पाठविले यावरून तिच्याहि मनांत महाराष्ट्रराज्य स्वतंत्र राखावें असें नसून तीहि स्वार्थदृष्ट्या वागत होती असें म्हणणें हेंहि अवास्तव आहे. शाहू परत आला नव्हता किंवा येण्याचा संभवहि तिला वाटत नव्हता तेव्हां तिनें काय वर्तन केलें यावरच तिचा मूळ हेतु ठरविला पाहिजे व ज्याअर्थी तिनें औरंगजेबाशीं तडजोड करण्याऐवजीं निकराचा झगडाच चालविला असें इतिहास सांगतो त्याअर्थी तिच्या हेतूबद्दल शंका राहूंच नये. तसेंच तिनें बहादुरशहापाशीं सुद्धा सर्व दक्षिणेचें **सरदेशमुखीवतन** मागितलें असून शाहूप्रमाणें चौथाईच्या

---

१७. New History of the Marathas Vol. II p. 281.

१८. राजवाडे संकीर्ण लेखसंग्रह लेखांक १५ 'धाकटा शिवाजी व धाकटा रामराजा'

मोबदल्यांत पंधरा हजार स्वारांनिशीं दक्षिणेंतील मोगल सुभेदाराचें रक्षण करण्याची गोष्टहि काढलेली नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.[१९] एवंच शाहूच्या येण्यानें मराठी राज्य मांडलिक झालें ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. अर्थातच यापुढें जे इतिहासलेखक उठल्यासुटल्या पेशव्यांच्या प्रत्येक कृत्यांत हिंदुपदपादशाहीची पूर्तता पाहतात व झाली असें उद्घोषित करतात ते शंभरदां खोटें लिहिल्यानें त्यांतून सत्य निर्माण होतें अशा मताचे असावेत असा निष्कर्ष निघतो. मराठेशाहीचें यापुढील धोरण दिल्लीची इस्लमापदपादशाही कायम ठेवून तीखालीं हिंदूंचीं स्थिति कशी सुधारावयाची एवढेंच राहिलें असें सबंध पेशवाईचा इतिहास सांगतो. असें धोरण नसतें तर निजामाचें राज्य कायम राहून त्यांचे पेशव्यांशीं जे एक शतकभर झगडे चालले त्यांवर लिहिण्याचा प्रसंग आज आम्हावर आलाच नसता.

राष्ट्राचें निश्चित ध्येय ही केवळ अभिमानपोषक, भावनोद्दीपक व शिळोप्याच्या वेळीं मिशीला पीळ देण्यासाठीं उपयुक्त अशीच केवळ गोष्ट नव्हे, तर तीवर राष्ट्राचें भवितव्य किंबहुना स्वतंत्र कायम अस्तित्व अवलंबून राहतें याबाबत आधुनिक समाजशास्त्रकारांचेंहि अनेक मानव-जातींच्या सूक्ष्म अभ्यासानें बनलेलें मत अभ्यासकांस विदित असेलच. यासाठीं पिट्-रिव्हर्स यांचा 'संस्कृतीचा संघर्ष' हा प्रबंध वाचण्याची मी आपणास शिफारस करितों.[२०] ज्या मानवसमूहांना आपलें स्वतःचें स्वतंत्र असे प्राणपणानें राखण्यासारखें कांहीं आहे असें वाटत नाहीं तें राष्ट्र ऱ्हासाच्या मार्गाला लागलें असें खुशाल समजावें. भौतिकबल दृढ करणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि गोष्टी त्या मानवजातीचें स्वतंत्र अस्तित्व जगांत टिकविण्यास समर्थ ठरणार नाहींत. तडजोड हा दुबळ्यांचा, पराभूत झालेल्यांचा मार्ग आहे. अनिर्वाह पक्ष असेल तेव्हांच त्याचा स्वीकार करणें जरूर ठरेल. पण आपल्या स्वतःला तात्पुरतें काम करावयाला लागूं नये, त्रास सोसण्याची जरूरी न पडावी, आपल्या व्यक्तिसुखांत

---

१९. Elliot–Vol. VII–Page 409.

२० *Pitt-Rivers*—The Clash of Culture and the Contact of Races, 1927.

व्य‌यय न यावा म्हणून जी व्यक्ति, जो मानवसमूह, जें राष्ट्र तडजोडीच्या मार्गानें आपलें जीवित जगूं म्हणतें तें जगतीतलावर फार काळ स्वतंत्र म्हणून टिकणार नाहीं असा इतिहासाचा धडा आहे.

सबंध पेशवाईचा इतिहास म्हणजे वचस्येकं मनस्येकं या वचनाचा आविष्कार होय. शाहू छत्रपतीच्या इच्छेनुसार पेशवे आपणास दिल्लीच्या बादशहाचे नोकर म्हणवीत राहिले पण त्या बादशहाचें राज्य लुटण्याचा त्यांचा मुख्य धंदा होता. जर शाहूच्या आज्ञेमुळें बाजीरावानें निजाम उखडून काढला नाहीं असें म्हणावयाचें तर त्याला माळव्यांत पाय पसरण्यास कशी संधि मिळाली? कीं निजामाचें दक्षिणेंतील राज्य तेवढें मोगलांचें व माळव्यांतील किंवा गुजरातेंतील तेवढें इतरांचें समजावयाचें ? शिवाजीनें ही आपत्ति ओळखूनच आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा पुकार सर्वत्र केला होता. म्हणजे केवळ ध्येय म्हणूनच नव्हे तर राज्यव्यवहारांतील धोरण म्हणून सुद्धां स्वातंत्र्याच्या घोषणेचा उपयोग होता. शाहूला यांतील सूक्ष्म भेद कळण्याइतके डोकेंच नव्हतें असें इतिहासावरून दिसतें. जेव्हां कमी बुद्धीचा, दुबळा व भित्रा माणूस राज्यावर येतो तेव्हां पेशवाईसारखा गोंधळ त्यांतून आपोआपच निर्माण होतो. बळानें व साहसानें वरचढ असलेले मराठे वस्तुतः प्रभूच असावयाचे, पण कायदेशीरदृष्ट्या प्रभु न होण्याचा निश्चय त्यांनीं केला. या त्यांच्या धोरणामुळें पेशवाईंत अनेक भानगडी निर्माण झाल्या व मराठ्यांचें राजकारण नासलें हें इतिहासावरून स्पष्ट होतें.

या आणीबाणीच्या व इतिहासाला कलाटणी मिळणाऱ्या काळांत निजामउलमुल्क दक्षिणचा सुभेदार म्हणून महाराष्ट्रांत आला. याला मराठ्यांच्या राज्याविरुद्ध उगवलेला अशुभसूचक धूमकेतु असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. महाराष्ट्राच्या भूगोलाची, जनतेची व राजकारणाची खडान् खडा माहिती असलेला हा पुरुष मराठ्यांना पुरून उरला यांत कसलेंच आश्चर्य नाहीं कारण व्यक्तिदृष्ट्या तो त्याकाळच्या सर्व राजकारणी पुरुषांत श्रेष्ठच होता. याचें चरित्र डोळ्यांसमोर आणलें म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होईल. चौदाव्या वर्षापासून हा स्वतः लष्करी मोहिमांत भाग घेऊं

लागला. १६८४ सालीं पुणें व सुपें या भागांत त्याची धाड आली होती व त्याला शंभर स्वारांची मनसबहि याच वेळीं मिळाली. औरंगजेबाच्या निकटवर्ती माणसांत त्याची योजना असल्यामुळें मुसलमानी धर्म, धोरण, राजनीति यांचें धडे त्याला या महागुरूकडून मिळाले. सात वर्षें दक्षिणेंत तुंगभद्रातीरापर्यंत सर्वत्र संचार केल्यामुळें १६९१ सालीं त्याला चिन्किलिचखान ही पदवी मिळाली व या नांवानेच तो मराठ्यांच्या इतिहासांत पुष्कळसा माहीत आहे. १६९३ सालीं तो पन्हाळा व कराड या भागांत स्वारीवर होता. त्याचा बाप गाजीउद्दीन औरंगजेबाच्या विश्वासांत असून बादशहाच्याच जातीचा होता. निजामाची आई ही शहाजहानचा प्रख्यात वजीर सादुल्लाखान याची मुलगी असल्यामुळें दिल्लीच्या तुराणी सरदारांत त्यास मानाचें स्थान होतें. एकुलता एक मुलगा असूनहि त्याचें बापाशीं पटत नव्हतें, तें औरंगजेबाच्या करड्या वागणुकीमुळें त्याला पटवून घ्यावें लागलें. १६९८ त तो विजापुराजवळ असून पुढल्या वर्षीं त्यास तीन हजारी मनसब मिळालीं. १७००–१७०१ सालीं परळी व सातारा किल्ला घेण्यांत तो औरंगजेबाबरोबर होता. त्या सालीं त्याला विजापूरचा फौजदार नेमून औरंगजेबानें त्याची मनसब ३६०० स्वारांची केली. पुढच्या वर्षीं तो विजापूरचा सुभेदार व तळकोंकण, बेळगांव आणि संपगांव याचा फौजदार झाला व त्यास चार हजारी मनसब मिळाली. १७०४ सालीं त्याला मुद्गल व नुसरताबादचीहि फौजदारी मिळाली. १७०५ सालीं वाकिनखेड्याच्या वेढ्यांत तो असून पंचहजारी झाला. औरंगजेबानंतर त्याच्या मुलांत जी यादवी सुरू झाली त्यांत त्यानें किंवा त्याच्या बापानें धूर्तता राखून मुळींच भाग घेतला नाहीं. बापाची बदली झुल्पिकारखानानें अहमदाबादला करविली व तेथेंच तो आंधळा सुभेदार १७१० सालीं वारला. त्याची संपत्ति मोगली पद्धतीप्रमाणें सरकारजमा झाली व त्यामुळें निजाम या काळापासून स्वतःच्याच पायावर उभा राहूं लागला. बहादुरशहानें झुल्पिकारखानाच्या सांगण्यावरून या सर्व तुराणी सरदारांची दक्षिणेंतून उत्तरेंत बदली करविली तेव्हां चिन्किलिचखान अयोध्येचा सुभेदार नेमण्यांत आला व त्याचा किताब खानदौरांबहादुर झाला. १७०८ ते १७११ या तीन वर्षांत तो असंतुष्ट असून त्याचें झुल्पिकारखानापुढें कांहींहि चालत नव्हतें व त्यामुळें आपल्या जागेचा राजिनामा देऊन तो

कांहीं काळ दिल्लीस घरीं बसला. तरीहि त्याची योग्यता अशी मानली जात असे कीं त्याला चार हजार रुपये वर्षासन घरबसल्या देण्यांत आलें. बहादुरशहाच्या कारकिर्दीच्या अखेरीस तो पुनः सातहजारी सरदार म्हणून कामावर रुजु झाला व त्याचा किताब बापाप्रमाणें गाजीउद्दीनखान बहादूर फिरूझजंग असा झाला. बहादुरशहाच्या मरणानंतर त्यानें राजपुत्र अझीमुश्शानची बाजू घेऊन हालचाल करण्याचा प्रयत्न केला. पण तो राजपुत्र मारला गेल्यामुळें त्याला पुनः घरीं बसावें लागलें. वस्तुतः या वेळीं त्याला झुल्पिकारखानाकडून शासनच व्हावयाचें, पण झुल्पिकार-खानाच्या हाताखालील अब्दुस्समदखान हा त्याचा पाठीराखा असल्यामुळें तो जिवानिशीं सुटला. १७१२ सालीं जहांदरशहाच्या छोट्या कारकीर्दीत तो आग्र्याचा किल्लेदार होता. तेथें त्यानें झुल्पिकारखानाविरुद्ध फर्रुखशि-यरच्या पक्षास सहाय्य केलें म्हणून त्याला नव्या राजवटींत दक्षिणचा सुभेदार नेमण्यांत येऊन त्याची किताबत खानखानां निजामउल्मुल्क बहादुर फत्तेजंग अशी चढविण्यांत आली. १७१३ च्या जूनमध्यें तो बुऱ्हाणपुरास येऊन दाखल झाला आणि येथपासून त्याचा बाळाजी विश्वनाथ व शाहू यांच्याशीं संबंध आला.[२१]

सन १७०७–१७१३ हीं सात वर्षें शाहूला आणीबाणीचीं गेलीं. केवळ बादशाही सनदेच्या पाठिंब्यामुळें व बाळाजी विश्वनाथाच्या हिंमती–हिकमतीमुळें त्याचा कसाबसा टिकाव लागला. शाहूकडे गेलेले आपले सरदार परत आणण्याची ताराबाईनें जोरानें खटपट केली.[२२] त्याप्रमाणें सेनापति चंद्रसेन जाधव १७११ सालीं तिच्याकडे परत आला. रंभाजी निंबाळकर सुद्धां त्यास मिळाला. हे सरदार यावेळीं मोगल सुभेदाराच्या मदतीनें ताराबाईची बाजू वरचढ करण्याचा प्रयत्न करीत होते. थोरात बंधूहि याचवेळीं ताराबाईची बाजू घेऊन शाहूला स्वराज्याचा ताबा घेण्यांत अडथळा करूं लागले. अशा वेळीं निजामउल्मुल्क वर सांगितल्याप्रमाणें दक्षिणेंत येऊन थडकला. त्याचा बेत औरंगजेबाची शिस्त चालविण्याचा

---

२१ Nizam-ul-mulk Asaf Jah I By Y. H. Khan Chapter II. Later Mughals, Vol. I By Irvine pp. 268-272.

२२. राजवाडे खंड ८ ले. ६८; ऐतिहासिक पत्रव्यहार ले. ५.

असून झुल्पिकारखान व त्याचा नायब दाऊदखान पन्नी यांनीं मराठ्यांशीं जें संगनमत चालविलें होतें त्याविरुद्ध होता. चौथाई सरदेशमुखी कबूल करणें म्हणजे मोगल राज्याच्या पायावर कुऱ्हाड घालून घेणें आहे हें तो ओळखीत होता. फर्रुखशियर बादशहानें झुल्पिकारखानास देहांत प्रायश्चित्त दिल्यामुळें त्यानें अवलंबिलेला मार्ग सोडून देण्यास निजाम यावेळीं मोकळा झालेला होता. तसेंच या वेळीं बादशहाचे कारभारी बनलेले सय्यदबंधू हेहि अशाच मताचे होते. शाहूची नोकरी सोडून गेलेले चंद्रसेन, नेमाजी, रंभाजी प्रभृति प्रबळ सरदार त्यानें हाताशीं धरून, बद्धमूल झालेले मराठ्यांचे सरसुभेदार व कमाविसदार हुसकून देण्याचा उपक्रम आरंभिला. त्याच्या प्रयत्नास बरेंच यश येऊन गोदावरीच्या काठीं मराठ्यांचा बसलेला जम पार ढासळून गेला. औरंगाबादेच्या परिसरांत निजामाने मराठ्यांची बहुतेक हकालपट्टी केली.[२३] निजामाचा नातेवाईक सरदार तुरुकताजखान हा यावेळच्या धामधुमींत त्याचें साह्य करीत होता. तसेंच पुढें निजामशाहींत पुष्कळ दिवस प्रसिद्ध असलेला गियासखान हाहि या वेळेपासून दक्षिणेंत वावरतांना दिसतो. त्यांनीं मराठ्यांच्या चौथाईसरदेशमुखीचें बंड उखडून काढण्याचा चंग बांधला. मराठ्यांनीं त्याचा प्रतिकार चालविला, पण निजाम मराठ्यांच्या सर्व लटपटीखटपटीस पुरून उरला. निजामाच्या यावेळच्या सुभेदारीच्या काळांतच बाळाजी विश्वनाथास ता. १७ नोव्हेंबर १७१३ रोजी शाहूनें पेशवाईपद दिलें व नंतर जुलै १७१४ च्या आरंभीं ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी यांस पन्हाळ्यावर कैद होऊन राजसबाईचा मुलगा संभाजी गादीवर आला व त्यानें रामचंद्रपंत अमात्यास पुनः अधिकारावर आणलें. यापूर्वीच्या कांहीं काळांत रामचंद्रपंत ताराबाईच्या इतराजींतच होता; निदान विश्वासांत नव्हता. या अंतस्थ घडामोडींची ऐतिहासिक सरणि अजून समाधानकारक रीतीनें लागलेली नाहीं. कोल्हापुरच्या राज्यक्रांतींत रामचंद्रपंताचा हात असणें जसें संभवतें त्याप्रमाणेंच शाहू व बाळाजीचेंहि त्या कारस्थानांत अंग असावें असा संशय येण्यास जागा आहे व राजवाड्यांनी चौपन्न वर्षांपूर्वींच आपल्या लेखांत (टीप १८) तसें स्पष्ट म्हटलेंहि आहे. आपल्या प्रतिस्पर्ध्यास गोत्यांत

---

२३. राजवाडे ८ ले. ७५.

आणण्यासाठीं असें कारस्थान शाहू व बाळाजीच्या मदतीनें घडलें असणें शक्य आहे. रामचंद्रपंताचें मत शाहू मराठ्यांचा राजा नसावा असें नव्हतें. मात्र त्यानें मोगलांचें मांडलिकत्व स्वीकारूं नये एवढीच त्याची इच्छा होती. शाहूचे पाठीराखे सरदार चौथाईच्या उत्पन्नावर जगत असल्यामुळें निजामाचा चौथाई न देण्याचा उपक्रम त्यांच्या मुळावर आला. अर्थात् ते या वेळेपुरते बादशहाच्या दक्षिणेंतील प्रतिनिधीचे विरोधी बनले व एवढ्यापुरती त्यांची रामचंद्रपंताच्या मताशीं एकवाक्यता झाली. म्हणून त्याला मोकळें करून अधिकारावर आणण्यांत त्यांचा हात असेल असा सुप्रतिष्ठित तर्क करतां येतो. रामचंद्रपंतांच्या शाहूकडे केलेल्या मागण्यांबद्दल जो बिनतारखेचा कागद अमात्यांचे दप्तरांत सांपडला आहे तो या पुढील काळांतला म्हणजे सन १७१३ सालचा मानला म्हणजे त्यांतील अटींचा उलगडा होण्यास मदत होते.[२४] रामचंद्रपंत नजरकैदेंतून सुटून पुनः राजकारणांत लक्ष घालूं लागलेला दिसतो. कान्होजी आंग्र्यानें बहिरोपंत पिंगळ्यास कैद करून शाहूवर बाका प्रसंग आणला त्यावेळीं रामचंद्रपंताचा शाहूकडे जाऊन व तेथें सर्वाधिकारी होऊन मराठेशाहीची पुनर्रचना स्वातंत्र्याच्या मूळ पायावर करण्याचा विचार दिसतो. पण मराठ्यांच्या दुर्दैवानें हा घाट पुढें कोणत्या तरी अज्ञात कारणामुळें कोसळून पडला असावा. अर्थात् पंताला संभाजीला गादीवर आणून कोल्हापुराहूनच कांहीं नवीन घटना घडवून आणण्याचा मार्ग स्वीकारावा लागला. या नवीन उपक्रमास आवश्यक म्हणून शिवाजीची राजनीति लेखनाविष्ट करून १८ वर्षांच्या संभाजीस पढविण्याची योजना त्यानें आखलेली दिसते. शिवाजीच्या ह्या अमोल राजनीतीची माहितीहि पेशवाईंत कोणास झालेली दिसत नाहीं कारण तिची प्रत अन्यत्र कोठें सांपडत नाहीं. पंताचें गाढ ज्ञान व पोक्त अनुभव पन्हाळ्याच्या त्याच्या समाधींत गाडलीं गेलीं. त्यांची खबर गगनबावड्याच्या दप्तरांतील राजनीतीची प्रत कोणा सारस्वत कारकुनाकडून मुंबईस जाऊन विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध होईपर्यंत महाराष्ट्रास नव्हती. हेंच काय, प्रसिद्ध होऊनहि तिचें महत्त्व लक्षांत येण्यास आणखी साठ वर्षें जावीं लागलीं, इतकी पेशवाईनें दिलेल्या कलाटणीमुळें

---

२४. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २ पृष्ठें ७३-८५.

मराठ्यांची बुद्धि कलुषित व मंद झाली होती. राजवाड्यांसारख्या तल्लख बुद्धीच्या व स्वाभिमानी माणसाच्या मनांतहि ती भरूं शकली नाहीं हा याबाबत सर्वांत मोठा पुरावा आहे.

असें असलें तरी राजवाड्यांनी आपल्या दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत शाहूच्या प्रत्यागमनानें मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत दोन नवीन तत्वें शिरलीं हे निःसंदिग्ध रीतीनें मान्य केलें आहे. तीं म्हणजे ( एक ) भोसल्यांना दिल्लीच्या पातशहाचें अंकितत्व प्राप्त झालें व ( दोन ) सरंजामी जागिरीची पद्धत महाराष्ट्रांत नव्यानेंच उद्भवली. तसेंच रामचंद्रपंत अमात्यप्रभृति जीं माणसें ताराबाईच्या पक्षाला चिकटून राहिलीं "त्यांना दिल्लीपतीचें अंकितत्व बिलकुल पसंत नव्हतें व जहागिरी मिळविण्याची विशेष हाव नव्हती" असेंहि त्यांनी स्पष्ट लिहिलें आहे. "शिवाजीनें व राजारामानें घालून दिलेला कित्ता त्यांना सर्वस्वी गिरवावयाचा होता. ताराबाईला व तिच्या सरदारांना यश येतें तर शिवाजीनें स्थापिलेल्या स्वराज्याचें फारच हित होतें. परंतु मोठ्या जहागिरींच्या लालुचीनें शाहूच्या पक्षाला मिळालेल्या सेनापतिप्रभृति बड्याबड्या सरदारांच्यापुढें ताराबाईसारख्या स्त्रीचें व तिच्या लहान सरदारांचें तेज पडलें नाहीं व महाराष्ट्र राज्य यवस्थेंत **बेबंदशाहीचे बीज अप्पलपोटेपणाच्या तडाख्यांत कायमचें पेरलें गेलें** असेंहि राजवाड्यांनी ठणठणीत म्हणून ठेवलें आहे."[२५] तत्वासाठीं लहानपण पत्करणाऱ्या या माणसांस राज्याच्या खऱ्या वारसाविरुद्ध उठल्याचा व पातशाही सनदा न जुमानण्याचा दुहेरी आरोप सहन करावा लागला व शाहूचे बखरकार ह्या सरदारांना पुंड बंडखोर अशा संज्ञाहि पातशाही सनदेच्या जोरावर लावूं लागले, असा उलटा न्याय इतिहासाभ्यासकास अनुभवास येतो.

या एकंदर बनावाचा मराठे लोकांची तीन छकलें होण्यांत परिणाम झाला. चंद्रसेन, रंभाजी, नेमाजीप्रभृति मोठे सरदार महाराष्ट्राच्या पूर्वभागांत निजामाचे अंकित होऊन मोगली राज्याचे कायम पाठीराखे बनले. दुसरा गट पेशव्यांच्या नेतृत्वाखालीं मध्यमहाराष्ट्रांत राहिला आणि

---

२५ राजवाडे खंड २ पृष्ठ ८.

तिसऱ्या गटांत वारणेपासून तुंगभद्रेपर्यंत जाऊन राहिलेले मराठे सामील झाले. या तीन पक्षांच्या संघर्षानेंच मराठेशाहीचा १८ व्या शतकांतील इतिहास बनलेला आहे.

अशा स्थितींत पेशव्यांच्या १८ व्या शतकांतील राजकारणाची दिशा आपोआपच ठरून गेली. त्यांचे यश ज्या प्रमाणांत ते दुसऱ्या दोन बाजू कमकुवत किंबहुना नष्ट करूं शकतील त्यावर अवलंबून होतें. ज्या अर्थी शतकाच्या झगड्यानंतर त्यांना हे दोन गट नष्ट करण्यांत यश लाभलें नाहीं त्या अर्थी त्यांच्या धोरणांत मुळांतच कोठें चूक होती असेंच इतिहासास म्हणावें लागेल. ही चूक म्हणजे शाहूच्या इच्छेस अनुसरून कायम दिल्लीपतीचें अंकितत्व कबूल करणें व चालू ठेवणें हीच होय. या ध्येयामुळें दिल्लीपतीच्या सार्वभौमत्वाचा ताबा जेव्हां इंग्रजांनीं घेतला तेव्हां मुळांतच मांडलिक असलेला निजाम व पेशव्यांशीं सदा बाकून वागणारे कोल्हापुरकर त्यांच्या छत्राखालीं जाऊन कारपर्यंत जगले. पण चुकीचें धोरण स्वीकारणारे पेशवे मात्र दीडशें वर्षांपूर्वींच या नव्या सार्वभौमसत्तेचे आपोआपच मांडलिक ठरून अखेरीस नष्ट झाले! चुकीचें धोरण व ध्येय राष्ट्रास भोवल्याचें याहून चांगले उदाहरण बहुधा आढळणार नाहीं. ‘मराठा तितुका मेळवावा’ हा रामदासांनी दिलेला तंत्र शाहूच्या प्रत्यागमनापर्यंत अनुसरला गेला व त्यामुळें मोगल बादशाही खिळखिळी झाली. पण ही खिळखिळी बादशाहीहि पूर्ण मोडण्याचें श्रेय पेशव्यांना मिळवितां आलें नाहीं. तें अखेर परक्या इंग्रजांनीं मिळविलें. पेशव्यांचे घोडे अटकेपार पेशावरास मोगल बादशाहीचा शत्रु अहमदशहा अब्दाली यास मोडण्यास त्याच्या पाठीवर गेले व या उच्छृंखल पराक्रमाचा प्रत्याघात म्हणून पानिपत करून पळत परत आले. पण उदगीरच्या लढाईत दुखविलेला निजाम पुरा नेस्तनाबूत करून शत्रुशेषहि शिल्लक ठेवूं नये ही पुराणी नीति अंमलांत आणण्याचा विचार पेशव्यांस शिवला नाहीं. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत शिंदे, जाधव, निंबाळकर, आटोळे, पांढरे मोगलाईत गेले. बाजीरावाच्या कारकीर्दींत चिमणाजी दामोदर, सेनापति दाभाडे, सरलष्कर सुलतानजी व छत्रपति संभाजी निजामाचे सहाय्यक झाले. नानासाहेबाच्या काळीं खुद्द छत्रपति ताराबाई तसेंच दाभाडे, गायकवाड, पवार, रघूजी

भोसले, बाबूजी नाईक हेच काय पण खुद्द पेशव्यांचे नोकर मल्हारजी होळकर व जयाप्पा शिंदे, हेहि निजामाशीं कारस्थान करून त्याच्या बाजूस जातील असें भय पेशव्यास वाटत राहिलें.[२६] यावरून मराठ्यांना पेशवाई मानवली होती असें कसें म्हणावें ?

निजामाची दक्षिणेंतील सुभेदारीची पहिली कारकीर्द दीड वर्षांतच संपली. पण तेवढ्या अवधींत त्यानें १७०७ सालीं असलेली दक्षिणेची स्थिति पार बदलून टाकली व मराठ्यांच्या सत्तेस पायबंद लावण्यांत यश मिळविलें. त्याच्या मागून सय्यद हुसेनअली दक्षिणचा सुभा होऊन आला. त्याची परततांना निजामानें तो चार मैलांवरून चालला असतांना सुद्धां गांठ घेतली नाहीं.[२७] इतकें या दोघांत वैमनस्य व तिरस्कार उत्पन्न झाला होता. सन १७१५ पासून १७२४ पर्यंतची नऊ वर्षे सय्यदबंधू व त्यांचे हस्तक यांच्याशीं झगडण्यांत निजामास घालवावीं लागलीं. या काळांत सहजच बाळाजी विश्वनाथाला वेगळें धोरण स्वीकारावें लागलें. हुसेनअलीनें तीन वर्षे निजामाचें अनुकरण करून मराठ्यांना ताब्यांत आणण्याचा प्रयत्न केला. पण तो मराठ्यांनीं हाणून पाडला. हुसेन-अलीस निजामाइतकी दक्षिणची व मराठ्यांची माहितगारी नव्हती. त्यामुळें तो मराठ्यांचा गनिमी कावा पाहून कुंठित झाला व त्यानें बाळाजीशीं संगनमत केलें. कारण दोघेहि समदुःखी होते. जशी बाळाजीची स्थिति महाराष्ट्रांत तो नवथर प्रधान झालेला असल्यामुळें डळमळीत होती, त्याप्रमाणेंच सय्यदबंधूना नवे उपटसुंभच म्हणून बादशाहींतील जुने पिढी-जात सरदार समजत होते. बाळाजीला कान्होजी आंग्र्याविरूद्ध न लढतां यश मिळवितां आलें. परंतु इतर ठिकाणीं तसें घडलें नाहीं. दमाजी थोरातानें तर ताराबाईचा पक्ष पुढें चालवून बाळाजीस त्याच्या कुटुंबासह कपटनीति आचरून कैद केलें, व झडप घालून शाहूचा दुसरा प्रधान नारो शंकर सचिव यासहि आपल्या बंदींत घालून खंडणी घेतल्याखेरीज त्यास तो सोडीना. या संकटांतून बाळाजीनें हुसेनअलीच्या सहाय्यानें

---

२६. पुरंदरे दप्तर भाग १ ला ले. २८७.

२७. Irvine–Later Mughals Vol. I. P. 328,

आपली मुक्तता करून घेतली. यावेळीं मराठ्यांजवळ तोफखाना नव्हता. तो मोगलांकडून आणून त्यानें दमाजीची हिंगणगांवची गढी जमीनदोस्त करविली व दमाजीला पकडून शाहूच्या कैदेंत आणला. अर्थात् या उपकाराबद्दल त्याला हुसेनअलीच्या मदतीस ससैन्य दिल्लीस जाण्याचे कबूल करावें लागलें. हुसेनअलीनें बादशहाकडून शाहूस दक्षिणेंतील सहा सुभ्यांच्या चौथाई सरदेशमुखीचे हक्क मंजूर करून देण्याचें अंगावर घेतलें. व अशा रीतीनें मराठ्यांचे पाय एकदां दिल्लीस लागले. या स्वारीचा इतिहास इतिहासवाचकांस सुज्ञातच आहे. त्याची पुनरावृत्ति येथें करण्याचे प्रयोजन नाहीं. या स्वारीसंबंधानें मराठ्यांच्या राज्यघटनेच्या दृष्टीनें एवढेंच लक्षांत ठेवावयाचें कीं, बाळाजी विश्वनाथानें ज्या स्वराज्याच्या म्हणून सनदा आणल्या त्या "साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या" म्हणजे इंग्रजी भाषेंत "डोमिनिअन स्टेटस्"च्या सनदा होत्या. शाहूचा वकील सेवक म्हणून बादशहाच्या दक्षिणेंतील प्रतिनिधीस म्हणजे निजामास मोठ्या आदबीनें अर्ज करून चौथाईसरदेशमुखीचे हक्क मिळवतांना दिसतो. त्याबद्दल शाहूनें बादशहास पेशकश कबूल केली आहे व या हक्कांच्या मोबदल्यांत दक्षिणेंतील पुंड व चोर यांचा बंदोबस्त करून १५००० स्वारांनिशीं दक्षिणच्या पातशाही सुभेदाराची म्हणजे निजामाची कायम नोकरी करावयाची आहे.[२८] अर्थात् या कराराप्रमाणें इमानेंइतबारें वागावयाचें तर दक्षिणेंतील मोगली राज्य कायम राखावयाचें अशी कबूली मराठ्यांनीं दिली. शाहूनें ही कबूली अगदीं मनापासून ईश्वरास स्मरून दिली याचा पुरावा हाच कीं, शाहूनें आपलें स्वतःचें नाणें पाडलें नाहीं. पेशवाईंतील सर्व रुपये मोगल बादशहांच्या नांवानें वर फारसी अक्षरें कोरून पाडण्यांत येत असत. पेशव्यांच्या मनांत हें मांडलिकत्व पुढें कधीं झुगारून द्यावयाचें असें असल्यास तशी कृति त्यांच्या हातून कधीं कोणत्याहि बाबतींत घडली नाहीं असें पेशवाईचा इतिहास बोलतो.

बाळाजी विश्वनाथानें सय्यदबंधूंस मदत करून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा आणल्या, त्या त्यांनी रफिउद्दर्जात या जवळजवळ

---

२८. पारसनीस-तह व करारमदार ले. १-५.

बंदिवान असलेल्या बादशहाच्या नांवे दिलेल्या होत्या. फर्रुखशियर या अधिकृत बादशहास पदच्युत करण्यांत हुसेनअलीस बाळाजीनें यावेळीं मदत केली होती. ही गोष्ट निजामप्रभृति खानदानी मोगल सरदांरास अत्यंत वैषम्य वाटणारी होती, कारण फर्रुखशियर हा दिल्लींत लोकप्रिय होता व सय्यदबंधूंची सत्ता कमी करण्याच्या खेरीज त्यानें कोणतेंहि दुष्कृत्य केलें नव्हतें. हे सय्यदबंधू कट्टर मोगलांपेक्षा कांहीं थोडे हिंदूंच्या बाजूचे होते. म्हणजे त्यांचा बाह्य रिवाज हिंदी मुसलमानांप्रमाणें असून त्यांचे कारभारी रतनचंदप्रभृति हिंदूच होते. ते स्वत: हिंदूंच्या वसंतपंचमी, होळी वगैरे सणांत भाग घेत व मीठमोहरी ओवाळून टाकणें यासारख्या हिंदु समजुतींना अनुसरून वर्तन करतांना आढळत.[२९] व त्यांतील वडील भाऊ अब्दुल्ला कुत्बुलमुल्क वजीर हा तर हिंदु संस्कृतज्ञ पंडितांचा आश्रयदाता दिसतो. कारण लक्ष्मीधर नांवाच्या एका कवीनें या अब्दुल्लाचें चरित्र संस्कृतांत लिहिलें आहे. हा लक्ष्मीपति उर्फ लक्ष्मीधर दक्षिणी ब्राह्मण असणें संभवतें, कारण त्याच्या वडील भावांची नांवें श्रीनिवास, वीरेश्वर अशीं आहेत. आपल्या काव्यांत हा साहजिकच अब्दुल्लाची स्तुति व किलिचखान उर्फ निजाम याची निंदा करतो व याच्या काव्यांत ( श्लोक ७६ ) पंडितखाना हा शब्द बंदीखाना या अर्थी योजिलेला आहे तोहि याबाबत सूचक वाटतो.[३०] कारण हा शब्द या अर्थीं आम्हास फक्त दुसऱ्या एकाच ठिकाणीं आढळांत आला आहे व तें ठिकाण म्हणजे निजामुल्मुकाचा नासीरजंगास मृत्युसमयीं केलेला उपदेश उर्फ मृत्युपत्र हें होय.[३१] फारसींत बंदीखान्यास आदबखाना उर्फ सद्वर्तन शिकविण्याचें घर असें म्हणतात व याचें भाषांतर मराठींत ज्ञानमठ असें केलेलें आढळतें. म्हणजे त्याकाळांतील कारागृह ही जागा आजच्या रिफॉर्मेटरी उर्फ सुधारणाशालेसारखी मानीत हेंहि स्पष्ट होतें, आणि यावरून अनुमान काढावयाचें तर पौर्वात्य पद्धति बंदिवानांच्या बाबतींत तत्कालीन यूरोपीय पद्धतिपेक्षां जास्त माणुसकीची होती असें म्हणावें लागतें. अस्तु.

---

२९. Irvine–Later Mughals Vol. II. p. 100

३०. Abdullāh–Carita by Lakṣmīpati. Calcutta 1948.

३१. Nizam-ul-mulk Asaf Jāh I by Y. H. Khan p. 289.

या सर्व बनावाचा परिणाम अर्थातच कट्टर मुसलमानांना दुखविणारा झाला व औरंगजेबशिष्य निजाम हा मराठ्यांचा कायम प्रतिस्पर्धी बनला. मराठ्यांच्या फौजेच्या मदतीने दिल्लीच्या बादशहांची बडतर्फी बहाली व्हावी हें दिल्लीच्या मुसलमानांस साहजिकच दुःसह दृश्य होतें. मुसलमानांच्या आपसांतील भांडणांत हिंदु हे अखेरचा निकाल ठरविणारे ठरावे हें मुसलमानी भारतीय नीतीच्या मुळावर येणारें आगामी संकट आहे हें निजामानें ओळखलें व म्हणून आपल्या भारतांतील सत्तेच्या रक्षणार्थ सरहद्दीपलीकडील मदत बोलावण्याची क्लृप्ति त्याला सुचली. नादिरशहाला निजामानें बोलाविलें असा जो इतिहासांत एक तत्कालीन समज आहे तो वरील विवेचनावरून दृढ होतो. पुढें अहमदशहा अबदालीस आमंत्रण देण्यांत तर नजीबखानप्रभृति मुसलमानांबरोबर बिजेसिंग, माधोसिंग हे जोधपूरजयपूरचे राजेहि सामील झालेले दिसतात. एवंच हा उपक्रम परिणामावरून मराठ्यांना हितकर झाला नाहीं हें उघड दिसतें.

मराठ्यांच्या राजकारणावर याचा परिणाम घटनादृष्ट्या विघातक ठरणारा झाला. ज्या रफिउद्दर्जात नामक नामधारी बादशहाच्या नांवे बाळाजीला सनदा मिळाल्या, त्याचें नांवच पुढें तैमूरवंशजांच्या बादशाही यादींतून गाळण्यांत आलें.[३२] रफिउद्दर्जात व त्याचा भाऊ रफिउद्दौला यांच्या कारकीर्दी फक्त आठ महिन्यांत खलास झाल्या व त्यांच्या मागून जो महमदशहा गादीवर आला त्याची कारकीर्द फर्रुखशियरच्या पदच्युतिदिनापासून मोजण्यांत आली. म्हणजे कायदेशीर दृष्टीनें पाहतां बाळाजीच्या सनदा फोल ठरल्या. याचा फायदा घेऊन शाहूनें वास्तविक दिल्लीच्या बादशहाचें स्वामित्व साफ झुगारून दिलें पाहिजे होतें, कारण शाहूची माता येसूबाई व तिच्या बरोबर दिल्लींस बंदींत असणारे नोकर यांना सोडवून आणण्यासाठीं बाळाजीची स्वारी आवश्यक होती असें मानलें तरी दगडाखालीं सांपडलेला तो हात आतां सुटला असल्याकारणानें नाजुक अडचणीमुळें कबूल करण्यांत आलेला करार पाळण्याचें नैतिक बंधन मराठ्यांना उडवितां येण्यासारखें होतें. खेरीज सनदांनीं मिळालेले सर्व हक्क अखेर पेशव्यांना मोगल अधिकाऱ्यां-विरुद्ध लढूनच खरे करून घ्यावे लागले. ते कधींहि बिनबोभाट वसूल

३२. Later Mughals by Irvine Vol. II P. 2.

करतां आले नाहींत. जी गोष्ट युद्धानें मिळवावयाची तिच्याबद्दल सेवकभाव मिरविण्यांत भूषण तें कोठलें व या वर्तनाची सयुक्तिकता तरी काय? पण सबंध पेशवाईंत राज्यशासनशास्त्राचा अभ्यास व तदनुरूप वर्तन अत्यंत ढिलीं दिसतात. पुढें जेव्हां निजाम पुनः दक्षिणेचा सुभेदार सय्यदांविरुद्ध बंड करून झाला तेव्हां त्यानें नष्ट बादशहाच्या फर्मानास अनुसरून मराठ्यांस मिळालेले चौथाईसरदेशमुखीचे हक्क नाकबूल केले असले तर तें बेकायदेशीर असें म्हणणें कठीण होतें. या वेळीं बाळाजी विश्वनाथ मरून तरुण बाजीराव त्याच्या जागीं मुख्य प्रधान झाला होता. बापाबरोबर दिल्लीची सफर करून आलेला असल्यामुळें बाजीरावास मध्यवर्ती मोगल राजकारणाची प्रत्यक्ष माहिती झालेली होती. पण तिचा फायदा घेऊन तो स्वतंत्र धोरण आंखतांना आरंभीच्या सहा वर्षांत तरी दिसत नाहीं. याचें पहिलें कारण एक तर तो वयानें इतर प्रधानांपेक्षां लहान होता व त्याचें शाहूच्या दरबारीं नीट बस्तान तोंवर बसलें नव्हतें. आपल्या पाठीराख्या हित-कर्त्यांच्या अल्पवयी मुलाला शाहूनें मुख्यप्रधान नेमलें तरी या कृत्यांत त्याला दरबारांतील इतर प्रधानांचा फारसा पाठिंबा नसावा असें पुढील बनावावरून स्पष्ट दिसतें. स्वतः बाजीरावाचें वर्तन पाहिलें तर तेंहि या वेळीं एखाद्या नवशिक्यासारखें नरमाईचे दिसतें. जो बाजीराव बाळापूरच्या लढाईत सय्यद आलम अलीबरोबर होता तो त्याचा पराभव होतांच वरमलेला दिसतो व पुढें त्यानें १७२१ च्या आरंभीं निजामाची भेटहि घेतली. निजामानें यावेळीं पुनः मराठी राज्याचे खरे वारस कोण हा मुद्दा पुढें आणला व चंद्रसेनामार्फत कोल्हापूरकर संभाजीस शाहूविरुद्ध उठविलें. यावेळीं शाहू एकट्या बाजीरावाच्या सल्ल्यानें वागत नसून त्याचे सल्लागार प्रतिनिधि, सुमंत, नारो राम मंत्री, चिमणाजी दामोदर, खंडो बल्लाळ चिटणीस, खंडेराव दाभाडे प्रभृति होते.

आरंभींच्या चार वर्षांत बाजीराव निजामाशीं अगदीं दबून भिऊन वागतांना दिसतो. या काळांत त्यानें निजामाची भेट तीनदां घेतली.[३३] १७२० सालीं निजाम दक्षिणेंत येऊन इकडे दीड वर्ष राहिला व त्यानें या अवधींत सय्यदबंधूंचा दक्षिणेंतील पक्ष मोडून टाकला. त्यांत शाहूच्या

३३. सरदेसाई—मराठी रियासत (५) 'बाजीराव' पृ० ३६

पक्षालाहि माघार घ्यावी लागली. सन १७२२-२३ हीं सालें निजामानें दिल्लीचा वजीर म्हणून उत्तरेंत घालविलीं. या अवधींत त्यानें दक्षिणेप्रमाणें गुजरात व माळवा हे सुभे आपल्या सत्तेखालीं आणण्याचा प्रयत्न करून पाहिला पण तो साधला नाहीं. बादशहाशीं सुद्धां त्याचे पटलें नाहीं कारण बादशहा वेश्या, फकीर व खुषमस्कऱ्ये यांच्या कह्यांत गेला होता व त्यांच्या संगतींत निजामाचा पदोपदी पाणउतारा होऊं लागला. म्हणून कंटाळून वजीरी सोडून निजाम १७२४ च्या आरंभीं दक्षिणेंत यावयास निघाला. त्याचें तेथेंहि बस्तान बसूं नये म्हणून त्याच्या विरुद्धपक्षानें हैद्राबादचा सुभेदार मुबारिझखान यास निजामाचा प्रतिकार करण्यास लिहिलें. या मुबारिझखानानें गेलीं कांहीं वर्षें मराठ्यांचा दक्षिणेंतील अंमल उखडून काढण्याचा चंग बांधून तेलंगण व कर्नाटक या प्रदेशांत त्यांस पायबंद घालण्यांत बरेंच यश मिळविलें होतें. त्यामुळें जेव्हां तो निजामाचा प्रतिकार बादशाही हुकुमावरून करण्यास सिद्ध झाला तेव्हां मराठ्यांची त्यास मनापासून मदत झाली नाहीं. मराठे साखरखेडल्याच्या लढाईंत रणांगणावर हजर होते पण ते तटस्थासारखे होते. तटस्थ राहण्यांत त्यांची चूक झाली असें पुढील परिणामावरून म्हणणें भाग आहे, कारण त्यामुळें निजाम दक्षिणेंत कायम होऊन मराठ्यांचें पातशाही दरबारांतील संधानहि त्यामुळें तुटलें. या वेळीं शाहूच्या दरबारीं निश्चयानें एक बाजू घेऊन तिची तड लावणारा मुत्सद्दी वा सेनानी कोणीहि नव्हता. बाजीरावाला आपलें आसन कसें टिकतें याचीच या वेळीं जास्त काळजी होती. शाहूच्या दरबारांत फत्तेसिंग भोसले हा राजपुत्र म्हणून या वेळीं सर्वांत मोठा मानकरी व जागीरदार होता. त्याला भागानगर उर्फ हैद्राबादचा सुभा मिळावा अशी शाहूची मागणी होती.[३४] पण तो हेतु निजामाच्या जयामुळें पार वितळून गेला. निजामानें औरंगाबाद व हैद्राबाद या बाजू आपल्या सरदारांकडून व्यापल्यामुळें शाहूच्या सरदारांना कर्नाटकाकडे आपली मुलुखगिरी वळवावी लागली. १७२५–२६ हीं दोन वर्षें शाहूचे सरदार तुंगभद्रा दक्षिणतीरीं स्वारी करण्यांत गुंतले होते. या स्वाऱ्यांत मुख्य सेनापति फत्तेसिंग असून त्याच्या हाताखालीं प्रतिनिधि, दाभाडे, निंबाळकर हेच काय पण मुख्य प्रधान बाजीरावहि सामील होता.

---

३४. पे. द. १० पृ० ३

या स्वाऱ्यांत सोंधें, बिदनूर, म्हैसूर, चित्रदुर्ग वगैरे मराठ्यांचीं शिवाजीपासून मांडलिक असणारी संस्थानें पुनः मराठ्यांच्या कक्षेंत आणण्याचा उपक्रम करण्यांत आला पण तो फारसा यशस्वी झाला नाहीं. मराठी फौजांचे जंगलांतून जाण्यांत व दुष्काळामुळें पाणीहि न मिळाल्यामुळें फार हाल झाले—इतके कीं, या स्वारीची आठवण पुढें पुष्कळ वर्षें मराठ्यांस राहिली.[३५] या अनुभवामुळेंच बहुधा बाजीरावाचें मन कायमचें दक्षिणेकडून उडालें. बाजीरावानें यावेळीं श्रीरंगपट्टणापर्यंत जाऊन घाटाखालील अर्काटच्या नबाबाकडेहि चौथाई—सरदेशमुखी मागितली पण नंतर बारा वर्षें त्या बाजूकडे मराठे मुळींच फिरकले नाहींत. यामुळें शहाजीपासून मराठ्यांच्या सत्तेखालीं आलेला हा भाग त्यांच्या ताब्यांतून निखळल्यासारखा झाला. तंजावरचे बद्धमूल मराठेहि यामुळें स्वराज्याबाहेर फेकले गेले. अर्काटचे नबाब या काळांत वाढीस लागून मद्रास व पाँडिचेरी येथील व्यापारी इंग्रज—फ्रेंच सुद्धां डोकें वर काढूं लागले, कारण त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा अंकूर मुळांतच करपून न जाण्यास कारण, प्रबळ वरचढ सत्तेचा प्रखरपणा त्या भागांतून संपूर्ण नाहींसा झाला. त्यामुळें म्हैसूरचा पाळेगार वाढून मराठ्यांस एक नवीन प्रबळ शत्रु त्या भागांत निर्माण झाला. मराठी राज्याचें त्यामुळें अतोनात नुकसान झालें असें इतिहासच सांगतो. मराठेशाहींतील उत्तरदक्षिणवाद हा एक काल्पनिक व वावदूकपणाचा प्रकार ज्यांना वाटतो, ते पेशव्यांचा पाठीराखेपणा करतां करतां मराठी राज्याचा पायाच विसरतात असें म्हणणें भाग आहे.

राजवाड्यांनीं आपल्या दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत ५० वर्षांपूर्वींच या दुष्परिणामाचा संपूर्ण विचार केलेला आहे. व त्यानंतर आतां पेशवे दप्तर प्रसिद्ध होऊन पुष्कळ नवे कागद इतिहास—अभ्यासकांसमोर आले तरी त्यांचें विवेचन त्यामुळें बदलण्याचें कारण पडत नाहीं इतका तो विस्तृत पायावर झालेला आहे. इतकें असूनहि पुन्हा जेव्हां राजवाडे "शाहू व बाजीराव यांच्या मनांत निजामन्मुलुख, सय्यद, दिल्लीचा पातशहा या सर्वांस संपुष्टांत आणून सर्वत्र महाराष्ट्रधर्माची व महाराष्ट्र-

---

३५. ब्र. च. ले. ३२

राज्याची स्थापना करावयाची होती"[३६] असें म्हणतात, तेव्हां मनुष्याच्या मनाची आपणांस आवडणाऱ्या गोष्टीबद्दल कल्पनेनें तसें म्हणण्याची प्रवृत्ति पाहून मानवाच्या स्खलनशीलतेबद्दल पुन्हा एकदां खात्री पटते. पण तो काळ इतिहासाला देशभक्तीचें एक साधन म्हणून वापरण्याचा व सर्व लिखाण प्रजेला स्फूर्तिप्रद वाटण्यासारखें करण्याचा होता. यामुळेंच राजवाड्यांचे लिखाण तसें झालें असें म्हटलें पाहिजे. अमात्यांच्या राजनीतीकडे राजवाड्यांचे जें दुर्लक्ष झालेलें दिसतें तेंहि "नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेच्या" तारुण्यसहज विलासांत बुडून जाऊन आपल्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं हिंदुपदपातशाहीची उर्फ भटकुलबादशाहीची जी चुकीची मांडणी आरंभींच केली, तिच्या उन्मादामुळें घडलेलें दिसतें.[३७] या चुकीचें परिमार्जन आतां तरी करणें आपलें कर्तव्य आहे.

---

३६. राजवाडे खंड २, प्रस्तावना पृ० १२

३७. राजवाडे-ऐतिहासिक प्रस्तावना पृ० ४६

## व्याख्यान दुसरें : : संधि–विग्रह

आपलें प्राक्कथन अपेक्षेबाहेर लांबलें, आतां दुसऱ्या व्याख्यानांत राक्षसभुवनच्या लढाईपर्यंतचा निजाम–पेशव्यांचा हर्षामर्ष सांगावयाचा आहे. या व्याख्यानांत मी सामान्य इतिहासाचें सरदेसायांच्या रियासतींत आलें आहे तेवढ्याचें ज्ञान श्रोत्यांना आहे असें धरून चाललों आहें. सन १७२५ सालीं निजाम दक्षिणेंत कायम झाला. त्यानें स्वतः कधीं राजा म्हणवून घेतलें नाहीं. यांत जशी त्याची एका दृष्टीने स्वामिनिष्ठा तशी दुसऱ्या बाजूनें लोकोत्तर दूरदृष्टि दिसून येते. सर्व मुसलमान तेवढे एक, भारतांत त्यांचें दिल्ली हें एकमेव केंद्र, व मोगली राज्यपद्धति हा एकमेकांना जुळविणारा दुवा, असें मनांत निश्चित करून त्यानें आपला मार्ग आंखला. त्यामुळें मधून मधून त्याला दिल्लीच्या राजकारणाकडे लक्ष पुरवावें लागे. व्यवहारांत स्वतंत्र होऊनहि आपलें स्वातंत्र्य कोणाच्या डोळयांत खूपूं नये अशी वागणूक त्यानें ठेवली. शाहूनें जवळजवळ तोच पंथ स्वीकारला. मोंगलांचे नाणें ही दिल्लीच्या प्रभुत्वाची खूण कायम ठेऊन त्यानें एका अर्थी मराठ्यांना अखिल भारताचे म्हणजे त्यांतील सार्वभौम मोगल साम्राज्याचे नागरिक बनविलें. त्याचे सरदार व महसूल अधिकारी या बादशहाच्या सनदांनीं दिलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणी-साठीं देशभर पसरविण्याचा पायंडा त्यानें पाडला. घटनाशास्त्रदृष्ट्या मांडलिक संस्थानिक शाहू याचे निजामाशीं संबंध, तो अधिकृत राज-प्रतिनिधि असल्यामुळें, सेवकपणाचे राहिले, जसे आधुनिक काळांत गायकवाड, शिंदे, होळकर व निजाम यांचे ब्रिटिश व्हाइसरॉयशीं होते. या गोष्टीने मराठ्यांचा तेजोभंग होऊन मुसलमानांची हिंदुस्थानांतील प्रतिष्ठा कायम रहाण्यास मदत झाली, इतकी कीं, त्याचे ऐतिहासिक दुष्परिणाम ब्रिटिश राजवटींत सुद्धां मुसलमानांच्या "आपण राज्यकर्त्यांच्या जातीचे आहोंत" अशा घमेंडखोर वागणुकींत प्रतीत होत राहिले. खुद्द पेशवाईंत त्यामुळें फारसी ही परकी भाषा मराठ्यांच्या बोकांडीस बसली,

इतकी कीं इंग्रजांनांही तें लोढणें सन १८३५ पर्यंत झुगारून देतां आलें नाहीं. हीहि गोष्ट मुसल्मानांचा वरचष्मा राखण्यास उपकारक ठरली. एल्फिन्स्टननें पेशव्यांच्या राज्यावरील आपल्या अहवालांत, सातारचे राजे हे स्वतःस कधीच स्वतंत्र समजत नव्हते "[१] असें विधान याच गोष्टींच्या आधारावर केलेलें आहे, व त्यामुळें सातारकर छत्रपतींनां सबंधमराठी राज्याचा वारसा देण्याचा प्रश्न उद्भवतच नाहीं असें गृहीत धरलें आहे. या अनाडी वागणुकीचा घटनाशास्त्रदृष्ट्या दुष्परिणाम अखेरीस नाना फडणिसाच्या लक्षांत आला. जेव्हां महादजी शिंद्यानें दिल्लीच्या बादशाहीचा सर्वाधिकार पेशव्यांच्या नांवें करून घेऊन व्यवहारांत त्याची मुतालिकी स्वतः पत्करिली तेव्हां नानाला सातारच्या बंदिस्त छत्रपतींच्या प्रभुत्वाची सोयिस्कर आठवण झाली. पण ही गोष्ट 'झोपीं गेलेला जागा झाला' या म्हणीप्रमाणें 'पाछळवुद्धि बामणिया' ठरली. जर नानांत घटनाचातुर्य असतें तर सवाई माधवरावांच्या मरणानंतर स्वतः छत्रपतींचें पेशवेपद स्वीकारून व इतर प्रधानांच्या जागीं योग्य माणसांची नेमणूक करून बाजीरावशाहीचें संकट टाळतां आलें असतें. पण फडणीस म्हणून पाऊणशें वर्षें वागलेल्या भानुकुळांतील पेशवेसेवक पुरुषाला ही कल्पना कशी सुचणार? व एवढी हिंमत तरी कोठून निर्माण होणार? मुसल्मानांच्या पक्क्या राजनैतिक दृष्टीमुळें व जतन केलेल्या स्वाभिमानमूलक हिंमतीमुळें दीडशें वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतरहि जिनांना गांधींवर कुरघोडी करतां आली हें इतिहासास विसरतां येणार नाहीं.

वरील विवेचन म्हणजे इतिहासाला दोनशें वर्षें मागून सुचलेले विचार नव्हत. खुद्द बाजीरावाच्या ठिकाणीं त्यामुळें निर्माण झालेला न्यूनगंड त्याच्याच पत्रांत दृष्टोत्पत्तीस येतो. बादशहाला मराठ्यांचें अस्तित्व दाखविण्यासाठीं दिल्लीचे पुरे जाळावयास जो बाजीराव दिल्लीच्या जवळ मोगलांची तीन सैन्यें चुकवून जातो, तो तेथें पोचल्यावर अर्जुनाप्रमाणें कुंठित होतांना दिसतो! तेथें गेल्यावर त्यास सुचतें कीं " पुऱ्यास आगी देऊन खाक शहर करावें त्यास **दिल्ली महास्थळ, पादशहा बरबात**

---

१. Forrest G. W. "Official writings of Elphinstone P. 268.

**जालियांत फायदा नाहीं.** दुसरें पादशहाचे व खानदौराचे चित्तांत सलूख करावयाचें आहे. मोगल यांस सलूख करू देत नाहींत व अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो. याकरितां आगी लावावयाचे महकूब करून पातशहास व राजे बखतमल यांसी पत्रें पाठविलीं "[२] कीं " आम्ही शहराजवळ आलों यामुळें दिल्लींत गलबला झाला. शहरानजीक राहिल्यानें शहरास उपसर्ग लागेल. याकरितां कूच करून झीलच्या तलावावर जातों." बाजीरावासारख्या कांहींशा उद्दाम गणल्या गेलेल्या माणसाची अशी स्थिति कां व्हावी? तर त्याच्या मनांतील दिल्लीच्या नांवाबद्दल, मोगल बादशहा-बद्दल असलेला सादर संभ्रम हाच होय. त्याच्या हातांतील गांडीव गळून पडलें व तो दिल्लीहून दूर सरला. हें पत्र वाचतांना आम्हांस ब्राईसच्या 'पवित्र रोमन साम्राज्य' या अद्वितीय ग्रंथांतील लेखनाची आठवण होते.[३] "Dishonoured and defenceless, the spell of her name was still strong enough to arrest the conqueror in the moment of triumph. The irresistible impulse that drew Alarich was one of glory or revenge, not of destruction: The Hun turned back from Aquileia with a vague fear upon him; The Ostrogoth adorned and protected his splendid prize."

"The bolder genius of Odoacer resolved to abolish an empty pageant....yet over him too the spell had power; and as the Gaulish warrior had gazed on the silent majesty of the senate in a deserted city, so the Herulian revered the power before which the world had bowed, and though there was no force to check or to affright him, shrank from grasping in his own barbarian hand the sceptre of the Caesars."

पण या वर्णनांत उल्लेखिलेले अलारिक व ओडोसेर हे रानदांडगे तरी होते. पण 'दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम्' या श्लोकांत

---

२. ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र–पारसनीसकृत. लेखांक २७.

३. Bryce —The Holy Roman Empire–(1907) p. 23, 25.

सांगितल्याप्रमाणें भारतवर्षांत दुर्लभ असा जन्म मनुष्यजातींत व तोहि ब्राह्मणकुलांत प्राप्त होऊनहि, क्षत्रियकुलावतंस गोब्राह्मणप्रतिपालक शाहू छत्रपतींचा मुख्य प्रधान जो बाजीराव, त्याच्या उरांत दिल्ली पाहतांच धडकी कां भरते ? तर बाहेरून मोठा वेष धारण करून मोठ्या सैन्यानिशीं मोठी धडक मारून बाजीराव मोठ्या हिंमतीनें दिल्लीजवळ आला, तरी त्याचें मन वस्तुतः अलारिक व ओडोसेर यांच्या प्रमाणेंच राहिलेलें होतें. ज्या उच्च ध्येयासाठीं, भारतीयांच्या ज्या जन्मसिद्ध हक्कासाठीं, शिवछत्रपतींनीं शून्यांतून ब्रह्म याप्रमाणें यवनाक्रांत अखिल भरतखंडांत नवीन मराठी स्वतंत्र राज्य, 'चौपन्न पातशाहींचा धणी जो औरंगजेब कीं ज्याची या पृथ्वीतलाच्या ठायीं 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' अशी कीर्ति', त्याला न जुमानतां स्थापिलें,[४] त्या राज्याच्या ध्येयाची, घटनेची, परंपरेची बाजीरावाला किंवा पेशवाईतील कोणाला खरी ओळख झालेली नव्हती. खेडेगांवांतून रस्सीलोटा घेऊन मुंबईला येऊन—शेअरबाजारांत कोट्याधीश होणारा मारवाडी जसा सुसंस्कृत म्हणतां येणार नाहीं, तसाच बाजीरावहि म्हटला पाहिजे—आणि हेंच अज्ञान व तज्जन्य चुकीचें वर्तन हेंच मुख्यतः १८ व्या शतकांतील मराठ्यांच्या पराक्रमाला बाधक झालें.

बाजीराव व चिमाजीआपा हे पराक्रमी व यशस्वी असल्यामुळें त्यांच्या मनाबद्दल, ध्येयाबद्दल व वागणुकीबद्दल महाराष्ट्रांत चुकीचा समज रूढ झाला आहे. हे दोघेही बंधू वरिष्ठांशीं वागतांना जसे अघळपघळ सेवक, तसे खालच्याशीं वागतांना उद्दाम होते. ते अज्ञ दैववादी होते याचा पुरावा त्यांच्या ब्रह्मेंद्रस्वामीशीं झालेल्या पत्रव्यवहारांत विस्तृत पसरलेला आहे. तेथें आढळणारी त्यांची आत्मनिंदा व दुबळेपणा गुरुभक्तीच्या नांवाखालींहि शोभण्यासारखीं नाहीत. बाजीरावाची कर्जबाजारी हा एक घृणेचाच विषय होण्यासारखा आहे. यांत त्याचा गैरहिशेबीपणा उर्फ उधळेपणा तर दिसतोच, पण त्यावरून त्याचें व त्याच्या सरदारांचे आणि सैन्याचे संबंध काय तऱ्हेचे असतील याचा बोध होतो. शिवाजीनें मुलुखगिरी केली, पण ती कधींहि आंतबट्ट्याची नसावी आणि त्याचे सैनिक आणि सरदार तर त्यानें इतके

---

४. अमात्यांची राजनीति ( १९२६ ) पृ० २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें स्थळप्रत
अनुक्रम २८५९९ १७८५
११७२ वि: ९७४/५१४५
नों. दि:

शिस्तींत राखले होते कीं कोणालाहि त्याविरुद्ध आपली सत्ता वा संपत्ति मिरवितां आली नसतीं. तीस वर्षांच्या भालेराई स्वातंत्र्ययुद्धात महाराष्ट्रांतील एक मोठा वर्ग शेती सोडून लुटारू सैनिक होण्याच्या मार्गास लागला. युद्धामुळें शेतीचीहि शाश्वती न राहिल्यामुळें साधलें तर डल्ला मारण्याचा व दैव काढण्याचा शेअरबाजारी मार्ग महाराष्ट्रांत रूढ झाला. दीर्घकालीन महायुद्धानें कोणतेंहि राष्ट्र ढिलें होतेंच. पण मागाहून त्याला पुनः शिस्तींत आणण्याचें कार्य राजसत्तेनें करावयाचें असतें. तें न करतां महाराष्ट्र वैराण झाला, दक्षिण भुकेकंगाल बनली, तर मुलुखगिरीला उत्तरेस वळण्याचा मार्ग स्वीकारून महाराष्ट्रसमाजाची बिघडलेली घडी कशी सुधारणार होती ? ती सुधारली नाहीं हें इतिहासच सांगतो. ब्राह्मणांचें नेतृत्व राष्ट्राला प्राप्त झालें म्हणून लोकांचें शिक्षण सुधारलें, शील वाढलें, शिस्त प्रस्थापित झाली, असें न घडतां दुसऱ्यांच्या प्रदेशावर चरणाऱ्या सैनिकांबरोबर त्यांची लूट कागदोपत्रीं दडविणारा व एकंदरीत प्रजेला बाधणारा असा एक ब्राह्मण कारकूनवर्ग पेशवाईत बेसुमार वाढला असें तत्कालीन अस्सल कागदपत्र हजारों वाचल्यानंतर आमचें मत झालें आहे. याला आळा घालण्याऐवजीं ज्याप्रमाणें कर्जबाजारी दिवाळखोर नवीन नवीन धंदे कर्जावरच काढून जास्त जास्त खोलांत जातो व स्वतः बुडून दुसऱ्या अनेक कष्टानें द्रव्य मिळविणाऱ्या सज्जन माणसांना व बायाबापड्यांना बुडवितो, तोच प्रकार १८ व्या शतकांतील मराठ्यांच्या राजनीतीमुळें, त्यांची इच्छा असो वा नसो, घडला हें इतिहासज्ञांस मशहूर आहे. परप्रांतीयांची मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहण्याची दृष्टि त्यामुळेंच व त्या काळापासूनच वेगळी झालेली दिसते.

यावर अशी शंका कोणी घेईल कीं पेशवे जर इतके असमर्थ होते तर त्यांचा जम कसा बसला ? याला स्पष्ट कारणें आहेत. तीस वर्षांच्या धूळधाण उडविणाऱ्या स्वातंत्र्ययुद्धानंतर समाजांतील शांतताप्रिय सज्जन व दुबळा असा बहुसंख्य वर्ग साहजिकच अंदाधुंदीस कंटाळला होता. त्याला जो कोणी कोणत्याहि मार्गानें शांतता प्रस्थापित करील असा पुढारी हवासा वाटणें सहाजिक होतें. जर 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' अशा जोमानें स्वातंत्र्ययुद्ध पुढें चालू ठेवलें असतें, तर दक्षिणेंत आणखी एक पिढी निकराचें युद्धच करावें लागलें असतें. एवढें जोखीम अंगावर न घेतां

पेशव्यांनीं मांडलिकी पत्करून शाहूचा जम बसविण्याचा उपक्रम केला. त्यामुळें अंतस्थ युद्धांत त्यांची बाजू बादशाही पाठिंब्यामुळें वरचढ ठरली व ठिकठिकाणी मोगलांबरोबरचें युद्ध संपलें असें जाहीर करून राष्ट्राचा आधार जो शेतकरी सद्गृहस्थ त्याला तूं खुशाल लावणी कर, तुझें शेत कोणी तुडविणार नाहीं, तुम्हांपासून घ्यावयाचा पैसा तो हिशेबानें आम्ही पाटील कुलकर्णी, देशमुख देशपांडे यांपासून घेऊं, असें आश्वासन पेशव्यांना देतां आलें. चिमाजी आपानें बाजीराव मेल्यानंतर हिंगण्यांना लिहिलेल्या एका पत्रांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे—"तीर्थरूप कैलासवासी नाना (बाळाजी विश्वनाथ) यांची नजर रयेत पाळावी, अशेष जनाची दुवा घ्यावी हेंच त्यांचे चित्तांत कायावाङ्मनसा होतें. तदनुरूपच अरण्यवत् मुलुक जाहला होता यास कौल देऊन कंटकांचा उच्छेद करून रयेत नांदविली. रयेतीचा आसीर्वाद घेतला. तन्मुले नानांची कीर्ति लोकोत्तर प्रकाशमान जाहली.[५]" बाजीरावाच्या संबंधानें तो म्हणतो, "ऐशास पातशाहाची सर्वप्रकारें कृपा संपादून घेऊन पातशाहतचा बंदोबस्त तुटला आहे, कितेक अमीर बेयेख्तियार होऊन जो जे जागा राहिला तो बरायेखुद खावंद आपणच यैसें मानून पातशाहाचा हुकूम किमपि मानीत नाहीं, त्यास पातशाहाच्या येख्तियारांत आणून पातशाही बंदोबस्त करून रयेत गोरगरीबाची दुवा घ्यावी, मुलकाची मामुरी करून पातशाही खजानियाची तरकी करून हिंदुस्तानच्या पातशाहतचा बंदोबस्त केलियाची लोकोत्तर कीर्ति संपादून पातशहाचे कृपेस पात्र व्हावें, याच अन्वयें आजी आठदाहा वर्षें तीर्थरूप कैलासवासी राव यांनीं"[६] प्रयत्न केला. या दोन उताऱ्यांत बाळाजी विश्वनाथ व बाजीराव या दोघांच्या उद्योगाचें मुख्य सूत्र घरच्या अभिमान्यानेंच उत्तम रीतीनें दिग्दर्शित केलें आहे. पण याच त्यांच्या पडखाऊ धोरणामुळें मराठेशाही कायम पातशाहीच्या ताटाखालीं राहिली, हें अर्थातच इतिहासकाराला म्हणणें भाग आहे. पातशाही चालविणें हें छत्रपतीच्या मुख्य प्रधानाचें कर्तव्य होतें काय? बरें, ज्या पातशाहीचा बंदोबस्त बाजीराव करूं म्हणत होता तीच पातशाही

---

५. हिंगणे दप्तर ले. १५

६. हिंगणे दप्तर ले. १५

राखण्याचा चंग निजामानेंहि बांधला होता. आणि पातशाही कारभारी तरी बाजीरावाला केव्हां विचारापुसावयाला लागले ? तर जेव्हां बाजीरावानें त्यांचे दोन सुभेदार मारून त्यांखालील मुलुख आपल्या कक्षेत आणला तेव्हां. आणि हें सर्व करीत असतां घरची हकीकत काय ? तर पेशव्याचे बरोबरीचे सप्तप्रधान, सरदार व सरकारकून यांपैकीं कोणीहि त्याच्यावर खूष नाहीं किंवा त्यांच्या अंमलास राजी नाहीं. कोल्हापूरकर संभाजी व ताराबाई यांना बाळाजीनें कसेंबसें तोंड देऊन गप्प बसविलें होतें, त्यांचा पक्ष पुनः निजामानें उठविला. सरदेसाई म्हणतात, "तें युगच बारभाईंच्या खेतीसारखें अव्यवस्थित व लहर लागेल तसें चालणारें होते."[७] पण ही अव्यवस्था कां निर्माण झाली होती ? लहर कोणाची चालत होती ? जे शिवकालीन राज्यपद्धतीची आठवण ठेवून चालूं म्हणत होते ते सप्तप्रधान पेशव्यांनीं गुंडाळून ठेवून निष्प्रभ केले नसते तर अव्यवस्था कां माजली असती ? आठांपैकीं सात प्रधानांचीं कामें तहकूब झाल्यावर बेबंदशाही न माजली तर आश्चर्य ! सैनिक मराठ्यांच्या जातीचा एकमेव प्रधान जो सेनापति, त्यालाच बडतर्फ करविण्याची इच्छा बाळगणारे बाजीराव व चिमाजी आपल्याच वर्तनानें आपण नवीन तयार केलेल्या नोकरांस बेशिस्तीचा धडा घालून देत नव्हते काय ?[८] शिवाजीचे अष्टप्रधान सर्व सारख्या मानाचे व परस्पर स्वतंत्र होते. ते राजाला जबाबदार होते तर येथें बाजीराव इतरांना गुंडाळून ठेवून राजालाहि जबाबदार होता किंवा काय याची शंका ! नारो राम मंत्री हा वडील प्रधान स्पष्ट लिहितो, "राज्यांतील मऱ्हाटे चौघे चौंकडे गेले, राहिले त्यांसहि घालवितात, हें निमित्य उत्तम नव्हे. जें करणें तें राज्यकारभारास व्यत्यय न दिसे तें केलें पाहिजे लौकिक विरुध न दिसे तो विचार करून लिहून पाठविलें पाहिजे...श्रीनें तुम्हांस यश बहुत दिलें तें जतन करणें."[९] सेनापति खंडेराव दाभाडे हा तीन राजवटी पाहिलेला वृद्ध व अनुभवी माणूस लिहितो—"चिमणाजी पंडित राजाज्ञा येथें येऊन बसले, हुजरून निघाले, हा लौकिक परकीयांनीं यैकून बहुत कांहीं संतोष मानून आदरपूर्वक कागदपत्र

७. मराठी रियासत ५ ( बाजीराव ) पृ० ४२४

८. पे. द. १२ ले. ३९

९. पे. द. १२ ले. ४२

आले ते आम्ही दृष्टीनें पाहिले. **जाणारास कांहीं नाहीं परंतु हे गोष्टी जाऊं देणारास युक्त नव्हे.**"[१०]

हा चिमणाजी पंडित राजाज्ञा ऊर्फ चिमणाजी दामोदर मोघे याचें चरित्र बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांच्या वर्तणुकीवर चांगला प्रकाश टाकतें, म्हणून येथें त्याचा थोडा गोषवारा देतों. हा पुरुष बहुधा बाळाजी विश्वनाथाप्रमाणेंच कोंकण सोडून आपला भाग्योदय करून घेण्यासाठीं देशावर आलेला दिसतो. दोघांनांहि ब्रह्मेंद्रस्वामींचा पाठिंबा होता. पैकीं चिमणाजीपंत वयानें थोडा वडील असावा. ताराबाईच्या कारकीर्दींत खानदेशांत राहून नेमाजी शिंदे व केसोपंत पिंगळे यांबरोबर हा माळव्यावरच्या स्वारींत सतत गुंतलेला दिसतो. शाहू परत आला तेव्हां अगदीं प्रथमच आपल्या फौजेसह हा त्याला मिळाला. यावरून बाळाजी विश्वनाथाप्रमाणें याचाहि मोगलांच्या छावणींतील शाहूशीं संबंध जडला असावा असें वाटतें. पुढेंहि दहा वर्षें तो कान्होजी भोसल्याबरोबर माळव्यावर स्वाऱ्या करतांना दिसतो. पुढें हा शाहूचा राजाज्ञा, म्हणजे खाजगी चिटणीस व राजाच्या खाजगी उत्पन्नाचा हिशेबनवीस झाला, व त्याचा दर्जा अष्टप्रधानांत नसूनहि त्यांप्रमाणेंच गणला जाऊं लागला. हुसेन अली सय्यदाच्या वेळीं मराठ्यांशी तह होऊन त्यांच्या मागण्या सय्यदांनीं कबूल केल्या तेव्हां त्यानें असें ठरविलें कीं, बाळाजी विश्वनाथ व चिमणाजी यांनीं अनुक्रमें शाहूचे नायब व वकील म्हणून औरंगाबादेस राहून तेथून आपले कमाविसदार पाठवून चौथाई–सरदेशमुखी वसूल करावी. यावरून यावेळीं त्याचा दर्जा पेशव्याच्या बरोबरीचा मानला जात होता असें होतें. खाफीखान म्हणतो कीं, "राजा[११] शाहूच्या या दोन अतिशय बुद्धिमान सेनानींनीं सय्यदाशीं अटी ठरवून तह घडवून आणला." असें दिसतें कीं, बाळाजी पुणें भागांत साताऱ्याला जवळ राहात असल्यामुळें प्रधान झाला व चिमणाजी दूर खानदेशांत राहण्यामुळें शाहूच्या दरबारांत थोडा मागें

---

१०. पे द. १२ ले. ९

११. Elliot & Dowson History of India Vol. VII p. 466.

पडला. खंडेराव दाभाडे सेनापति होऊन खानदेश त्याच्या कक्षेंत गेल्यावर चिमणाजी सातार्‍यास येऊन राहिला व त्याने वसविलेला चिमणपुरा अजून सातार्‍यास आहे. बाळाजीचा व याचा पूर्ण घरोबा असून हा बाजीराव व चिमणाजी यांना चिरंजीव नांवानें पत्रें लिहितांना आढळतो. पुढील बनावावरून असा तर्क होतो कीं, बाळाजी वारल्यानंतर आपल्याला पेशवा म्हणून शाहूनें नेमावें अशी त्याची मनीषा असावी. पोरसवदा ल्हान बाजीरावाला मुख्य प्रधान नेमण्यांत शाहूनें दूरवर विचार करण्याऐवजीं बाळाजीच्या उपकारांची फेड या रूपानें करण्याचा हेतु धरला, असें बखरीवरून वाटतें. बाजीरावाच्या पहिल्या सहा वर्षांच्या कारकीर्दींत चिमणाजी निरुत्साही बनून आर्थिक दृष्ट्याहि पेंचांत आलेला दिसतो. मग त्याला कारण कांहीहि असो. याचा चंद्रसेन, रंभाजीप्रभृति मोगलाईतील मराठ्यांशीं पत्रव्यवहार चालू असावा व त्यांनीच, जेव्हां निजामानें १७२७ सालाच्या आरंभीं संभाजीला हातीं धरून मराठ्यांना कमकुवत करण्याचा बेत आंखला तेव्हां, उत्कर्षाची आशा दाखवून चिमणाजीला आपल्याकडे बोलाविलें असावें. शाहूकडून उत्कर्ष होण्याची आशा पेशवेबंधूंच्या स्वार्थी कारस्थानानें तुटल्यामुळें आर्थिक पेंचांतून बाहेर पडण्यासाठीं हा निजामाकडे गेलेला दिसतो. निजामाबरोबर संभाजीसहित हिंडतांना याला १७२८ सालीं कोल्हापूरचा पेशवा करण्यांत आलें. हें पद त्याकडे दोन वर्षांहून अधिक राहिलेलें दिसत नाहीं. तो पुढें मोगलाई सरंजामदार बनून खानदेशांत आपल्या मूळ स्थानीं कायम झाला. १७३१ च्या डभईच्या लढाईंत हा निजामातर्फे दाभाड्याबरोबर असून उदाजी पवाराबरोबर बाजीरावाच्या हातीं सांपडून कैद केला गेला व पुढें लवकरच सुटला. बाजीराव व चिमाजी त्याच्याकडे अखेरपर्यंत घरोब्याच्या नात्यानेंच वागत राहिले. आयुष्यांतील महत्वाकांक्षा धुळीस मिळाल्यामुळें याचीं अखेरचीं तीन चार वर्षें पश्चात्ताप स्थितींत गेलेलीं दिसतात. चिमणाजीच्या मृत्यूनंतर या घराण्याची स्थिति खालावलेली दिसते. तरी पुढें नानासाहेब पेशवाहि खानदेश त्याच्या हातीं आल्यावर त्याच्या मुलानातवांची वास्तपुस्त करतांना दिसतो.

हें चरित्र वाचून मनांत विचार येतो तो हा कीं, असा शूर शहाणा माणूस शाहूची नोकरी वीस वर्षें केल्यानंतर एकदम त्याला कां सोडून

जातो ? केवळ लोभ व महत्त्वाकांक्षा एवढेंच कारण या प्रश्नाचें उत्तर देऊं शकणार नाहीं. त्याची तक्रारहि थोडीच होती व ती पुरी करण्याचें सामर्थ्य बाजीरावाला होतें हें वर दिलेल्या खंडेराव दाभाड्याच्या पत्रावरून उघड होतें. पण पेशव्यांचा सर्वांविरुद्ध खाक्याच असा कीं, "कोणी जावो कोणी राहो, स्वार्थी माझा दृढ भावो." ही वृत्ति बाळाजीच्या वेळीं सुप्त होती, तरी तिचा परिणाम चंद्रसेन जाधवाच्या बाबतींत दिसून आलाच. नेमाजी, रंभाजी वगैरे सरदार मोगलांकडे झुकण्याचें कारणहि असेंच असावें. आपल्या वाढीला अनुकूल क्षेत्र प्रत्येक महत्त्वाकांक्षी व्यक्ति पहातच असते. पण यावेळीं हवें तेव्हां परक्यांकडे जाण्याचा पायंडा जोरानें पडण्याचें कारण, मोगल हे कट्टे शत्रू हा भाव शाहूच्या मांडलिकीपणामुळें अजिबात नाहीसा झाला हाच होय. जर शाहू मोगलांची नोकरी पत्करतो तर त्याची नोकरी करण्याऐवजी प्रत्यक्ष त्याच्याहि धन्याची म्हणजे मोगलांची आपणच कां करूं नये हा विचार सर्वांच्या मनांत रूढ झाला, व संबंध पेशवाईत तो तसाच राहिला. राजद्रोह असा शब्द पेशवाईत कोठें उरलेला दिसत नाहीं. "हें राज्य एक. या राज्याची एक[१२] मर्यादा" हा भाव अगदी उडून गेला. हें राज्य सोडून दुसरीकडे जाणें ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट असा भाव शिवाजीनें आपल्या राज्यांत रुजवून काढिला होता व त्याची मुळी इतकी जोमदार होती कीं वरून अनेकदां झाड छाटलें तरी पुन्हा तो भाव ऐन प्रसंगीं उसळून वर येत असे. त्यावरच मराठ्यांचें राज्य १८ व्या शतकांत चाललें तसें चालूं शकलें. पण पेशव्यांच्या इतर प्रधानांना हतप्रभ करण्याच्या धोरणामुळें राज्ययंत्र नेहमींच खिळखिळें राहिलें. वेळोवेळीं वेगवेगळे सरदार कांहींना कांहीं कारणामुळें एका पक्षाकडून दुसऱ्याकडे थारेपालट करीतच राहिले. कर्नाटकांत घोरपडे जे शिवकालांत बद्धमूल झाले ते तिकडेच संस्थानिक होऊन राहिले. पण मुराररावाची नोकरी अमक्या एका धन्याच्या हाताखालीं कायम झाली असें घडलेंच नाहीं. तो इंग्रज, फ्रेंच, म्हैसूरकर, तंजावरकर, अर्काटकर, सावनूरकर, निजाम, पेशवे, कोल्हापुरकर किंवा सातारकर छत्रपति यांच्या तर्फे केव्हांना केव्हां लढला. पण दुसऱ्या दृष्टीने पहातां तो कोणाचाच

---

१२. अमात्यांची राजनीति पृ. २.

नोकर असें आपणांस समजत नव्हता असें त्याच्या चरित्रावरून दिसतें. अशा अंदाधुंदीचें कारण, पेशवाईत राज्याचा असा कांही दंडकच राहिला नव्हता असें म्हणणें भाग आहे.

स्वतंत्र मोठ्या जहागिरी न जिंकलेल्या प्रदेशांत देण्याचें जें बिनभांडवली राज्यधोरण राजारामकालीं अनिर्वाहपक्ष म्हणून सुरू करण्यांत आलें तें पुढें ताराबाई व रामचंद्रपंत यांच्या अमदानींत कमी करण्याचा प्रयत्न सुरू होता.[१३] हें धोरण ज्यांना मान्य नव्हतें ते धनाजी, परसोजी, नेमाजी, हैबतराव, कान्होजी प्रभृति बडे व शिरजोर सरदार शाहूच्या दुबळ्या पक्षास स्वार्थसाधनासाठीं मिळाले.पेशव्यांचाहि तोच पंथ होता. सरंजामदारी निर्माण झाली कीं त्यांच्यांत आपसांत युद्धें निर्माण होणार हें ठरलेलेंच होतें. जर पेशव्यांना सुसंघटित राज्य निर्माण करावयाचें होतें तर त्याला पहिली गरज स्वतःचा स्वार्थ सोडण्याची होती. पेशव्यांनीं पैशाचा स्वार्थ बाजीरावापासून पुष्कळच सोडलेला दिसतो. ही त्यांची चांगली बाजू होय. पेशवे नेहमी कर्जबाजारी राहिले, पण त्यांनीं कधीं व्याजाच्या मोठ्या दरानें वाढलेलें कर्जहि नाकबूल केलें नाहीं. अतिशय हाल सोसूनहि ते कर्ज देतच राहिले. हा प्रकार सर्व मराठ्यांचा नव्हता. नागपुरकर मुधोजी भोसल्यानें आपल्या बंगालच्या स्वारीवर पाठविलेल्या सैन्याचें देणें बहुतेक दिलेंच नाहीं. तोच प्रकार इतरत्रहि आढळतो. " शिलेदारांपुढें व सावकारांपुढें घासतां घासतां आपलें कपाळ छिनत चाललें "[१४] अशी तक्रार बाजीराव करतांना आढळतो. तोच म्हणतो कीं, " दाभाडे, गायकवाड, बांडे या सरदारांचे कोटी कोटी खजिने आहेत. " जर ही पराक्रमी बाजीरावाची स्थिति, तर गरीब बापड्या चिमणाजी दामोदराची स्थिति काय असेल याचा आपणांस अंदाज करतां येतो. पेशवाईत कांहीं सरदाऱ्या केवळ आर्थिक पेंचामुळें मोडल्या. अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत, त्यांतीलच हा प्रकार दिसतो.

---

१३. राजवाडे ३, १४४; ८–१५२.
१४. ब्रह्मेंद्र ले. ३२

निजामानें संभाजी छत्रपति, सेनापति दाभाडे, कान्होजी भोसले प्रभृति मंडळींना उठवून १७२७ ते १७३१ पर्यंतच्या काळांत मराठे-शाहीला मोडून काढण्याचा जोराचा प्रयत्न केला. पण तो महाराष्ट्रापुरता सिद्धीस गेला नाहीं तरी निजामाचें बस्तान दक्षिणेंत ठीक बसलें. हैदराबादचा मोठा सुभा तर सर्वस्वी त्याच्या ताब्यांत राहिला. कारण श्रीपतराव प्रतिनिधीनें तीन लाख रुपये नाममात्र सरदेशमुखी घेऊन त्या सुभ्याच्या चौथाईची माफी शाहूकडून निजामास देवविली. म्हणजे दक्षिणेंतील पूर्वसमुद्राकडील अर्धा भाग त्याचा ठरून मराठ्यांच्या सनदा तेवढ्या पुरत्या बरबाद झाल्या. विजापूर उर्फ कर्नाटकच्या सुभ्यांत निजाम व मराठे या दोघांचा अंमल कमीजास्त प्रमाणांत चालला, पण सैन्याच्या मदतीखेरीज मराठ्यांना घरबसल्या करवसुली कधींच करतां आली नाहीं. तीच हकीकत औरंगाबाद, वऱ्हाड व खानदेश या महाराष्ट्रांतल्या सुभ्यांतहि राहिली. बेदरचा सहावा सुभा हा दोघांच्या युद्धाचें क्षेत्र सतत राहिला. यांपैकीं वऱ्हाड व बेदर या सुभ्यांत नागपुरकर भोसले वरचढ होते व औरंगाबाद व खानदेश या सुभ्यांत पेशव्यांचा वरचष्मा राहिला. पण वरचष्मा म्हणजे राज्य मात्र नव्हे. पेशवे पुण्यांत स्थायिक झाले तरी जुन्नर, नगर यांसारखा जवळचा प्रदेशहि त्यांच्या ताब्यांत अर्धी पेशवाई होऊन जाईपर्यंत येऊं शकला नाहीं आणि इतकें असून महाराष्ट्रांतच काय पण सबंध हिंदुस्थानभर हिंदुपदपादशाही वृद्धिंगत होत चालली असें राजवाड्यांपासून सर्व इतिहासलेखक म्हणतात, तेव्हां हा इतिहास शेख महमदी मामला दिसतो. अशी बढाईची संवय हिंदूंना आरंभापासूनच लागलेली दिसते. एखाद्या शत्रूचा एखाद्या वेळीं चुकून माकून पराभव केला तरी वंशपरंपरा तो राजा व त्याचें राज्य आपलें मांडलिक झाले अशी बढाई मारण्याचा प्रघात हिंदूंच्या ताम्रपटांत सर्रहा आढळतो. त्यामुळें खरोखरी राजकीय स्थिति काय होती याबाबत इतिहासकारांत मोठा गोंधळ माजलेला आहे. तोच प्रकार पेशवाईंतहि उतरलेला पाहून हंसूं येतें. आम्ही वर सांगितलेंच आहे कीं, कायदेशीरदृष्ट्या अठराव्या शतकांतहि हिंदुस्थानावर दिल्लीपतीचें अधिराज्य होतें. प्रत्यक्ष अंमलासंबंधानें म्हणावयाचें तर मराठ्यांच्या ताब्यांत सबंध महाराष्ट्रहि कधीं आला नव्हता. त्याचा कांहींना कांहीं भाग निजामाच्या ताब्यांत अखेरपर्यंत

राहिला. आणि हा सर्व प्रकार निजामाच्या पराक्रमामुळें व हिकमतीमुळें शक्य झाला.

याबाबत वाद चालतो तेव्हां त्याचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे निजाम हा एवढा प्रबळ, हिकमती व खेरीज सुदैवी असूनहि पेशव्यांनीं त्याचा वरचष्मा कधींच चालूं दिला नाहीं हीच हिंमतीची, कर्तबगारीची व आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे. एवढी गोष्ट सुद्धां दुसरा कोणी असता तर करूं न शकता! दुसरा प्रकार याच्या उलट म्हणजे पेशवे इतके पराक्रमी, प्रबळ व वाढत्या दैवाचे असूनहि निजामानें आपलें अस्तित्व कायम टिकवून खेरीज मधून मधून पेशव्यांवर चढाई केली, पुणें सुद्धां जाळलें आणि सबंध पेशवाईस पुरून अखेरपर्यंत मराठ्यांवरच काय पण इतर हिंदूंवरहि राज्य करण्यास तो कालपर्यंत राहिला! यांतील कौतुकाची व आश्चर्याची गोष्ट कोणती मानावयाची हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा भाग आहे. पण आम्हांला मात्र अल्पसंख्य मुसलमानांचा पुढारी असूनहि अतिबहुसंख्य हिंदूंच्या प्रदेशावर आपला पाय कायम रोवून ठेऊं पाहणाऱ्या निजामाचेंच कौतुक वाटतें व त्याच्या राज्यपद्धतींत कांहींतरी चांगुलपणाचा भाग निश्चित असावा असें मानण्याकडे मनाची प्रवृत्ति साहजिकच होते. निजामी राज्यांतले मराठे सरदारहि पेशवाईंत सामील होण्यास राजी नव्हते यावरून या अनुमानास बळकटी येते.

पहिल्या निजामानें मराठ्यांच्या वाढत्या कमानीच्या काळीं हा प्रकार कसा साधला तें पाहतां दिल्लीपतीबद्दलची पेशवाई भावना हा त्याचा मुख्य आधार होता हें लक्षांत येतें. शाहू छत्रपति कृतज्ञतेच्या वैयक्तिक भावनेमुळें दिल्लीपति मोडण्यास नाखूष होता असें मानलें तरी त्याच्या मृत्यूनंतर तरी पेशवे सर्वाधिकारी झाले होते ना? मग त्यांना ही अनुभवानें दोन पिढ्या बाधलेली अडचण दूर करण्यास व आपल्या राजनीतीचें धोरण नवीन बनविण्यास काय हरकत होती? पण त्यांच्याहि मनांत वर बाजीरावाच्या उदाहरणांत सांगितल्याप्रमाणें स्वतःबद्दल अखेरपर्यंत न्यूनगंड होता. स्वराज्यापुरता तरी त्यांचा स्वातंत्र्यनिग्रह कितीसा होता हे पाहतां

त्याहि बाबतींत निराशा होते. छत्रपतींनी दिल्लीच्या बादशहाकडून सरदेशमुखीची सनद मिळविली तर आपण सरदेशपांडेपणाची सनद[१५] स्वतःसाठीं मिळवावी ही त्यांची महत्त्वाकांक्षा, व ही क्षुद्र आकांक्षाहि निजामानें कधीं पूर्ण होऊं दिली नाहीं हा प्रकार निराळाच. बरें, महाराष्ट्रांतील इतर प्रतिष्ठित माणसें तरी पेशव्यांच्या राज्याची शाश्वती कितीशी मानीत याचेंहि एक मनोरंजक उदाहरण आहे.[१६] पेशव्यांचे दिवाण जे महादोबा पुरंदरे ते दिल्लीस महादेवभट हिंगण्यास लिहितात कीं, त्यांच्या सासवडच्या देशपांडेगिरीच्या वतनाची बादशाही सनद दिल्लीहून करून पाठवावी ! या पत्रानें सबंध पेशवाईवर विदारक प्रकाश पडतो. त्यावेळचे सर्व शहाणे (?) पुरुष असें गृहीत धरीत कीं अखेरीस मोगल राज्य हें कायम आहे. छत्रपतींचें म्हटलें तर आहे म्हटलें तर नाहीं. तेव्हां आपली मोगली सनद जवळ असलेली बरी ! अशी ज्या ठिकाणीं लोकांची मनोवृत्ति, त्या अंमलाला स्वतंत्र राज्याची प्रतिष्ठा कशी लाभणार, त्याचा अभिमान कोणाला निर्माण होणार, त्यासाठीं मरावयास कोण तयार होणार ? पेशव्यांनी आपल्यातर्फे म्हणून दिल्लीस ठेवलेले हिंगणे नेहमीं तेथील मुत्सद्यांच्या कच्छपीं दिसतात. त्यांना बादशहाच्या प्रतिष्ठेची काळजी, जणूं मराठ्यांना प्रतिष्ठा पारखी होती. ज्या निजामानें भोपाळच्या पेंचांत सांपडला असताहि स्वतःच्या जबाबदारीवर बाजीरावास कांहीं द्यावयाचें नाकारलें, त्याबद्दल बाजीरावाचा मनोभाव काय ? तर आपलें म्हणणें कबूल करून त्यानें दक्षिणेस सुखरूप जावें तें न करतां किंवा बाहेर पडून छातीठोक युद्ध करावें तेंहि न करतां तो किल्ल्याच्या आश्रयास जाऊन पेंचांत आला, ही त्यानें अनुचित गोष्ट केली ! या गोष्टींत नबाबाची अब्रू गेली ! बाजीरावाला हें कळलें नाहीं कीं निजाम किती दूरंदेशीनें वागत होता. बाजीरावानें त्याला बोलाचालीसाठीं बाहेर तळावर येण्यास मोकळीक दिली, पण बाजीरावाच्या अटी कबूल करण्याऐवजीं तो पुन्हा किल्ल्याच्या आश्रयास गेला, पण त्यानें वाटेल ती अट कबूल केली नाहीं. निजामानें स्वतः आपल्या पुत्राच्या नांवें झालेला माळव्याचा सुभा बाजीरावास सन

---

१५. पे. द. १५, ले. ८६, पृष्ट ९६.
१६. पे. द. ३१ नं. १४७.

१७३८ च्या आरंभीं लिहून दिला व त्याबद्दल बाजीराव हुरळला आणि चिमाजी आपास लिहितो, " आपा, राजश्री स्वामींचें तपोबळ, वडिलांचें पुण्य समर्थ तरीच ही गोष्ट घडोन [ आली ]. अन्यथा होणें कळलेंच आहे. आज पादशाहींत नबाबासारिखा अमीर दुसरा कोण आहे ? याणें जो पाया घालून दिल्हा तो अवघ्यांत श्रेष्ठ आहे. नबाब अतःपर दिल्लीस जातील व समागमें कोणी द्यावयाचा तो देऊन. नबाब दिल्लीस गेलियावरी या प्रांताचा व राजवाडीयांचा बंदोबस्त कर्तव्य तैसा करून—होईल वर्तमान तें लिहून पाठवूं. कांहीं द्रव्य नबाबाजवळ मागावें ही इच्छा होती, परंतु नबाब द्रव्याचा लोभी. पूर्वीं याची साहित्य केली ते समयीं मन वाढवून द्रव्य देववलें नाहीं, तें हल्ली पदरचे देतील हे गोष्टी तशासारखी. दिल्लीस गेल्यावर सार्वभौमापासून प्राप्त जाहल्यास चुकणार नाहीं. करार झाला यांत अंतर न करावें ऐसी नानरोटी नबाबांनी दिली. अतःपर नबाब खता करतील ? कदाचित् काळकम [ काळक्रमें ? ] **दुर्बुद्धि निर्माण झाली तर केलें पावतील. श्री त्यास जय देणार नाहीं.** लोभ असो दीजे हे आशीर्वाद. "[१७]

वरील पत्रांत सांगितल्याप्रमाणें निजामानें दिल्लीस गेल्यावर कांहीं एक केलें नाहीं. उलट त्यानें परत दिल्लीस मराठ्यांचा जोर कसा मोडावा त्याबाबत खटपट चालविली. बाजीरावाच्या सन १७३७ सालीं दिल्लीच्या दरवाजापर्यंत केलेल्या स्वारीची व भोपाळास निजामास मिळालेल्या पराभवाची वार्ता मात्र हिंदुस्थानची सरहद्द ओलांडून इराणांत नादिरशहास मिळाली[१८] व आपले धर्मबंधु जे दिल्लीपति ते काफिरास खंडणी देण्याइतके दुर्बळ झाले आहेत हें ऐकून तो इकडे येण्यास निघाला. एवढाच परिणाम बाजीरावाच्या पराक्रमाचा हिंदुस्थानावर झाला. जो निजाम बाजीरावाला छदाम देईना त्याला नादीरशहाचा कैदी म्हणून दिल्लीकडून त्याला द्यावयाची खंडणी लोकांना मारमारून वसूल करून द्यावी लागली! व जी बादशाही राखण्यास पेशवे निघाले होते तिला मरणांतिक धक्का

---

१७. ब्रह्मेंद्र ले. ३५.

१८. Hanway—Travels in Persia etc. 2 nd. ed. 1754 Vol. I page 350.

नादिरशहानें दिला. ज्या माळव्याची सनद मिळाली म्हणून बाजीराव हुरळला होता त्या सुभ्याची–मुख्य नव्हे—नायब सुभेदारी मिळविण्यासाठीं पुढें नानासाहेब पेशव्यास आणखी पांच वर्षे थांबावे लागलें व तीहि मिळण्यास बादशहाच्या बंगालच्या सुभेदाराच्या मदतीस ऐशीं हजार फौजेनिशीं जाऊन कलकत्त्याजवळ रघूजीस पिटून लावावें लागलें ! एवढी जबर व मराठी राज्यास कायम दुबळे करणारी किंमत देऊन पेशव्यांना आपलें बस्तान बसवावें लागलें. बरें, बाजीराव हा नुसता शिपाईगडी होता म्हणून त्याच्या हातून अशी चूक झाली असें म्हणावें, तर त्याच्या मरणानंतरहि चिमाजी आपा तीच चुकीची पद्धत अनुसरतांना दिसतो व सवाई जयसिंग व अमीरखान यांची बाजू धरून **मोडलेल्या बादशाहीची उजागरी** करण्याच्या हिंमतीच्या गोष्टी सांगतांना आढळतो.[१९]

निजामाच्या विरुद्ध असलेल्या दिल्लीच्या अमीरांची व खुद्द महममशहा बादशहाची अशी समज झाली होती कीं, आपल्यावरील बाजीरावाचें संकट टाळण्यासाठीं निजामानें त्याला उत्तरेकडे वळविलें असावें. निजामाचे हे दक्षिणेंतील डाव बंद पडावेत म्हणूनच त्याला बादशहानें दिल्लीस परत बोलाविलें. व उत्तर सोडून पुरीं बारा वर्षे होऊन गेलेलीं असल्यामुळें पुनः एकदां दिल्ली दरबारची हालहवाल स्वतः डोळयांनीं पहावी म्हणून निजामानें हें आमंत्रण स्वीकारलें. कारण दिल्लीच्या बादशाहीची आपुलकी व अभिमान त्याच्या हृदयांत कायमच होता. निजाम उत्तरेंत १७३७ च्या जुलैपासून १७४० च्या जुलैपर्यंत ३ वर्षे राहिला व या अवधींतच भोपाळ व नादिरशहा हीं दोन मोठीं प्रकरणें होऊन गेलीं. निजामाच्या मनाचा अंत कधीं कोणाला लागला नाहीं व त्यानें आपला उद्याचा बेतहि कधीं कोणास समजूं दिला नाहीं. त्याच्या अशा वागण्यामुळें त्याच्याविरुद्ध प्रचलित झालेले समज खरे किंवा खोटे म्हणणें हेंहि कठिण आहे. उदाहरणार्थ खानदौरान मीरबक्षी याची थट्टा झोंबून व महंमदशहाच्या भोंवतीं जमलेल्या नाकर्त्या खुषमस्कऱ्यांची खोड परस्पर मोडली जावी म्हणून त्यानें व अयोध्येच्या सादतखानानें नादिरशहाला हिंदुस्थानांत

---

१९. हिंगणे दप्तर खंड १ ला, ले. १५, १७.

येण्याविषयीं लिहिलें असा समज मागाहून प्रचलित झालेला नसून तत्कालीन लेखकांनींहि या गोष्टीचा उल्लेख हिंदुस्थानांतच काय, पण इराणांतहि केलेला आहे याचा पुरावा नादिरशहाच्या सन १७४७ त झालेल्या खुनापूर्वीं इराणांत जे जर्मन व इंग्रज प्रवासी व्यापारादि करण्यासाठीं तेथें गेले होतें त्यांच्या लिखाणांत मिळतो.[२०] किंबहुना निजामाचें उदाहरण देशद्रोही माणसाचें समजून तसा त्याच्या नांवाचा उल्लेख तुर्कस्थानांत होऊं लागलेला होता. तें कसेंहि असलें तरी बाजीरावाच्या उत्तरेंतील स्वाऱ्या व निजामाचा त्याच काळीं सुरू असलेला कर्नाटकांतील संथ संचार हे पाहिले म्हणजे या गोष्टी काकतालीय न्यायानें घडत होत्या असें म्हणतां येणार नाहीं. शाहूनें कर्नाटक फत्तेसिंग भोसले, नारो राम मंत्री, बाबूजी नाईक बारामतीकर व रघूजी भोसले यांकडे सोंपविला होता, व पेशव्यांना तो मिळण्याची शक्यता थोडी होती. तेव्हां आपल्या प्रतिस्पर्ध्यांचें नाक परस्पर कापण्यासाठीं व पेशव्यांच्या मुलखावरून नजर दूर करण्यासाठीं पेशव्यांच्या वकिलानें निजामाच्या अशा संचारास उत्तेजन दिलें नसेल असें परस्परांतील भाव पहातां म्हणवत नाहीं. पेशवे हे जसे शूर व हिकमती होते तसेच मत्सरी, लोभी, व दुसऱ्याचें यश शक्य तितकें हिरावून घेणारे नव्हते असें नाहीं. याचीं उदाहरणें अनेक आहेत. या स्वारींत निजामाचा तेथवर न बसलेला जम विजापूर सुभ्यांत बसून सोंधें, बिदनूर, म्हैसूर, सावनूर वगैरे ठिकाणचे संस्थानिक त्यानें आपले मांडलिक करून सोडले. असें करणें म्हणजे संभाजी छत्रपतीस शाहूनें तोडून दिलेल्या मुलखावर परस्पर आक्रमण करविणें होतें, तें निराळेंच. शाहूला नेहमी अशी भीति वाटत असे कीं, पेशव्यांच्या उत्तरेंतील व एकंदरींत मोगल बादशाहीविरूद्ध चालविलेल्या आक्रमणांत आपल्या राज्याला धोका आहे, कारण संधि पाहून मोगल केव्हांना केव्हां आपला मोर्चा मराठ्यांकडे वळवतील यामुळें तो नेहमीं बाजीरावाबद्दल साशंक असे. इतकें असूनहि त्याला नको म्हणण्याची सोय नव्हती. कारण बाजीरावानें एवढी फौज वाढविली होती कीं, तिचा खर्च कसा भागवावा हाच पुढें या वेळेपासून पेशव्यांपुढील आद्य विचार झाला. मोगलांच्या सुसज्ज तोफखान्यासमोर व शिस्तवार लढाईच्या

---

२०. L. Lockhart–Nadir Shah. P. 124 ( 1938 )

योजनेसमोर या मराठी फौजांचा टिकाव लागणें कठिण होतें. जो मोगल बादशाहीचा वृक्ष मुळावर घाव घालून तोडण्यासाठीं बाजीराव उत्तरेस दिल्लीवर चालून गेला, त्याला कांहींहि धक्का न लावतां तो खोखोंतल्या खेळाप्रमाणें धांवत जाऊन पळत परत आला. त्यानें दिल्लींतील संपत्ति जणूं नादिरशहासाठीं स्वतः हात न लावतां शिल्लक ठेविली. ती पुढें दोन वर्षांनीं आपल्या धर्मबंधूंच्या सहाय्यार्थ म्हणून येऊन नादिरशहानें लुटली व पुढें खंक झालेली दिल्ली मराठ्यांना आपलें बिनहिशेबी राजकारण तीन पिढ्या चालविण्यास मोकळी करून ठेविली. बाजीराव आपल्या पत्रांत लिहितो, " मोगल मागें मागें आले तरी त्यांस पायींची धापा देऊन धावतां धावतां खराब होत तेंच करून बुडवितों." [२१] पण मोगल या सैतानाच्या पाठी लागण्याइतके मूर्ख नव्हते. ते स्वस्थ आरामानें दिल्लींत राहिले. जो बाजीराव ज्या सोनपत–पानपताचें त्यास दर्शनहि झालें नव्हतें तिकडील " मुलूख ताराज करून मोंगल अन्नास महाग होत ऐसेंच केलें जाईल " वगैरे बढाईच्या गप्पा लोकांच्या मनोरंजनार्थ लिहून ठेवतो, तो स्वतःच आपल्या शिलेदारांपुढें कपाळ घासण्यासाठीं रिकामा पुण्यास आलेला दिसतो. या मराठे–मोगलांच्या झगड्याला " इतिहासांत अपूर्व " असें रियासतकार म्हणतात.[२२] मराठ्यांची नांवाजलेली गनिमी पद्धति यांत दृग्गोचर होत असेल. पण ती व्यवहारदृष्ट्या राष्ट्राला किती चुकीच्या मार्गावर नेणारी व निरुपयोगी होती हेंहि बाजीरावाच्या या दिल्ली स्वारीवरून स्पष्ट होतें. निजामाला मात्र या बाजीरावाच्या उत्तरीय महत्त्वाकांक्षेमुळें तीन वर्षांचा ( १७३४–३७ ) उसंत दक्षिणेंत मिळाला. व त्याचें राज्य स्थिर होण्यास तेवढीच मदत झाली असें म्हणणें इतिहासकारास भाग आहे.

निजाम सन १७३७ सालीं दिल्लीच्या रक्षणार्थ उत्तरेंत गेला. तेथें बादशहानें त्याचा मोठा सत्कार केला व त्याला असफ्‌जाह ही सर्वांत मोठी पदवी दिली व त्याचा चुलत चुलतभाऊ कमरुद्दिनखान तेथें वजीर होता त्याच्या अधिकारास धक्का न लावतां निजामाला त्यावर मुखत्यार नेमलें.

---

२१. ब्रह्मेंद्र लेखांक २७, पृष्ठ २९.

२२. मराठी रियासत ५ ( २ ) पृष्ठ ३०३

त्याचा अधिकार लष्करी व मुलकी दोन्ही होता. याच अधिकारांत त्यानें मुलाच्या नांवानें माळव्याचा सुभा व आग्र्याचा सुभा करून घेऊन तो माळव्यांत आला व तेथें वर सांगितल्याप्रमाणें बाजीरावाकडून भोपाळास अडचणींत पकडला जाऊन तह करून परत दिल्लीस आला. तों नादिरशहाच्या स्वारीची वार्ता आली. त्यांतून मोकळा झाल्यावर सुद्धां तो एक वर्ष दिल्लीस राहिला. या अवधींत दक्षिणेंत त्यानें आपला मुतालिक करून ठेवलेला दुसरा मुलगा नासिरजंग यानें स्वतंत्र होण्याचा बेत केला. या त्याच्या बेतांत जानोजी निंबाळकर प्रभृति मराठे सरदार सामील झाले. घरांतील या फुटीचा फायदा घेऊन बाजीरावानें १७४० च्या आरंभीं नासिरजंगास खानदेशांत पेंचांत आणून त्याकडून नेमाड प्रांतांतील खरगोण, मकडाई वगैरे महालांची जागीर करून घेतली. नंतर थोड्याच दिवसांत बाजीराव नर्मदेच्या काठीं मरण पावला तरी पुढें चिमाजी आपानें निजामाच्या विरुद्ध असलेल्या दिल्लीदरबारांतील पक्षाचें सारथ्य पत्करिलें. दिल्ली सुधारण्याची आशा नष्ट झाल्यामुळें निजाम तिकडून १७४० च्या पावसाळ्यांत दक्षिणेंत येण्यास निघाला. तो इकडे पोंचण्यापूर्वींच चिमाजी आपासुद्धां मरण पावला होता. यावेळीं दक्षिणेंत थोडी उसंत मिळाल्यामुळें शाहूनें स्वतंत्र रीतीनें फत्तेसिंग व रघूजी भोसले यांना अर्काटच्या नबाबाच्या जुल्मांतून तंजावरच्या राजाला वाचविण्यासाठीं तिकडे ससैन्य पाठविलें होतें. त्यांनीं आरंभींच मोठी धडक मारून अर्काटचा नबाब व त्याचा मुलगा यांना लढाईंत ठार मारिलें व तेथून पुढें त्रिचनापल्लीस जाऊन तेथील किल्ला मार्च १७४१ च्या शेवटीं काबीज केला. तेथें फत्तेसिंगानें मुराररराव घोरपड्यास किल्लेदार नेमलें. रघूजी, चंदासाहेब व त्याचा पुत्र यांस कैदी म्हणून बरोबर घेऊन वऱ्हाडांत परत आला. बाजीराव व चिमाजी हे वडील कर्ते पुरुष गेल्यामुळें वीस वर्षांचा तरुण नानासाहेब पेशवा यावेळीं बराचसा आपल्या सरदारांच्या कलानें चालला होता. अशा वेळीं निजाम दक्षिणेंत येऊन पोहोचला. बाजीराव व चिमाजीनें जें निजामाविरुद्ध धोरण स्वीकारलें होतें तें सोडून नानासाहेबानें या वेळीं बंडखोर नासिरजंगाविरुद्ध त्याचा पिता जो निजाम त्याला मदत केली. ही गोष्ट बहुधा पिलाजी जाधव, महादोबा पुरंदरे, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर प्रभृतींच्या विचारानें घडली असावी. यामुळें यावेळीं मुलाकडून परस्पर म्हाताऱ्या

निजामाचा पराभव होऊन त्याचा कांटा कायमचा निघण्याचा मोका प्राप्त झाला होता तो हुकला. उलट नासिरजंग पराभव पाऊन फकीर झाला.[२३] आपल्या कट्टर ठरलेल्या शत्रूचाहि कांटा योग्य वेळीं काढण्याचा उद्योग पेशव्याकडून कधींहि तडीला गेलेला दिसत नाहीं. असाच प्रकार पुढें नजीबखानाच्या बाबतींत उत्तरेत झाला हें इतिहासज्ञांस विदित आहेच.

जर या वेळीं योग्य सल्ला मिळून नानासाहेबानें वेगळें वर्तन केलें असतें तर दक्षिणचा इतिहास पालटला असता. मोठी फौज बरोबर घेऊन पेशवा उत्तरेंत गेला तो नासिरजंगाच्या पराभवानंतर तरी निजामाच्या पाठीस लागता तर कर्नाटकांत सुद्धां त्यास अडविणारें कोणी नव्हतें. पण धूर्त निजामाशीं सल्ला केल्यामुळें निजाम मात्र आपले ठरलेले बेत सिद्धीस नेण्यास मोकळा झाला. पेशव्यानें निष्कारण रघूजी भोसल्याच्या कार्यक्षेत्रांत प्रवेश करून ज्यांनीं मराठ्यांचें कांहींच वाकडे केलें नव्हतें त्या गढामंडल्याच्या गोंड राजाला जिंकण्याचें ठरविलें व मराठ्यांच्या एवढ्या अफाट फौजेपुढे तो राजा गारदहि झाला.[२४] तेथून मागें येऊन पुनः पेशवा पावसाळ्यानंतर उत्तरेंत गेला. निजामानें त्याला तिकडे जाण्यास अर्थातच उत्तेजन दिलें. अजून माळव्याच्या जिंकलेल्या सुभ्याच्या फुसक्या बादशाही सनदा मिळविण्याचा पेशव्यांचा खुळा हव्यास सुटला नव्हता. त्या मिळविण्यासाठीं महादेवभट हिंगणे यासारख्या बेवकूब वकिलाच्या सल्ल्यावरून रघूजी भोसल्याविरुद्ध बंगाल्यांत जाण्याचें पेशव्यानें कबूल केलें व ऐंशी हजार एवढी मोठी फौज घेऊन प्रयाग, काशी, गयेवरून तो बंगाल्यांत गेला व तेथें अलीवर्दीखानाची बाजू घेऊन रघूजीला त्यानें बंगाल्यांतून पळवून लाविलें. या कृत्यानें हिंदुस्थानचा इतिहास बदलला असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. रघूजीला यावेळीं प्रतिबंध न होता तर त्यानें व त्याचा दिवाण भास्कर राम कोल्हटकर यांनीं मिळून बंगाल, बिहार हा प्रदेश सहजरीत्या आपल्या सत्तेखाली आणला असता. असें होतें तर पुढें क्लाइव्हच्या विजयाचा पाया मुळांतच खचला असता.

---

२३. ब्रह्मेंद्र, ले. ६०.
२४. ब्रह्मेंद्र, ले. ६१.

आपल्या देशबांधवांचा पराभव करून दिल्लीच्या बादशहाकडून माळव्याच्या सनदा मिळविण्याऱ्या पेशव्याची व त्याच्या सल्लागारांची किती तारीफ करावी !

निजाम मात्र सत्तरी उलटूनहि पुनः आपल्या राज्याची घडी नीट बसवीतच होता. भोसले व पेशवे यांचीं सर्वांत मोठीं मराठी सैन्यें बंगाल्यांत दूर वर गेलीं असें पाहून तो कर्नाटकांत उतरला. त्याचें अर्धें सैन्य चंद्रसेन जाधव व जानोजी निंबाळकर यांचेंच होतें. त्यांसह कृष्णा उतरून त्यानें दक्षिणेंतील उन्मत्त झालेले छोटे छोटे नबाब भरडून काढले. कर्नूळ, कडाप्पा, अर्कॉट या मार्गानें त्रिचनापल्लीस जाऊन तीहि त्यानें १७४३ च्या ऑगस्टमध्यें हस्तगत केली. व अशा रीतीनें रघूजी व फत्तेसिंग यांच्या दोन वर्षांच्या उद्योगावर लीलेनें बोळा फिरविला. याच-मुळें पुढें या प्रदेशांत इंग्रज, फ्रेंच वाढीस लागले. म्हणजे सन १७४३ हें साल हिंदुस्थानच्या इतिहासांत मोठें क्रांतिकारक समजलें पाहिजे. यावर्षी उत्तरेंत व दक्षिणेंत दोन्ही ठिकाणीं दुर्बळ मुसलमान नबाबांचीं राज्यें पेशव्याच्या अदूरदर्शीपणामुळें कायम होऊन वाढीस लागलीं व पुढें इंग्रज, फ्रेंच व त्यांनीं तयार केलेले गारदी यांच्या मदतीनें मराठ्यांच्या कक्षेंतून कायमचीं सुटलीं. जो मुरारराव घोरपडे येथवर स्वतंत्र होता तो गुत्तीची ओसाड जागीर घेऊन यापुढें निजामाचा अंकित बनला, आणि तंजावरचा मराठा राजा कायम अर्कॉटच्या नबाबाच्या कक्षेंत गुरफटून तसाच मांडलिक होऊन राहिला. जो प्रदेश गेलीं शंभर वर्षें मराठ्यांनीं पादाक्रांत करून त्यांतील कांहीं प्रदेशावर स्वतः अंमलहि चालविला होता, ज्या प्रदेशांत हजारों महाराष्ट्रीय ब्राह्मण व क्षत्रिय पिढ्यान्‌पिढ्या स्थायिक होऊन ठिकठिकाणीं नांदत होते, जेथील प्रजेलाहि मराठ्यांची चांगली जानपछान होऊन त्यांतील बरेच मराठी भाषा बोलूं व लिहूं लागले होते, असला प्रदेश सोडून उत्तरेंत राज्य स्थापणें पेशव्यांनीं पत्करिलें त्यामुळें दक्षिण तर त्यांच्या सत्तेंतून निसटलीच, पण उत्तरहि फारशी ताब्यांत आली नाहीं. सरदेसायांनीं याहि प्रकरणाचा आपल्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें विपर्यास केला आहे. "**मराठमंडळाचा मुख्य चालक पेशवा**"[२५] हें

२५- मराठी रियासत ५, पेशवा बाळाजीराव भाग १ पृ० ७०

तत्त्व रघूजीनें शाहूच्या हयातींत कोणत्या कारणास्तव मान्य करावयाचें होतें? छत्रपतीची पद्धति पाहिली तर सारे राजाचे सारखे नोकर होते. १७५० पर्यंत नानासाहेबाला सर्वाधिकार मिळालेला नव्हता. असें असतांना रघूजीनें दक्षिणेंत कर्नाटकांत वा पूर्वेस बंगाल्यांत मराठ्यांचें राज्य वाढविण्याचा उद्योग आरंभिला तर त्याच्या मार्गांत आडवें पडणें हा शुद्ध मत्सरीपणा व दुष्टपणा म्हटला पाहिजे. निजामावर उपकार करून रघूजीचा पाणउतारा करावयाचा हा काय भलेपणाचा मार्ग? बरें, रघूजी गर्वानें वागत होता असेंहि पुराव्यावरून म्हणतां येत नाहीं. तो आरंभीं महाराजांकडे तक्रार करतांना आढळतो व नंतरहि शेवटपर्यंत पेशव्याशीं स्वतः भेटून सलूख राखूं इच्छितो.[२६] पण नानासाहेबाला रघूजीपेक्षां बादशहाची मोहब्बत जास्त. रघूजी हलका झाला तर तें त्यास इष्ट, आणि त्यासाठीं आधींच्या सुभेदारास अन्यायानें मारून स्वतः सुभेदार झालेला अलिवर्दीखान जगविण्याची त्याची तयारी!

सन १७४३ पासून १७४८ पर्यंत निजामाचीं शेवटचीं पांच वर्षें फारशीं महत्त्वाचीं नाहींत. तो दिवसेंदिवस म्हातारा होऊन स्वतः कांहीं करण्यास असमर्थ झालेला दिसतो. तरी औरंगजेबाप्रमाणें शेवटपर्यंत त्यानें अधिकारत्याग केला नाहीं. या कालांत रघूजी भोसले गोंडवण जिंकून नागपुरास आपलें वेगळें संस्थान स्थापण्यांत गर्क होता व त्याचे सरदार आणि मुलगे बंगाल, बिहार आणि ओडिसा या प्रांतांत भोसल्यांची सत्ता पसरविण्यांत गुंतले होते. त्यामुळें निजामाला तिकडून फारसा त्रास झाला नाहीं. तसेंच पेशवा व त्याचे सरदार शिंदे, होळकर, पवार, बुंदेले प्रभृति यमुनादक्षिणतीरापर्यंत अंमल दृढ करण्यांत गुंतले होते. त्यामुळें त्यांचाहि उपद्रव निजामास झाला नाहीं. या उलट हे सरदार उत्तरेंतील राजपूत, अहीर, जाट, बुंदेले व गोंड प्रभृति हिंदु राजांच्या बोकांडी बसले. यांत महाराष्ट्रधर्माचें रक्षण न होतां मुसलमानी बादशाहीचें मात्र परस्पर संरक्षण होत होतें!

निजामाचा वडील मुलगा गाजीउद्दीन फिरूजजंग दिल्लीस अमीर उल्-उमरा होता. तो शांत वृत्तीचा, सज्जन व विद्याभिलाषी होता. त्याचें लक्ष

---

२६. पुरंदरे दप्तर १·१५२ (पृ० १०३)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२६८
ना. क्र.

दक्षिणच्या सुभ्यावर नव्हतें. दुसरा मुलगा नासिरजंग महत्त्वाकांक्षी, पराक्रमी व राज्यपदास लायक असा होता. पण निजामानें त्यास चांगलेंच दाबांत ठेवलें होतें. तो नेहमीं स्वारी शिकारींत असे व त्यानें १७४७ सालीं सदाशिवराव भाऊ दक्षिणेंत गेला होता तेव्हां तिकडे स्वारीहि केली होती. कर्नाटक शाहूनें फत्तेसिंग भोसल्यास दिलें होतें. त्याचा सहकारी बाबूजी नाईक बारामतीकर होता. पेशव्यांचा नातेवाईक असूनहि पेशव्यांनीं त्याचा सतत उच्छेद केला. निजामाच्या मदतीनें तरी कर्नाटकांतील चौथाई वसूल व्हावी म्हणून त्यानें निजामाशीं स्नेहहि केला होता. पण पेशवे, त्यांचे दिवाण पुरंदरे व गुरु ब्रह्मेंद्रस्वामी हे सर्व बाबूजीच्या—कां कोणास ठाऊक —हात धुवून पाठीस लागलेले दिसतात. स्वामी तर फत्तेसिंग भोसल्यास आज्ञा करतो कीं, " तुम्ही बाबूजी नाईक यासी मैत्री करूं नका. हा केवळ पंचमहापातकी आहे. जातीचा सराफ अपेशी आहे. त्याची मैत्री तोडून टाकणें."[२७] नानासाहेबाच्या फुशीमुळें कर्नाटकांतील मुसलमान नवाबांनीं व संस्थानिकांनीं सन १७४४ सालीं त्याचा पराभव केला, व त्याला तिकडून पिटून लावलें. त्यामुळें तो कर्जबाजारी होऊन शाहूच्याहि गैरमर्जींत आला. पेशव्यानें पुढें कोल्हापूरच्या कर्नाटकांतील हक्कांचें संरक्षण व खंडणीची वसुली आपणाकडे घेतली व शाहूकडूनहि तो प्रदेश आपल्या नांवें करून घेतला. या कामीं त्याचें निजामाशीं संगनमत होतें. स्वतःच्या प्रतिष्ठेसाठीं अनेक पराक्रमी व हुशार मराठ्यांना पेशव्यांनीं जागेवर बसविलें त्यांतीलच हें एक उदाहरण आहे. यामुळें निजाम, अर्काटचा नबाब, व सवनूर, कर्नूल, कडाप्पा येथील पठाण संस्थानिक हे सर्व चिरंजीव झाले व पुढें अखेरपर्यंत पेशव्यांना बाधले. या प्रकारांतहि महाराष्ट्रधर्मरक्षणाचा कोठें थांग लागत नाहीं ! उलट "सर्व म्लेच्छाक्रांत जालें आहे. देवालयांची पुजा राहिली. महाद्वारें अडकिलीं आहेत" अशी तक्रार श्रीरंगनाथस्वामीचा पुजारी त्रिचनापल्लीहून फत्तेसिंग भोसल्यास लिहितांना आढळतो.[२८] एवढा अनर्थ पेशव्याच्या मत्सरी व लोभीपणामुळें दक्षिणेंत घडला याचा हें पत्र उत्तम पुरावाच आहे.

---

२७ ब्रम्हेंद्रचरित्र ले ३००

२८. भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष ३१ अंक २-३ ले. ७७ ( दाभाडे दप्तर ).

निजामाच्या शहाणपणाचा पुरावा त्याच्या मरणसमयीं नासिरजंगास केलेल्या उपदेशांत आढळतो. हा उपदेश अनेक ठिकाणीं छापलेला आहे. त्याचीं अनेक कलमें असून तीं सर्व वाचकांनीं मनन करण्यासारखीं आहेत. त्यांतील पहिलें कलम मराठ्यांसंबंधीं आहे. तो म्हणतो, " दक्षिणचें राज्य करूं इच्छिणारांनीं असें लक्षांत वागवावें कीं, मराठे या देशाचें जमीदार रहिवासी आहेत. त्यांना सर्वस्वी नाहीसें करणें शक्य नाहीं. अर्थात् त्यांच्याशीं सलुख्यानेंच वागणें योग्य आहे. " पण १६ व्या कलमांत दक्षिणी ब्राह्मणांबद्दल तो म्हणतो कीं, " ते डोचकें मारण्यायोग्य आहेत. त्यांतहि हे दोघे हरामजादे–एक मोरू व एक रामदास–हे दौलतीचे नाशकर्ते जाणून त्यांस कैदेंत ठेवले आहेत. तेथें त्यांचा बंदोबस्त ठेवण्यांत आपल्या कामाचा बंदोबस्त समजावा. कैदखान्यास पंडितखाना नांव त्यामुळें आहे." [२९] निजामाचें हें मतहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यांतील मोरू म्हणजे साडेतीन शहाण्यांतील एक जो विठ्ठल सुंदर त्याचा वडील भाऊ मोरो सुंदर हा असून दुसरा रामदास हा पुढें नांवास चढून खून झालेला तेलंगा ब्राह्मण होय. यावरून दक्षिणी ब्राह्मणांत तो मुख्यतः औरंगाबाद, हैद्राबाद पट्ट्यांतील ब्राह्मण अंतर्भूत धरतो असें दिसतें. मराठ्यांशीं सलूख ठेवावा असें सांगून तो पुढें सांगतो कीं, त्यांच्या सैन्याला दक्षिण जिंकण्याला कधींहि संधि देऊं नये. या तत्त्वाच्या जोरावरच निजामाचें राज्य दक्षिणेंत कायम झालें व पेशव्यांनीं उत्तरेकडे मोर्चा वळवून दक्षिण निजामाच्याकडे सोंपवून दिल्यामुळें त्याला व त्याच्या वंशजांना आपलें हें मनांतील धोरण राखण्यास पेशव्यांनीं मदतच केली असें म्हटलें पाहिजे. दक्षिणी ब्राह्मणांबद्दलच्या कलमांत पुढें असेंहि आलें आहे कीं, औरंगजेबानें ब्राह्मण दिसला कीं त्याला कैदेंत घालण्याची कायम आज्ञा दिली होती. मनांतून असें तत्त्व घोळणाऱ्या व तें मरणसमयीं मुलास सांगून ठेवणाऱ्या याच निजामाच्या पोकळ आदरसत्कारानें बाजीराव मात्र स्वतःस कृतकृत्य समजतांना आढळतो. " नबाबाची आमची भेट आदरपुरस्सर जाली... थोरपणानुरूप उत्तम भाषण केलें. आम्हांस हातीं

२९. Nizam--ul--Mulk Asafzah by Y. H. Khan Chapter II

धरून खिल्वताचे डेरियांत गेले. नबाबाच्या आमच्या गोष्टी इष्टक्याच्या परस्परें उत्तमच होणें त्या जाल्या. नबाब फारच संतोषी होऊन पुनरोक्त उभा राहून भेटला. चित्ताचे खुलासियाचें भाषण केलें. आम्हापुढें पानदान ठेऊन विडे दिल्हे. बरोबर दहावीस पावलें येऊन निरोप दिल्हा. आम्ही डेरियास आल्यानंतर मेवियांच्या डाल्या व मेजवानीचे सामान आपले लस्करांतून आमचे लस्करपर्यंत एकच हारकतर (हरकतार) दोन घटका रात्रपर्यंत लाविली होती. येक वस्त्रें व सिरपेच व जेगा कलगी दिल्ही. सारांश नबाबानी भेटीचा सन्मान व आदर व लौकिक व इज्जत अब्रूलायक बहुतच संपादिला. याप्रमाणें भेट मागेहि जाली नाही व पुढेंहि कोठें होणार नाही. लौकिक संपादणें तो संपादून यशकीर्तीचा लाभ होतो, अन्यथा होणे आहेसे नाहीं...नबाबाच्या व आमच्या भेटी तीन जाहल्या पण बोलाचालीचा मजकूर जाला नाही व इष्टकत्वाच्या व सौरस्याचेच भाषण जाहालें. (भेटीमुळें) परस्परें चित्तांत कीत (किन्त) वाढला होता तो दूर होऊन दिन प्रतिदिन स्नेहाची अभिवृद्धि असे. नबाबानीं चौकडी मोत्यें व दरम्यान कमची कुडक्यांची जोडी दिली. बहुत दया व आदर संमान केला तो लिहितां विस्तार आहे. सविस्तर भेटीनंतर कलेल. सर्व आपले मराठे, चंद्रसेन व सुलतानजीराऊ निंबालकर आदि करून आम्हास भेटविले. आमचे डेरियास पाठविले. आम्ही त्यांचा बहुमान केला...बहुत बहुत प्रकारें आदर सन्मान केला तो लिहितां विस्तार आहे. पुढें समयानुरूप उपयोग पडेल." [३०] पेशवे हे मुसलमानांच्या दरबारी रिवाजास व पोषाखी वागणुकीस किती भाळलेले होते याचा उत्तम पुरावा याहून दुसरा कोणता? बाजीरावानें भेटीचा पुढें उपयोग होईल असें कल्पिलें तो उपयोग मात्र कधींच घडला नाहीं!

निजामाच्या उपदेशांतील दुसरीं कलमेंहि त्याच्या दूरदृष्टीचीं व शहाणपणाचीं निदर्शक आहेत. तो म्हणतो "राजा हा पृथ्वीचा एकमेव मालक नसून फक्त विश्वस्त आहे. त्यानें सर्व पृथ्वी एकट्यानेंच व्यापण्याचा आधाशीपणा करूं नये. सर्व माणसें ईश्वरानेंच निर्माण केलेलीं असल्यामुळें त्यांना मारणें हेंहि योग्य नव्हे. खेरीज माणसें इतकीं स्वस्त नाहींत कीं

---

३०. भा. इ. सं. मं. ऐ. सं. साहित्य खंड ६, ले. ६.

ज्वारीबाजरीच्या कणसाप्रमाणें दर वर्षीं नवीं निर्माण होतील. शिपाई लोकांचाहि वंश चालावा म्हणून त्यांना घरीं जाण्यासाठीं सवड द्यावी व शक्य तितकी घराजवळील कामावर त्यांची योजना करावी. दक्षिणचें राज्य हें आपलें वतन नसून नोकर म्हणून आपल्याकडे आहे. म्हणून दिल्लीच्या बादशहाशीं नेहमीं नम्रपणानें वागावें. नादिरशहानें मला बादशाहीपद देऊं केलें तेव्हां मी सांगितलें कीं येणें करून कोणाचेंहि कल्याण नाहीं व मजकडे निमकहरामी मात्र येईल. तेव्हां त्यानें मला बादशाहीचा मुख्त्यार नेमलें. मुलाला तो आणखी सांगतो कीं ' तूं आपलें आयुष्य प्रवासांत रोज नवा मुलुख पहात व नवें पाणी पीत तंबूच्या छायेंत घालवावें म्हणजे देशाचा बंदोबस्त व राज्यव्यवस्था सुरळित चालेल. मौल्यवान वेळ इकडे तिकडे करण्यांत न घालवितां राज्याच्या प्रत्येक कामाला त्याच्या महत्त्वा-प्रमाणें वेळ देत जावा. साधुसंत वंदीत जावे. दक्षिणेंत जुनीं स्वतंत्र राज्यें होतीं त्यांचे सुभे जाहले आहेत म्हणून त्या जुन्या राज्यांतील घराणदार लोक आपल्या राज्यकारभारांत त्यांच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें घेत जावे. एका माणसाकडे एकच काम द्यावें. जास्त देऊं नये. प्रजेच्या गरजा नेहमी जाणून घ्याव्या. मोठ्याकडून मोठीं कामें व लहानाकडून लहान कामें घ्यावीं. हलक्या माणसाला दारांत उभें करूं नये, मग त्यांशीं बोलणें कोठलें ? एखादे वेळीं बडे लोक श्रमाचें हलकें काम अंगावर घेत नाहींत, अशा वेळीं लहानाकडूनच तें करून घ्यावें लागतें. स्वतः होऊन कधीं युद्धास प्रवर्तूं नये. आपल्या सत्तेचा प्रभाव किंवा युद्धकौशल्य दुसऱ्यास दाखविण्यासाठीं किंवा दुसऱ्यांचा मुलुख जिंकणें वा संपत्ति हरण करणें यासाठीं युद्ध आरंभिणें अन्यायाचें आहे. शक्य तितकें तें टाळीत जावें. पण अंगावर येऊन पडलेंच तर शेवटपर्यंत धीरानें चालवावें." आपला अनुभव म्हणून निजाम सांगतो कीं " दक्षिणेंतील लोकांत बऱ्हाणपुर व विजापूरचें लोक सर्वांत जास्त अविश्वासू आहेत. उत्तरेकडील लोकांत गुजराती व कश्मीरी या लोकांना टाळावें व त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवूं नये. खर्चाचा बेत आपल्याप्रमाणें ठेवला तर आपल्या राज्याचें उत्पन्न आपणास सात पिढ्या पुरेल. एरवीं वर्षा दोन वर्षांत सर्व खलास होईल. खजिना नेहमीं जवळ बाळगावा कारण शिपाई आपला तुंबलेला तनखा केव्हां मागतील व त्यासाठीं दंगा करतील याचा नेम नसतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलप्रत. क्रमांक २८५१२ वि. ५९५५ क्रमांक ११७२ नों. दि. १५।५।६८

म्हातारपणीं करूं नये ती गोष्ट मी मनुष्यसहज दुबळेपणामुळें करून बसलों आहें. ही गोष्ट म्हणजे तरूण मुलीशीं लग्न करणें. आतां हा माझ्या इज्जतीचा व नांत्राचा प्रश्न असल्यामुळें मी माझ्या सर्व मुलांना व त्यांच्या वंशजांना फर्मावितो कीं त्यांनीं या बायकोचें भरणपोषण करून तिला मानानें वागवावें. तसेंच तूं आपल्या धाकट्या भावांना स्वतःच्या मुलांप्रमाणें व त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें वागवावें व ते सर्व तुझे मित्र व हितचिंतक होतील असें करावें. येणेंकरून तुझें बळ वाढेल व हा सर्व प्रकार एकमेकांस भूषणास्पद होईल, नातू हिदायत मोहिउद्दिनखान हा आमच्या वंशाचाच आहे, त्यावर कृपा करून व त्याला चांगल्या तऱ्हेनें वागवून आपल्या बाजूस वळवून त्याला चुरडून टाकण्याचें मनांत आणूं नको. चहाडखोरांच्या व निंदकांच्या बोलण्याकडे तूं कधींहि लक्ष देऊं नको व क्षुद्रांना जवळ येऊं देऊं नको. आतां रडावयाचें सोडून असाच ऊठ आणि लवकर जाऊन स्वतःच्या विश्वासाचे लोक सर्व अधिकारावर नेम आणि राज्याचा भार स्वतःवर घे. ईश्वर तुझें रक्षण करो."

अशा तऱ्हेचा उपदेश मरणसमयीं दुसऱ्या कोणी केलेला ऐकिवांत नाहीं. ज्या प्रमाणें या उपदेशाच्या संक्षिप्त भाषांतरित प्रति मराठींत आढळतात तशा अमात्यांच्या आज्ञापत्राच्या प्रती पेशवाईंत होऊन अभ्यासिल्या जात्या तर किती चांगलें होतें ! असें न घडल्यामुळेंच पेशव्यांची वागणूक होकायंत्र नसणाऱ्या तुफानांत सापडलेल्या जहाजासारखी झाली यांत आश्चर्य तें काय?

पेशवे उत्तरेकडे सरकले तें योग्य कां अयोग्य हा वाद अजून नव्या पुराव्यावर मांडण्याचा हव्यास सुटलेला नाहीं. दिल्लींतील कमकुवत इराणी पक्षास मराठ्यांची मदत हवी असल्यामुळें बाजीराव तिकडील राजकारणांत शिरला. "मराठे न जाते तर आणखी कोणी गेले असते व बलिष्ठ होऊन मराठ्यांस त्रास देते. तेव्हां मराठ्यांनीं पसारा मांडला हें ठीकच केलें, पण मांडलेला पसारा आवरून धरण्याइतकी मनुष्य–द्रव्य–व बुद्धि ही बळें आमच्यापाशीं नव्हतीं. त्यांचा तुटवडा पडला व तो भरून काढण्याचे उपाय आम्ही शोधूं शकलों नाहीं हा आमचा दोष"[३१] असें फारसी पत्रें वाचून संशोधक गणेश हरि खरे

---

३१. ऐतिहासिक फारसीं साहित्य खंड ४, पृष्ठ २६

प्रतिपादितात. जर हीं तीन बळें आमच्याजवळ पुरेशीं नव्हती तर मग होतें तरी काय? याचें उत्तर अदूरदर्शी व बिनहिशेबी हिंमत आणि लोभ. यांचा मात्र पेशवाईत पूर लोटला होता, असें वाटतें. बाकी आपण बुद्धींतहि कमी पडलों ही खऱ्यांची कबूलीहि कमी नाहीं. आणि तोच आमचा मुख्य मुद्दा आहे. १८ व्या शतकांत मराठ्यांच्या झंझावातापुढें केवळ बुद्धिबळावर मुसलमानी सत्तेचे वृक्ष टिकून राहिले हीच जास्त बहादुरीची व कौतुकाची गोष्ट होय.

सन १७४८ च्या मे महिन्यांत निजामुल्मुल्क दिल्लीस जाण्यासाठीं निघाला तो बुन्हाणपूर मुक्कामीं मरण पावला. या वेळीं महंमदशहा बादशहा मरण पावला असून त्याचा पुत्र अहमदशहा अब्दालीचा पराभव करून परत दिल्लीस येऊन तख्तनशीन झाला होता. बादशहानें जसें निजामास मदतीस बोलाविलें होतें तसेंच पेशव्यासहि बोलाविलें होतें. त्याप्रमाणें पेशवा जयपुरापर्यंत जाऊन पोहोंचला होता. सरदेसाई तो दिल्लीस जाऊन बादशहास भेटला म्हणून म्हणतात तें चूक आहे ( म. रि. ५ बाळाजीराव १ पृ. १००; N. H. of the Marathas, Vol. II p. 237. ) तेथें बादशहाच्या मरणाची वार्ता आल्यावरून तो परत फिरला. मानुपूरच्या लढाईत वजीर कमरुद्दीनखान मेल्यामुळें दिल्ली दरबारांत तुराणी पक्षाची बाजू खचली व इराणी पक्ष सफदरजंग वजीर होऊन अधिकारावर आला. या वेळीं चंबळेपर्यंतचा मुलूख मराठ्यांच्या कक्षेंत आधींच आलेला असल्यामुळें पेशव्यानें आपल्या सरदारांस यावेळीं तरी मर्यादा घालणें इष्ट ठरलें असतें. या सालच्या पावसाळ्यांत पेशवा पुण्यास परत आला तो पुढें दीड वर्ष साताऱ्यास छत्रपतीच्या राजकारणांत गुंतून पडला. उलट दिल्लींत नव्या वजिराविरुद्ध तुराणी पक्षाचीं कारस्थानें सुरू झाली. बादशहानें नासिरजंगास उत्तरेंत बोलाविलें. पण त्याला निघावयास पुरें एक वर्ष लागलें. जर तो दिल्लीस पोहचता तर तेथें यादवी सुरू होऊन मोगलांची मध्यवर्ती सत्ता आपोआप दुर्बळ झाली असती. या उलट पेशव्याचे सरदार जे शिंदे–होळकर, त्यांनीं वजिराकडून खर्च घेऊन नासिरजंगास नर्मदेवरच अडविलें. त्यामुळें दक्षिणेंत नासिरजंग सहीसलामत परत येऊन पेशव्यावरील दाब आपोआपच वाढला. आपल्या कायम शत्रूस परस्पर छेद देण्याची कला पेशव्यांना कधींच साधली नाहीं. दीडवर्ष राणीचा ( सगुणाबाई ) मृत्यु, शाहूचा आजार व नंतर मृत्यु आणि नवीन राजवटीची घडण या प्रकारांत मोडलीं. शाहूच्या भावनेचा अडथळा आतां नसल्यानें पेशव्याला निजामाबाबत नवीन धोरण आंखणें

शक्य व इष्टहि होतें. यावेळीं मद्रासच्या किनाऱ्यावर इंग्रज–फ्रेंचांचें युद्ध सुरू होऊन दक्षिणेंतील राजकारणांत नव्या पक्षांचा उदय झाला होता. सात वर्षे कैदेंत ठेवलेला चंदासाहेब साताऱ्याहून सुटून तिकडील राजकारणांत पुन्हा जाऊन मिळाला. त्यानें ड्युप्लेच्या मदतीनें लढाई करून अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन यास १७४९ च्या ऑगस्टांत ठार केले. मागें सांगितलें आहे त्याप्रमाणें वृद्ध निजामानें मृत्यूपूर्वी हैदराबादचा सर्व पूर्व किनारा व्यापणारा सुभा आपल्या मुलीचा मुलगा मुजफ्फरजंग यास दिला होता. पण नासिरजंगाची इच्छा आपल्या दक्षिणच्या राज्यांत एवढी मोठी कपात करून घेण्याची नव्हती. म्हणून तो तिकडील प्रदेशावर आपला ताबा बसविण्यासाठीं कर्नाटकांत उतरला. पेशवा यावेळीं घरच्या भानगडींत अडकून गेला असल्यामुळें त्यास या दूरच्या राजकारणांत भाग घेण्यास सवडच नव्हती. त्यामुळेंच नासिरजंगास बिनधोकपणें मद्रासकडे प्रयाण करतां आले. मुजफ्फरजंगाची महत्त्वकांक्षा आतां हैदराबाद सुभ्यापुरती तोटकी राहिली नसून सहा सुभे दक्षिणचा निजाम होण्याइतकी वाढली होती. १७५० च्या पावसाळ्यांत जर नानासाहेबानें निजामशाहीचे दोघे प्रतिस्पर्धी वारस सातशें मैल दूर गेले आहेत ही संधि साधून निदान मराठी-बोलणारांचा सर्व प्रदेश मुक्त करण्याची योजना आंखली असती तर पुढील चार वर्षांच्या भानगडींतून तो सुटला असता. ही गोष्ट करावयाची तर शिंदे, होळकर, भोसले, दाभाडे व गायकवाड या सर्वांस एकत्र करून औरंगाबादेवर निकराचा हल्ला चढवावा लागला असता. पण नानासाहेब पेशवा कधीं चुकून माकून "आपण शिवाजी महाराजांचे शिष्य आहोंत" असें म्हणाला असला तरी शिवाजीच्या राजकारणाचा त्याला गंधहि लागला नव्हता. मोठें काम हातीं घेऊन लहान प्रश्न आपोआप उडवून टाकण्याची विद्या त्यास अवगत नव्हती. रामदासांचा 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र त्याच्या कधीं कानांवरच पडला नसावा. मग निजामाला उडवण्याची कल्पना तरी त्याला कोठून सुचावी? या उलट दिल्लीचा मोह पेशव्यांना उत्तरेंत ओढीतच होता, म्हणून त्यानें शिंदे-होळकरांची रवानगी उत्तरेंत पठाणाकडून पराभव पावलेल्या वजिराच्या मदतीस अकारण करून एका नवीन खड्ड्यांत पाय घातला. तो खड्डाच होता हें पुढील इतिहासानें सिद्ध केलें आहे.

ध्येयाचा अभाव, उच्च कल्पनेचें दारिद्र्य, मागील चाकोरींतून गाडी हांकण्याची साहसहीन प्रवृत्ति व क्षुद्र घरगुती चालत आलेले हेवेदावे इरेने पुढें चालविण्याची बुद्धि, यामुळें नानासाहेबानें असें वर्तन केलें. जर वर सांगितलेल्या कल्पनेप्रमाणें त्यानें मराठ्यांच्या कायम शत्रूविरुद्ध धर्मयुद्ध पुकारलें असतें तर वऱ्हाडचा सुभा रघुजी भोसल्यानें ताब्यांत घेतला असता. बेदरचा सुभा जयाप्पा शिंद्यानें व्यापला असता. तसाच विजापूर सुभा फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधि, बाबूजी नाईक, मुरारराव घोरपडे प्रभृति छत्रपतींच्या निकटवर्ती मंडळींनीं, औरंगाबाद पेशव्यानें, खानदेश होळकरानें, व गुजरात दाभाडे–गायकवाडांनीं घेऊन सर्वांची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली असती. ताराबाई व कोल्हापुरकर संभाजी यांना थोडें स्वतंत्र क्षेत्र सभोंवतालच्या प्रदेशांत दिलें असतें तर त्यांत मराठी राज्याचें कांहींच नुकसान होण्यासारखें नव्हतें. या उलट पुणें–सातारा–कोल्हापुरच्या संकुचित क्षेत्रांत घरगुती राजकारणें क्षुद्र माणसांना मोडून काढीत खेळत बसल्यामुळें एका वर्षांत ही संधि गमावली जाऊन पुनः तेच तेच शत्रू व तेच तेच प्रश्न नव्या स्वरूपांत पुढें येऊन मराठेशाहीची स्थिति तत्त्वतः खालावली. पेशवे, त्यांचे दिवाण पुरंदरे, चिटणीस, प्रतिनिधि व त्यांचे मुतालिक, ताराबाई, रामराजा, दर्याबाई, छत्रपति संभाजी व त्याची बायको जिजाबाई, भगवंतराव अमात्य या सर्वांची जीं क्षुद्र कारस्थानें व मोठ्या पदाला न शोभणारे हेवेदावे या काळांत खेळले जात होते त्यांचें विपुल लिखाण वाचून अभ्यासकाला शिसारी येते. पेशवाहि या प्रकरणांत मनाचा मोठेपणा दाखवितांना दिसत नाहीं. ज्या गोविंदराव चिटणीसानें मरणोन्मुख शाहू-कडून सर्वाधिकारीपणाच्या सनदा लिहून घेऊन पेशव्याला दिल्या असें समजण्यांत येतें, त्यावरहि नानासाहेबाचा विश्वास नसलेला दिसतो.[१] ताराबाई आपणच शाहूस सांगून बाहेर आणलेल्या नातवाला खोटा म्हणतांना आढळते.[२] संभाजी छत्रपति “ रामराजाला मारून टाका म्हणजे मी साताऱ्याला येईन ”[३] असें सांगतो. पेशव्याचा दिवाण व घरगुती

---

१. ऐ सं. सा. खंड ७ ले. ११.

२. इ. सं. पे. द. स. मा. नं. ८

३. पे. द. ६ ले. १५३

सल्लागार मित्र महादोबा पुरंदरे नानासाहेबाचा लोभ पाहून काम सोडून घरीं बसतो. उमाबाई व तिची सून अंबिकाबाई दाभाडे या अर्धी गुजरात पेशव्याला देण्याऐवजी कैदेंत रहाणें पत्करतात. दमाजी गायकवाडाचे मुलगे ओलीस घेतल्याखेरीज पेशवा त्यालाहि गुजरातेंत जाण्याची परवानगी देत नाहीं. रामचंद्रबावा 'सदाशिवरावाला फितवून कोल्हापुरचा दिवाण होण्याचा व आपला प्रतिस्पर्धी महादोबा पुरंदरे याच्या पायांत बेडी घालण्याचा "[४] सल्ला देतो. नामधारी रामराजाकडून पेशवे कर्नाटक व गुजरात आधींच्या हक्कदारांना डावलून आपल्या नांवें करवून घेतात. असे किती तरी अन्यायाचे प्रसंग या काळांत घडले आहेत. पण दाभाडे-गायकवाडांची गुजरात किंवा फत्तेसिंग, घोरपडे प्रभृतींचे कर्नाटक यांवर नजर ठेवणाऱ्या पेशव्यास निजामाचा औरंगाबाद सुभा आपल्या ताब्यांत घेण्याची वासना होत नाहीं, हा कलीचाच प्रभाव म्हणावा, दुसरें काय?

ही संधि घालविल्यामुळें ज्या शिंदे-होळकरांच्या पराक्रमाचा प्रथम महाराष्ट्राला उपयोग व्हावयास पाहिजे होता ते अयोध्येच्या वजिराचें राज्य स्थापन करण्यास उत्तरेंत गेले, जणू सफदरजंग (वजीर) पठाणाकडून नेस्तनाबूत होता, तर मराठ्यांचे त्यांत कांहीं अहित होतें! सन १७५०-५१ सालीं नासिरजंग व मुजफरजंग हे प्रबळ निजाम आपसांतील राजकारणानें परस्पर मारले गेले तेव्हां पेशव्याजवळ शिंदे-होळकर-गायकवाड-भोसले यांचें संतुष्ट सैन्य मदतीस असतें तर बुसीच्या रूपानें फ्रेंचांचा पाय निजामाच्या दरबारांत व क्लाईव्हच्या रूपानें इंग्रजांचा पाय अर्काट-तंजावरच्या राजकारणांत पुढें पडून सर्वच दक्षिणेंतील राजकारण बदलण्याचा प्रसंग पेशव्यावर आला नसता. सलाबतजंग, निजामअली, बुसी, रामदासपंत, हे कृष्णेच्या दक्षिणेसच पराभूत होऊन त्यांची स्वारी पुण्यावर आली नसती. ती सन १७५१ च्या अखेरीस आली तेव्हां कोठें पेशव्याचे डोळे उघडले. मग तो शिंदे-होळकरांस लिहितो कीं, "तुम्ही उत्तरेंत गुंतून राहून वजिराची अब्रू राखली व आमची गमावली!" हें कामाचें नाहीं. तुम्ही दौलतेचे स्तंभ. राज्यांत खेळ फार झाले आहेत. खामखा यावें. जे मेहनत तुम्ही वजिराचे कामासाठीं केली ते मेहनत येथें येऊन जलदीनें

४. पु. द. भाग १ ले. २७०, २७५

करतेत तर बहुत लाभ होता......आम्हांजवळून रघूजी बाबा मोगलाकडे गेले. मोगलांनीं त्यास जागीर देऊन आपलेसे केले. बाबूजी नाईक लटकें फटकें बोलून आशेस लावून दोन वर्षे आम्हीं वोढिलें. परंतु ते याउपर आईसाहेबांजवळून कर्नाटक करून घेणार, रामदासपंताजवळून नालबंदीस रुपये घेऊन तिकडे जाणार, ते हे एकत्र होणार. प्रतिनिधिहि वाढले. गोविंदारायांचा सरंजाम घेतला. शेर झाले. खामखा आम्हांवर मनसबा करणार......बहुत लोक म्हणतात कीं, रामदासपंतानें जानबा याच कामासाठीं पाठविले कीं तुम्ही स्नेह मानून गाफील रहावें......पठाण कर्नाटकांत बळावले आहेत. महमंदअल्लीखान त्रिचनापल्लीस बळावला आहे......ताराबाईची चित्तशुद्धि नाहीं. मोगलांची चित्तशुद्धि नाहीं. देश अगदीं गेला. रुपया एक नाहीं. पन्नास लाख कर्ज नवें जाहालें. लोकांस खानगी नाहीं. घोडीं पडलीं, या विचारें दारीं बसतील. कर्जदारांचीं दिवाळीं निघत चाललीं. रामदासपंतानें अब्रू घेतली ती एकदां हरतजवीज करून त्यास पुरती जरब देणें घडल्यावांचून तुम्हांस कैलासवासी ( बाजीराव व चिमाजीआपा ) यांनीं वाढविलें व तुम्ही इराण–तुराणपावेतों लौकिक केला तो सर्व व्यर्थ ! आम्हीहि रायांचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला. सर्वस्व वेंचून एकदां रामदासपंत मोडावा. ते आम्हांवर मनसबा करतात यांत संशय नाहीं."[५] असें काकुळतीनें म्हणण्याची पाळी पेशव्यावर आली. यावरूनच त्याचें पन्नास सालचें सबंध राजकारण, त्यानें केलेले नवे नवे उपक्रम, सर्व चुकीचे होते हें सिद्ध होतें. म्हणजे आम्ही वर जें नानासाहेबांनीं करावयास पाहिजे होतें असें म्हटलें आहे तोच दुसरा वैकल्पिक मार्ग त्या वेळीं मराठी राज्याच्या हिताचा होता हें उघड झालें. एवढें होऊनहि अजून पेशवा, निजाम नाहींसा करण्याची वार्ता काढीत नाहीं, तर रामदासपंताच्या हातांतील सलाबतजंगास प्रतिस्पर्धी म्हणून दिल्लीचा वडील निजामपुत्र गाजीउद्दीन यास शिंदे–होळकरांनीं दक्षिणेंत आणावें असें सांगतो. त्याप्रमाणें शिंदे–होळकर त्यास दक्षिणेंत घेऊन येतात. पण ज्या ह्या गाजिउद्दीनाच्या येण्यावर पेशव्याचें राजकारण दोन वर्षे तटलें होतें तो अखेर १७५२ च्या ऑक्टोबरांत दक्षिणेंत आला, पण त्याला मेजवानीस बोलावून निजामअल्लीच्या कपटी आईनें विष घालून ठार

५. गाव्येतिहाससंग्रह-पत्रें यादी वगैरे. आवृत्ति २, ले. ९८-९९.

मारिलें! पेशवा नानासाहेब धूर्त समजला जातो. पण आपल्या हातांतील डाव म्हणून मुद्दाम आणलेला गाजिउद्दीन यास चुकून सुद्धां त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या गोटांत जाऊं देऊं नये अशी काळजी आधींच घेणें त्यास सुचलें नाहीं! इतकी त्यास मोगलाई राजकारणाची माहिती होती! यामुळें रामदासपंताचा आधींच खून झाला होता तरी निजामशाहीची जमी पेशव्यास करतां आली नाहीं. तो डाव फ्रेंचांच्या हातांत गेला व आणखी सहा वर्षें मराठ्यांच्या बोकांडी बसला. या अदूरदर्शीपणामुळें बुसीला प्रतिस्पर्धी म्हणून क्लाइव्हची मदत पेशव्याला घ्यावी लागली. त्याच्या मदतीनें तुळाजी आंग्रे बुडविल्याकारणानें मुंबईकर कायम मराठ्यांच्या आरमाराच्या भीतींतून मुक्त झाले. याच वेळीं पुढें रघूजी भोसला मरून त्याच्या अल्पवयी मुलांत भांडणें लागलीं. तीं सोडविण्याच्या मिषानें पेशव्यानें त्या सर्वांनांच आपल्याजवळ आणून दोन वर्षें माशा मारीत ठेवलें. त्यामुळें अलीवर्दीखान मेल्यानंतर नबाब झालेल्या सिराजउद्दौल्याला त्याच्या इंग्रजांशी सुरू झालेल्या भांडणांत भोसल्यांची अपेक्षित मदत मिळूं शकली नाहीं. याचमुळें क्लाइव्हनें मद्रासहून कलकत्त्यास जाऊन सावकाशपणीं बंगालचा ग्रास केला. ज्या तीन कोटींच्या सुभ्याची बारा लाख चौथाई मिळविण्यासाठीं भोसल्यांना दहा वर्षें स्वाऱ्या करून अकल्पनीय खर्च व मनुष्यहानि सहन करावीं लागलीं होतीं, तो हिंदुस्थानांतील सर्वांत सुपीक व निरुपद्रवी सुभा इंग्रजांच्या ताब्यांत एका फुसक्या लढाईनें आला. पेशवा व त्यांचे सरदार कर्जाच्या खातेऱ्यांत लोळत असतां तिकडे इंग्रज बोटी भरभरून सोनें आणि रुपें इंग्लंडास रवाना करीत होते. या वेळीं बेदरकारपणें लुटून नेलेल्या बंगालच्या संपत्तीच्या भांडवलावर इंग्लंडांत लागलेले शोध औद्योगिक उन्नतीस लावणें त्यांना शक्य झालें. जर हें भांडवल ऐनवेळीं न मिळतें तर ते ते यांत्रिक शोध संशोधकांच्या घरीं कुजत पडले असते. यामुळें इंग्लंडच्या इतिहासाला सर्वस्वी नवीन कलाटणी देणारी औद्योगिक क्रांति झाली व त्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी जे फ्रेंच त्यांना सप्तवार्षिक युद्धांत चोपून काढून चॅथॅमनें ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला. एवढी सर्व आपत्ति एका नानासाहेब पेशव्याच्या अज्ञानामुळें, अदूरदर्शीपणामुळें व घरच्या क्षुल्लक प्रतिस्पर्ध्यांना नेस्तनाबूद करण्याच्या ईर्षेमुळें घडली असें इतिहासकारास वाटल्याशिवाय रहात नाहीं.

या विषयाची चर्चा आम्ही यथास्थित तीस वर्षांपूर्वीच केली आहे. पण तीमुळें जो सुपरिणाम व्हावयास पाहिजे होता तो मात्र दुर्दैवानें झाला नाहीं आणि त्यामुळें खोट्या इतिहासाची, बेफाट बढाई वा काल्पनिक हिंदुपद-पादशाहीची प्रथा तशीच पुढें चालू राहून इतिहासाच्या नव्या नव्या आवृत्त्यांत पुनः त्याच त्याच स्वरूपांत तेच तेच अनेकवार खोडलेले मुद्दे मांडण्यांत येत आहेत. अशा खोट्या इतिहासावर पोसलेली कोठलीहि जनता उत्कर्षाचा मार्ग चालूं शकणार नाहीं.

ज्या हिंदुपदपातशाहीबद्दल व तिच्या सिद्धतेबद्दल इतिहासकार वेळीं अवेळीं मधून मधून सारखे लिहितांना आढळतात, ती हिंदुपद-पातशाही तरी पेशवे व त्यांचे सरदार उत्तरेंत कोणत्या तऱ्हेने स्थापूं म्हणत होते ? प्रथम त्यांनी जयपूरच्या सवाई जयसिंगास दिलेला माळव्याचा सुभा तेथील राजपूत वगैरे हिंदु जमीदारांस दाबून ताब्यांत घेतला. नंतर बुंदेल्यांस भरडून सागर, झांसी वगैरे संस्थानें स्थापलीं. त्याहिपुढें बिहारांत जाऊन मोगली राज्यासहि पुरून उरणारे पुरबिये जमींदार मांडलिक करण्यांत आले. रानावनांतील गोंड राजे तरी मराठ्यांच्या ताब्यांतून सुटावे, तर तेंहि नाहीं. गढ्यामंडल्याचा झगडा पेशवाईत ५० वर्षें चालला व तेथील संस्थानिक हिंदुधर्माचे पेशव्यांइतकेच अभिमानी होते. नंतर पेशव्यांचे भारतीय वीर राजपुतांवर जाऊन आदळले. वृद्ध निजामास सुचलेला विचार त्यांच्या डोक्यांत कधीं आला नाहीं. तो म्हणजे ज्या देशचे जे रहिवासी ते उखडून काढण्याची वासना कोणीहि परक्याने धरूं नये. मोगल बादशहांनीं सुद्धां ज्यांना जवळ जवळ स्वतंत्र संस्थानिक म्हणून ठेवलें होतें, त्या हजार वर्षें रेताड मुलखांत कसाबसा निर्वाह करून राहणाऱ्या ठाकुरांना मोडून काढण्यांत भूषण तरी काय व त्यानें हिंदुपदपातशाही कशी वाढणार होती ? हा लढा सबंध पेशवाईभर तसाच चालू होता. शिंदे–होळकरांनीं जय मिळवले असतील, पण या प्रदेशावर राज्य करणें त्यांनाहि शक्य झालें नाहीं आणि हें सर्व मोगल बादशहाचे सुभेदार म्हणून मराठे करीत होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पेशव्यांनीं व त्यांच्या सरदारांनीं राखला अयोध्येचा वजीर कीं ज्यांच्या ताब्यांत प्रयाग, अयोध्या व काशी यांसारखी क्षेत्रें सतत राहिलीं व कुटले जयपूर, जोधपूर, भरतपूरकर कीं जे मथुरा, वृंदावन, नाथ-द्वार, पुष्कर वगैरे तीर्थांचे पिढिजात रक्षक होते ! दक्षिणेंत पहावें तर सुद्धां

कर्नाटकांतील सोंदें, बिदनूर, म्हैसूर, कनकगिरी, चित्रदुर्ग, गद्वाल, सुरापूर, हरपनहळ्ळी यांसारखी शुद्ध हिंदूंचीं संस्थानें सालोसाल नाडतांना पेशवे व त्यांचे सरदार आपणास दिसतात. पण गोवेकर, सवनूरकर, कडापा, कर्नूल, अर्काटकर यांस नाहीसे करण्याची त्यांची खटपट नाहीं. पण मराठ्यांवर राज्य करून रोज वळवळणीच्या वाशाप्रमाणें कपाळास आपटणारे निजाम व सिद्दी हे जेथें ते राखतात, तेथें हिंदुपदपादशाहीची आशा कोठून धरावी?

पेशव्यांचे वकील पाहिले तर तेहि मोठे विचित्रच दिसतात. त्यांना "निजामन्मुलुकाचा बोलबाला" होईल ती गोष्ट झाली पाहिजे."[६] त्यांना मोगल बादशहाकडून राजे महाराजे असे किताब मिळतात व ते घेतात. परदरबारच्या वकिलांची अशी वागणूक पेशवे कशी व कां चालूं देत होते? तर याचें उत्तर हेंच म्हटलें पाहिजे कीं, दिल्लीचा पातशाही दरबार हा परराष्ट्रदरबार नसून मालकाचा दरबार होता व मालकाला अमुक कर आणि तमुक करूं नको असें म्हणण्याचा अधिकार कोणाला? "सर्वोत्कर्षे पादशाही बंदे, पातशाही बंदगींत रुजू रहावें"[७] हीच या वकिलांची कोशीस! "तुरानीयांनी सिष्टाचार सळूख कोणासी केला नसेल तो तुम्हासी केला, दक्षणचा दुय्यम पातशाह (निजाम) हातीं आला, या गोष्टीचें सौख्य झालें"![८] हे हिंगणे नाशिकजवळ राहणारे होते व तो प्रदेश १७५३ पर्यंत पेशव्यांच्या ताब्यांत आलाच नव्हता. अर्थात् ते निजामाचेच प्रजाजन होते व म्हणूनच त्यांस पिशाची लिपि म्हणजे फारसी लेखनपद्धति ज्ञात होती. तसेंच ते जयसिंहाचे इनामदार होते म्हणजे जयपूरच्या विरुद्ध तरी ते कोणत्या तोंडाने बोलणार? एकंदर पत्रव्यवहार अभ्यासून आमची अशी खात्री झाली आहे कीं जर या आणीबाणीच्या काळांत हिंगण्यांऐवजीं दुसरे कोणी दक्षिणेकडील वकील बोलाचालींत असते तर बाजीराव व नानासाहेब यांचें राजकारण चुकीच्या वळणावर जाऊन अखेरीस फसलें नसतें. हे वकील स्वतःच दिल्लीच्या वजिरांचे व पादशहाचे सरंजामी महाल कमाविशीनें करीत व ते महाल मराठ्यांकडे होण्यांत त्यांचा प्रत्यक्ष तोटा

---

६. पे. द. १५ ले. ८३

७. हिंगणे दप्तर १ ले. ३५

८. हिंगणे दप्तर १ ले. ४४

होता. वकिलांनी परदरबाराकडून बक्षिसें व इनामें मिळविण्याचा हा तडाखा नाना फडणिसापर्यंत चालू होता व त्यामुळें अगदीं आजतागायत अनेक मराठ्यांचीं इनामें निजामाच्या राज्यांत चालू आहेत. पण या सगळ्याचें आम्ही वर वेळोवेळीं विवेचन केलें आहे त्याप्रमाणें आद्य कारण, मोगली राज्य कायम ठेवण्याच्या मनसुब्यामुळें आपपरभाव व्यवहारांत फार ढिला राहिला व राजद्रोह या शब्दाला अर्थच राहिला नाहीं हेंच होतें.

पेशवाईत मोगली राज्यावर चरणें हा तर मराठ्यांचा मुख्य उद्योग आणि तें तर बुडवावयाचें नाहीं हा आपणासच घालून घेतलेला खोडा. यामुळें मोठ्या हास्यास्पद गोष्टी घडत गेल्या. ज्या बादशहाच्या सनदा पेशव्यांनीं व त्यांच्या सरदारानीं घ्यावयाच्या तो बादशहा जिवंत राखण्याचीहि जबाबदारी त्यांनी स्वतःवर घेतली नाहीं. कारण नसतां निजामाचा नातू जो गाजीउद्दीन वजीर त्याचा पक्ष यांनीं उचलिला. या गाजीउद्दीनानें दोन बादशहा मारिले व ते पेशव्याचा पाठिंबा होता म्हणूनच त्याला मारतां आले. हा मोहरा हातांत राखण्याचें कारण, त्याचा उपयोग दक्षिणेंतील निजाम जो सलाबतजंग त्याला सतत भिववितां यावे, कारण तोहि निजामाचा वडील वारस होता. या गाजीउद्दीनासारखा बेइमान, बोलण्यांत बोलणें नसणारा, आततायी निर्घृण व बेफाट माणूस इतिहासांत क्वचितच झाला असेल. त्याची मुख्य कारकीर्द दहा वर्षांत आटोपली तरी तो पुढें चाळीस वर्षें जिवंत होता व १९व्या शतकाच्या आरंभीं तो वारला. पेशव्यानीं स्वतः बादशहाचा खून न करतां परस्पर त्याच्याकडून ते करविले असें मुसलमानांचें मत होणें पेशव्यांच्या विचित्र वागणुकीमुळें पूर्ण शक्य होतें. पानपतप्रसंगाच्या वेळीं सदाशिवराव भाऊचा बेत शुजाउद्दौल्याला आपल्या बाजूस ओढण्यासाठीं वजिरी देण्याचा होता व याचें एक कारण ज्याच्या बापाचा खून गाजीउद्दीनानें करविला तो शहाअलम बादशहा दिल्लीहून पळत जाऊन बिहारांत इंग्रजांशीं लढत होता व साहजिकच त्याची इच्छा गाजीउद्दीनाचें तोंडहि पाहण्याची नव्हती. पानिपतच्या लढाईनंतर अहमदशहा शुजाजवळ मदतीदाखल पैसे मागूं लागला, तेव्हां शुजा त्याचा निरोप न घेतां अयोध्येस पळून गेला. त्यामुळें ज्याला पेशव्याचा पाठिंबा आहे व जो व्यक्तिशः राज्यकारभार हांकण्यास समर्थ आहे अशा राजघातकी गाजीउद्दीनासच त्याला वजिरीचीं वस्त्रें

पाठवावी लागलीं. अर्थात् हा सर्व कागदी खेळ झाला. प्रत्यक्ष सत्ता दहा वर्षें नजीबखानाच्या हातीं राहिली व तो मेल्यावरच शहाआलम इंग्रजांचा आश्रय सोडून मराठ्यांच्या मदतीनें दिल्लीस परत आला व ही सर्व घडामोड ज्याच्या शहाणपणाचा डांगोरा पिटण्यांत येतो त्या माधवराव पेशव्याच्या संमतीनें झाली,[९] कारण माधवराव तरी चाकोरीच्या बाहेर कोठून जाणार? तो पणजापासून चालत आलेलें दिल्लीची बादशाही चालविण्याचें धोरण पेशव्यांचा अस्सल वंशज म्हणून इमानें इतबारें चालू ठेवणार. पेशव्यांचा प्रवेश दिल्लींत करून देणारा म्हणून गाजिउद्दीनाचे उपकार स्मरून त्याला पेशवा स्वतःच्या ताब्यांतील बुंदेलखंडांत निर्वाहासाठीं दोन लक्षाची स्वतंत्र जागीर नेमून देताना आढळतो तो यामुळेंच[१०]. हे वजीर मजकुर पुढें कांहीं दिवस सागरास घर बांधून होते. नंतर मल्हारराव होळकरांबरोबर इंग्रजांशीं लढण्यांतहि होते व विसाजी कृष्णाच्या स्वारींतसुद्धां मराठ्यांच्या मागें मागें जाटवाड्यांत फिरत होते. शहाआलमनें त्यास वजिरी देणें अशक्य असल्यामुळें ते तसेच भटकत होते. पुढें नारायण-रावाच्या खुनानंतर बारभाईच्या वेळीं इंग्रज-मराठ्यांचें युद्ध चालू झालें तेव्हां ते दक्षिणेंत येऊन त्यांत भाग घ्यावयास पहात होते. त्यांनीं इंग्रजांकडे बोलणें लाविलें कीं "तुम्ही मला दक्षिणेंत निजाम करा म्हणजे तुमचे सगळे हेतु मी पूर्ण करून देईन."[११] रघुनाथराव सुरतेस असतां हा गाजीउद्दीन तेथेंच होता. इंग्रज त्याचें म्हणणें कबूल करीतना. तेव्हां त्यानें मक्केच्या यात्रेस जाऊन फकिरी घेण्याचे सोंग केलें. पण मनांत वैराग्य नसल्यामुळें पुनः परत येऊन हे राजेश्री गुजरातेंत, राजपुतान्यांत भटकत होते. शहाआलम नाहीं तर त्याचा एक असंतुष्ट मुलगा अहसनबख्त याला हाताशीं धरून मोगल बादशाहींत पुनः प्रवेश करण्याचा त्याने यत्न केला. जोधपूरचा बिजेसिंग, काबूलचा तैमूरशहा अब्दाली वगैरेंची मदत घेण्याचाहि व्यूह त्यानें रचला. पण त्याला कधीं यश आलेंच नाहीं. असें या

---

९. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ७—लेखांक ३६ भा. इ. सं. मं

१०. Wad Peshwa's Diaries No IX Item No. 70

११. Calendar of Persian correspondence Vol. V. letters nos. 1598, 1660.

माणसाचें एखाद्या कादंबरींत किंवा नाटकांत घालण्यासारखें चरित्र आहे. याच्या भयानेंच निजामअल्ली हा बारभाईच्या कारस्थानांत रघुनाथरावाविरुद्ध व इंग्रजांविरुद्ध नाना फडणिसास मिळून राहिला हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

एका मुख्य धाग्याचा विचार करतां करतां आपण फार पुढें आलों, पण तें पेशव्यांची वागणुकीची रीत समजण्यासाठीं करावें लागलें. माधवरावानें जानोजी भोसल्यावर निजामास मिळून दोन स्वाऱ्या केल्या व त्याला बलहीन करून सोडलें. यामुळें ओढिसांतील कटकच्या पायावरून बंगाल्यांतील इंग्रजांना ते आपला अंमल नबाबाच्या नांवाखालीं स्थिर करीत असतां तंबी पोहोचविणें शक्य झालें नाहीं. एवंच नानासाहेब व माधवराव यांच्या चुकीच्या धोरणामुळें इंग्रज बंगाल्याचे मालक झाले व त्या तीन कोटी सुभ्याच्या उत्पन्नावर त्यांनीं हिंदुस्थानचें राज्य मिळविण्याचा व्यापार केला. आपल्याला मानीत नाहींत व कदाचित् आपणाहून वरचढ होतील म्हणून राज्यांतील पराक्रमी माणसांस सदा ठेंचीत राहणाऱ्या पेशव्यांच्या धोरणामुळेंच पेशवाई कमकुवत राहिली व निजाम अमर झाला.

नानासाहेबाच्या कारकिर्दींतील निजामाशीं झालेले झगडे रियासतकारांनीं आपल्या इतिहासांत कमी जास्त विस्तारानें वर्णिले आहेत. रियासतकारांचें लिखाण नेहमींच गोळाबेरजी स्वरूपाचें असतें व अलीकडील आवृत्त्यांत वयोमानाप्रमाणें विस्मरणाचें प्रमाण वाढल्यामुळें त्यांत अनेक चुकाहि झाल्या आहेत. पण त्या चुकांचा परामर्ष व्याख्यानांच्या मर्यादेंत घेतां येणार नाहीं. तेव्हां त्या प्रयत्नास आम्ही हातहि घालीत नाहीं. आपल्या कारकिर्दीच्या पूर्वार्धांत नानासाहेब निजामाशीं दबूनच वागत होता. त्याला दुखवावयाचें नाहीं म्हणून मुख्यतः नानासाहेबाला बरींच वर्षें उत्तरेंत काढावीं लागलीं. बादशहाला भेटावयाचें म्हणतां म्हणतां सात वर्षें गेलीं तरी महमदशहाची भेट, त्याला घेतां आलीच नाहीं. अर्थात् भेट घेऊन कांहीं विशेष लाभ होणार होता असें नव्हे. वृद्ध निजामाच्या मनांत पेशव्यांचें पाऊल दिल्लीदरबारांत न पडावें असेंच होतें. नंतर नासिरजंग, मुझफरजंग यांच्या काळांत तीन वर्षें लोटलीं. या वेळीं शाहूछत्रपतीचे आजार व मरण, ताराबाई व रामराजा यांचे हर्षामर्ष; या घरगुती खटल्यांत पेशवा गुंतून निजामशाही बुडविण्याची एकमेव संधि फुकट गेली

व पेशव्यांचे मुख्य सरदार उत्तरेंतील राजकारणांत जास्त जास्त गुंतत गेले. या तिकडील पापांचें क्षालन त्यांना पानपतची जबर किंमत देऊन करावें लागलें. प्रत्येक वेळीं पेशव्यांच्या सरदारांनीं चुकीची बाजू घेतली. मुसलमान राखून राजपूत, जाट व शीख यांना कुटलें. त्यामुळें उत्पन्न झालेला द्वेष अखेरपर्यंत मराठी राज्यास भोंवला. एकदां पराभविलेले तेच तेच राजे व त्यांचा तोच तोच मुलूख हे सरदार पन्नास वर्षें जिंकीत होते. आणि त्यांना तेव्हांच गप्प बसवितां आलें कीं जेव्हां डिबॉइन व पेरॉं यांसारखे फ्रेंच सेनानी शिंद्यानें नोकरीस ठेविले! त्यांच्या हाताखालील बहुसंख्य शिपाई उत्तरेंतील हिंदु-मुसलमान होते. महादजीचा दिल्लींतील अंमल हा वस्तुतः मराठ्यांचा विजय नव्हे. मराठी घोडदळाचें शौर्य, शिंदे–होळकर अलिबहादूर, शेणवी सरदार व शिंदे बाया यांचा दौलतरावांशीं झालेला झगडा, यांत खर्ची पडलें. पैशाची अडचण पेशवाईंत कधीं संपलीच नाहीं. मग स्वस्थ राज्य त्यांतून कोठून निर्माण होणार व विद्या, कला, सुधारणा यांचा तरी उत्कर्ष कसा संभवणार? या काळांत मराठे हे इतर हिंदु व मुसलमान यांपेक्षां कोणत्याहि विद्येंत वा कलेंत पुढें नव्हते. हेंच काय, पण ते ज्या राजपुतादिकांना रांगडे म्हणत त्यांपेक्षां स्वतःच जास्त रांगडे होते याचा भरपूर पुरावा उपलब्ध आहे. जिथें युद्धशास्त्रांत व शस्त्रास्त्रांत ते परक्यांवर अवलंबून, तेथें इतर ज्ञानाचें काय बोलावयाचें आहे? ज्या सवाई जयसिंगाचा मराठ्यांनीं अनेकदां पराभव केला होता व पुनः स्नेहहि संपादिला होता तो जयसिंह बाजीरावाशीं तुलना करतां किती तरी मोठा म्हटला पाहिजे. त्यानें जयपूरसारखें अप्रतिम सुंदर शहर वसविलें, अनेक इमारती बांधल्या, ज्योतिषादिशास्त्रांवर महाराष्ट्रीय पंडितांस आश्रय देऊन ग्रंथ लिहविले, अश्वमेधादि यज्ञ केले, मथुरावृंदावनादि क्षेत्रांत अप्रतिम देवळें बांधलीं व दिल्ली, जयपूर, उज्जैन, बनारस वगैरे ठिकाणीं अगदी अद्ययावत् जातीच्या वेधशाळा बांधिल्या, यूरोपीय खगोलविद्यागणित व उपकरणें जाणून घेण्यासाठीं गोव्याच्या पोर्तुगीजांकडे[१२] व इतर ठिकाणीं लिहून तीन गणिती

१२. Arquivo Portugues Oriental Tomo 1. Ibid Part V Nos. 24, 25, 66, 67, 105, 106, 109, 115, 117, 118, Vol III Part IV (1948). No. 156.

मुद्दाम जयपुरास आणविले आणि त्यांच्या, हिंदूंच्या व मुसलमानांच्या ज्योतिषज्ञानाची शक्य तितकी सांगड घालण्याचा प्रयत्न केला. यांतील कोणतेंहि अंग पेशव्यांनीं उचलिलें नाहीं. जयसिंगानें घर व चर्च बांधून देऊन जे खिस्ती फादर जयपुरास ठेविले त्यांचें वंशज आजहि तेथें आहेत. अशा श्रेष्ठ जयसिंहाचा स्वाभिमानी व शूर मुलगा जो ईश्वरीसिंह त्याला विष घेण्याची पाळी मात्र पेशव्याच्या व त्याच्या सरदारांच्या रांगड्या कृतीनें आली आणि त्याला मारून जो माधोसिंग मराठ्यांनीं गादीवर आणला तो पुढें कायम मराठ्यांचा दुष्मन होऊन राहिला! ज्या जाटांनी व गोसाव्यांनी अब्दालीच्या स्वारींत आपलें रक्त सांडून मथुरा, वृंदावन, गोकुळ इत्यादि क्षेत्रांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला, त्यांना नानासाहेब पेशवा हिंदूहि समजत नाहीं[१३] आणि हें सर्व सुरजमलानें व त्याच्या बायकोनें पानपताहून पळून आलेल्या मराठ्यांचा शक्य तो समाचार घेऊन त्यांचे जीव वाचविल्यानंतर! दक्षिणेंतील म्हैसूर, कनकगिरी, गदवाल, बिदनूर इकडील हिंदु राजेहि मराठ्यांपेक्षां निश्चित जास्त सुसंस्कृत होते. त्यांच्या दरबारीं व राज्यांत हिंदुशास्त्रें व विद्याकला जास्त अभ्यासिल्या जात होत्या, हें खुद्द नानासाहेबानेंच आपल्या नाना पुरंदऱ्यास लिहिलेल्या प्रख्यात पत्रांत कबूल केलें आहे. (मात्र हें पत्र सरदेसाई नानासाहेबानें बुंदेलखंडातून लिहिलें असें म्हणतात!) मुसलमानांसंबंधाने बोलावयाचें तर त्यांतीलहि उच्च वर्ग तत्कालीन मराठ्यापेक्षां बहुतेक बाबतींत श्रेष्ठ होता व म्हणूनच बाजीराव, नानासाहेब व माधवराव हे सर्व त्यांच्यापुढें नमून वागतांना दिसतात. ज्याप्रमाणें दोन पिढ्यांचा सहवास जयसिंहाशीं करूनहि पेशव्यांनीं त्यांच्या विद्याभिलाषित्वाचे अनुकरण केलें नाहीं त्याप्रमाणें ज्या शहानवाज-खानाशीं नानासाहेब पेशव्याचा अनेक वर्षें घनिष्ट संबंध आला त्याच्या गुणांचाहि वास पेशवाईत कोणाला लागलेला दिसत नाहीं. हा शहानवाज-खान मोठा बहुश्रुत विद्वान् व इतिहासज्ञाता म्हणून ओळखिला जातो. याचा ग्रंथ 'मआसिर-उल्-उमरा' नांवानें माहीत असून त्यांत मोगलांच्या राज्यांत होऊन गेलेल्या सगळया अमीर उमरावांचीं काळजीपूर्वक संकलित केलेलीं चरित्रें दिलेलीं आहेत. ही माहीती मिळविण्यासाठीं त्याला लाहोर

---

१३. ऐ. सं. सा. खंड ७ ले. २५.

पासून अर्काटपर्यंच्या व अहमदाबादपासून ढाकापर्यंतच्या हिंदुस्थानांतील सर्व स्थलांची माहिती करून घ्यावी लागली. हा ग्रंथ त्यानें कैदेंत असतां लिहिला. तो नासिरजंगाचा मित्र व सहकारी होता म्हणून वृद्ध निजामानें जेव्हां नानासाहेबाच्या मदतीनें नासिरजंगावर फकिरीचा प्रसंग आगला तेव्हांच यालाहि कैदेंत टाकलें व या फुरसतीचा त्यानें असा ज्ञानकोशाच्या जातीचा ग्रंथ लिहिण्यांत उपयोग केला. या उलट पेशवाईंत खुद्द पेशव्यांचीहि चरित्रें लिहिलीं गेलीं नाहींत. शिवाजीचें चरित्र सभासदानें राजारामकालीं लिहिलें. तदनंतर प्रतापसिंहाच्या राजवटींत मल्हार रामरावानें छत्रपतींचीं चरित्रें उर्फ मराठ्यांचा इतिहास लिहिला. इतके पेशवाईंतील ब्राह्मण विद्याभिलाषी होते! मुसलमान मात्र अनेक तवारिखा या काळांत लिहितच होते व त्यांच्या लिखाणामुळेंच इतिहासाचा कांही भाग विस्मृतीच्या महासागरांतून वांचला आहे. राजवाडे आपल्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत १८ व्या शतकांतील मराठ्यांच्या दोषांत मुद्रणकलेचें, भूगोलाचें व इतिहासाचें अज्ञान आरंभींच कबूल करतात. (पृ. १००) पण मराठ्यांची मुसलमानांच्या श्रेष्ठतेशीं तुलना करीत नाहींत. त्यामुळें असा खोटा समज महाराष्ट्रांत रूढ झाला आहे कीं मुसलमान हे हिंदूंशीं तुलतां मागासलेलेच होते. खरी गोष्ट अशी कीं राज्यशास्त्रांत, युद्धशास्त्रांत व कलांत तें सुमारें पांचशें वर्षें नेहमींच वरच्या पायरीवर होते. ज्या बाबतींत हिंदू श्रेष्ठ होते ते विषय म्हणजे तत्त्वज्ञान व वैयक्तिक नीति. पण या गोष्टींचा व्यवहारांत कांहीच उपयोग नव्हता. वेदांताचें सतत भरपूर पीक काढीत असतांहि हिंदू शतकानुशतकें परक्यांचें गुलाम राहिले यावरूनच ही गोष्ट सिद्ध होते. अजूनहि आमचें या बाबतींतील वेड कमी झालेलें नाहीं. ज्ञानेश्वरीच्या व तुकाराम-नामदेवाच्या अभंगांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघतात पण इतिहासाचें पुस्तक दहा दहा वर्षांतहि विकलें जात नाहीं, अशी स्थिति विद्यमान आहे. मराठ्यांच्या इतिहासाची तर महाराष्ट्राला एवढी उबग आलेली दिसते कीं 'पुणें विद्यापीठ' होऊनहि महाराष्ट्रीय ब्राह्मणांची मुलें त्यापेक्षां मुसलमानांचा वा इंग्रजी अमदानीचा इतिहास अभ्यासार्थ निवडतात. अखिल भारतीय नाट्यस्पर्धेंत जीं नाटकें तेलंगणांतून वा बंगाल्यांतून येतात त्यांत शिवाजीवर १६ व संभाजीवरहि दोन नाटकें दृष्टीस पडतात. पण मराठी भाषेंतील नाटकांत मात्र इतिहासाचें

नांव नाहीं, ही स्थिति तेंच दाखवितें! काल्पनिक कादंबऱ्या व गोष्टी व तितकेच काल्पनिक तर्कटी वाद यांचा महाराष्ट्रांत सध्यां एवढा बोलबाला व चढता भाव आहे कीं तेथें आधाराशिवाय न लिहितां येणारा इतिहास कसा रुचावा?

पन्नास वर्षांच्या झगड्यानंतर एकप्रकारची स्थितिस्थापकता निजाम-पेशव्यांच्या राजकारणांत दिसून येऊं लागली. ही गोष्ट १७५१च्या एका पत्रांत स्पष्ट शब्दांत मांडलेलीहि आहे. बुसीचा जोर मिळाल्यावर निजाम-शाहींतील मुत्सद्यांस पुन्हां खुमखुमी आली. त्यांतील अब्दुल खैरखान नामक निजामाचा जुना साथीदार व बुऱ्हाणपुरचा सुभेदार यानें सलाबत-जंगास सल्ला दिला कीं "गनीमाईत या दिवसांत फितूर आहे. प्रधानपंतहि बेफाम आहेत. हा समय उत्तम आहे. आपण सर्व गोष्टींनीं सगूदा आहोंत यास्तव साधले प्रसंगास आळस न करावा, बिगाड करावा"[१४]. पण या सल्ल्याविरुद्ध दुसरा सरदार नासीरजंगाने म्हटलें कीं "हे गोष्ट उत्तमांत दिसत नाहीं. मागें थोरले नबाबाने बहुत यत्न केला होता. तो व्यर्थ झाला म्हणून सख्य संपादून होते. आतां तुम्ही विरुद्ध करूं म्हणतां, ऐशास **तुमच्याने गनीमाई मोडवत नाहीं, व गनीमाच्यानेहि तुम्हास मोडवत नाहीं.** नाहक लौकिक करून घ्यावा, सिबंदीखाले यावें, मुलुकाचा पाटावरवंटा होईल. बरा दिसत नाहीं." ऐसें बहुत प्रकारें परिमार्जन केलें. हीच गोष्ट उत्तर पेशवाईत उभय-पक्षांच्या मनांत ठसली. जोरावर असत तेव्हां मराठे, व ते खालावत तेव्हां मोगल एकमेकांविरुद्ध चढाई करीत. सदाशिवरावभाऊ हा यांतील चढाईखोर माणूस होता. त्याने उदगीरच्या लढाईत साठ लाखांची जहागीर व चार मुसलमानी राजधान्या म्हणजे–बुऱ्हाणपूर, अहमदनगर, दौलताबाद व विजापूर व खेरीज अशीरगडचा–दक्षिणचे द्वार समजला जाणारा–किल्ला, इब्राहिम-खानाच्या मदतीने निजामाचा पराभव करून घेतलीं. पण या नंतर तीं ठासून राखण्याचा बंदोबस्त न करतां तो पानपताकडे चालता झाला. तेव्हां निजामअलीने फिरून तो मुलुख परत घेतला. या घालमेलींत दोन वर्षें गेलीं. व तोंवर मराठ्यांचा उत्तरेंतील चंबळा–यमुना पारचा अंमल व

---

१४. राजवाडे खण्ड १ लेखांक ९.

दक्षिणेंतील तुंगभद्रा—दक्षिणकांठचा अंमल नजीबखान व हैदर यांनीं उडवून दिला होता. व महाराष्ट्रांतील घर राखण्यासाठीं पेशव्याला पुणें जाळून घेऊन व तेथील देवता-मूर्तींची मोडतोड सहन करून हैदराबादेवर जावें लागलें, तेव्हां कोठें राक्षसभुवनाचा जय मिळून पुन्हा शांतता निर्माण झाली. पण एवढें सव्यापसव्य कां करावें लागलें? तर शत्रू निःशेष करण्याची काळजी त्यांनी कधीं घेतली नाहीं म्हणून. मोठा विजय मिळवून नेहमीं दुसरीकडे जावयाचें अशी त्यांची रीत. त्यामुळें स्थिर अंमल कोठेंच व केव्हांच बसला नाहीं. राजधानीचें शहर पुणें, हेंहि सदा धोक्यांत राहिलें. या अनुभवानें शहाणा होऊन माधवरावानें उभयपक्षांत सख्याचा पाया घातला. निजामाचा मुत्सद्दी रुक्नुद्दौला हाहि या नवीन समझौत्याचा संस्थापक म्हणतां येईल. हा सलोखा पुरीं तीस वर्षें टिकला. सन १७६३ पासून सन १७९३ पर्यंत उभयपक्षांत युद्ध झालें नाहीं. याचा अर्थ उभयतांत नेहमीं सहकार्य राहिलें असा मात्र नव्हे. सन १७७४ तें १७८२ या काळांतील इंग्रजांबरोबरच्या युद्धांत निजामानें आरंभीं बरीच मदत नाना फडणीसास केली. पण त्याबद्दल चोपून मोठा मुलुखहि परत घेतला हेंच काय, पण ज्या चौथाईसरदेशमुखीच्या पैशांवर पेशव्यांची हालत टिकावयाची, तेंहि देणें त्यानें तहकूब ठेविलें. प्रत्यक्ष लढण्यापेक्षां गप्प बसण्याबद्दल दिलेली ही लांच होती. धूर्त निजामअली उर्फ बंदेगानअली धाकटा निजाम, याची कारकीर्द तीन पेशव्यांना पुरली. ज्या या धाकट्या निजामाशीं माधवरावानें व पुढें नाना फडणीसानें सख्य जोडलें व राखलें, तो धाकटा भाऊ असल्याकारणानें आरंभीं वडील भावांच्या आड दडलेला असला, तरी त्याचे गुण आरंभापासूनच पहाणारास दिसण्यासारखे होते. मेषपात्र सलाबतजंगाच्या १२ वर्षांच्या नाममात्र कारकीर्दींत स्वतंत्र, धूर्त व चळवळ्या असा हाच एक भाऊ होता. त्यानें बुसी व शहानवाजखान या दोघांनाहि मोठ्या हुशारीनें तोंड दिलें. व निजामाचा अंमल गोदा—उत्तर तीरच्या प्रदेशांत म्हणजे खानदेश—वऱ्हाडांत शक्य तितका राखला. पेशव्यांनीं या निजामाला सहाय्य केलें नसतें तर वऱ्हाड व गंगथडी जानोजी भोसल्यानें केव्हांच खालसा केली असती. म्हणजे तो प्रदेश कालपर्यंत निजामाच्या राज्यांत राहून त्याच्या वडील मुलास ब्रिटिशांच्या प्रिन्स ऑफ वेल्स प्रमाणें "वऱ्हाडचा युवराज"

म्हणवून घेण्यास दीडशें वर्षी नंतर संधि मिळती ना! माधवरावानें सख्याचें पाऊल टाकलें याचाच अर्थ हिंदुपदपातशाहीची आशा त्यानें कायम सोडली असा होतो हें उघड होय. हीच गोष्ट शाहआलम बादशहास अलाहाबादेहून दिल्लीस आणून स्थानापन्न करविण्यांत त्यानें दाखविली. ज्या रुक्नुदौल्याच्या मध्यस्थीमुळें हें सख्य घडून आलें त्याचा पुढें काम संपल्यावर निजामानें खून करविला ही गोष्टहि दृष्टीआड करण्यासारखी नाहीं.

धाकट्या निजामाचा दहा वर्षें मुख्य सल्लागार व दिवाण असलेला विठ्ठल सुंदर हा साडेतीन शहाण्यांतील एक पुरुष होता. याचा वडील बंधु मोरोपंत याबद्दल थोरल्या निजामानें जे उद्गार काढले आहेत त्यावरून याच्याहि वृत्तीचा बोध होतो. मुसलमानांच्या सहवासाने कांहीं ब्राह्मणहि किती वेगळे झाले होते हें या बंधूंच्या चरित्रांवरून कळून येतें. उदगीरच्या लढाईनंतरच्या तहांतील एक अट या विठ्ठल सुंदरास निजामअलीनें बडतर्फ करावें अशी होती. पण आरंभीच्या ४५ लाखांऐवजी १५ लाख जागीर जास्त देऊन निजामाने त्याला आपल्या पदरीं राखलें. पुढील काळांतील मुशिरुल्मुल्काचा हा विठ्ठल सुंदर पूर्वज म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. त्यानें यावेळीं पेशव्यांच्या मर्जीप्रमाणें वागण्याचें कबूल केलें[१५] पण पानिपतानंतर काय कारस्थानें केलीं हें इतिहास प्रसिद्धच आहे. जशी उत्तरेंत गाजीउद्दीनाची ओळख पेशव्यांस पटली नाहीं, तशीच या विठ्ठल सुंदराची ह्या वेळेपर्यंत पटली नाहीं. जानोजी भोसले, प्रतिनिधि, गोपाळराव पटवर्धन, सदाशिव रामचंद्र, वगैरे लोकहि यानें कांहीं काळ आपल्या बाजूस ओढले यावरून त्याची हुषारी दिसून येते. सन १७५७ सालची शिंदखेडची मोहीमही याच राजश्रींच्या कारस्थानामुळें निर्माण झाली होती. शहानवाझखान व हैदरजंग यांचे खून याच प्रकरणांत पडले. मुजफरखानाला सदाशिवरावभाऊवर मारेकरी घालवण्यांत याचाच हात असावा. अशा इसमाला मुसलमानांप्रमाणें शिरच्छेद न केला तरी निजामाप्रमाणें कायम कैदेंत ठेवणें इष्ट होतें. पण सबंध पेशवाईत अशी काळजी अगाऊ घेतल्याचा पुरावा कोठेंच सांपडत नाहीं. ही सामान्य मतानें नीति असेल पण राजनीति खास नव्हे.

---

१५. पे. द. १–८३.

पेशव्यांचें मन हिंदुपदपातशाही स्थापन करण्याच्या ध्येयावरून कां चळलें यास जीं अनेक कारणें आहेत त्यांतील एक कारण त्यांना भेटलेले गुरु रामदासाप्रमाणे निरिच्छ, वैराग्यशील व उच्चध्येयाने प्रेरित असे नसून ब्रह्मेंद्र व नारायण दीक्षित पाटणकर यांप्रमाणे शुद्ध व्यवहारी, लोभी व स्वार्थपरायण होते हेंहि आहे. "ब्रह्मेंद्रस्वामीच्या चरित्राचे मराठेशाहींतील दुष्परिणाम" यावर एक स्वतंत्र प्रबंध लिहिण्यासारखा आहे. राजवाड्यांनी आपल्या तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत त्याबद्दल पुष्कळ लिहिलेंहि आहे. पेशव्यांच्या सगळयाच हालचाली या गुरूंच्या आज्ञेने होत होत्या असें म्हणतां आलें नाहीं तरी त्यांच्या मनांत अनेक व्यक्तींबद्दल निष्कारण गैरसमज निर्माण होईल अशी त्यांची वर्तणुक होती ही गोष्ट स्पष्ट आहे. तसेंच ब्रह्मेंद्राच्या लावालावीमुळें राष्ट्रीय नीतिमत्तेचा ऱ्हास झाला हा राजवाड्यांचा शेरा सर्वस्वी पटण्यासारखा आहे. या स्वामीचें मोगली राज्यासंबंधीचें मत त्यानें चिमाजी आप्पास लिहिलेल्या पत्रांत स्पष्ट झालेलें आहे. स्वमी लिहितो "धर्म जरी म्हणावा तरी तुमचे राज्यांत कवडीचा नाहीं. आणि कारकून तुम्हास लेखीत नाहींत, तुम्हाहून अधिक जाहले. राजा कृपाळु, चाकर बेईमान, आपलीं आपलीं घरें भरितात. **औरंगजेब होता त्याचा धर्म जबरा चालत होता. त्याचे दुऱ्हाईस वाघाने उभें रहावें. तरीच चंदी चंदावर सुटलें.**"[१६] ज्यांच्या गुरूचें मत औरंगजेबाच्या राज्यांत जबरा धर्म चालत होता व पेशव्याच्या राज्यांत तो नाहीं असें होतें, ते पेशवे मोगलाई मोडावयाला कसे कंबर बांधतील? पेशवाईतील राजवटीचें वर्णन स्वामीच्या दोन वाक्यांत आलेंच आहे— राजा कृपाळु आणि चाकर बेइमान. कारकून प्रधानांस मोजीत नाहींत! स्वामी त्याच पत्रांत पुढें म्हणतो, "राजा तरी महादेवाचा महादेव झाला. पुढे होईल कसें? लक्ष्मणबावा, हें कसें कामास येईल?" स्वामीने केलेलें हें निदान व दर्शविलेली काळजी इतिहासानें खरीं ठरविलीं आहेत. पेशवाईत धनी व चाकर हें नातें छत्रपति—पेशव्यापासून सुरुवात करून तीन रुपयांच्या कारकुनापर्यंत कोठें टिकलेंच नाहीं. सर्व बनवाबनवीचा प्रकार होता. असें राज्य कार्यक्षम कोठून राहणार? व कोणतेंहि ध्येय

---

१६. ब्रह्मेंद्र ले. २८०.

अशा राज्ययंत्रांतून कसें सिद्धीस पावणार? स्वामी ब्रह्मेंद्र जसा पेशव्यांस व त्यांच्या सरदारांस आशीर्वाद देऊन हात पुढें पसरी, तसाच प्रकार तो हबशी व निजाम यांबाबतहि करी. तो राणी सगुणाबाईस लिहितो, "आम्ही गेलों होतों जे, नबाब मोगल यास भेटोन त्यांपासोन गांव मागोन पालखींत बसोन तुम्हांस मुख दाखवावें. त्यास त्याची भेट न जाहली. याजकरितां राहतां राहिलें. खालें कोंकणांत होतों त्यास त्याजवळचे चार गांव इनाम देऊन कसें चालवीत असत तेंही तुम्हांस विदितच आहे. बाजी होते ते म्हणत जे, किलीजखानास तुम्हांस नेवून भेटवितों; आणि पांच गांव इनाम देऊं. त्यास तो मरोन गेला एरवीं देविता. तुमची खातरनिशा होती. तुमचें सत्पात्रीं देव तुमचें घेईना. कुपात्रीं द्यावें ऐसें तुमचे मनांत होतें, याजकरितां कुपात्रीं देतां!"[१७] ज्या छत्रपतीच्या आश्रयाखालीं सातान्या-जवळ स्वामी राहतो त्या छत्रपतीच्या निष्ठा असणाऱ्या राणीस स्वामी असें बेगुमानपणें लिहितो, यावरून याची दानत काय म्हणावी? तसेंच या पत्रांत निजामउल्मुल्काला भेटून त्याच्याकडून गांव इनाम घेऊन व पालखींत बसून येऊन छत्रपतीच्या राणीला हिणविण्याचा या स्वामीचा हेतु होता व त्याच्या मनांत म्हणावयाचें होतें, कीं तुम्हीं देत नाहीं तर तुमचा अविंध शत्रु मला देईल. असा स्वामी ज्यांचा गुरु व पाठीराखा ते पेशवे निजामाला कायम बुडवून सारी दक्षिण कोठून मोकळी करणार? पेशव्यांचे दुसरे गुरु नारायण दीक्षित हेहि ब्रह्मेंद्रांप्रमाणेच द्व्यामोशायन, म्हणजे मराठे व मोगल या दोघांनाहि सारखाच आशीर्वाद देऊन आपलें घर भरणारे होते. ह्यांच्या मनांतून चित्पावन व कऱ्हाडा हा भेद मात्र काशीवास केल्यानंतरहि धुतला गेला नव्हता.[१८] यांनी औरंगजेब बादशहासमुद्धां आशीर्वाद दिला होता[१९] कारण ते औरंगाबादेच्या परिसरांत

---

१७. ब्रह्मेंद्र ले. २५९. १८. पे. द. ३०—१४७.

१९. ज्या औरंगजेबाला दीक्षितांनी आशीर्वाद दिला त्याने ज्या सातान्यांत दिक्षित रहात त्या गांवच्या टेकडीवर असलेले खंडोबाचे देऊळ पाडून टाकलें होते ही गोष्ट सुद्धा याबाबत लक्षांत ठेवण्यासारखी आहे. Sarkar–Aurangzeb Vol. III, 1921 p. 280. याच रानांत औरंगजेब शिकारीस आला असता तेथें त्याची व नारायण दीक्षिताची भेट झाली असें दीक्षितांच्या आख्यायिकेंत म्हटलेलें आहे.

सातारें गांवी वाडा बांधून सद्गृहस्थ बनले होते. यांचे चिरंजीव बाळकृष्ण दीक्षित १७५४ सालीं राघोबादादा दिल्लींत असतां भेटीस गेले होते. तेथें दुसऱ्या आलमगीर पादशहाने यास १५००० रुपयांचे गांव काशीप्रांती नेमून दिले व म्हटलें कीं "ज्या पहिल्या अलमगीर पादशहांवर थोरल्या दीक्षितांचा पूर्ण आशीर्वाद जाहला होता त्यांच्या कृपेने मोगलांच्या राज्याची दिन प्रतिदिनीं आजतागायत ऊर्जितावस्था भरभराटच आहे.[२०] म्हणून ही यत्किंचित सेवा करितों." अशा रीतीचें रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति म्हणणारे ज्यांचे गुरु, त्यांचे शिष्य मोगलाई बुडवून आपल्या गुरूंचा आशीर्वाद खोटा कसा करितील? औरंगजेबानें मोडलेलें काशीचें देवालय तेथें उभारलेली औरंगजेबाची मशीद पाडून टाकून त्याजागीं पुन्हा विश्वेश्वरस्थापना करावयाची असा आपला हेतु राजारामापासून मराठ्यांनीं मनांत धरिला होता. अमात्यांच्या राजनीतींत या गोष्टीचा उच्चार आहे. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांचीहि तेंच करण्याची उमेद होती असें चिमाजीअप्पा लिहितो. पण प्रत्यक्ष वेळ आली, पेशवे ८०,००० फौजेनिशीं काशीसमोर गंगादक्षिणतीरीं येऊन ठाकले तेव्हां नारायण दीक्षितास भय पडलें. व त्यानें पेशव्यास व इतरांस साध्या यात्रेकरूप्रमाणें निःशस्त्र करून काशींत आणून विश्वेश्वरदर्शन करवून परत पाठविलें. कारण तेथील सफदरजंगाच्या फौजदाराने धाक घातला कीं "मराठे काशीवर चालून येतात असें कळलें कीं मी आधीं १०,००० ब्राह्मणांची सुंता करून टाकतों. याउलट निःशस्त्र गेलेले पेशवे व त्यांचे सर्व नामांकित सरदार—शिलेदार एका दृष्टीने मोगलांच्या दाढेंतच सांपडलेले होते. मनांत आणते तर मोगल त्यांची कत्तलहि करूं शकते. अशी गोष्ट त्यांनीं केली नाहीं याचें कारण नानासाहेब यावेळीं बादशहाच्या हुकूमाने रघूजीविरुद्ध अलीवर्दीखानास मदत करण्यासाठीं चालला होता. व मराठे निःशस्त्र होण्याची मानहानि सोसूनहि त्रिस्थळीची यात्रा करण्यास राजी होते. यानंतर आठ वर्षांनीं सन १७५१ मध्यें मल्हारराव वजिराच्या मदतीस म्हणून अलाहाबादेपर्यंत आला तेव्हां काशींत अफवा उठली कीं 'तो काशींत येऊन मशीद पाडणार व तेथें पुन्हा विश्वेश्वरस्थापना करणार!'

---

२०. इतिहाससंग्रह-ऐतिहासिक चरित्रें क्रमांक ५ पृष्ठ-४७.

या वार्तेनेंच दीक्षितांच्या हृदयांत धडकी भरली![२१] एकीकडे देवता-स्थापना करूं नये असें म्हणणें हा सुद्धां हिंदुमात्रास दोष. मग काशीच्या पंडितांनीं त्याला असंमति कशी दर्शवावी? असा पेंच त्यांना पडला. दुसरेपक्षीं वाटलें कीं हा मल्हारराव सैन्याच्या जोरावर ही गोष्ट करून जाईल व मागाहून आपली मात्र नित्य गांठ वजिराच्या मुसल्मान फौजदाराशीं. तो पुन्हा उलटें केल्याशिवाय राहणार नाहीं, तेव्हां सर्व ब्राह्मणांनीं ठरविलें कीं होळकर काशींत आला तर सर्वांनीं पेशव्यास विनंति करवून मशिद पाडवण्याचें काम बंद करवावें. म्हणजे तेणेंकरून ब्राह्मणांचे जीवित निःशंक होईल. आणि ब्राह्मण जगणें हा तर आद्य धर्म![२२] त्यांच्यावर संकट येईल अशी गोष्ट कोणी कल्पूंहि नये. ब्राह्मणांच्या सुदैवाने होळकर काशीस येऊन पोहोचलाच नाहीं. प्रयागाहूनच त्याचें सैन्य परत गेलें! हिंदूंची जेथें अति बहुसंख्या त्या उत्तर प्रांतांतील ही स्थिति, मग जेथें मुसलमानांची बहुसंख्या तेथील विचारच कशाला?

निजाम-पेशव्यांचे संबंध वर्णितांना याचा काय संबंध असें कोणी म्हणतील. तर त्यास हेंच उत्तर कीं वर दर्शविलेल्या वृत्तीचा अडथळा हाच प्रामुख्याने पेशवाईंत मराठ्यांना सर्वत्र बाधला, 'सारी दक्षिण मोकळी होती' असे उद्गार बाजीराव, नानासाहेब, सदाशिवरावभाऊ सर्वांनीच काढलेले आढळतात. पण ती 'मोकळी दक्षिण' मराठ्यांची न होतां तत्त्वतः तरी मोगलांचीच कां राहिली? तंजावरचा राजा नेहमीं अर्काटच्या नायब सुभेदाराचा मांडलिक होऊन सदा पेंचांत कां सांपडला? म्हैसूर, बिदनूर, चित्रदुर्ग वगैरे हिंदु संस्थानें हैदराच्या ताब्यांत गेल्यावर सुद्धां तो दिल्लीच्या बादशहाची सुभेदारी मिळविण्याची इच्छा धरतांना कां आढळतो? तर पेशव्यांनीं मोगल बादशाहीचा मान आपल्या वागणूकीने कायम राखिला होता, म्हणून. तो हैदर कधीं पेशव्यांची किंवा त्यांच्या छत्रपतींची सनद मागतांना आढळत नाहीं. कारण तेच मुळीं मोगलांचे मांडलिक व सुभेदार! मोगलांनीं कधीहि न जिंकलेले त्रावणकोरचे व नेपाळचे हिंदु राजे आपल्याला अनुक्रमें "सुलतानमन्येबहादूर" व "जंगबहादुर" असले किताब कां लावून

२१. राजवाडे खंड ३ ले. ३९७.
२२. राजवाडे खंड ३ ले. ३९८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८९९ वि: निबंध
क्रमांक ११८०२ नों: [illegible]

घेतात ? तर राजारामाच्या हेतूप्रमाणें दिल्लीचें राज्य घेऊन महाराष्ट्रधर्माचा प्रसार करण्याचें पेशव्यांनीं नाकारलें व या उलट २२ सुभ्याच्या चौथाईच्या मोबदल्यांत ती बादशाही टिकविण्याची हमी त्यांनीं घेतली म्हणून.

बाजीराव, नानासाहेब व माधवराव यांनीं प्रत्येकानें निजामाचा जोराचा पराभव दोन दोन वेळां केला. पालखेड व भोपाळ, भालकी, सिंदखेड व उदगीर, भुलेश्वर व राक्षसभुवन असे पुष्कळ जय पेशव्यांनीं निजामावर मिळविले. यांचा युद्धकाल १७२७ पासून १७६३ पर्यंतचा आहे. हा काळ पेशव्यांच्या वाढत्या जोराचा होता. त्या काळांत निजाम नष्ट न झाल्यामुळें पुढील काळांत त्याला नष्ट करणें अशक्यच झालें. एवढ्या काळांत हैदराची नवीन सत्ता उदयास आली होती व इंग्रजहि बंगाल व मद्रास या भागांत सत्ताधीश झाले होते. या पुढच्या राजकारणांत या चार राज्यांचे हर्षामर्ष राजकारण बनवीत राहिले. इंग्रज व फ्रेंचांना परस्पर छेद देऊन दोघेंहि व्यापारीच राहतील, सत्ता बळकावण्याच्या उद्योगांत त्यांचे पाऊलच पुढें पडणार नाहीं असें करण्याची सत्ता सन १७४३ पर्यंत मराठ्यांजवळ होती. पण नानासाहेब त्यावेळीं पोरसवदा असून त्याचे सल्लागार सरदार व मुत्सद्दी शूर असले तरी हिंदुस्थानचा राज्यपट जाणणारे नव्हते. त्यांहून निजाम जास्त ज्ञाता होता. त्याने आपल्या उशापायथ्याशीं नडणारे पेशवे व भोसले मोठ्या चतुराईने उत्तरेंत दूर बंगाल्यांत जातील असें करून मराठ्यांचा तुंगभद्रा दक्षिणतीरचा अंमल नष्ट करून टाकला व इंग्रज-फ्रेंचांच्या नवीन शस्त्रास्त्रांची व युद्धपद्धतीची जोड आपल्या राज्यास करून दिली. त्यांपैकीं फ्रेंच पानपताबरोबरच दक्षिणेंतून उखडले गेले. त्यांनीं पुन्हा हैदर व टिपू यांच्या मदतीनें पुढें येण्याचा प्रयत्न केला, पण तो साधला नाहीं. हैदराला ठेचावयाचें म्हणून माधवरावाला निजामाशीं जुळतें घ्यावें लागलें. कारण दोघांचेंहि राज्य हैदर कुरतडीत होता. याच अवधींत इंग्रज आपले बंगाल व मद्रास हे दोन प्रांत खुष्कीने जोडून घेण्याचा खेळ खेळत राहिले, निजामापासून त्यांनीं उत्तर सरकार प्रांत तर झपाटलाच, पण निजाम व हैदर या दोघांनाहि तोंड देणें त्यांना या वेळीं शक्य नव्हतें. कारण त्यांचे हात गंगातीरीं बादशहा, वजीर व रोहिले यांच्या राजकारणांत अडकले होते. खेरीज कंपनीच्या कारभाराचा खेळखंडोबा नोकरांच्या लुटारूपणामुळें त्यांना बाधत होता. या सर्व प्रकारांतून त्यांची सुटका

हेस्टिंग्स गव्हर्नर झाल्यानंतर झाली. त्याचीं आरंभीचीं वर्षें राज्याची घडी बसविण्यांत, पैशाचें उत्पादन वाढविण्यांत व आपलें स्थान स्थिर करण्यांत गेलीं. या वेळीं मुंबईकर इंग्रज महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन त्याच्या मदतीस आले. म्हणजे त्यांनीं साष्टी बेट घेऊन ब्रिटिश राज्याची पश्चिम आघाडी उघडली. वस्तुतः या गोष्टीचा आरंभ डोळयांत न भरतां त्यांनीं सन १७५९ त सुरत घेऊन केला होता. व या पायावरच त्यांनीं राघोबाचें कारस्थान रचिलें. सात वर्षांच्या इंग्रज-मराठे झगड्यांत मराठ्यांनीं आपलें पाणी इंग्रजांस दाखविलें तरी त्यांतून मराठेशाही तिभंगून बाहेर पडली. भोसले, शिंदे व पेशवे हीं सत्तेचीं स्वतंत्र केंद्रें सालबाईच्या तहानंतर वाढीस लागलीं. नागपूर, ग्वाल्हेर व पुणें या तिन्ही ठिकाणीं इंग्रज वकील येऊन बसले. तत्पूर्वींच हैदराबादच्या निजामाच्या दरबारीं प्रवेश करून त्यांनीं तो मोहरा राजकारणांत आपल्या बाजूनें खेळविण्याचा उपक्रम केला होता. इंग्रजमराठ्यांच्या युद्धांत निजामानें प्रत्यक्ष मदत थोडीच केली. पण गप्प राहून व सवाई माधवरावाचा राघोबाविरुद्ध पाठपुरावा करून त्याने नाना फडणीसाचें आसन बळकट केलें. पुढेंहि शिंद्यांच्या व हैदराच्या विरुद्ध त्यानें नानासच धरून रहाण्याचा शहाणपणा दाखविला. गरज सरल्यानंतर आपल्यास सोडल्याबद्दल टिपूनें मराठ्यांस पुढें चांगलाच त्रास दिला. टिपूच्या जुलमाचा प्रतिकार नानाला करतां आला नाहीं. जसे इंग्रजांचे कैदी टिपूने सोडले नाहींत त्याप्रमाणें पेशवे-पटवर्धनांचे कैदीहि त्यानें सोडले नाहींत. मुराराव घोरपडे हैदरानें व नरगुंदकर काळोपंत पेठे टिपूनें मुलामाणसांसह कैदेंत मारले. या गोष्टींचा प्रतिकारहि नानाकडून झाला नाहीं. या दुबळेपणामुळेंच पेशव्यांना पुढें निजाम व इंग्रज यांशीं दोस्ती करून टिपूचा पराभव करावा लागला व यांतूनच इंग्रजांच्या मध्यस्थीचा प्रवेश निजाम-पेशव्यांच्या संबंधांत झाला. त्याचे काय परिणाम झाले तें पुढील व्याख्यानांत सांगण्यांत येईल.

---

## व्याख्यान चौथें : : सख्य आणि धुसफुस

राक्षसभुवनाच्या लढाईनंतर निजामअलीखान याची खात्री पटली कीं, मराठे पानिपतामुळें कितीहि दुबळे झाले असले, त्यांच्यांत केवढीहि फूट पडली असली, तरी अखेरीस पेशव्याची सत्ता आपल्याहून अधिक आहे, आणि याचें मुख्य कारण त्यांच्या सर्वांच्या मनांत असलेली एकमेकां-विषयींची राष्ट्रभावना, कीं जी हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि लोकांत त्या काळीं दृष्टोत्पत्तीस येत नव्हती. निजामाच्या सुदैवानें यावेळीं त्याला मीर मुसाखान रुक्नुद्दौला हा शहाणा, सौम्यप्रवृत्तीचा दिवाण मिळाला. त्यानें असें धोरण ठेविलें कीं उभयता दरबारांत वादविवाद उमटूंच नये. तत्कालीन इंग्रजांच्या मताने हा दिवाण पेशव्यांच्या ताटाखालचें केवळ मांजर होऊन राहिला[१] व त्यानें आपल्या वर्तनानें निजामाच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणला. आपण हें लक्षांत आणलें पाहिजे कीं, कोणाहि शांतता-प्रिय मुत्सद्यांविरुद्ध बहुधा हाच अभिप्राय दिला जातो. दहा वर्षांच्या याच्या कारकीर्दींत निजामाच्या प्रजेला शांतता लाभून तिची आर्थिक स्थिति सुधारली व भोसल्यांच्या चढाईपासून तिचें रक्षण झालें. पेशव्यानें वेळोवेळीं उदारपणा दाखवून निजामाला मराठ्यांनीं घेतलेली जागीर परत दिली.[२] याच वेळीं इंग्रजांनीं पूर्वसमुद्राकडील बाजूनें निजामाचें राज्य कुरतडण्यास सुरवात केली होती. हैदराच्या भयामुळें इंग्रजांना निजामाच्या मदतीची गरज होती. व रुक्नुद्दौला सर्वांशींच सख्य जोडण्याच्या विचाराने वागत असल्यामुळें त्यानें इंग्रजांशींहि तह केला.[३] या वेळीं निजामाला रुक्नुद्दौल्याबद्दल संशयहि आला.[४] पण पेशव्याचा पाठिंबा त्यास असल्यामुळें निजामाचें कांहीं चालले नाहीं. माधवराव पेशव्यानें

---

१. P. R. C. Vol. II, 182

२. Banerji ‘ Madhavrav ’ p. 88

३. Banerji ‘ Madhavrao ’ p. 123

४. Banerji ‘ Madhavrao ’ p. 126

अर्काटच्या सुभ्याकडे चौथाईची मागणी केली. व या गोष्टीला निजामातर्फे रुक्नुदौलाहि कबूल झाला. कारण त्यामुळें निजामाचाहि त्या भागांतील बंद झालेला अंमल पुन्हां सुरू होणार होता. माधवरावाला या वेळीं जें पडतें धोरण निजामाशीं घ्यावें लागलें याचें एक कारण राघोबादादाशीं चालू असलेली घरांतील कायम धुसफुस हेंच होय. पेशव्यानें आपल्या धोरणानें पेशवाईची सत्ता बळकट केली तरी त्यामुळें मराठेशाही बळकट झाली असें मात्र म्हणतां येणार नाहीं. जानोजी भोसल्याच्या बंगाल्यांतील चौथाईला माधवरावाच्या धोरणानें मदत न मिळतां मराठ्यांचा तिकडील हक्क गमावल्यासारखाच झाला.[५] त्यामुळें भोसल्यांची आर्थिक स्थिति खालावून पूर्वेकडील राजकारणांत त्यांचा तेजोभंग झाला. इंग्रजांच्या खर्चानें अलाहाबादेस सुखानें राहिलेला शाहआलम कारण नसतां आपल्या मदतीनें तेथून उठवून त्याला दिल्लीस स्थानापन्न करण्यांत पेशव्याच्या सरदारांनीं दूरदृष्टी दाखविली असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. उलट बादशहाच्या नांवानें त्यांनीं रोहिल्यांना झोडल्यामुळें रोहिले हीनदीन होऊन पुढें सुजाउद्दौल्याच्या लोभाला इंग्रजांच्या मदतीनें बळी पडले व मराठ्यांना अलाहाबाद व कुडा हा अंतर्वेदींतील प्रदेश मोबदल्यांत मिळावयाचा तोहि इंग्रजांनीं सोडला नाहीं. पेशव्यांच्या सर्व नामांकित स्वाऱ्यांमुळें अशीच अकल्पित हानि हिंदुस्थानच्या सर्व भागांत घडली. मराठ्यांनीं वाईटपण मिळविलें व त्यांनीं नरम केलेल्या लोकांचा प्रदेश आयता इंग्रजांच्या घशांत अल्पश्रमानें पडला. निजाम बरोबरीच्या नात्यानें पेशव्यांनी राखला तो अखेर आयता इंग्रजांच्या जाळयांत जाऊन पडला. तीच हकीकत मराठ्यांनीं मढें उकरून जिवंत केलेल्या शाहआलम बादशहाचीहि झाली. बरें, त्यांच्या या धोरणामुळें कोणी बादशहाच्या सनदेवरून मराठ्यांना त्यांची चौथाई सुप्रयुक्त दिली, असेंहि घडलें नाहीं. हेंच काय, पण टिपूशीं झालेल्या इंग्रज–निजाम–पेशवे यांच्या तहामुळें त्याकडूनहि पेशव्यांना आपली जुनी म्हैसूरकरावरची चौथाई मागतां येणार नाहीं असें कॉनवालिसनें पेशव्यांना बजावलें.[६] पेशव्यांच्या दरबारीं रहाणारा इंग्रज

---

५. Correspondence

६. Poona Residency Correspondence Vol. 2–No. 151.

वकील मॅलेट हाहि टिपूवरील दोस्तांच्या स्वारीपूर्वींच इंग्रजांच्या प्रतिष्ठेबाबत किती जागरूक होता हें पाहिलें म्हणजे पेशव्यांच्या सत्तेचें मूल्यमापन परस्परच होतें. पेशवे आपल्याकडे राजाधिकार आहे असें समजून गव्हर्नर जनरलला खालच्या दर्जाच्या मायन्यानें लिहूं लागले तेव्हां जशास तसें या न्यायानें इंग्रजांनींहि त्यांना त्याच मायन्यानें उलट लिहावें असें मॅलेटनें सुचविलें.[७] पेशवे हे राजे नसून छत्रपति हा त्यांचा राजा आहे आणि तो राजाहि दिल्लीच्या बादशहाना वरिष्ठ समजून अर्जी लिहितो आणि आपल्या राज्यांतील नाणें मोगलबादशहाच्या नांवानें पाडतो, हेंच काय पण पेशवे सुद्धां आरंभीं तरी दक्षिणच्या निजामाला अर्जच करीत असत व नाना फडणीस तर अजूनहि निजामाला अर्जीच पाठवतो या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन व खुद्द निजामअली कॉर्नवालीसला बरोबरीच्या नात्यानें लिहितो, त्याअर्थी इंग्रजांना पेशव्याच्या वकील इ मुतलकीला भिऊन त्याला वरिष्ठ मानण्याची गरज नाहीं[८] असें मॅलेटनें कलकत्त्यास इंग्रजांच्या पारसनवीसास कळविलें. ही गोष्ट १७९० इतकी पुढील आहे. पण तीवरून इंग्रजांची वृत्ति हळू हळू कशी पालटत गेली याचा बोध होतो. या लिहिण्यानंतर टिपूविरुद्ध निजाम–पेशवे–इंग्रज करार झाला तेव्हां इंग्रजांनीं पेशव्याचेंच नांव हजर सत्ताधीश म्हणून तहांत घातलें. कॉर्नवालीसनें छत्रपतींचा वरिष्ठ अधिकारी म्हणून उल्लेख करण्याचेंहि टाळलें. वस्तुतः असें करण्यांत पेशव्यांची चूक होत होती. पण सर्वच पेशवाईत हा राज्यघटनेंतील ढिलाईचा प्रकार जारी दिसतो.

१८ व्या शतकांतील मराठ्यांच्या राज्यास इतिहासांत "सरंजामदारांचें संयुक्त राज्य" असें म्हटलेलें आहे. पण पेशव्यांचा सारा रोख इतर राजमंडळाच्या सरदारांना सुद्धां आपल्या एकमुखी सत्तेखालीं आणण्याचा व दाबून ठेवण्याचा दिसतो. भावाभावांतील भांडणें, सरंजामदारांची व्यक्तिशः नालायकी, अशासारख्या गोष्टींचा उपयोग करून त्यांची सत्ता सदा दुर्बल ठेवण्याचें पेशव्यांचे धोरण प्रमाणिकपणाचें नव्हतें किंवा मराठी राज्याला हितकरहि नव्हतें. राज्यांतील कोणीहि भागीदार परकी

---

७. Ibid Vol. 2–No. 87.

८. Ibid.

सत्तेकडून चिरडला जाऊं नये एवढ्यापुरतें सर्वांचें संगनमत ठेवून इतर बाबतींत पक्ष घेणें दूरदृष्टीचें नव्हतें. त्यामुळें त्या त्या सरंजामदारांनीं स्वसंरक्षणासाठीं पेशव्यांच्या युक्तीचा त्यांच्यावरच उलट प्रयोग केला. म्हणजे पेशव्यांच्या घरांतील दुहीवर फुंकर घालून त्यांनीं परस्परांविरुद्ध तट निर्माण केले. नानासाहेबाच्या कारकीर्दीत पेशव्याच्या घरांतील भाऊबंदकी दाबांत होती ती माधवरावाच्या कारकीर्दींत उसळून वर आली. तेव्हां भोसले, गायकवाड, प्रतिनिधि हे पूर्वींपासून फटकून असणारे भागीदारच काय, पण पेशव्यांचे नोकर, शिंदे, होळकर व पटवर्धन हे सुद्धां वेगवेगळया पक्षांस वेळोवेळीं सामील झाले. छत्रपतींपासून प्रत्येकाच्या घरांत दोन मतें व पक्ष सुरू झालें. राघोबा व माधवराव यांच्या भांडणांत निजाम-हैदर व इंग्रजच काय, पण गोविंदराव व सयाजीराव गायकवाड; मानाजी व महादजी शिंदे, तुकोजी व अहिल्याबाई होळकर; जानोजी व मुधोजी भोसले; आबा व नाना पुरंदरे अशीं किती तरी अंतर्गत द्वंद्वें पेशवाईच्या आश्रयाने भांडूं लागलीं. असें होण्याचें एकमेव कारण म्हणजे मराठमंडळाला यावेळीं निश्चित अशी घटना नव्हती. खेळांतील मोहऱ्याप्रमाणें वेगवेगळ्या व्यक्ती दुसऱ्यांचा उपयोग जरूरीप्रमाणें करूं लागल्या. ज्येष्ठपणाचा नियम, श्रेष्ठपणाचा नियम; कुलीन वा अकुलीनपणा; कोणताच धरबंद मराठी राज्यांत दंडक म्हणून राहिला नाहीं. या गोष्टींत मराठी राज्याची निम्मेहून जास्त शक्ति खर्ची पडली हें इतिहासाभ्यासकांस सुज्ञात आहेच.

जो महादजी शिंदे पुढें दिल्लीच्या बादशहाचा नायब 'वकील-इ-मुतलक' होऊन निजामास दुस्सह झाला, तो सन १७६४ सालीं स्वतः राघोबा व सखुबाई शिंदे यांच्या कचाट्यांत सांपडला होता तेव्हां त्याने निजामाकडे नोकरीची इच्छा दर्शविली होती.[९] जानोजी इंग्रज, निजाम व हैदर तिघांशींहि मदतीची याचना करतांना आढळतो. राघोबा-तर्फे इंग्रजांशीं बोलाचाली करतांना मोरोबादादा, सखारामबापू, बजाबा पुरंदरे, भिवराव पानसे हे सुद्धां सामील दिसतात. गणेश संभाजी खांडेकर व गोपाळराव गणेश बर्वे खुशाल मराठी राज्य सोडून अयोध्येच्या वजिराच्या आश्रयास जातात.[१०] हें सर्व दृश्य काय दाखवितें? माधवरावाची कारकीर्द

---

९. पे. द. ३८–१५२

१०. पे. द. १९ प. ७१, ७३, ९२

चांगली होती असें ही समाजस्थिति दाखविते काय ? ३० वर्षांच्या दीर्घ अभ्यासानंतर आमचें तर असें मत झालें आहे कीं छत्रपतीला पुन्हा राज्य-कारभारांत मानाने आणून अष्टप्रधानमंडळासारखी व्यवस्था पुन्हा सुरू केल्याशिवाय मराठी राज्याला खरा तरणोपाय नव्हता, पण तसें न करितां छत्रपतीला कैदेंत ठेवून व मराठ्यांना दाबांत ठेवून हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग चोखाळल्यामुळें पेशवाईचा इतिहास झाला तसा झाला.

नारायणरावाचा खून ही आकस्मिक घटना नसून मागील पेशवाईच्या इतिहासाचा तो स्पष्ट परिपाक होता. ज्या राघोबाने दोन बादशहांचा खून करविणाऱ्या गाजीउद्दीनाशीं मैत्री ठेविली, तो पुतण्याचा खून घडविण्यांत कोठें माघार घेईल ? मुझफरखानासारखा उलट्या काळजाचा (सरदार) गारदी नोकरीस ठेवून आपली कामें सुकर करूं पहाणारा नानासाहेब, सुमेर-सिंग गारद्याचा पंथ महाराष्ट्रांत आणणारा नव्हे काय ? बारभाईंनीं निजामाची मदत घेतली, ती जर योग्य, तर हैदराची मदत घेणारा राघोबा अपराधी कसा ? आणि हे सर्व प्रकार राज्याचा लचका दिल्याशिवाय घडणेंच अशक्य होतें. मग त्या ठिकाणीं या दिल्या–घेतल्या प्रदेशांतील प्रजेची कुतर-ओढ कोण पहातो ? त्यांचें स्वराज्यप्रेम वा राजनिष्ठा कशी टिकून रहावयाची ? अशा स्थितींत निजामानें ' सवाई–माधवराव पेशवा सोळा वर्षांचा होईपर्यंत आपण त्याचा पाठपुरावा करूं '[११] असें वचन देऊन तें पाळलें ही मोठी अद्भुत गोष्टच म्हटली पाहिजे. सन १७७४ सालीं काढलेल्या या उद्गारांचा उल्लेख अनेकवार अनेक ठिकाणीं झालेला आहे. ' दोन राज्यांत जुदाई म्हणजे वेगळेपणा नाहीं ' हा मूलमंत्र निजामानें या वेळेपासून सुरू ठेवला. या अलिखित करारप्रमाणें नाना फडणीसानें या वेळीं निजामास दिलेला मुलूख त्याने परत करावयाचा असें ठरलें होतें असें तुकोजी होळकर सन १७९२ त म्हणतांना आढळतो.[१२] तें खरें कीं खोटें याचा निर्णय अस्सल कागदांवरून होत नाहीं.

माधवरावाच्या कारकिर्दींत निजाम, भोसले व हैदराविरुद्ध पेशव्यांच्या स्वाऱ्यांत सामील होता व त्यामुळें त्याचा आर्थिक फायदा होऊन त्याचें

११. पा. द. रु. ८९ फा. १ प. ५३

१२. चंद्रचूड दफ्तर ग्वाल्हेर १९३५ लेखांक १०६

राज्य टिकून राहण्यास चांगलीच मदत झाली. वस्तुतः या धाकट्या निजामाचें वर्तन येथवर विश्वास ठेवण्यासारखें मुळींच नव्हतें. निजामाच्या उरलेल्या सर्व मुलांत हाच धूर्त, पराक्रमी महत्त्वाकांक्षी होता पण तो उलट्या काळजाचाहि होता. उत्तर वयांत याजवळ पराक्रम कांहीं उरलेला नसून केवळ धूर्ततेच्या बळावर त्यानें आपलें राज्य टिकविलें—नव्हे वाढविलें. नानासाहेबाच्या कारकिर्दीतील निजामाशीं संबंध याच व्यक्तीच्या छक्क्या-पंजामुळें कठीण झाले होते. जरूरीप्रमाणें खून करण्यांत मुसलमानी राजकारणाचा एक भाग सांठविलेला असतो. मुसलमानांची भावाभावांतली युद्धेंहि बाकीचे भाऊ मरून एक भाऊ शिल्लक राहील तेव्हां संपतात असें मोगल बादशाहीचा इतिहास सांगतो. तीच प्रथा या धाकट्या निजामानें चालविली. हे थोरले व धाकटे निजाम औरंगजेबाच्या मरणापासून शाहअलम लेकच्या जयानें इंग्रजांच्या ताब्यांत जाईपर्यंत सुमारें एक शतक मराठेशाहीला पुरून उरले. पेशव्यांच्या या अवधींत पांच पिढ्या झाल्या हा मुद्दाहि राजकीय विवेचनांत लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मुसलमान युद्धांत, खुनामुळें किंवा व्यसनांनीं मरतात तर हिंदु नेहमींच अल्पायुषी दिसतात. दुसरी गोष्ट संततीबाबत. मुसलमानी राज्यकर्त्यांत संततीमुळें भांडणें तर हिंदूंत संततीच्या अभावामुळें वा अल्पायुष्यत्वामुळें राजकीय प्रश्न उद्भवतात असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. या गोष्टीला पुढारल्या समजलेल्या ब्राह्मणांच्या राज्यामुळें कांहींहि आळा बसला नाहीं. पेशवाईतील बहुतेक वृद्ध समजले जाणारे पुरुष साठीहि ओलांडलेले क्वचितच असत. ३९ वर्षांचा नानासाहेब पेशवा स्वतःस म्हातारा समजतो व राघोबाहि त्याला तसेंच म्हणतो[१३] हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राजवाड्यांनीं एका ठिकाणीं "पेशवाईतील अल्पायुषी पुरुष बाह्यतः थोडे जगूनहि वस्तुतः आजच्या निष्क्रिय पुरुषांशीं तुलतां कार्यदृष्ट्या जास्त जगत असत" असें म्हटलें आहे तें अल्प प्रमाणांत खरें असलें तरी समाज व राष्ट्रदृष्ट्या विघातक आहे हें विसरतां येणार नाहीं. अस्तु.

शहानवाजखान, हैदरजंग, मुजफरजंग प्रभृतींच्या खुनांमुळें चांगली ओळख पटविलेला हा धाकटा निजाम वस्तुतः पेशव्यांनीं हातांत होतें तेव्हां

---

१३. पुरंदरे दप्तर भाग १ ला ले. ३९८ व ४०५

मारूनच टाकला पाहिजे होता. युद्ध करावयाचें आणि कट्टर शत्रु तेवढा मारावयाचा नाहीं ही धर्मनीति मुसलमानांबाबत काय कामाची? पण जेथें वृद्ध निजामाला दोनदां कोंडूनहि बाजीराव मारूं शकला नाहीं तेथें त्याचेच वंशज तसें कसें करणार? पेशवे सदा दक्षिण मोकळी होती असें म्हणत पण ही मोकळी दक्षिण आपली करण्यास शत्रू नाहींसा झाला पाहिजे हें कांहीं त्यांना सुचलें नाहीं. सिंदखेडच्या मोहिमेंत व नंतर उदगीरच्या लढाईत निजामाला मारतां आलें असतें. कायगांवकर दीक्षितांच्या एका पत्रांत तर स्पष्ट उदगीरला अशी संधि प्राप्त झाली होती असें लिहिलें आहे.[१४] पण पेशव्याच्या महाताने तुम्ही सांगाल तर आपला हत्ती निजामअलीच्या हत्तीशीं भिडवितो असे वीरश्रीने म्हटलें तरी पेशवे ती संधि साधीत नाहींत. "यांनी क्षमाच केली" असे दीक्षित लिहितात. ज्यानें दहा वर्षें पेशव्यांचें राजकारण अवघड केलें व नासलें त्याला मारण्यांत जर अशी क्षमाशीलता तर महात्मा गांधी तरी दुसरें याहून जास्त काय करते? पानिपतची बातमी आल्यानंतर नानासाहेब उत्तरेंतून मागें लबाडी करणाऱ्या या निजामअलीबद्दल राघोबास लिहितो कीं "तो करारा-प्रमाणें पेशव्यांचे मदतीस येत नाहीं तेव्हां त्याला जिवें मारावें किंवा निदान कैद करावें"[१५] पण अब्दालीचा पाठलाग करणारा राघोबा तसें कांहीं न करतां सबबी सांगतो व शेवटीं "ईश्वरीतंत्र जें होणें तें होईल" असे उग्दार काढतो. हें ईश्वरी तंत्र हा निजाम पुढें बेचाळीस वर्षें जगून पेशवाईचा दिमाख इंग्रजांकडून उतरलेला पाहिल्यानंतर मरण्यांत दृष्टोत्पत्तीस आलें.

माधवरावाच्या कारकिर्दीत पेशवा हुशार व जोरदार होता तेव्हां त्याशीं सख्य संपादून यानें आपलें रक्षण केलें. पुढे राघोबा–बारभाईच्या झगड्यांत भलेपणा जोडून त्याने गेलेला मुलूख नाना-बापूंकडून परत मिळविला. यामुळें विसाजी कृष्ण बिनीवाले व रामचंद्र गणेश कानडे यांच्या जागिरी जाऊन ते दुबळे बनले व असंतुष्ट राहिले. निजामाचा सरदार इब्राहिमबेग धौशा यानें आरंभीच्या तीन वर्षांत हरिपंताबरोबर बरें

१४. राजवाडे खंड ३ लेखांक ५०३.

१५. पुरंदरे दप्तर भाग १ ला ले. ३९३.

काम केलें पण पुढें निजाम पेशव्यांना व हैदराला व भोसल्यांनाहि इंग्रजांविरुद्ध उठवून स्वतः सबबी सांगत स्वस्थ बसला. त्यामुळें सालबाईच्या तहांत त्याचा कांहीं हात राहिला नाहीं. नंतर त्याचा दिमाख वाढतच गेला व तो वाढण्याचें मुख्य कारण नाना व महादजी यांचें वैमत्य होय. मध्यंतरी दहा वर्षे दिल्लीची बादशाही मराठ्यांच्या हातांतून परत नजफखान प्रभृति मुसलमानांच्या ताब्यांत गेली होती ती परत मराठ्यांच्या कक्षेंत आणण्याचा महादजीचा प्रयत्न, तर त्याला सोडून मराठ्यांनी तह केल्यामुळें रागावलेल्या टिपूच्या वाढत्या सत्तेला कसें तोंड द्यावयाचें हा नानापुढील प्रश्न. अर्थात् नानाला निजामाशीं मिळवून घ्यावें लागलें. १७८४ सालीं सहसा बाहेर न पडणारा नाना मुद्दाम यादगिरीस जाऊन निजामास भेटला व तेथें त्यांनीं एक करार केला व त्याप्रमाणें पुढील दहा वर्षांचें राजकारण चाललें. या राजकारणामुळें नाना व निजाम टिपूविरुद्ध एक राहून महादजीचें उत्तरेंकडील राजकारण वेगळें बनलें. इंग्रजांशीं बोलाचाली एकमुखी राहावयाची ती न रहातां तिभंगली गेली. महादजीजवळ ॲन्डरसन वकील सन १७८२ पासून राहूं लागला तर मॅलेट पुण्यास सन १७८६ सालीं आला. खेरीज भोसल्यांच्या दरबारीं इंग्रज मधून मधून आपला वकील पाठवीत राहिले. निजामाकडे तर सन १७७९ पासून इंग्रजांचा वकील हैदराबादेस राहूं लागला. या वकिलांनीं एकाची बातमी दुसऱ्यास देऊन मराठ्यांच्या व निजामाच्या राजकारणांत ढवळाढवळ चालविली. यांतूनच पुढें टिपूविरुद्ध तिघांची गट्टी होऊन मोहीम ठरली. ही गोष्ट महादजीस हितकर वाटत नव्हती. उत्तरेंत महादजीवर अयोध्येच्या वजिराच्या बाजूने इंग्रजांचा शह होता. टिपूच्या स्वतंत्र जोरामुळें मद्रासेंतील इंग्रजांवर तरी कांहीं दाब राहून इंग्रजांचे बळ तेवढेंच कमी ठरत होतें. श्रीरंगपट्टणच्या या पहिल्या मोहिमेंत नाना सामील होता तरी वेलस्लीच्या दुसऱ्या मोहिमेंत भाग घेण्यास मराठे कबूल झाले नाहींत, कारण आपल्या पहिल्या चुकीमुळें इंग्रजांची सत्ता कशी वाढली तें त्यास कळून चुकलें होतें. निजाम याउलट वागत राहिल्यामुळें अखेरीस इंग्रजांचा मांडलिक होऊन अमर झाला. ही गोष्ट मराठ्यांच्या दूरदृष्टीच्या अभावामुळेंच घडली. कारण तत्पूर्वी मराठ्यांनीं खर्ड्यास निजामाचा पराभव केला होता.

वस्तुतः अशी गोष्ट व्हावयास नको होती. पण ती घडली याचें कारण निजामाचा कुटिल दिवाण मुषीरुल्मुल्क. मुसलमानांच्या हिंदुस्थानांतील इतिहासांत नेहमीं असें दिसतें कीं त्यांच्यांत मधून मधून कट्टर कुटिल लोक निर्माण होऊन जमत आलेला हिंदु-मुसलमानांचा समझौता मोडला जातो. १७ व्या शतकाच्या मध्यांत शहाजहाननंतर जर ज्येष्ठपुत्र दारा बादशाहा होता तर हिंदुस्थानचा इतिहास बहुधा पालटता. पण त्याजागीं सर्व भावांस मारून औरंगजेब पुढें सरल्यामुळें शंभर वर्षांचें तप फुकट गेलें. संस्कृत विद्या व हिंदुधर्म याबद्दल मसलमानी राज्यकर्त्यांच्या मनांत आवड व आदर निर्माण होणें येथवरचा टप्पा दारानें गांठला होता. उलट बाजूनें मुसलमानी संस्कृति आत्मसात् करून राजपुतान्यांत एक नवी मिश्र हिंदु संस्कृति उदयाला येत होती. जगन्नाथमंडितासारखा तेलंगा ब्राम्हण कवि—

"यवनी नवनीतकोमलाङ्गी"

असलें काव्य लिहिण्याइतका धीट झाला होता. यांतून सर्व हिंदुस्थान मोगलांच्या आधिपत्याखालीं एक होऊन नवा जमाना सुरू होणें अशक्य नव्हतें. तशी एकी होती तर पाश्चात्यांचा पाय या देशांत न पसरतां देशाची पुढील उत्क्रांति वेगळ्याच मार्गानें झाली असती. मग कदाचित शिवाजी व मराठे यांचें स्वतंत्र नांवहि या देशाच्या इतिहासांत निर्माण झालें नसतें. पण औरंगजेब बादशहा होतांच अकबरापासून १०० वर्षें बंद झालेला जिझिया कर पुन्हां सुरू झाला. हिंदूंची देवळें पाडलीं गेलीं व त्यांचे धर्मांतरसुद्धां पुन्हां जोरांत होऊं लागलें. शिथिल होणारा इस्लाम पुन्हां कट्टर होण्याच्या मार्गास लागला. अशीच गोष्ट औरंगजेब-शिष्य निजाम याच्या उदयामुळें दक्षिणेंत घडली. १८ व्या शतकाच्या मध्यास दुसऱ्या आलमगिराच्या वेळीं जर पेशवे दूरंदेशीनें व सावधगिरीनें वागते तरीहि देशाच्या इतिहासाला वेगळें वळण हिंदूंच्या पुढारीपणाखालीं लागलें असतें. पण यावेळीं गाजीउद्दीन व नजीबखान निर्माण होऊन त्यांनीं गाडें मागें आणलें. यानंतर पेशवे-निजाम स्वसंरक्षणासाठीं एक झाले तर तेथें हा मुषीरुल्मुल्क उमटला. वस्तुतः बहुसंख्य हिंदूंच्या नेतृत्वाखालीं व दिल्लीच्या इस्लामी बाहशहाच्या नांवाखालीं हा प्रश्न सुटण्यास अडथळा येण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण शहाणपणाच्या व खऱ्या मुत्सद्देगिरीच्या

अभावामुळें हा डाव फुकून सर्वस्वी परक्या अशा गोऱ्या ख्रिस्ती राष्ट्राकडून हा प्रश्न सोडवून घेण्याची आपत्ति भरतखंडावर कोसळली.

येथें निजामाच्या वागणुकीचें कौतुक वाटतें. राज्य चिरस्थायी करण्याला ज्या गोष्टींचें पाठबळ लागतें त्या गोष्टी या उतरत्या काळांतहि हैदराबादेस चालू राहिल्या. निजामाच्या नित्य दिनचर्येंचीं बातमीपत्रें पुण्यास मोडींत लिहून आलेलीं वाचलीं तर ही गोष्ट मनांत भरते. १०० वर्षे मराठी राज्य होऊनहि निजामानें दरबारांतील फारसी भाषा बंद केली नाहीं. यामुळें मुसलमानांचे आत्मगत विचार व परस्पर व्यवहार गुप्त राहण्यास मदत झाली. मराठे परकी भाषा शिकण्यांत नेहमींच मागें. त्यांच्यात फारसी जाणणारे अगदीं हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक होते. त्यामुळें निजाम व नाना यांचा खरा संवाद घडणें अशक्य होतें. राज्यकर्ते व मुत्सद्दी सर्वस्वी पारसनिसांच्या मुठींत होते. आणि हे पारसनवीस भले किंवा प्रामाणिक किंवा खरे देशभक्त क्वचितच होते. दुसऱ्या रघोजी भोसल्यानें तर एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "आमची मान या पारसनिसांच्या हातांत. ते केव्हां कापतील हा नेम नाहीं." गोविंदराव काळयाच्या पत्रव्यवहारावरून आमची ही समजूत दृढ झालेली आहे. या लोकांचे स्वतःचे स्वार्थ पुष्कळ बाबतींत राज्याच्या आड येत. हे स्वतः व यांचे हस्तक निजामाच्या मुलखांत कमाविशी करीत; जागीरदारांचे चौथाई-सरदेशमुखीचे तंटे सोडविण्यासाठीं मध्यस्थ बनत. गोविंद भगवंत पिंगळे हा वकिलाचा दुय्यम निंबाळकराच्या जागिरीचा कारभारीच बनलेला दिसतो. या लोकांना निजामाच्या मोगली दरबाराचा मोठा दरारा वाटत होता. आणि तो कायम ठेवण्यासारखी निजामाची वागणूक अखेरपर्यंत दिसते. त्यावेळीं दिल्लीस शाहआलम बादशहाच्या दरबारांत जो रिवाज नसेल तो हैदराबादेस निजामाच्या दरबारांत अगदी कांटेकोरपणें कसोशीनें पाळण्यांत येत असे. सन १७८२ सालाच्या आरंभीं नानानें आठ वर्षांच्या सवाई माधवरावाचें लग्न करण्याचा बेत केला. ही बातमी निजामास कळतांच त्यानें कृष्णराव काळयास सांगितलें कीं 'हा मुलगा गर्भापासून आम्ही पाळलेला आहे. तेव्हां त्याचें लग्न आम्हीच करतों. दहा लाख रुपये खर्च झाले तरी हरकत नाहीं[१६]'

१६. पा. द. रु. नं. ६२ फा. १४ प. ७-८-९.

असें म्हणून निजामानें काळयास दोन लाखांची हुंडी कापड-खरेदीसाठीं ताबडतोब देऊं केली. शिंदे भोसले व निजाम यांच्या सोयीसाठीं व वस्तूंचा शहरांतून म्हणजे औरंगाबादेंतून जवळ पुरवठा व्हावा म्हणून लग्नाची जागा गोदातीरीं पैठण क्षेत्रीं मुक्रर करण्यास सांगितली. पण काळे या बेताचा उच्चार ऐकूनच स्तिमित झाला! त्याला भीति वाटली कीं या निमित्तानें हे सर्व राज्यकर्ते व त्यांच्या दरबारचे इंग्रजादि वकील एकत्र होऊन कांहीं तरी कारस्थानांत पेशव्यास ओढतील. त्यांच्यासमोर व त्यांचें बहुमत असतां त्यांच्या विरुद्ध कांहीं बोलणें वा करणें अशक्य होऊन बसेल; तेव्हां त्यानें म्हटलें कीं, "मी ही गोष्ट नानास लिहितों व तेथून हुकूम येईल तसें करावयास येईल. त्याची आजच घाई नको.[१७]" नानाच्या पुणें दरबारांत असलें औदार्य किंवा त्या औदार्याच्या मिषानें कां होईना, आपले हेतु सफाईनें साधण्याची शिताफी यांतील कांहींच दृष्टोत्पत्तीस येणें कधीं शक्य नव्हतें. नानांची व काळयांच्या पोटांतील इच्छा निजाम लग्नास न येईल तरच बरें अशी होती. पण त्याला नको येऊं म्हणणें किंवा आमंत्रण न पाठवणें कसें शक्य होतें? असें दिसतें कीं या निजामाच्या मनांत सवाई माधवरावाबद्दल खरोखरीच प्रेम निर्माण झालें होतें. पेशवा वाढून शिकार खेळूं लागला हें ऐकून त्यानें उद्गार काढले कीं "पहा, या ब्राह्मण पेशव्याला (पशू खावयाचा नसल्यामुळें) शिकारीचा काय उपयोग आहे? पण घोड्यावर बसण्याची तयारी, शारीरिक कष्ट-मेहनत, तहान-भूक सोसण्याची संवय व्हावी म्हणून तो हा व्यायाम नित्य करीत आहे. पण इकडे आमचे साहेबजादे पाहिले तर सदा आळसांत व ऐषआरामांत दंग."[१८] खर्ड्याच्या लढाईपूर्वीं धुसफुस चालू होती तेव्हां व पराभवानंतरहि निजामाचें एकसारखें बोलणें होतें कीं "मला एकवार तरुण पेशव्याची मुलाखत घेऊन दोन दौलतींतील वाद समक्ष तोडण्याची इच्छा आहे."[१९] पण सवाई माधवरावाच्या घरगुती कृत्यांवर सुद्धां बारकाईनें नजर ठेवणारा व त्यास कोठें बाहेर स्वारीबरोबर न पाठवणारा

---

१७. पा. द. रु. नं. ६२ फा. १४ प. ७, ९.

१८. पा. द. रु. ६२ फा. ३ ले. ४७.

१९. पा. द. रु. ४४ फा. ५ ले. २५.

नाना अशा गोष्टीस कोठून संमति देणार? नानाच्या संकुचितपणानें मराठी राज्याचें फार अहित झालें आहे यांत शंका नाहीं. उदारपणानें व मोकळेपणानें अनेक मोटीं कार्येंहि सहजांत सिद्धीस जातात. आणि शेवटीं

"अरक्षितं रक्षति दैवरक्षितम्
सुरक्षितं दैवहतं विनश्यति।"

या पंचतंत्रांतील वचनाप्रमाणें घडलें व नानाची सर्व काळजी फुकट जाऊन सवाई माधवराव घरांतच पडून मरण पावला.

आणि अखेर सवाई माधरावाचें लग्नहि १७८२ च्या मे मध्यें न होतां १७८३ च्या फेब्रुवारीपर्यंत लांबलें. यावेळीं हैदर मेल्यामुळें नानाचा महादजीनें केलेल्या सालबाईच्या तहास असलेला विरोध ढिला पडला होता. हैदराला दिलेलें वचन त्याच्या मृत्युबरोबर सोपलें असा पवित्रा नानाला घेणें शक्य झालें. याचा परिणाम टिपूवर मात्र विपरीत होऊन तो पुढें सतत निजाम-पेशव्यांच्या विरुद्ध राहिला. त्यानें इंग्रजांस एकट्यानें चोपून १७८४ सालीं मंगळूरचा स्वतंत्र तह केला. अर्थात् मराठ्यांच्या व निजामाच्या मुलुखावर स्वारी करण्यास तो मोकळा राहिला व हा हक्क त्यानें चांगल्या तऱ्हेने बजावला. यावेळीं फ्रेंचांनी प्रथम बुसी व नंतर मॉंतेनी यांच्या द्वारा पेशव्यांशीं सख्य जोडण्याचा खूप प्रयत्न केला पण तो अनेक कारणांनी सिद्धीस गेला नाहीं. तीन वर्षें पुण्यास राहून मॉंतिनी कंटाळला. व मॅलेट तेथें आल्यावर त्याची रवानगीच झाली. फ्रेंचांनी यापुढें टिपूशीं संगनमत केलें व ते यूरोपांतील इंग्रजफ्रेंचांच्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या विशिष्ट संबंधामुळें टिपूच्या मुळावर आले. टिपूनें १७८७ पूर्वींच नरगुंद घेऊन तेथील दिवाण काळोपंत पेठे याच्या कुटुंबावर अत्याचार केला होता. समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांतून लोक बाटवून मुसलमान करण्याचा त्याचा तडाखा सुरू होता व तो स्वतःस दक्षिणचा सुलतान म्हणवूं लागला होता, इत्यादि कारणामुळें टिपूशीं व त्यामुळे फ्रेंचांशीं नानाचें जमलें नाहीं; ही गोष्ट इंग्रजांस फायदेशीर झाली. उत्तरेंत मात्र महादजीनें डिबॉईन सारखे फ्रेंच आपल्या नोकरींत ठेवून इंग्रजांवर एक प्रकारचा शह राखला. अशा रीतीनें इंग्रजांचें प्रस्थ पुणें व हैदराबाद या दोन्ही ठिकाणीं वाढल्यामुळें पेशवे-निजामांच्या संबंधांत त्यांचा हात शिरणें व त्यांच्या शब्दास महत्त्व

चढणें अपरिहार्य झाले. त्यांतहि निजामाच्या दरबारीं आलेले इंग्रज वकील आक्रमक वृत्तीचे असल्यामुळें व सर्वजणच निजामाचे पाठीराखे मनांतून झाल्यामुळें नानाच्या वाटाघाटीला दहा वर्षें नेट मिळूं शकला नाहीं. मुष्रीरउल्मुल्क आधुनिक जिनाप्रमाणें नानाचें स्वराज्याचें गाडें अडविण्यास समर्थ ठरला, उलट पक्षीं कॉर्नवॉलिसने निजाम-पेशव्यांची मदत घेऊन टिपूची खोड मोडली व त्याचें अर्धें राज्य घेऊन त्याचा बळमोड केला. नानाचा संकुचितपणा व कृपणपणा त्यांच्या राजकारणांतहि आडवा येत असे. निजामाने आपले स्वतंत्र वकील म्हणूव मीर अबुल कासीम व मीर आलम यांस कलकत्त्यास पाठविलें होतें. पण नानाचें राजकारण लाला सेवकराम व त्याचा मुलगा यांच्या मार्फत चाले. अर्थात् स्थानिक इंग्रज वकील मॅलेट यानें नानावर आपली छाप बसविली यांत आश्चर्य काय? महादजी शिंद्यानेहि आपल्याजवळ इंग्रज वकील बाळगिले होते पण त्यांची छाप महादजीवर कधींहि पडली नाहीं व महादजीच्या मनाचा अंत किंवा पुढील बेतांचा सुगावा त्यांस कधी लागला नाहीं. दहा वर्षें वादविवादांत कुजत राहिलेला निजाम-पेशवे वाद जेव्हां महादजी दक्षिणेंत आला तेव्हां नेटास लागला. महादजी जिवंत असतां तो बोलाचालीने किंवा युद्धाच्या मार्गानें कसाहि सुटता तरी त्यांत मराठ्याचा जास्त फायदा झाला असता, पण त्याच्या १२ फेब्रुवारी १७९४ सालीं झालेल्या आकस्मिक मृत्यूमुळें पोरसवदा दौलतराव नानाच्या कक्षेंत आला व पुण्याच्या राजकारणाला अनिष्ट वळण लागलें.

महादजी जिवंत असतांना निजामाने काहींशा स्वार्थानें व काहींशा भीतीने बोलाचाली चालू ठेवली होती. महादजी दिल्लीच्या बादशाहीचा मुख्त्यार व्यवहारांत असल्यामुळें दक्षिणेच्या सुभेदाराची बहालीबडतर्फी सुद्धां कायदेशीर दृष्ट्या त्याच्या स्वाधीन होती. मात्र या गोष्टीचा फायदा घेण्याची बुद्धि किंवा दूरदृष्टी मराठ्यांच्या दरबारांत नव्हती. पण महादजीनें स्वतःसाठी त्याच्या गुरूची समाधि ज्यांत आहे तो बीड जिल्हा स्वतःला जागीर मिळावी असा हेतु धरला होता. मुषीरला वाटत होतें कीं महादजीचा मुख्त्यारीचा अधिकार निजामावरील चौथाई-सरदेशमुखीसारख्या हक्कांचें उच्चाटन करण्यासाठी उपयोगांत आणावा. यासाठीं त्यानें महादजीला वेळोवेळीं नजराणा म्हणून म्हणा, लांच म्हणून म्हणा, पैसे देण्याचा उपक्रम

केला. पुढें खर्ड्याच्या लढाईनंतर तहाच्यावेळीं ह्या रकमा शिंद्याला मिळावयाच्या खंडणींत वजा घालण्यांत आल्या. दिल्लीच्या बादशाहाचा मुख्त्यार म्हणून हिंदुस्थानांतील कोणत्याहि सत्ताधीशाकडून खंडणी मागण्याचा आपला हक्क कॉर्नवॉलिसने उडविलेला पाहून महादजी मनांत खिन्न झाला होता. पण झाला प्रकार बाहेर न दाखवितां त्यावर उपाययोजना काय करावयाची याची मनांतून त्यानें तजवीज चालविली होती. पण स्वतःची सत्ता राखण्याच्या दृष्टीनें नानाचा सर्व प्रयत्न असल्यामुळें पेशव्याच्या सत्तेस एकसूत्रीपणा येणें कठीण होते. १७९० सालीं टिपूविरुद्ध जो नानानें इंग्रजांशीं तह केला तो महादजीला पसंत नव्हता. कारण इंग्रजांच्या वाढत्या सत्तेस जो जो कोणी प्रतिकार करूं शकेल तो आपला मित्र अशी त्याची भावना होती. महादजी आणखी कांहीं वर्षे जगता तर इंग्रजांचें कार्य वेलस्लीच्या वेळीं जितकें सुकर झालें तितकें झालेंच नसतें. आपल्या दीड-वर्षांच्या पुण्यांतील मुक्कामांत महादजीनें तरी देखील इतका एकोपा घडवून आणला होता कीं, त्याच्या मृत्यूनंतर एक वर्षानें झालेल्या खर्ड्याच्या लढाईंत सर्व मराठे सरदार पेशव्याच्या बाजूस उभे राहिले असें दृश्य जगास दिसलें. मात्र याचें श्रेय परस्पर नाना फडणीसाला मिळालें. असें श्रेय मिळूनहि निजामाचा प्रश्न कायमचा निकालांत काढण्याची संधि नानानें साधली नाहीं.

निजामाची मात्र आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं व आपले हक्क राखण्यासाठीं सारखी धडपड सुरू होती. फ्रेंच शिपाई मॉन्शर रेमॉं उर्फ मुसा रेमू याच्या हाताखाली त्यानें नवें गारदी पलटण उभारून त्याची संख्या वाढवीत वाढवीत बारा हजार इतकी मोठी केली होती. खुद्द पेशव्याजवळ याच्या तोडीचें पायदळ नव्हतें. इंग्रजांचा पाठिंबा तर त्यानें मिळविला होताच. त्यासाठीं १७८८ सालीं त्यानें गुन्टूर जिल्हा इंग्रजांना दिला. त्याचाच वकील मीरआलम कलकत्त्यास व मद्रासेस जाऊन आल्यामुळें इंग्रजांशीं त्याचा चांगलाच परिचय झाला होता. सर जॉन केनवे (किनवी) या इंग्रज वकिलानें हैद्राबादच्या राजकारणाची व गोविंद कृष्ण काळयांच्या खटपटीची बातमी कलकत्त्यास सतत देत ठेवली होती. मुषीरउल्मुल्काची इंग्रजांच्या लिहिण्यावरून अशी समज झाली होती कीं, आपण धडाक्यानें आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठीं म्हणून मराठ्यांशी लढाई सुरू केली तर अखेरीस

इंग्रजांना आपल्या मदतीस येणें भाग पडेल. कारण निजामाचा पराभव झालेला ते पहाणार नाहीत. नागपूरकर भोसले व पेशवे यांच्यांशी निजामाची हक्काबद्दल धुसफुस, तेव्हां प्रथम मनांत भीत असूनहि आपला जोर दाखविण्याच्या मुसल्मानी पद्धतीनें मुषीरनें निजामाचा मुक्काम रणांगणाच्या वाटेवर म्हणून बेदरास हलविण्याची योजना १७९३ च्या पावसाळयाच्या आरंभींच केली. निजामाची यावेळीं साठी उलटलेली असून त्याची प्रकृतिहि नादुरुस्त असे. त्यामुळे तो व त्याचें कुटुंब हैदराबाद सोडण्यास राजी नव्हतें. तरी मुषीराने आपलें म्हणणें खरें करून निजामाची छावणी मांजरा नदीच्या तीरीं बेदरच्या उत्तरेस जनवाडा येथें नेली व येथे तो दीड वर्ष राहिला. दिल्लीच्या बादशहाप्रमाणेंच निजामाच्या मुलांतहि बापाच्या पाठीमागून कोणी निजाम व्हावयाचें याबाबत चर्चा सुरू होती. वडील मुलगा अलिजाह यावर बापाचें प्रेम नव्हतें व तो यावेळी व खर्ड्यानंतर मराठ्यांच्या बाजूस मनांतून होता असा समज आहे. दुसरा मुलगा मीर पोलाद जंग उर्फ सिकंदरजाह हा मुषीराशी संगनमत राखून असल्यानें नेहमी बापाजवळ असे व त्यालाच निजाम करण्याची बापाची इच्छा असावी. या गोष्टीची जाणीव अलिजाला असल्यामुळें त्यानें आपली बाजू बळकट करण्यासाठीं गोविंद कृष्णाच्या मार्फत नाना फडणिसाशीं व खेरीज टिपूशींसुद्धां संधान राखलें होतें. याचा परिणाम निजामाच्या मृत्यूनंतर अंतर्गत यादवींत होण्याचा संभव होता, पण निजामाच्या सुदैवानें याच वेळीं १७९४ च्या आरंभीं महादजी मृत्यु पावला व नंतर पावसाळयाच्या आरंभीं हरिपंत फडकेहि दीर्घ आजारानंतर वारला. या दोन सेनानींच्या मृत्यूमुळें मुषीराला धीर आला. महादजी जिवंत असेपर्यंत मराठ्यांविरुद्ध निजामास मदत करणें इंग्रजांस अवघड होतें तें यापुढें त्यांना वाटण्याचे कारण नाहीं असें त्यानें ठरविलें. तसेंच हरिपंताच्या मरणानें नानाचा उजवा हात गळून पडल्यामुळें त्याचाहि जोर कमी होईल अशी आशा मुषीराच्या मनांत निर्माण झाली. याचाच परिणाम १७९४ च्या पावसाळयांत दोन्ही बाजू कठोर होण्यांत झाला. नानानें सर्व सरदारांना त्वरेनें छावणीस येण्याचे हुकूम सोडले. इंग्रजांना पुढील प्रकार दिसत असल्यामुळें त्यांनीं प्रकरण आपसांतच मिटावें अशी खटपट चालविली. कारण दोन दोस्तांच्या भांडणांत त्यांची स्थिति फार नाजूक होणार होती. तेव्हां अखेरचा उपाय म्हणून त्यांनीं निजामाकडून

मीर आलम यास बोलणें करण्यासाठीं पुण्यास पाठविलें व तो २६ जुलै १७९४ रोजीं तेथें येऊन दाखल झाला.[२०]

येथें आतां भांडणांच्या मुद्यांचा थोडा विचार केला पाहिजे. शिवाजीच्या स्वराज्याबाहेरचे मराठ्यांचे दक्षिणेंतील सर्व हक्क बादशहाच्या सनदांनी दिले गेले होते. हे सर्व हक्क मराठ्यांस मिळते तर त्यांना सालिना घरबसल्या सहा कोटी रुपये मिळावयास पाहिजे होते. पण हा सर्व कागदी हिशेब झाला. दक्षिणच्या १८ कोटी रुपयांच्या उत्पन्नापैकीं हैदराबादचा सुभा पहिल्या निजामानें शाहूकडून प्रतिनिधीच्या मार्फत माफी मिळवून सोडविला असल्यामुळे पूर्वेच्या बाजूस मराठ्यांचें पाऊलहि कधीं पडलें नाहीं व यामुळेंच त्या किनाऱ्यावर इंग्रज व फ्रेंच हातपाय पसरूं शकले. येणें-करून सुमारें एकतृतीयांश उत्पन्न तर मराठ्यांनीं गमावलेंच, परंतु राजकीय दृष्ट्या मराठ्यांच्या सत्तेस एक प्रकारें पायबंद बसला. वऱ्हाडच्या सुभ्यांत मुख्यतः नागपुरकर भोसल्यांचा हक्क होता, तो जानोजी भोसल्याचे वेळेस साठ–चाळिशीच्या तहानें निश्चित करण्यांत आला होता. चाळीस टक्के म्हणजे बाह्यतः चौथाई–सरदेशमुखी व घासदाणा या हक्कांची बेरीज होते ( २५+१०+५=४० ). पण मराठ्यांनीं कोणतीहि गोष्ट कधीं बिनतोड केली असें घडलेंच नाहीं. सगळया सुभ्याचे वेगवेगळे भाग केलेले असत. त्यांत कांहीं खालसा, कांहीं जागीर, कांहीं सरंजामी, असे भाग असत. त्यावर हक्क घ्यावयाचे किंवा नाहीं व घ्यावयाचे असल्यास किती प्रमाणावर घ्यावयाचे याचा नेहमीं वाद पडे. सरंजामदारास फौज ठेवण्याबद्दल मुलूख दिलेला असल्यामुळें ते म्हणत कीं, आम्ही मराठ्यांस हक्क दिल्यावर आम्हांस उरणार काय व त्यांत ठरलेली फौज राखावयाची तरी कशी? सुभ्यांत जितका सरंजामी व जागिरीचा मुलूख जास्ती तितकें मराठ्याचें उत्पन्न कमी होत असे. म्हणून निजामाचा प्रयत्न जास्त सरंजामदार व जागीरदार निर्माण करण्याकडे होता. यांत मराठे स्वतःसाठींहि जागीर मिळविण्याचा प्रयत्न करीत. उदाहरणार्थ रघोजीने दारव्याची जागीर आपला मुलगा जो साबाजी त्याच्या नांवाने मिळविली होती व त्याबद्दल साबाजीनें निजामाची नोकरी करावयाची असे. गोदाउत्तरतीरच्या प्रदेशांत

---

२०. P. R. C. Vol. IV, 87.

घासदाणा घेण्याचा आपल्याला हक्क आहे असें भोसल्यानीं निजामाकडून कबूल करवून घेतलें होतें. वस्तुतः हा हक्क शाहूला मिळालेल्या सनदांत समाविष्ट नाहीं. मुधोजीच्या वेळीं या हक्काबद्दल भोसल्यास फक्त तीन लाख रुपये सालिना मिळत व त्याचीहि रोज घासाघासी करावी लागे, कारण मराठे हक्क वसुलीसाठीं यावयाचे ते फौजबंद असावयाचे व या फौजांनीं व त्यांच्या घोड्यांनीं त्या प्रदेशावर वर्षांतील कांहीं काळ चरत रहावयाचें असाच त्याचा अर्थ होता. ही सर्व आपत्ति मराठ्यांनी स्वतःच्या कमकुवत-पणामुळेंच ओढवून घेतली होती. वस्तुतः सबंध प्रदेश—मग तो कितीहि लहान असो—संपूर्णपणें आपल्या राज्याला जोडून त्यांनी हा प्रश्न निकालांत काढावयास पाहिजे होता. पण जास्त मुलखावर गैरहिशेबी हात मारण्याला सवड रहावी म्हणून ते सर्वच प्रदेशांत आपला हक्क वसूल करण्यास पहात. पेशव्याचे हक्क इतर चार सुभ्यांत समाविष्ट होते. त्यापैकीं खानदेशचा लहान सुभा त्याची राजधानी जी बुऱ्हाणपुर त्यासह जवळजवळ सर्व पेशव्यांनीं व्यापला होता. औरंगाबाद व बेदर या दोन सुभ्यांत अनेक मराठा सरदारांच्या जागिरी व इनामें पसरलेलीं होतीं. तीच स्थिति विजापूर सुभ्याची होती. नर्मदेपासून कावेरीपर्यंतच्या मुलखांत पसरलेले हे वसुली हक्क कांहीं प्रदेशांत ठाणीं देऊन मराठ्यांनीं सर्वस्वी आपले केले होते. यांचे सालवार हिशेब पद्धतशीरपणें ठेवले जात असतील कीं नाहीं याची शंकाच आहे. त्यामुळें हिशेबाचा नेहमीं वांधा पडे. मुषीर-उल्मुल्काने कायदेशीरपणा धरून प्रत्येक बाब तपासून घेण्याचें ठरविलें तेव्हां नानाचीहि तिरपीट उडाली. प्रथम तो तुमच्या अस्सल सनदा कोठें आहेत त्या दाखवा येथपासूनच बोलूं लागला तेव्हां नाना साताऱ्यास नीळकंठ बाबुराव अमात्यास छत्रपतींच्या दप्तरांत त्यांचा शोध करण्यास लिहितांना आढळतो. यावरून त्या पेशव्यांजवळ पुण्यास नव्हत्या असें वाटतें. नंतर या प्रश्नांचा कसा शेवट झाला तें उपलब्ध कागदांवरून ठरवितां येत नाहीं. पण बहुधा अनेक वर्षांच्या चालू वहिवाटींचा पुरावा गृहीत धरून त्यावरून काम पुढें चालु झालें असावें. विजापूर सुभ्यांतील अडोणी वगैरे कृष्णा दक्षिणतीरचा मुलुख निजामाचा भाऊ बसालतजंग याकडे होता. त्याचा मुलगा महाबतजंग हा पेशव्यास चौथाई–सरदेशमुखी देत असे. तो मेल्यानंतर ती जागीर निजामानें खालसा केली तेव्हां मराठ्यांच्या हक्कास

बाध आला. तोहि एक वादाचा मुद्दा बरेच दिवस चालू होता. बेदरची चौथाई हाहि दुसरा वादाचा मुद्दा होता. निजामाचें स्वतःचे म्हणणें असें होतें कीं, जो सर्वस्वी नष्ट होणार होता तो सवाई माधवराव आम्ही पाठिंबा दिल्यामुळें शिल्लक राहिला. तर त्याने आतां कुठले जुनेपुराणे हक्क आमच्या मुलखांत सांगून ते वसूल करण्याची इच्छा धरावी ही गोष्ट स्नेहापासून दूर आहे. निजाम आणि मुषीर यांच्या बोलण्यांत व वागणुकींत फरक होता. निजाम जुने हक्क होते याबद्दल कबुली देऊन स्नेह म्हणून ते सोडावे असें म्हणत होता. मुषीर ते हक्कच गैरलागू ठरविण्याच्या विचारांत होता. खेरीज निजाम शब्दाने गोड तर मुषीर उद्धट व तुटक असा दोघांत अंगभूत फरक होता. निजामाला वाटे कीं, जर तरुण व उमद्या पेशव्याची व आपली एकवार भेट होईल तर सहज आपण त्याचें मन वळवून व त्यास उपकाराचें स्मरण देऊन आपलें काम मनासारखें करून घेऊं. या गोष्टीस नानाने कधींहि परवानगी दिली नाहीं. वयांत आल्यानंतर व विशेषतः महादजीच्या दक्षिणेंतील आगमनामुळें माधवराव बराच धीट व स्वतंत्र होत होता. अशावेळीं जर तो खासगी बोलाचालींत निजामाचें म्हणणें उदारपणाच्या भरांत कबूल करून बसता तर नानाची मोठी फजिती होती. कारण मालकानें जें दिलें तें देणार नाहीं असें म्हणणार नाना कोण?

मुषीरउल्मुल्क टिपूवरील दोस्तांच्या स्वारींत स्वतः हजर असून त्यानें कॉर्नवॉलिसच्या वशिल्याने व मदतीने नानाच्या तोंडास पानें पुसावीं असा बेत आंखला होता. टिपूचें अर्धें राज्य दोस्तांनीं घेऊन त्यांतील तिसरा हिस्सा पेशव्याला मिळाल्यानंतर वर पुनः पेशव्यानें उरलेल्या मुलखाबद्दल टिपूकडून चौथाई मागावी हें कॉर्नवॉलिसला अगदीं गैर व तहाच्या अटींना सोडून आहे असें वाटलें व तसें त्यानें स्पष्ट मॅलेटमार्फत नानास कळविलें. पण निजामावरील चौथाईचे हक्क हे दोस्तीच्या आधींच फार काळ चालत आलेले असल्यामुळें ते दोस्तीच्या दृष्टीनें गैर असे जरी कॉर्नवॉलिसला वाटत होते तरी त्यावर मराठ्यांचा हक्कच नाहीं असें तो म्हणू शकत नव्हता. कॉर्नवॉलिस १७९३ च्या अखेरीस परत गेल्यानंतर सर जॉन शोअर हा शहाणा व शांतताप्रिय गव्हर्नरजनरल अधिकारावर आला. मराठ्यांच्या राज्याची, त्यांतील व्यक्तींची व त्यांच्या

वागण्याच्या रीतीची त्यास खडान्‌खडा माहिती होती. पण महादजी शिंद्यांच्या कवायती कंपूमुळें वाढलेलें मराठ्यांचें बळ; तसाच प्रसंग आल्यास टिपू त्यांस मिळण्याची शक्यता; व खेरीज मॅलेटने खंबायतला कंपनीचा अधिकारी म्हणून पहिल्या इंग्रज-मराठे युद्धांत असतांना पाहिलेलें त्यांचे पाणी याबद्दलची सावधगिरीची माहिती व धोक्याची सूचना मॅलेटनें शोअरला लिहिल्यामुळें त्यानें यावेळीं निजामाबद्दल सदिच्छा प्रगट करण्यापलीकडे जाण्याचें नाकारलें.

शोअरचें मराठ्यांबद्दलचें मत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या राज्यास तो बहुजनसमाजाचें राज्य असें समजत नसून परस्पर भांडणाऱ्या व वैमत्य असलेल्या थोड्या शिष्ट जनांचें तें बनलेलें आहे व त्यांच्या राज्याचीं लोभ, अपरिमित महत्वाकांक्षा व परस्वहरणशीलता हीं मुख्य तत्वें असून त्यांची वागण्याची रीत मात्र फार सावधगिरीची, धूर्ततेची व कालहरणाची असते, संशय व मत्सर हे त्यांचे स्वभावविशेष आहेत आणि राजकारणी हेतूबाहेर त्यांचा धर्माभिमान हाहि एक दुसरा ध्येयाचा विषय आहे—मात्र सध्यां तो सुप्त असून संधि सापडेल त्यावेळीं तो पुढें येईल—असें तो म्हणतो.[२१] गुप्तता व गूढता यांच्या बुरख्यांत त्यांची धूर्त वागणूक दडलेली असल्यामुळें त्यांचे खरे हेतु समजणें कठीण. पण ते जाणण्याची आपणास गरजहि नाहीं असें त्यांचे मत होते. इंग्रजांची सत्ता त्यांच्या लष्करी व आर्थिक बळावर अवलंबून असून तें बळ कायम आहे तोपर्यंत इतर कितीहि कारस्थानी असले तरी त्यांच्या कारस्थानांचा कांहीं उपयोग नाहीं असें पक्कें ठरवून व सर्व गोष्टींचा मागला पुढला विचार मनांत आणून त्याने आपल्या तटस्थतेचें धोरण ठरविलें होतें. असें असून त्यावर तत्कालीन इंग्रज लेखकांनीं व इतिहासकारांनीं नापसंतिदर्शक टीका केली आहे. पण तो सर्व प्रकार इंग्रजांना पुढील दहा वर्षांत मिळालेल्या अचानक यशामुळें झालेला असल्याने त्यांत सयुक्तता नाहीं. मॅलेटनंतर पुण्यास वकील म्हणून आलेला कर्नल पामर यास तर वेलस्लीनें त्याच्या सभ्य, प्रामाणिक व अनाक्रमक वर्तणुकीमुळें कामावरून दूर केलें! कारण दुसऱ्या बाजीरावास तैनाती फौजेच्या जाळ्यांत पकडण्यांत त्यास यश आलें नाहीं.

---

२१. P. R. C. Vol. II No. 223.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २८५९९ दि. १६।८।६०
क्रमांक ११७२ नों. दि. ५।७।५८

खरी स्थिति अशी कीं, सज्जन व भल्या इंग्रजांनीं आपल्या प्रामाणिक वागणुकीनें हिंदी लोकांचें मत इंग्रजांबद्दल अनुकूल केलें, पण त्याचा गैरफायदा आक्रमक झोंड इंग्रजांनीं घेऊन कंपनीचें राज्य वाढविलें. सबंध इंग्रज राजवटींत असाच प्रकार चालू होता पण त्यावरून त्या त्या वेळच्या घटनांबद्दल चुकीचा समज आपण करून घेतां कामा नये.

इतिहाससंग्रहांत नाना फडणीस व मुषीर उल्मुल्क यांचा एक होऊं घातलेला करार छापलेला आहे.[२२] तो १७९० च्या पावसाळयांतील असून त्याप्रमाणें पुढें अंमलांत आलेलें दिसत नाहीं. यानंतर मुषीराची कॉर्नवालिसची दोस्ती होऊन त्याच्या गोड वागणुकीमुळें मुषीराला वाटलें कीं आपल्याला इंग्रजांची मदत लाभेल, पण तो प्रकार फसवा ठरला. दिल्लीची बादशाही चालविणें हा वडील निजामापासून चालत आलेला आपला वंशपरंपरागत अधिकार असें निजाम मानीत होता. ती गोष्ट भाऊसाहेब, नारायणराव व आतां सवाई माधवराव यांच्या नांवाने वेळोवेळीं मुख्त्यारी केली गेल्यामुळें ५० वर्षे बंद होती. तरीहि आपल्याला तसाच अधिकार मिळावा अशी निजामाची खटपट होती. महादजीनें पेशव्याच्या वकील-इ-मुतलकीबरोबर निजामासहि जें फर्मान आणिलें त्याबरोबरचा पोषाख पेशव्याच्या तोडीचा नव्हता याबद्दल निजामास वाईट वाटलें. तेव्हां याबाबत दुरुस्ती करून पाटीलबावांनी नवा पोषाख निजामाच्या संतोषासाठीं पाठवावा असें गोविंदराव काळे नानास लिहून सुचवितो. म्हणजे यावेळीं सुद्धां निजामाचा आब राखण्याची गोविंदरावास काळजी! तोच प्रकार गोवधबंदीच्या फर्मानाचा. महादजीने तें फर्मान अंमलबजावणीसाठीं निजामाकडे पाठविलें व त्यानें तोंडदेखलें लिहिलें कीं आम्ही फर्मानाप्रमाणें ताकीद केली, पण जाहिराणा या फर्मानाचा उच्चार हैद्राबादेंत झालेला दिसत नाहीं.[२३] हेंच काय, पण गोविंदराव काळयाने नानाचें पत्र वाचून आनंद मात्र मानला, स्तुति केली, पण स्वतः या गोष्टीचा उच्चार हैद्राबादेंत कोणाजवळ केला नाहीं. तो लिहितो, "येथें जो क्रम चालावयाचा तो चालो. परंतु घरोघर मुसलमानांचे चर्चा आहेत कीं बादशाई हुकूम आसा

२२. ऐतिहासिक टिप्पणे भाग ५ ले. ३६.
२३. सातारा १ नं. ३६९, ३७०.

आला, कोण्ही कोण्ही मधेस्तास पुसावयासही गेले, त्यास त्याणी असें कसें घडलें म्हणोन जाबही दिल्हे. कोणा कोणांसी असेंही बोलिले कीं त्यांस आपले धर्माची खरोखरी गरज आहे तरी आम्हीहि कांही मागूं, तें त्याणीं दिल्यास मग हें कबूल करूं. चिंता काय! नाही तरी फुकट कोण यैकतो? यैसी धून आहे. आम्ही उचार कोठें केला नाहीं, व उचार करावयाची आज्ञाही नाहीं. आहे मजकूर तो लिहिला असे."[२४]

या पत्रांतील मध्यस्थ म्हणजे मुषीर. त्याची वृत्ति त्याच्या उद्गारांत दिसते कीं जर हिंदूंसाठीं आम्ही गोवधबंदी कबूल करावयाची तर आम्हांसाठीं त्यांनींहि कांहीं कबूल केले पाहिजे. तें काय याचा उल्लेख पत्रांत नाहीं. कदाचित् हिंदूंनीं डुक्कर मारूं नये अशा तऱ्हेचा मुसलमानांच्या मागणीचा भाग असेल किंवा मुषीर त्याबद्दल कांहीं व्यावहारिक फायदा म्हणजे मुलूख किंवा द्रव्य पेशव्यांकडून कबूल करून घेणार असेल. पण चांगली किंवा न्यायाची गोष्ट फुकट ऐकण्याची त्याची इच्छा नाहीं. पण या पत्रांतील आमच्या मतें मुख्य भाग शेवटचा आहे. तो म्हणजे गोविंदराव काळे लिहितो कीं, आम्ही उचार कोठें केला नाहीं व उचार करावयाची (नानाची) आज्ञाहि नाहीं. इतकी तत्कालीन राज्यकर्त्यांची वृत्ति मुसल्मानांबाबत भित्रेपणाची होती. असे भित्रे राज्य करावयास लायक असें कसें म्हणतां येईल? मुषीराचें वर्तन नेहमी व्यावहारिक, देवघेवीचें होते. महादजी शिंद्यामार्फत पेशव्यांशीं तटून राहिलेले, चौथाई सरदेशमुखीचे तंटे सोडवून घ्यावे असा विचार मुषीरानें महादजी दक्षिणेंत येणार ही बातमी आल्यापासून चालविला होता. महादजीला गुरूच्या नांवाने बीड परगणा पाहिजे तर तो देण्यापूर्वीं आपलीं कामें आधीं करून घेऊन मग तसें कांहीं करण्याचा त्याचा बेत होता.[२५] यावेळीं मुषीर टिपूच्या स्वारींत असून अखेरचा तह अजून झाला नव्हता. महादजी शिंद्याने निजामास लिहिलें होते कीं तुम्ही टिपूचें शासन करण्यासाठीं इंग्रजांशी मैत्री केली ही चांगली गोष्ट झाली नाहीं. एकतर टिपूचा प्रश्न आतांच नव्याने उमटला असें नसून त्याच्या शासनास पेशव्यांचा एक सरदारहि पुरे अशी स्थिति असून निजाम व पेशवे या

---

२४. सातारा १ नं. ३६९.

२५. सातारा १, नं. ३२६.

१०२६४

दोघांनाहि एकेकट्याने किंवा दोघांनी मिळून टिपूचा पराभव करतां येत नाहीं असा याचा जगभर गवगवा झाला. तर आतां तरी तो प्रश्न लवकर निकालांत काढावा. महादजीचा हेतू असा कीं इंग्रजांशीं संबंध दिल्लीच्या बादशहाचा मुख्त्यार या नात्याने आपल्या एकट्याचा असावा. निजाम व पेशवे दोघेही दिल्लीच्या बादशहाचे सेवक. त्यांनी स्वतंत्र तह किंवा बोलचाली इंग्रजांशीं करूं नये. पण या गोष्टीस जेथें नाना राजी नव्हता तेथें निजाम कोठून असणार? सालबाईच्या तहाने पेशव्यांचा मुख्त्यार म्हणून महादजीचें वजन वाढलें तें कमी करण्यासाठीं तर नानाने स्वतंत्र इंग्रज वकील पुण्यास बोलावला व मराठ्यांत दुही होणें इंग्रजांस इष्ट असल्याने त्यांनीं ती गोष्ट सहजच कबूल केली होती. तसेंच सालबाईच्या तहांत प्रत्यक्ष हात नसल्याने निष्प्रभ झालेला निजाम पुन्हा एक मोहरें म्हणून हिंदी राजकारणांत नाचविण्यासाठीं इंग्रजांनीं हैद्राबादेसहि आपला वकील ठेवून भेदनीतीचा पाया घातला. इंग्रज हे हिंदी राजकारणांत जरूरीप्रमाणें व सवडीप्रमाणें कोणास तरी मोठेपणा देऊन आपलें कार्य करून घेण्यांत तरबेज होते. आरंभीं बंगालच्या सुभेदारास व अयोध्येच्या वजीरास गप्प बसविण्यासाठीं त्यांनीं पळपुट्या शहाअलमाचा पराभव करून त्यास आपल्या छत्राखालीं घेतलें आणि त्याच्या सनदेने बंगालबिहाराची दिवाणी पदरांत पाडून घेतली. त्याचा उपयोग संपल्यावर त्यास महादजीच्या ताब्यांत जाऊं देऊन हा पांढरा हत्ती पोसण्याची जबाबदारी अंगावरून झटकून टाकली. यानंतर आठ वर्षें मराठ्यांच्या युद्धांत रागरंग पाहून त्यांनी तहासाठीं महादजीचा उपयोग करून घेतला. ही गरज संपून तो दिल्लीचा मुख्त्यार झाला असें पाहून त्याचे पाय ओढण्यासाठीं पेशवे व निजाम यांना स्वतंत्र म्हणून चढविले आणि त्यांच्या मदतीनें आपणास मुळींच न जुमानणारा जबरदस्त जो टिपू त्याचा नक्षा उतरविला. या प्रसंगीं झालेल्या दोस्तीच्या तहाने आपण इंग्रज आणि पेशवे यांचे समान ठरलों असें मानून निजामाने म्हणजेच मुषीरानें यापुढें दोस्तांची राज्यें जशींच्या तशीं रहावीं अशी हमी घेणारा करार इंग्रजानीं आपल्याशीं करावा अशी मागणी कॉर्नवॉलिसकडे केली पण त्यानें ही नसती जबाबदारी अंगावर घेऊन दुबळया असून गर्व झालेल्या निजामाचें राज्य मराठ्यांच्या संभाव्य स्वारीपासून रक्षिण्याचें सफाईने टाळलें. त्याच्यानंतर आलेल्या सर जॉन

शोअरने आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच मुषीरानें पुढें आणलेला कराराचा मसुदा फेटाळून देऊन त्याची कांहीं गरज नाहीं असें ठरविलें,[२६] कारण पुणें व पानगळ मुक्कामीं पेशवे व निजाम यांच्या इंग्रजांशीं झालेल्या करारांचा त्यांत उल्लेख होता व जोपर्यंत पेशवे स्वतः होऊन ही गोष्ट इंग्रजांपुढें आणीत नाहींत तोपर्यंत त्याबाबत आपल्याला कांहीं करण्याचें कारण नाहीं असें त्यानें ठरविलें. कॉर्नवॉलिसने याबाबत जो मसुदा निजामाच्या इच्छेस अनुसरून ठरविला होता त्यांत त्यांचें मत प्रतिबिंबित झालेलें दिसतें व तें म्हणजे एकदा समान दोस्त झालेल्या माणसाने एकमेकांविरुद्ध कोणतेहि अन्य हक्क पुढें आणून भांडणें किंवा लढाई करणें हें गैर आहे हें होय.

निजाम स्वतंत्र राखणें व त्याला मराठ्यांच्या सत्तेखालीं सर्वस्वी जावूं देऊन दुबळें न करणें हे इंग्रजांचे हेतु यावेळीं निश्चित झाले होते. कारण हिंदी राजकारणांत सत्तेचा समतोलपणा राहण्यासाठीं त्यांना ती गोष्ट इष्ट होती. मुषीराचा हेतु केवळ निजामाचें राज्य तसेंच रहावें एवढाच नसून तें इंग्रजांच्या मदतीनें वाढवावें असाहि होता. पण इंग्रजांना निजामाच्या व मराठ्यांच्या परस्पर बलाची उत्तम जाणीव होती व माहीत होतें कीं दोघांचें युद्ध जुंपल्यास निजामाचा धुव्वा उडेल. मुषीर गर्वाचा पुतळा आहे व त्याच्या महत्त्वाकांक्षेस यश येण्याचा संभव नाहीं हें ओळखल्यामुळें इंग्रजांनाहि तो निजामाच्या कारभारांत नकोच होता. पण त्याला काढून टाकणें त्यांच्या हातांत नव्हतें. नाना फडणीसाला तो काढून टाकावयाचा आहे ही गोष्टहि इंग्रजांना खर्ड्यांच्या लढाईपूर्वीं कमीत कमी दोन वर्षें कळून चुकली होती. पण इंग्रज वकिलाला त्यावेळीं वाटत होतें कीं वृद्ध निजामाचें आयुष्य आतां थोडेंच उरलें आहे व त्याचा वडील मुलगा अलिजाह गादीवर आल्यास मुषीराला आपोआपच रजा मिळून निजामाचें राज्य बळकट होईल. पण निजाम नेहमीं आजारी व साठीनंतर नाठी बुद्धि झालेला होता तरी त्याचा मूळचा पिंड तरुण वयांत केलेल्या व्यायामामुळें चांगला बळकट होता व त्याचें आयुष्य आणखी दहा वर्षें लांबणार होतें. अर्थात् तावत्कालपर्यंत मुषीराची सद्दी कायम रहाणार होती. इतिहासांत

२६. P. R. C. Vol. II, No. 202.

प्रमुख राजांच्या आयुर्मर्यादेवर अनेक गोष्टी अवलंबून राहतात. त्यांतीलच ही निजामाची राजवट होती. दोन निजामांनीं एक शतक कारभार केल्यामुळें निजामाचें राज्य चिरस्थायी होण्याला फार मदत झालेली आहे हें इतिहासकारालाहि विसरतां येणार नाहीं.

सन १७९४ सालच्या उन्हाळयांत महादजी वारल्यामुळें निजाम-पेशवे वादाला वेगळें वळण लागलें. मुषीराला वाटणारी महादजीबद्दलची आशा काळानेंच नष्ट केली. त्याचा वारस दौलतराव अगदीच पोरसवदा होता व त्यामुळें त्याचा कारभारी आबा चिटणीस यामार्फत त्याच्या धोरणावर ताबा मिळविणें नानास शक्य झालें. याचें दुसरें एक अंतस्थ कारण म्हणजे आबा चिटणीस व शिंद्याचे शेणवी सेनानी व मुत्सद्दी यांच्यांत असलेली चुरस होय. त्यामुळें आबालाहि नानाचा पाठिंबा स्वतःच्या स्थिरतेसाठीं मिळविणें जरूर झाले. या गोष्टीमुळें नाना व महादजी यांच्या चुरशीचा फायदा आपल्याला मिळेल अशी निजामाची जी चुकीची समजूत होती तीहि आपोआप मावळली. जून १७९४ च्या आरंभीं सर जॉन शोअरची खात्री झाली कीं मुषीर हाच सर्व दृष्टींनीं खट्याळ आहे. पेशव्याचें निजामवरील हक्क हे न्यायाचे आहेत व त्याला दुबळेपणाचा फायदा घेऊन उकळेलेले पैसे असें म्हणतां येणार नाहीं. तरीदेखील हैदराबादचा वकील कर्कपॅट्रिक यानें निजामाचाच पाठपुरावा चालविला व पुण्याचा वकील मॅलेट याचा अशा वर्तनास पाठिंबाहि होता. कारण त्याला वाटत होते कीं आपण दोन दरबारांत जणूं सलोखा नांदत आहे असे बाह्यतः वागलों तर त्यामुळें मराठ्यांना आपल्या पुढील चालीचा अंदाज येणार नाहीं व त्यामुळें निजामाविरूद्ध त्यांची चढाईची इच्छा तितकीच लुळी पडेल. गव्हर्नर जनरलच्या सल्ल्यामुळें निजामानें वादाचा प्रश्न तडजोडीनें सोडविण्यासाठीं अखेरचा उपाय म्हणून मीर आलम या कलकत्ता मद्रास वगैरे ठिकाणीं जाऊन आल्यामुळें इंग्रजांचा मित्र झालेल्या वकिलास पुण्यास पाठविण्याचें मुक्रर केलें व तो २४ जुलै १७९४ रोजीं पुण्यास येऊन पोहोचला हें वर सांगितलेंच आहे. पण इतकें होऊनहि मुषीराचे चाळे थांबले नाहींत. मीर आलमच्या पाठीमागें व त्याला माहिती न देतां गोविंदराव कृष्ण काळयाच्या मार्फत त्यानें आपलें स्वतंत्र बोलणें नानाशीं चालूच ठेवलें. त्यामुळें निजामाचा सौम्यपणा फुकट

ठरला व त्यानें पाठविलेला वकील निष्प्रभ झाला. नानानें साहजिकच मीर आलमास विचारलें कीं तुम्हाला बाटाघाटीनंतर ठरेल तो करार करण्याचा अधिकार तुमच्या मालकानें दिला आहे काय? त्याला होय असें उत्तर देता आलें नाहीं. तेव्हां नानानें म्हटलें कीं मग उगाच शुष्क वाटाघाटीचा व कबुलीचा उपयोग तरी काय? कारण आपण कांहींहि ठरविलें तरी तुम्ही हैदराबादेस परत गेल्यावर तेथें काय ठरेल तें निश्चित नाहीं. राजकारणांत गुंतलेले मुत्सद्दी स्वतःचे तत्कालिक फायदे होण्यासाठीं मनांत नसलेल्या गोष्टी बाह्यतः करतांना आढळतात. महादजीला नानाकडून आपले उत्तर हिंदुस्थानांतील दहा वर्षांचे हिशेब व इतर कांहीं मुद्दे कबूल करून घ्यावयाचे होते तेव्हां त्यानें मुषीराच्या म्हणण्यास बाह्यतः मूक संमति दिल्यासारखें दाखविले होतें. पुढें ते हिशेब मंजूर झाले तेव्हां महादजीनेंच आपल्या मुषीराशीं चाललेल्या पत्रव्यवहाराचा सुगावा नानास दिला. यावेळीं महादजीला मुषीराकडून तीस पस्तीस लाख रुपये पोहोंचलेहि होते, पण बेदरला निजामाची छावणी आणण्यांत मुषीराचा जो हेतु होता तो मात्र साधला नाहीं. महादजीनें त्याला भासविलें होतें कीं "तुम्हाला नाना काढूं पहात आहेत तसेंच नानालाहि तुम्ही काढूं शकतां, कारण सवाई माधवरावाला नाना आवडत नाहींत." आणि ही गोष्ट त्यावेळीं सर्वत्र पसरली होती कीं नाना कारभारांतून निवृत्त होऊन काशीस जाणार व त्याची जागा शिंदे घेणार. आतां शिंदे वारल्यामुळें त्यावरील विश्वासघाताचा आरोपहि टळला होता. अशा स्थितींत मुषीराची मात्र कुचंबणा झाली. बेदरास येऊन एक वर्ष झालें तरी आपल्या लष्करी हालचालीमुळें नुसत्या दमानेंच घडून येईल असें त्यास वाटलें होतें तें कांहींच घडलें नाहीं, तेव्हां मालकाजवळ त्याची पत कमी झाली. व म्हणूनच निजामानें मीर आलमला सामोपचाचें बोलणें करण्यासाठीं पुण्यास पाठविण्याचें ठरविलें. या गोष्टीचें साहजिकच वैषम्य वाटून मुषीरानें पुनः काळयाच्या मार्फत डाव टाकण्याचा उपक्रम केला. तोहि कसा फसला हें आतां पाहूं.

शिवछत्रपतींच्या मूळ ध्येयाचा व राज्यपद्धतीचा एवढा ठसा महाराष्ट्रावर बसला होता कीं आतां शंभर वर्षांनंतरहि त्यांची आठवण सर्व महाराष्ट्रीयांच्या मनांतून बुजाली नव्हती. त्यांपैकीं त्यांच्या धर्माभिमानाबद्दल इंग्रजांसहि खात्री पटली होती हें शोअरच्या लेखांत वर सांगितलेंच आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे छत्रपतींच्या स्वातंत्र्याची. खुद्द नानालाहि या गोष्टीची आठवण महादजीनें दक्षिणेंत फर्मान आणून फर्मानबाडीचा उपक्रम पेशव्या-कडून अपेक्षिला तेव्हां झाली. त्यानें छत्रपतींच्या वर असलेला महाराजाधिराज असा किताब पेशव्यास स्वीकारतां येत नाहीं अशी अडचण पुढें आणली, पण अखेरीस त्याबाबत छत्रपतींची परवानगी सातार्‍याहून आणून महादजीची इच्छा शेवटास नेली. वस्तुतः सर्वच प्रकार घटनादृष्ट्या गैर होता. पण शाहूनेंच बादशहाचें सेवकत्व पत्करून व स्वतंत्र नाणें पाडण्याचें टाळून या गोष्टींचा पायंडा पाडला असल्यामुळें शिवाजीच्या मूळ घटनेंतील जीवच पाऊणशें वर्षांपूर्वींच निघून गेला होता व तो परत आणण्याची संजीवनी नानासारख्या दुबळ्या मुत्सद्यास साधण्यासारखी नव्हती. येथें सर्व राज्य गमावून परागंदा झालेल्या राजारामाच्या मुत्सद्यांची तुलना करतांना सहजच आठवण होतें. कोठें जिंजीच्या वेढ्यांतून अखिल हिंदुस्थान महाराष्ट्रधर्माच्या कक्षेंत आणण्याची घोषणा करणारा प्रल्हाद निराजी व त्याच्या हुकमाची तामिली करणारा रामचंद्रपंत अमात्य व कोठें नाना आणि महादजी कीं ज्यांना आंधळ्या व अन्नास महाग असलेल्या शहाआलमाचें फर्मान आणावेंसें व घ्यावेंसें वाटतें ! पण अशावेळींहि अभिमानानें सांगण्यासारखी गोष्ट ही की, छत्रपतींच्या राजमंडळाच्या जुन्या मानकर्‍यांनी या फर्मानबाडींत शिरण्याचेंहि नाकारलें, कारण दिल्लीच्या बादशहाचें फर्मान शिरोधार्य करून त्याला कुर्निसात करणें त्यांना आवडलें नाहीं व या समारंभानंतर पेशवा परत शनवारवाड्यांत आला, तेव्हां त्याला अभिनंदनदर्शक नजराहि त्यांनीं केल्या नाहींत. इंग्रज वकील किती बारकाव्यानें सर्व गोष्टींचा कानोसा घेत हें मॅलेटनें या, कोणाच्या फारशा लक्षांतहि न येण्यासारख्या, गोष्टींचा मुद्दाम कॉर्नवॉलिसला लिहिलेल्या पत्रांत उल्लेख केला आहे त्यावरून समजून येतें.[२७] म्हणजे झालेला समारंभ हा पेशव्यांच्या नोकरांनीं केला; पण छत्रपतींच्या नोकरांनीं तो मंजूर केला नाहीं, असा याचा नैतिक अर्थ होतो. मात्र हे मानकरी इतके दुबळे होते कीं, त्यांना यापलीकडे कांहींहि करतां येत नव्हतें.

महादजीच्या मृत्यूपूर्वीं एक महिना निजामाची त्याबाबत निराशा झाली नव्हती तेव्हां मॅलेटनें हैदराबादेला लिहिलेल्या पत्रांत कांहीं बाबीं पुन:

२७. P. R. C. Vol. II No. 140; पुरंदरे दप्तर भाग ३, पृ. १११.

एकदां कर्कपॅट्रिकच्या नजरेस आणल्या आहेत.[२८] "निजामाचें राज्य म्हणजे पत्त्यांचा बंगला आहे. दक्षिणच्या सुभेदारीच्या जागेवर त्याचा आनुवंशिक हक्क नाहीं. त्याच्या राज्यावर हक्क असणारे त्याचे गाजी-उद्दीनासारखे भाऊबंद पेशव्यांच्या राज्यांत रहात आहेत, अशा स्थितींत त्याच्या मृत्युनंतर काय होईल हें निश्चित नसतांना इंग्रजांनीं त्याच्या राज्याचें रक्षण करण्याची हमी व जबाबदारी कशाच्या आधारावर घ्यावयाची ? जेथें निजाम किंवा त्याचा मुख्य प्रधान यांच्या सद्गुणावर, शब्दावर किंवा कार्यक्षमतेवर विश्वास ठेवतां येत नाहीं तेथें दुसऱ्यांनी काय करावयाचें आहे ? स्वतः मेहनत न करतां दुसऱ्याच्या बळावर व फुकट्या मोगली बढाईवर राज्य चालविण्याची बुद्धि, त्याठिकाणीं मित्र काय करतील ? ज्यांच्या मध्यस्थीनें निजाम व मुषीर आपला कार्यभाग साधूं म्हणतात ते गोविंदराव काळे व पिंगळे यांची वागणूक किती **धरसोडीची व म्हणून अविश्वास्य आहे** हें अनेकदां उघड झालें आहे. त्यांच्या जोडीला निजामाचा पुण्यांतील नोकर खुत्तमराव व महादजी शिंद्याकडे असलेला वकील कल्याणराव व त्याचा आश्रित बाबाराव हे सर्व हिंदु; त्यांत कांहीं कल्याणरावाप्रमाणें नातेवाईक व कांहीं ब्राह्मण म्हणून त्यांची एकगट्टी; असा सर्व आपापसांतीलच स्वार्थाचा प्रकार आहे व निजामाच्या प्रजेलासुद्धां ब्राह्मण पेशवा हा आपल्याला जवळचा आहे व त्याच्या राज्याखालीं गेल्यास आपला सर्व दृष्टींनीं जास्त फायदा होण्याचा संभव आहे असें वाटतें, त्या ठिकाणीं इंग्रजांनीं निजामाची बाजू घेण्यांत हेतू तरी काय ? निजाम म्हणजे इंग्रजांच्या गळ्यांत अडकविलेला धोंडा आहे. युद्ध झालें तर निजामाचा टिकाव लागणें शक्य नाहीं हेंच काय, पण त्याचें स्वातंत्र्यच नव्हे तर अस्तित्वच संपुष्टांत येण्याचा धोका आहे. पेशवे व महादजी शिंदे हे दोघे आतां दिल्लीच्या बादशहाचे मुख्त्यार झाल्यामुळें त्यांचा दक्षिणच्या सुभेदारीवर साहजिकच दाब येणें शक्य आहे. इंग्रज निजामाच्या बाजूनें युद्धांत ओढले गेले तरी त्यांच्या बराकींत राहून कवायतींत चलाख वाटणाऱ्या घोडदळाचा मराठ्यांच्या गनिमी काव्यांत निष्णात असलेल्या घोडदळापुढें टिकाव लागणें कठीण आहे. इंग्रजांच्या

२८. P. R. C. Vol. IV, No. 54.

राज्यपद्धतींत त्यांचे अधिकारी वारंवार बदलत असल्यामुळें तोहि एक उणेपणा आहे. आशियांतील सगळेच लोक गोऱ्यांचा द्वेष करतात व त्यामुळें त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति त्यांच्या जातीच्या माणसांकडे झुकण्याची असते. आमच्या राज्यपद्धतींत नोकरींत आधीं लागलेला माणूस निर्गुणी असला तरी वरिष्ठ जागेवर जाऊन बसतो आणि असे कुचकामी वरिष्ठ जर मराठ्यांसारख्या कारस्थानी, धूर्त, उद्योगी व सर्व माहिती बारकाईनें मिळविणाऱ्या लोकांशीं झगड्यांत सांपडले, तर त्यांचें काय होईल हें सांगणें अशक्य. तेव्हां इंग्रजांनीं यांत न पडणें हेंच सर्व दृष्टीनीं शहाणपणाचें आहे हें तुम्हांस पटावें. ”

वरील पत्रानंतर एक वर्ष हें बोलाचालीचें सोंग चालू राहिलें तरी त्यांत कांहीं जीव नव्हता व अखेर लढाईनेंच या प्रकरणाचा निकाल लागला हें इतिहासज्ञांस विदित आहेच. मॅलेटच्या धोक्याच्या सूचनेचा एवढाच सुपरिणाम झाला कीं इंग्रज युद्धाबाहेर राहिले. मनाने मराठ्यांचा पराभव झाला तर तो इष्ट, असें असूनहि इंग्रजांची स्वतःवर जबाबदारी घेण्यास छाती झाली नाहीं. निजामाला आपला मुख्य आधार मुसा रेमूच्या कवायती पलटणीवर ठेवावा लागला. मुषीराची अशी योजना होती कीं मराठ्यांच्या घोडदळापुढें मोगलांचें घोडदळ ठेवावयाचें व किल्ले शहरें यांच्या रक्षणार्थ इंग्रजांची कवायती फौज उपयोगांत आणावयाची. या कामांत ते निष्णात अशी ख्याति क्लाइव्हने अर्काटचा बचाव केला तेव्हां-पासून गेल्या दोन पिढ्या दुमदुमत होती. त्यांच्या जोरावर आपल्या राजधान्या सुरक्षित ठेवून मराठ्यांची शहरें जाळावयाचीं असा मुषी-राचा बेत होता, तो इंग्रज न आल्यामुळें फिसकटला व पानपतच्या लढाई प्रमाणेंच जुन्या तऱ्हेचें घोडदळ व आधुनिक कवायती फौज यांचा सांधा न जुळवितां आल्यामुळें, तसेंच वृद्ध निजाम आपल्या जनान्यासह व खजिन्यासह निष्कारण युद्धांत अडकल्यामुळें, त्याचें भाऊसाहेबाप्रमाणें पानिपत झालें नाहीं तरी खर्डें झालें म्हणजेच खरडपट्टी निघाली, याचें कारण मराठे हे गिलचे नव्हते हेंच होय. यापुढें आतां युद्धाचें वर्णन देऊं.

---

जींत राष्ट्राचा अपमान सहन न झाल्यामुळें सर्व मराठे सरदार अखेरीस एकत्र आलेले दिसले अशी लढाई खर्ड्याची (ता. १७ मार्च १७९५) होय. नाना फडणीसांच्या कारस्थानाचा तो परमोच्च बिंदु व हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक संस्मरणीय टप्पा होय. मराठ्यांचे सर्व गुण, तसेच हिंदूंचे सर्व अवगुण या युद्धांत दृष्टीस पडतात. कोणत्या कारणामुळें हिंदु-मुसलमानांचा प्रश्न आपणांस सोडवितां आला नाहीं त्याचाहि बोध आपणांस या युद्धाच्या फलश्रुतीनें होतो.

निजामाशीं नानाचा जो संबंध आला त्यांत मुख्य मध्यस्थ व सल्लागार हरिपंत फडके होता. हरिपंत हा वस्तुतः फडांतील कारकून, पण फडणीसांतर्फे स्वारीचे हिशेब तपासण्यासाठीं पेशव्यांच्या स्वाऱ्यांवर जाऊन जाऊन तो कारकुनाचा शिलेदार झाला तरी अखेरपर्यंत त्याला पंत हेंच नामाभिधान चिकटलें. त्याला कोणी कधीं राव म्हटलें नाहीं. सन १७५५ पासून त्याचें नांव फडांत आढळतें.[1] १७६१ सालीं तो राघोबाबरोबर निजामाविरुद्ध हालचालींत हजर होता. नंतर माधवरावाच्या भोसलेप्रभृतीं-विरुद्ध झालेल्या युद्धांत तो प्रामुख्याने नानाकडे युद्धाचें वृत्त लिहून कळवितांना आढळतो. यांतच त्याचा रुक्नुद्दौल्याशीं परिचय होऊन निजामाच्या राजकारणाची त्यास माहिती झाली. पुढें नारायणरावाचा खून झाला तेव्हां हरिपंतासच नानाने हाताशीं धरलें, कारण हे दोघे पुरुष तेवढेच काय ते त्या खुनाशीं दूरतःहि संबंध नसलेले असे होते. अर्थात् सवाई माधवराव राखण्याची जबाबदारी मुख्यतः याच दोन पुरुषांवर येऊन पडली व ती त्यांनीं इमानें इतबारें पार पाडली हें सुप्रसिद्धच आहे. ही जबाबदारी पार पाडण्याची मुख्य मदार त्यांनीं पेशवे-निजाम सलोख्यावर अवलंबून ठेवली होती. या उपक्रमास त्यांना सर्वस्वी जबाबदार धरतां येत नाहीं, कारण त्याचा आरंभ थोरल्या माधवरावानेंच केला होता. पण माधव-

१. फाळके-शिंदे भाग ३, ले. ३०९, १६०.

रावाला जसा रुक्नुदौल्यासारखा मोकळ्या मनाने धीर करून स्वतंत्र पायंडा पाडणारा दिवाण निजामाजवळ लाभला, त्याप्रमाणें या दोघांना मिळाला नाहीं. त्यांना मुषीर हा कुटिल, बोलण्यांत बोलणें नसणारा, हरदमख्याली मध्यस्थ, निजामाच्या गळ्यांतील ताईत झालेला असा आढळला. मुषीर मूळ रुक्नुदौल्याच्या हाताखालींच वाढलेला असून त्यास निजामाच्या राज्याची संपूर्ण माहिती होती. तसेंच या धाकट्या निजामाच्या स्वभावांतील व्यंगें त्यानें पूर्णपणें जाणून घेऊन त्यावर कसा ताबा ठेवावयाचा याचें तंत्र अनुभवाने आत्मसात केलें होतें. १७५० ते १७८२ येथपर्यंत निजाम स्वतःच आपला कारभार वाटेल तसा करीत असे. या काळांत तो कामसू, हिकमती व आपला मनांतील विचार दुसऱ्याला कळूं न देतां वागणारा असा होता. पण वयोमानाप्रमाणें व कदाचित् जनानखान्यांतील ऐषआरामी जीवनामुळें त्याची मनःशक्ति, हुरूप व कार्यप्रवणता यापुढें ढिलीं पडलीं. यावेळीं त्याची पन्नाशी उलटली असून तो दक्षिणच्या राजकारणांत मुरलेला असा वडील पुरुष होता. नाना व हरिपंत हे दोघेहि त्याहून वयाने लहान होते व त्यांचा अनुभवहि निजामाइतका विविध क्षेत्रांतील नव्हता. आरंभीं बापाजवळ व नंतर वडील भाऊ जो नासिरजंग त्याबरोबर निजाम त्रिचनापल्लीपर्यंत स्वारी करून आलेला होता. त्यानें इंग्रज फ्रेंचांचे संबंध जवळून पाहिले होते. मोगल पातशाहींतून फुटून बाहेर पडलेल्या बहुतेक सुभेदारांनी आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं परक्यांची मदत घ्यावयाची हें आपल्या वागणुकीचें आद्य सूत्र ठरविलें होतें. हिंदूंना सर्वच बाहेरचे तेवढे यवन, त्यांबद्दल प्रेम किंवा विश्वास निर्माण होणें शक्य नव्हतें. पण मुसल्मानांना ख्रिस्ती हे हिंदूंपेक्षां नेहमींच जवळचे वाटत व ख्रिस्त्यांनांहि तसेंच वाटे, कारण दोघांचाहि धर्म मूळ यहुदीधर्मावर अधिष्ठित होता. आचार-विचार, पोशाख-रिवाज यांतहि ते एकमेकांना जवळ होते. १८ व्या शतकांतील हिंदुस्थानांत राहणाऱ्या अनेक गोऱ्यांनीं एतद्देशीय स्त्रियांशीं लग्नें केलीं होतीं. त्यांपैकीं बऱ्याच स्त्रिया धर्माने मुसलमान असत. खुद्द मॅलेट पुण्यांत अशी एक बिबी घेऊन राहात होता. १७९३ सालीं "मालिटाची कन्या मेली" म्हणून महादजीचा सल्लागार भाऊ बक्षी त्याला भेटून गेला असा उल्लेख मेणवली दप्तरांत सांपडतो.[२] एवंच इंग्रज-मुसलमान किंवा

---

२. सातारा १, ले. ४४०.

फ्रेंच-मुसलमान ऐक्य हें स्वभावसिद्धच होतें. यावर तोडगा म्हणजे एका गोऱ्याविरुद्ध दुसरा गोरा उठवावयाचा एवढेंच होतें. पण कोणत्या वेळीं कोणाची मदत घ्यावयाची हें ठरविण्यास धूर्तता आवश्यक होती. तशी ती पेशव्यांना साधली नाहीं असें इतिहासावरून दिसतें. बुसीच्या भयाने नानासाहेबानें इंग्रजांना मिठी मारली. त्याचा फायदा क्लाइव्हनें घेऊन ब्रिटिश राज्याचा पाया हिंदुस्थानांत घातला. याचें कारण पेशव्यांना पाश्चात्य राजकारणाची माहिती नव्हती हें होय. यूरोपांतील राजकारणाचे चढ-उतार इंग्रज-फ्रेंचांच्या वागणुकींत कसे अनुस्यूत होते याची कल्पना हिंदवासियांना नव्हती. महादजी शिंद्याने पहिल्या इंग्रज-मराठे युद्धांत अनुभव येऊन आपलें धोरण धूर्ततेने बदललें व इंग्रजांना शह म्हणून डिबॉईनसारखे फ्रेंच सेनानी नोकरीस ठेवून आपली बाजू मजबूत केली. या उलट नानाने महादजीला शह म्हणून इंग्रजांचा आश्रय केला; त्याच्या इच्छेविरूद्ध टिपूशीं झगडा केला. साहजिकच त्यांच्या विचारसरणीचा पगडा नानावर बसला. याबाबतींत महादजी अधिक सावध होता. इंग्रज हे हिंदी राजकारणांत या आधींच एक प्रबळ सत्ताधीश होऊन बसले असल्यामुळें ते निष्कंटक होतील असें कांहींहि करूं नये असें महादजीनें ठरविलें होतें. केव्हां तरी एकदां इंग्रजांशीं मराठ्यांना निकराचा लढा करावाच लागेल असें ठरवून त्यानें फ्रेंचांना जवळ केलें होतें. याचें कारण त्याला आपल्या फ्रेंच नोकरांकडून यूरोपांतील राजकारणाची चांगली माहिती मिळाली असावी, कीं जी नानाला नव्हती. म्हणूनच महादजीचा बेत टिपूला राखून निजामाला बुडवावें असा असल्याचा दिसतो. ही गोष्ट हरिपंत किंवा नाना दोघांनाहि कळत नव्हती असें वाटतें.

नानाची निजामाशीं चाललेलीं सर्व बोलणीं हरिपंताच्या सल्ल्यानें व गोविंद कृष्ण काळ्याच्या मध्यस्थीनें चालू होतीं. या काळ्याच्या वास्तविक योग्यतेसंबंधानेंहि महाराष्ट्रांत चुकीचा समज रूढ झाला आहे. हा जितका पेशव्यांचा तितकाच निजामाचाहि हितकर्ता होता. चौथाईसरदेशमुखी वसुली हा व याचा हस्तक पिंगळे मिळून करींत असल्यामुळें यांचा स्वार्थ या राजकारणांत गुंतलेला होता. कांहीं अंशीं याच्या कमकुवतपणामुळेंच मुषीर वाढला, असें सर्व पत्रव्यवहार वाचून आमचें मत झालें आहे. हरिपंताचा गोडवेपणा व नानाचा सौम्यपणा हेंहि याला कारण होतें, तरी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठा... 
अनुक्रम २४५९९ दि. १९७६
क्रमांक ९१५२ मो. ...



अखेर दोघेहि विटले. मरणापूर्वी एक महिना हरिपंतानें जें शेवटलें पत्र नानाला निजामाबाबत लिहिलें त्यांत "कांहीं ताळ राहिला नाहीं, नबाबांनी थोरपण काय केलें? सारे कार्यवादू आहेत. दौलांनी (मुषीरने) विनंति केली, निषेध नबाबांनी केला, शेवटीं दौला बोलिले कीं "करून चुकलों." हे उगेच राहिले. तेथें थोरपणाची गोष्ट कोठें राहिली? दौला फार चर्ढी लागले. हेंहि फार दिवस टिकणार नाहीं. इतक्या लिहिण्यांत नबाबाची जात समजली. बिघाडाचीं बोलणीं आहेत. आपली सावधगिरी आजपासून असावी. होळकर आणावे. फौज भाद्रपदमासीं जमा व्हावी. दौलासारखा चांडाल नाहीं. ईश्वर लवकरच समाचार घेईल. पट्टणचे स्वारीची[३] नालबंदी अजून निम्मे देणें आहे ती द्यावी व फौज जमा करावी." हें पत्र मे १७९४ चे असून एव्हांपासून नानाची पत्रें सर्व सरदारांना व पथक्यांना पुण्यास येण्याबद्दल गेलीं. मुषीराचे निजामाच्या दरबारांतील वैरी त्याला कंटाळलेलेच होते. त्यांतील अजीमुद्दौला हा आक्टोबर १७९४ च्या अखेरीस निजामापासून दूर झाला. इंग्रजांच्या मध्यस्थीच्या बोलण्यास नानानें कळविलें होतें कीं, आम्ही निजामावर हल्ला करूं इच्छीत नाहीं, तर आमच्या पैशांच्या वसुलीसाठीं प्रत्यक्ष मुलखावर स्वारी करून प्रजेकडून व स्थानिक अधिकाऱ्याकडून आम्ही आमचा पैसा वसूल करूं इच्छितों. त्याला निजाम आड आला तर मग मात्र आमचा नाइलाज आहे. या पवित्र्यामुळें अखेरपर्यंत दोन्हीहि बाजू आपणांस युद्ध कर्तव्य नाहीं असें म्हणत राहिल्या. वकील गोविंदराव काळे कायम निजामाजवळच बेदरच्या छावणींतच राहिला. हरिपंत मेल्यानंतर जानेवारी १७९५ च्या आरंभीं निजाम बेदर सोडून उत्तरेकडे कमठाण्यास सरकला. येथें उत्तम आंबराई होती. इंग्रज वकील कर्कपॅट्रिक यावेळीं निजामाच्या छावणींतच होता. पुण्यास अखेरची वाटाघाट करण्यासाठी जुलै १७९४ च्या शेवटीं येऊन राहिलेले मीर आलम, रायरायां रेणुराव व रघोत्तमराव हे मुषीराच्या बाजंदीपणामुळे फिके पडले होते, कारण अखेरचा तह करण्याचा अधिकार मीरआलमाला त्याने दिलाच नव्हता. ता. ४ जानेवारी १७९५ रोजीं निजाम कमठाणें सोडून पुढें अडीच मैल सिकंदरपुरास सरकला. आतां लढाई खेरीज दुसरा मार्ग उरलेला

३. पारसनीस दप्तर रु. ४३ फा. २० प. १४२.

नाहीं असे निजामाचेंहि मत झालें असें इंग्रज वकील म्हणतो[४], पण तें निजामाच्या यावेळच्या मनोवृत्तीचें विश्लेषण करतां खरें मानतां येत नाहीं. त्याची वृत्ति आंधळ्या धृतराष्ट्रप्रमाणें झाली होती. त्याला मुषीराचा लोभ सुटत नव्हता व दुसरीकडे पेशव्याचा प्रेमा ओढीतच होता. अजूनहि जर नाना व मुषीर यांची खऱ्या मोकळ्या मनानें भेट होऊन बोलणें होतें, तर युद्ध टळण्याची शक्यता आहे असें मुस्तकीमुद्दौला या मुत्सद्याचें मत होतें. पण याला ज्या प्रमाणें रुक्नुद्दौल्याने तीस वर्षांमागे मनाचा हिय्या करून आधीं निरोप न पाठवितां एकदम पेशव्याच्या डेऱ्यांत जाऊन माधवरावाची भेट घेतली व एका बैठकींत गेलीं तीस वर्षें टिकलेला तह घडवून आणला, तसा हिय्या मुषीराने करावा असें मुस्तकीमचें म्हणणें होतें. आणि हीच गोष्ट घडणें दुरभिमानामुळें व कुटिलपणामुळें अशक्य होतें. याचाच परिणाम निजाम पुढें सरकण्यांत झाला. ता. २२ जानेवारी १७९५ रोजीं त्याचा मुक्काम मांजरा नदीच्या तीरीं बोलीगांव येथे बेदरच्या पश्चिमेस ६६ मैलावर होता. निजामाचा वडील मुलगा अलिजाबहादर हा निजामाबरोबर नसून मागें हैदराबादेस होता व त्यावर निजामाची मर्जी नव्हती. दुसरा मुलगा पोलादजंग (शिकंदरजाह) हा मुषीराचा जावई असून निजामानंतर तोच गादीवर येईल अशी सामान्य समज होती. तोहि या प्रकरणांत मध्यस्थी करूं पहात होता. मुषीराने त्याच्या मध्यस्थीने सला होत असेल तर जरूर होऊं दे, मला मान्य, असेंहि गोविंदरावाजवळ म्हटलें.[५] पण याबाबत नानाची परवानगी मिळाली नाहीं. गोविंदराव काळ्याने गेल्या नोव्हेंबरांतच, बीडास दोन हजार फौज पाठवून व तेथील गांवोगावचे पाटील धरून आणून नगरांत ठेवावे आणि मामूलप्रमाणें वसुली घ्यावी असा बेत सुचविला होता व त्यांत त्याचा हेतु ही बातमी निजामास आल्यावर तो पुढें कसा वागतो तें पाहण्याचा होता.[६] पण ही गोष्टहि नानाकडून घडली नाहीं. नानाने फौजा बोलावल्या होत्या त्या हळू हळू जमूं लागल्या. निजामाचें सैन्य यावेळीं सुमारें लाखाच्या घरांत असून त्यांत घोडदळ व पायदळ यांची संख्या जवळ जवळ सारखीच होती तरी त्याच्या

---

४ P. R. C. Vol. IV, 159.

५. का. प. यादी. ले. ४५५.

६. पा. द. रु. ४३ फा. २० पत्र १३.

लष्करांत मुसलमान बहुसंख्य होते. हिंदु जागीरदारांच्या माणसांत रावरंभा, कल्याणराव, व भवानराव निंबाळकर, तेजसिंग, पदमसिंग व जोधसिंग खंदारकर, दारकोजीराव पाटणकर, साबाजी घाटगे, चडचणकर शिंदे, रुस्तुमराव पांढरे, मानसिंगराव हाके, शंकरराव भोंग, विठ्ठल सुंदरचा नातू चिमणाराजे, रायरायां, रघोत्तमराव, त्रिमलराव, नारायणराव वैशंपायन व खुद्द गोविंदराव कृष्ण काळे; यांखेरीज या युद्धासाठीं नवीन म्हणून राजे रामचंद्रराव मुंगीकर, भारामल, शिवबाळा हजारी नागपूरकर हेहि जमा झाले होते. पण यांच्या ताब्यांतील फौजेची संख्या पांच सात हजारांपेक्षां जास्त नव्हती. मुसा रेमू व मुसा पेरू* यांच्या हाताखालीं दहा हजार नवीन कवायती फौज असून ती जवळ जवळ शिंद्याच्या कवायती फौजांप्रमाणे तयार होती असें म्हणावयास हरकत नाहीं. बाकी फौज अतिशय भोंगळ, शिस्त व हुरूपहि नसलेली अशी होती. त्यांत हर्ल्ली आसदअल्लीखान बेंगणपल्लीवाला, सुभानखान, अलफखान करनूळवाला व अमीनखां अरब हे आघाडीचे व विशेष हिमतीचे समजले जात व त्यांच्यावरच निज़ामाची व मुदीराची मुख्य मदार होती. धौशाचा मुलगा येतेशामजंग, वऱ्हाडांतील सलाबतजंग, व वजीरखान हेहि विशेष नामांकित समजलें जात. यापैकीं आसदअल्लीखान, सुभानखान, अलफखां व अमीनखां यांना निजामाने डिसेंबरच्या आरंभींच नळदुर्गाकडे पाठविलें होतें. त्यांनी नळदुर्गापासून बार्शी परंड्यापर्यंत धूम उठविली. ही टोळी मुख्य सैन्यापासून दुसरीकडे पाठविण्यांत निजामाचा हेतु असा होता कीं, आपण कोठें जात आहों व आपल्या सैन्याचा रोख खरा कोठें आहे याबद्दल मराठ्यांचा गोंधळ व्हावा व त्याप्रमाणें पेशवे थोडे साशंक झालेच. तुकोजी होळकर इंदुराहून येत होता त्यास येतां येतां दिवाळी झाली तरी त्याचें तापीतीर सुटलें नव्हतें. तुकोजी हा बारभाईच्या कारस्थानापासून नाना व हरिपंत यांनीं महादजी शिंद्यास शह म्हणून संभाळलेला सरदार होता. टिपूच्या १७८७ च्या तहानंतर उत्तरेंत जाऊन त्याने अलिबहादुराबरोबर बरीच कामगिरी उठविली होती. पण एकंदरींत दिवसेंदिवस होळकरशाही खालावतच चालली होती. याला एक कारण अहिल्याबाईची मालकी

*हा धाकटा पेरू व शिंद्याकडील डिबॉइनच्या हाताखालील थोरला पेरू या भिन्न व्यक्ती होत.

व लोभ आणि तुकोजीचा भोंगळपणा व दुरभिमान. महादजी दक्षिणेंत आल्याबरोबर लाखेरीच्या लढाईत महादजीच्या सरदारांनी होळकरांचा पराभव करून त्यांचा नक्षा पार उतरविला होता तरी अजून नानाचा पाठिंबा त्याला होता व म्हणूनच नानाने त्याला दक्षिणेंत बोलाविलें होतें. त्याच्या-बरोबर त्याचा वडील मुलगा काशीराव व सरदार बापू होळकर होते. त्यांच्याजवळ थोडी कवायती फौजहि होती. पण तुकोजी अलीकडे वृद्धत्वामुळें व व्यसनांमुळें अगदीं कुचकामी झाला होता. मनाचा निग्रह नसल्यामुळें त्याच्या कारभारांत एकसूत्रीपणा राहिलेला नसून त्याचा विश्वासहि कोणावर नव्हता. तरी त्याला देवराव हिंगण्याने जरब दाखवून डिसेंबर १७९४ च्या आरंभीं पुण्यास आणलें. मात्र याच्या फौजेवर कोणतीहि गोष्ट अवलंबून ठेवण्याची सोय नव्हती. दौलतरावाच्या हुकमा-प्रमाणें जिवबादादा बक्षी उज्जयिनीहून निघून जानेवारींत पैठणापर्यंत आला. त्याच्याबरोबर पेरूच्या हाताखालीं तेवीस पलटणें असून त्यांची तयारी अव्वल दर्जाची होती. देवजी गवळी याच्या हाताखालीं १५००० स्वार असून तो या वेळीं बीड जिल्ह्यांत धुमाकूळ घालीत होता. त्यांच्या बरोबर सुमारें दहा हजार पेंढारी मुद्दाम उत्तरेंतून दक्षिणेंत नानाच्या हुकमाने आणविले होते. प्रत्यक्ष राज्यांचें युद्ध जुंपलें असें न म्हणतां विरुद्ध बाजूला युद्धापूर्वीच हैराण करण्यास ह्या पेंढाऱ्यांची पुंडाई उपयोगी पडे. या पेंढाऱ्यांत हिंदु मुसलमान असा भेद नव्हता. त्यांना सरकारकडून थोडा पण नियमित पगारहि ठरलेला असे. लुटीचा ठराविक हिस्सा त्यांना मिळून बाकीचा सरकारजमा होई. याखेरीज सरकारला त्यांना नियमित खंडणीहि स्वतःच्या मंजुरीबद्दल द्यावी लागत असे. हे पेंढारी इतके बेगुमान असत कीं त्यांना आपपर असें कांहीं नव्हतेंच. खुद्द पेशव्यांचे जासूद हेर व प्रसंगविशेषीं शिलेदार सरदारसुद्धां त्यांजकडून लुटले जात व त्यांच्या तक्रारी सदा चालू असत.

जिवबा ४ फेब्रुवारी १७९५ रोजी बांकीनजीक मिरजगांव येथेंसीनातीरीं दाखल झाला. त्याने ८ तारखेस दौलतरावाची व ११ तारखेस पेशव्याची भेट घेतली. याच वेळी रघूजी भोसलेहि १५००० फौजेसह लष्करांत येऊन दाखल झाला.[७] नानांच्या आज्ञेप्रमाणें दक्षिणेकडून पटवर्धन सरदार नोव्हेंबर

७. जिवबादादा ले. १४६, १४७. (१९०७)

महिन्यांत पुण्यास दाखल झाले. त्यांच्याबरोबर चिंतामणराव सांगलीकर, रघुनाथराव कुरुंदवाडकर, जनोबा यादवाडकर, विठ्ठलराव मिरजकर, सदाशिवराव मंगळवेढेकर व इतर भाऊबंद हजर होते. तसेच खंडेराव विठ्ठल विंचूरकर, रंगराव त्रिंबक राजेबहाद्दर, गोपाळराव पागे हेहि याचवेळीं भांबवड्यास डेरेदाखल झाले. पेशव्याकडे यावेळीं इंग्रज सरदारांच्या हाताखालीं कवायती पलटणें तयार होत होतीं पण त्यांची कवाईत अजून पुरी झालेली नव्हती. दौलतराव शिंदे नोव्हेंबरच्या मध्यास डेरेदाखल झाला व बाबा फडके ( हरिपंत तात्यांचा द्वितीय पुत्र ) हा ता. १८ नोव्हेंबर रोजीं सैन्यांत जाऊन तेथील कारभार त्यानें स्वतःकडे घेतला. खर्ड्यांच्या स्वारींत पेशव्यांच्या हुजरातीचा हा रामचंद्र बाबा फडके आजच्या भाषेंत Adjutant General होता. त्याच्या हुकमानें व परवानगीनें इतर फौजेनें चालावयाचें होतें. ८ डिसेंबर १७९४ रोजीं नाना फडणीस गारपीराच्या मुक्कामीं तंबूंत रहावयास आले. रंगराव राजेबहाद्दर यांचें घोडदळ व राघोपंत गोडबोल्याचे गाडदी हे नानाच्या रक्षणास दिले होते. अखेर ता. १४ डिसेंबर रोजीं पेशवे परशुरामभाऊसह सैन्यांत हजर झाले. पेशव्याची व तुकोजी होळकराची भेट ता. १६ डिसेंबर रोजीं झाली. यावेळीं शेलूकर यास नव्याने सरदारी वस्त्रें देण्यांत येऊन तो पेशव्याच्या सैन्यांत दाखल झाला. पेशवे प्रथम खडकीवर जाऊन तेथून येरवड्यास व तेथून पुढें वडगांवास व नंतर थेऊरास गेले. मराठ्यांची सैन्यें मुळा-मुठेच्या दक्षिण–उत्तर बाजूनें ज्याच्या त्याच्या सोयीप्रमाणें पुढें चाललीं. यावेळीं दररोज कूच मुक्काम होत नसून कांहीं ठिकाणीं बरेच दिवस तळ पडे. मकरसंक्रांत थेऊरासच होऊन नंतर ता. १२ जानेवारी १७९५ रोजीं पुढें कूच झालें. तेथून नांदेड व करकुंब व नंतर साळुमाळूचें पारगांव व वाळकी या वाटेनें पूर्वेकडे चालले. परशुरामभाऊ पटवर्धन नदीच्या उत्तर बाजूनें कोरेगांवावरून पुढें चालला. नंतर भीमा ओलांडून मांडवगण येथें मुक्काम झाला. नंतर घोडनदी ओलांडून काष्टी तांदळी या मार्गें श्रीगोंदें तालुक्यांत सैन्य चाललें. पेशवे, शिंदे व होळकर हे जवळ जवळ राहून सैन्य पुढें सरकूं लागलें. यावेळीं सैन्याचा तळ तीन कोस पडत असे. यावरून लष्कराच्या मांडणीची कल्पना येईल. नंतरचे मुक्काम आडळगांव, भोसे गांवाजवळची खिंड ओलांडून मिरजगांव व नंतर

नागलवाडी व सिंगवी या गांवामध्यें सीनेच्या पाण्यावर पेशव्यांचा तळ पडला. होळकर मागें मिरजगांवावर व शिंदे त्यांच्याहि मागें खांडवी-कोंवळीवर होते. यावेळीं जास्त सैन्य जमून लष्कराचा तळ चार कोस लांबीचा झाला होता. २० जानेवारीच्या सुमारास निजामाने आसदअलीस उत्तरेकडे सरून रघोजी भोसले वाशिमावरून पुढें येत होते त्यांच्या वाटेवर जोगाईच्या आंब्याच्या सुमारें जाऊन राहण्यास सांगितले. त्यामुळें नानानें भोसल्यास लिहून त्यानें उत्तरेकडून पैठणास शिंद्यांचे मागें यावें असें त्यास कळविलें.

खड्यांच्या लढाईबद्दल इतर युद्धांच्या मानानें पुष्कळच जास्त माहिती उपलब्ध आहे. रघोजी भोसले हा या युद्धांत एक प्रमुख भागीदार होता कारण पेशव्यांच्या चौथाई सरदेशमुखीप्रमाणें त्याचा गंग-थडीच्या घासदाण्याचा लढा त्याला तोडावयाचा होता व वऱ्हाडच्या हिश्शाबद्दलहि वाद होताच. नानानें बाबुराव वैद्य वाईकर यास नागपुरास पाटवून रघोजीची मदत पेशव्यास होईल अशी आगाऊ योजना गेलीं तीन वर्षें करून ठेविली होती. १७९३ पासून सैन्य ठेवल्यामुळें त्याच्यावर दोन वर्षांचा खर्च यापूर्वीच चढला होता म्हणून हरिपंताच्या मरणापूर्वीच तो नानानें युद्ध पुकारावें असें सारखा म्हणत होता. आतां तो नागपुराहून निघून जानेवारीच्या मध्यास पेनगंगा नदीवर येवती भगवती येथें येऊन दाखल झाला. येथून त्यानें बाबुराव वैद्यास विठ्ठल बल्लाळ सुभेदार याचे लष्करास पाटविले. हा विठ्ठलपंत परांजपे भोसल्याचा वऱ्हाडांतील सुभेदार असून मोटा पराक्रमी होता. याचा मामा नरहरपंत रिसबुड पूर्वी माधवरावाबरोबरच्या जानोजीच्या लढाईंत मरण पावलेला होता. त्याच्याच जागेवर विठ्ठलपंताची नेमणूक करण्यांत आली होती. याजवळ घोडदळा-प्रमाणेंच रोहिले–गारदीहि पुष्कळ होते व तोफांप्रमाणेंच बाणांची मारगिरी करण्यांत त्याच्या सैन्याचा हातखंडा होता. रघोजी यवतीहून आलेगांवास नडसीजवळ येऊन उतरला. भोसल्यांच्या सैन्याची वागणूक हा निजामाचा मुलूख असल्यामुळें बेबंद होती. लक्ष्मण कवडे बातमीदार लिहितो, "मार्गानें धूम करितात, गांव उजाड जाले. घोड्यास हरभरा दररोज चारितात व गांवांतील दाणादुणाहि आणतात. गांवास अग्नीहि लावून

देतात. याचप्रमाणें पुढें सुभेदाराचे लष्करवालेहि करतात."[८] यावरून त्यावेळच्या युद्धाचे स्वरूप कळून येईल. ज्या ज्या वाटेनें लष्कर जाईल त्याच्या आसपासचा दहावीस कोसांचा मुलूख वेचिराख व्हावयाचा हें जणूं ठरलेलेंच होतें आणि अशी गोष्ट नेहमी परमुलखांतच घडे असें नसून स्वतःच्या मुलखांतहि तोच प्रकार पुष्कळदां घडे. फेब्रुवारीच्या आरंभीं भोसले पैठणावरून गोदा ओलांडून दक्षिणेकडे येऊन नागतळ्याचा घाट चढून मौजे निंबगांव नजीक कडेअष्टी येथें रणांगणाच्या क्षेत्रांत येऊन दाखल झाले. यावेळीं जिवबादादासुद्धां पैठण सोडून दक्षिणेस मळेगांव, दुधड, अडूळ या वाटेनें कडेवळितांत येऊन अखेरीस सीनेवर खडकत या गांवीं पेशव्यास भेटला. विठ्ठल बल्लाळ परांजप्याचें सैन्य मागोमाग सिरापूर नजिक तिसगांव येथें ७ फेब्रुवारी रोजीं दाखल झालें. रघूजी भोसल्याबरोबर बाळकृष्ण दुबे व नारोबा नाईक कानडे हे सावकार नागपुराहून आले होते. यांच्याच मदतीनें सैन्याचे दैनंदिन खर्च चालत असत. यानंतर भोसल्याचें सैन्य देऊळघाट चढून केळ पिंपळगांव येथें आलें. येथून सीनानदी चौदा कोस असून तेथें तें १२ फेब्रुवारी रोजीं दाखल झालें. यापूर्वींच बाबुराव वैद्य पुढें येऊन नानास भेटला होता. जिवबाच्या मागोमाग भोसल्यांचीहि पेशव्यांशीं भेट झाली.

यापूर्वींच पेशव्यांची हुजुरात सीना नदी ओलांडून जामखेड तालुक्यांत मुक्काम करून राहिली होती. ता. ३० जानेवारी १७९५ रोजीं येथें महादजीपंत बेहरे व रास्ते आपल्या अडीच हजार फौजेसह येऊन मिळाले. दरेकरांचें पथक यानंतर आलें. मोगलाईतून जयवंतराव देशमुख कळंबकर हा पांडुरंगराव बारामतीकरांच्या मध्यस्थीने पेशव्यास येऊन मिळाला. असेच भापकर, देवजी कोळी, विनायकपंत परांजपे हा गाड्यांचा सरदार, हे येऊन मिळाले. यावेळींहि सैन्याची रीत नेहमीचीच होती. हुजरातीचा मुख्य तळ घोडेगांव येथे खर्ड्याच्या पश्चिमेस आठ मैलावर पडला. शिंदे उत्तरेकडे सहा कोसांवर खांडवीमांडवी येथें ओढ्याच्या पाण्यावर असून त्यांच्या सैन्याने तो गांव झाडून लुटला. घराचीं लाकडें लष्कराच्या लोकांनीं जाळण्यास आणलीं. यावेळीं हैबतराव चव्हाण बिडा-कडून पेशव्याच्या छावणीकडे येत होता त्याला देवजी गवळ्याच्या लोकांनी

८. पारसनीस रु. ९६, फा. १, पत्र १४८

वाटेंत लुटून त्याचे सोळा घोडे नेले. छावणींत हरभऱ्याची टंचाई झाल्यामुळें घोड्यांची चंदी १ फेब्रुवारीपासून निम्मे करण्याची पाळी आली. सीनेच्या कांठी घुमरी पिंपरी येथें सैन्याच्या हजिऱ्या व गणत्या घेण्यांत आल्या. बाबा फडक्याजवळ कारभारी परशरामपंत चक्रदेव, चिमणाजीपंत लेले व आपाजी गोपाळ फडतरे हे होते. हणमंतराव आटोळे व बळवंतराव सुबराव हे पथक्ये येथें सैन्यांत आले. सैन्यांच्या भयाने गांव पळाले. गांवचीं घरें मोडून लष्करांत आणण्याचा तडाखा चालला. होळकरांच्या पेंढाऱ्यांनी सहा गांव लुटले. चार फेब्रुवारी रोजीं ग्रहण होतें त्या निमित्त स्नानादि प्रकार छावणींत झाले. यावेळीं या भागांत लष्कराबाहेर कोणीहि निघूं शकत नव्हता. बेदड्यांचा उपद्रव चालूच होता. कृष्णाजीपंत लिमये त्यांनीं लुटला. सिद्धटेकाहून येतांना पेंढाऱ्यांनीं शिलेदाराचा ओझ्याचा बैलच पळविला. अशा गोष्टी पेशव्यांच्या मुलखांतच घडत होत्या हें लक्षांत ठेवलें पाहिजे, म्हणजे नानाच्या कारकीर्दीतहि किती शिस्त राहूं शकत होती याचा अंदाज येऊं शकतो, लष्करांतील हजेरींत व गणत्यांतहि लबाडी चाले. एका पथकांतील सैन्याची हजिरी झाल्यावर तेच लोक दुसऱ्या पथकांत जाऊन उभे रहात व अशा रीतीने त्याची भरगणती होण्यास मदत करीत. त्यामुळें चेहरेवार गणती घेण्याचा उपक्रम झाला. म्हणजे हजेरीच्या नांवाप्रमाणें व्यक्तीच्या चेहऱ्याची ओळख पटल्याखेरीज त्याची गणती मंजूर होत नसे. अशा प्रकारामुळें नामतः दिलेली लष्करांतील पथक्यांची बेरीज किती बरोबर असेल हें सांगणें नेहमींच मुष्कीलीचें होतें. बाबा फडक्याजवळ यावेळीं दुर्बीण आहे व तिचा उपयोग तो एक कोसाच्या टापूंतील प्रदेश पाहण्यास करूं शके असें वर्णनावरून दिसते. पेशवे, नाना, फडके, शिंदे, भोसले, होळकरप्रभृति बड्या लोकांसाठी पुण्यापासून दूरवरून भाजी, द्राक्षें, अंजीर, पेढे, बर्फी वगैरे वेळोवेळीं येत होती. लष्करांतहि सरदारांचे देव बरोबर असत. त्यांचे पुजारी ब्राह्मणहि असत व दौलतरावासारखा तरूण सरदारहि देवपूजा करतांना आढळतो. मग पेशवे, नाना वगैरेंचें सांगावयासच नको.

निजामाचा मुक्काम ४ फेब्रुवारीपर्यंत बुरगांव येथें असून त्याच्या सैन्याच्या तुकड्या मांजरेच्या दक्षिणतीरीं जरूरीप्रमाणें हालचाल करीत होत्या. त्यापैकीं एका टोळीने जोगाईच्या आंब्यास जाऊन तो क्षेत्राचा गांव लुटला.

" तेरा कुटुंबें ब्राह्मणांची यांणी आपल्या घरांत बसोन घरास आग लावून दिली. विसा ब्राह्मणांनीं जिव्हा उपडोन मेले. कांहीं बायका धरून नेल्या त्या बाटविल्या. बारशीची पेठ मारली. "[९] असें पत्र बारामतीस आलें. निजाम यावेळीं दक्षिणेस धारूराजवळ पारगांवास मांजरातीरीं होता. पेंढाऱ्यांचा उपद्रव फारच झाल्यामुळें बीड, नगर व सोलापूर या भागांतील लोक गडबडून गेले. वरील बातमी खरी असावी असें थत्ते सावकारांच्या नानास आलेल्या पत्रांवरूनहि दिसते. या बातमीमुळें आतां लढाई टळत नाहीं असें ठरून त्या दिशेने हालचाली सुरू झाल्या. याचवेळीं निजामाने ता. १६ फेब्रुवारी रोजीं पारगांवच्या आपल्या छावणींत एक फौजेची पाहणी करून आपल्या बलाढ्यपणाचा देखावा गोविंद कृष्ण काळ्यास दाखविला. काळे वकील व मुषीर दोघेहि निजामामागें अंबारींत खवासींत बसले होते. इंग्रजांचा वकील कर्कपॅट्रिक याच्या मतें या गोष्टीचा इष्ट तो परिणाम होऊन काळ्याने नानास निजामाच्या तयारीबद्दल लिहिलें. नानानें असें कळविलें होतें कीं, निजामानें पुढें येऊन मोहरीचा घाट उतरूं नये, उतरल्यास तें लढाईस आव्हान असें समजण्यांत येईल. म्हणून गोविंदरावानें एक नवीनच बूट काढला, त्यानें निजामाला सुचविलें कीं, निजामानें पश्चिमेस सीनानदीकडे न चालतां उत्तरेस गोदावरीच्या काठास चलावें. तिकडून पेशवेहि तसेच उत्तरेस सरकून मुंगी पैठणास येतील व निजाम शहागडास राहून चौदा कोसावर असणाऱ्या पेशव्याशीं पाण्याचा तुटवडा न पडतां बोलणी चालवूं शकेल. या हालचालीमुळें निजाम परिंड्याच्या वाटेने पुण्याकडे जाईल ही भीति नाहींशी होऊन बोलाचालीहि जास्त सुगमतेने होतील.[१०] या गोष्टीस मुषीरचीहि आडकाठी नव्हती. कर्कपॅट्रिकला कळलें होतें कीं, मुषीराचा यावेळीं परशुरामभाऊ व दुसरे मराठे सरदार यांच्यांशी नानाखेरीज पत्रव्यवहार चालू होता. त्यांतून कांहीं वेगळे वळण बोलाचालीस लागून बरें निघेल अशी आशा कांहीं जणांस वाटत असावी. पण गोविंदरावाची ही सूचना अंमलांत आलेली दिसत नाहीं. निजाम पारगांवास १४ फेब्रुवारीपासून ३ मार्चपर्यंत राहिला. तोंपर्यंत काय बोलाचाली झाल्या याचा अंदाज नीटसा होत नाहीं. पण लढाईनंतरच्या हकीगतींत म्हटलेले आहे

९. खरे ९, ले. ३६०३.
१०. P. R. C. Vol. IV No. 166.

त्याकडे पाहतां मुषीराचें वर्तन व त्याबद्दल अविश्वास हाच मुख्यतः लढाईस कारणीभूत होता असें म्हटलें पाहिजे. मुषीराने मारेकरीहि पाठविले. पुण्यांत झेंडे लावण्याची बढाई ठोकली. पेशव्यांना नर्मदापार करूं असे भर कचेरींत तो बोलूं लागला. पेशवे-नानांचीं सोंगेहि तमाशांत आणण्यांत आलीं, अशा तऱ्हेच्या ज्या वार्ता प्रचलित आहेत त्या पाहतां, असें आहे तर जाऊं दे एकदां होऊन, असें भित्र्या नानानेहि मनांत आणलेलें दिसतें. त्याच्या सुदैवाने यावेळीं सर्व मराठे सैन्य छावणींत एकत्र आलेलें होतें. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, प्रतिनिधि, घोरपडे, पटवर्धन प्रभृति बहुतेक सर्व मराठे वेगवेगळ्या कारणांसाठीं कां होईनां, एकत्र जमलेले होते. शिंद्याबद्दल सुरवातीस खात्री नव्हती. पण तोहि एक कंपू घेऊन आघाडीस येऊन राहिला होता. त्यामुळें निजामाकडील रेमूच्या गाड्यांची भीति मराठ्यांत उरली नव्हती. जर शिंदे नसते तर लढाईचें स्वरूप काय झालें असते याबद्दल शंकाच आहे.

'युद्धस्य कथा रम्या' हें वचन कोणता हेतु मनांत धरून मूळ लेखकानें लिहिलें न कळे. पण युद्ध होण्यापूर्वीच जे प्रकार या भागांत घडत होते ते पाहिले म्हणजे युद्ध हा प्रकार रामदासानींसुद्धा तामसी गुणांत कां घातला आहे याचा बोध होतो. जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांत हा सर्व प्रदेश उजाड बनला होता. श्रीराम सदाशिव बातमीदार जानेवारीच्या अखेरीसच लिहितो कीं, "अष्टी, जामखेड, खर्डे व खेरीज लहान गांव उजाड जाले. डाक बसवावयास वस्ती नाहीं. मधें मोगलाचे गांव उजाड जाले. आणखी उजाड होत जातात. कडेवळितांत देवजी गवळी याचे पेंढारी यांणी बहुत उपद्रव केला. माणसें मारलीं. ब्राह्मण मारले. गांवचे बाजार लुटले. त्यांस ताकीद काडीमात्र नाहीं...... रघोजी भोसले मानवतास येऊन लाख रुपये खंडणी घेऊन पाथरीस वेढा घातला.[११] एवंच येथील भागांतील लोकांची काय स्थिति झाली असेल याची यांवरून कल्पनाच करावी. निजामाच्या फौजेनें जोगाई भ्रष्टविली म्हणावें तर तोच प्रकार शिंद्याच्या पेंढाऱ्यांनीं रायमोहो हा बीड परगण्यांतील गांव लुटतांना केला. त्यांनींहि ब्राह्मणांवर व त्यांच्या बायकांवर तसेच अत्याचार केले. या पेंढाऱ्यांत रोहिले मुसलमान बहुसंख्य असत आणि

११. Nagpur Affairs Vol. I No. 304

ही गोष्ट खर्ड्यांच्या लढाईनंतर झालेली आहे हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. म्हणजे शत्रूचा नायनाट करण्यासाठीं म्हणून जें आपलाच मुलूख जाळण्याचे युद्धतंत्र महाराष्ट्रांत एक शतकापूर्वींच सुरू झालें होतें, तो प्रकार पुढेंहि तसाच सतत चालू राहिला असें दिसतें. मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे हिंदुस्थानावर काय दुष्परिणाम झाले व ठिकठिकाणच्या स्थानिक रहिवाशांचें मत मराठ्यांबद्दल अनुकूल कां राहिलें नाहीं याचा विचार एक स्वतंत्र ग्रंथ लिहून करावा लागेल एवढा मोठा आहे.

मार्चच्या आरंभीं निजाम पारगांवास होता. त्याचे गारदी व स्वार पश्चिमेस मोहरीच्या घाटावर पेंढाऱ्यांना तोंड देत पहाऱ्यावर असत. सिद्दी इमाम हा निजामाचा दूत गोविंदराव काळ्याकडे नेहमींच उभा असे. सल्ला करावा असें त्याचें बोलणें होतें.[१२] लष्कराचा मुक्काम पुढें हलवावयाचा कीं नाहीं याबद्दल पुण्याच्या पत्राची वाट निजाम पहात होता, पण पत्र येण्यासारखें आतां कांहीं उरलेंच नव्हतें. गोविंदरावानें स्पष्ट सांगितलें कीं, "कूच करणें किंवा मुक्काम या विषयीं आम्ही कांहींच म्हणत नाहीं आणि म्हणणारहि नाहीं. जशी तुम्हांस सलाह वाटेल तसें करावें. आमचा प्रतिबंध किमपि तुम्हास नाहीं. पत्राचा जबाब तुम्हांस पावे तोपर्यंत नबाबाचा मुक्काम तेथेंच असावा अशी खावंदाची आज्ञा आम्हांस आली नाहीं. आमचे बोलण्याची प्रतिक्षा तुम्ही करूं नये."[१३] तेव्हां मग निजामाची फौज पुढें चालूं लागली. ३ मार्च रोजीं निजामाचें लष्कर मोहरीचा घाट उतरूं लागलें व निजामानें स्वतः त्यामागोमाग जाण्याची तयारी केली. रुसून गेलेला निजामाचा सरदार अजीमुद्दौला याची भेट यापूर्वीं नुकतीच पेशव्यानें जाहीरपणें घेतली होती.[१४] व ही गोष्ट निजामाला साहजिकच सूचक वाटली. ता. ४ रोजीं निजाम मोहरीचा घाट उतरून तेलंगसी व मोहरी या गांवामध्यें त्यानें मुक्काम केला. त्याच्या आघाडीस तेजवंत भारामल तीन मैलावर असून त्याचें व शिंद्याचें लष्कर यांमध्यें ९ मैलांहून जास्त अंतर उरलें नव्हतें. याच जागेहून परिंड्याचा किल्ला दक्षिणेस २० मैलांवर असून खर्ड्यांची गढी वाटेवर पांच मैल दूर होती.

---

१२. Nagpur Affairs Vol. I No. 305

१३. पा. द. रु. ४३ फा. २० प. १०

१४. का. सं. प. या. ले. ४५८.

या वेळीं इंग्रज वकिलाजवळ रेनेलचा १७९१ सालीं केलेला हिंदुस्थानचा नवा नकाशा असून त्यावरून तो युद्धक्षेत्राची माहिती देतांना आढळतो. निजामाची समजूत पेशवे आपणावर ताबडतोब हल्ला करतील अशी होती. पण होळीचा दिवस असल्यामुळें मराठ्यांनीं ता. ५, ६ मार्च रोजीं कांहीं विशेष हालचाल केली नाहीं. ता. ७ रोजीं निजाम स्वतः लढाईच्या तयारीनें उभा होता. या वेळीं परशुरामभाऊ व बाबा फडके व जिवबा-दादाची एक तुकडी पुढें येऊन त्यांची निजामाच्या आघाडीशीं झटपट झाली. मराठ्यांनीं दुरून तोफाहि सोडल्या.

येथें खर्डे या गांवाची थोडी माहिती देणें आवश्यक आहे. हा गांव जामखेड तालुक्याच्या अगदीं पश्चिम सीमेवर असून तेथें सुलतानजी निंबाळकराची एक जुनी गढी गांवाच्या उत्तरेला एका टेकाडावर आहे. ही गढी अवरंगजेबाच्या कारकिर्दींत मराठ्यांनी मोगलांचा मुलुख व्यापण्याचा जो पद्धतशीर उपक्रम केला होता असें खाफींखान वर्णितो त्या काळांत, कदाचित् सुलतानजीचा बाप हैबतराव याने, बांधली असावी. या गढीच्या उत्तरेस पाऊण मैलावर नदीपलीकडे कान्होबाची टेकडी सुळक्यासारखी मधेच पठारावर उभी असून तिची उंची सुमारे तीनशें फूट आहे. तिच्या उत्तरेकडून मोहरीच्या घाटांतून येणारा रस्ता जातो व पलीकडच्या पांच मैलावर तेलंगसी आहे. या डोंगरावर पूर्वीचें हेमाडपंती देऊळ असून त्याची मशीद बनविली आहे. खर्डें हा गांव तटाच्या आंत असून त्याला वेशी आहेत. गावच्या दक्षिणेकडील पठारावर सुलतानजीने सन १७४३ त नवीन दगडी किल्ला बांधला. त्याला पूर्वीं एक पडकोट व खंदक होता. आतां तो बहुतेक पडला असून आंतील किल्ला तेवढा अजूनहि शाबूत आहे. हा किल्ला आसमंतांतील दहा मैलांत त्याच्या काळ्या भिंतीमुळें कोठूनहि दिसूं शकतो. निजाम ता. ११ मार्चच्या चकमकींनंतर ज्याच्या रात्रीं आश्रयास गेला तो हाच किल्ला, गांवांतील गढी नव्हे. गॅझेटियरने या गढीची दखलहि घेतलेली नाहीं, पण तीहि मोठी उठावदार दिसते. मात्र आतां तिच्या विटा लोक पळवीत असल्यामुळें ती पडीक झाली आहे. ताराबाईच्या कारकिर्दींत मराठ्यांनी व्यापलेला हा मुलुख पुनः कायम निजामाच्या राज्यांत गेला ही करुणकहाणी हे नवे जुने अवशेष पाहिल्यानें मनांत ठसते. खर्डें गांवाच्या उत्तरेस जी नदी आहे म्हणून लिहिलें ती

खर नदी नसून तिला मिळणारा एक नाला आहे, पण त्यालाहि पाणी असतें. नदी व कानोबाचा डोंगर यांच्यामध्यें ओंकारेश्वराचें भव्य देऊळ, त्यासमोर भव्य बारव व जवळच निंबाळकरांच्या छत्र्या आहेत. या सर्व गोष्टी आज शाबूत आहेत त्यावरून या युद्धांत गांवाला उपसर्ग लागलेला नसावा. लढाईला खर्ड्यांचें नांव मिळालें असलें तरी युद्धांतील मुख्य चकमक खर्ड्यांच्या नैर्ऋत्येस खर नदीपलीकडे असलेल्या सात मैलावरील एका टेकाडावर झाली. ही टेकडी आतां रणटेकडी या नांवानें प्रख्यात असून सभोंवतालच्या प्रदेशांत ती दूरवर उंच दिसते. मराठ्यांच्या आघाडीच्या फौजेचा तळ खर्ड्यांच्या पश्चिमेस आठ मैलावर घोडेगांव ते वाघें या दरम्यान कनारी नदीच्या वळणांत होता. याच्या ईशान्येस दोन मैलावर पिंपळगांव आळवे येथें त्याच नदीच्या वरील पाण्यावर शिंद्यांच्या फौजेचा तळ होता. भोसल्यांचें सैन्य घोडेगांवच्या दक्षिणेस जवळकें येथें पांच मैलांवर होतें. ता. ९ मार्च रोजीं निजाम तेलंगसीहून कूच करून खर नदीच्या पश्चिम कांठाने खाली सरकून खर्डें व घोडेगांव यांच्या मध्यावर लोणी ते वाकी यांच्या दरम्यान येऊन उतरला. त्यांवर पेशव्यांच्या फौजा जाऊन थोडी लांबून गोळागोळी होऊन संध्याकाळीं पेशव्यांच्या फौजा मागें मुक्कामावर परत आल्या. निजामाचा बेत खालीं दक्षिणेस परंड्याच्या किल्ल्याच्या आश्रयास जाण्याचा होता. त्याला तेथें पोंचण्यापूर्वींच नेस्तनाबूत करण्याचा मराठ्यांचा डाव ठरला. ता. ११ मार्च रोजीं पहाटे निजामाचें सैन्य लोणीहून कूच करून पद्धतशीर दक्षिणेकडे चाललें. त्यावेळीं सेनापति परशुरामभाऊ पटवर्धन तरडगांवच्या पश्चिमेस व आजच्या दोंडेवाडीच्या नैर्ऋत्येस मैलाच्या आंत असलेल्या रणटेकडीच्या आडोशास निजामावर कसा हल्ला चढवावा याची टेहळणी करीत उभा होता. त्याला निजामाचें सैन्य दिसणें शक्य नव्हतें, अशीच सखल ती जागा आहे. परशुराम-भाऊचा बेत टेकडीवर तोफा चढवून पूर्वेकडे निजामाच्या चालत्या फौजेंवर मारा करण्याचा होता. पण यापूर्वींच निजामाला बातमी लागल्यामुळें कीं काय कोणास ठाऊक, त्यांचें आघाडीचें सैन्य त्वरेने उजवीकडे सरकून परशुरामभाऊच्या छोट्या तुकडीवर येऊन त्याने अकस्मात् हल्ला चढविला. या चकमकींत परशुरामभाऊस कपाळावर व हातावर जखम लागली, त्याजवळ उभे असलेले चिंतामणभट खाडिलकर व विठ्ठलराव पटवर्धन ठार

झाले व सैन्याची पांगापांग होऊन तें पळालें. त्याच्या आसमंतात असलेले बाबा फडके, बाबुराव वैद्य व गोविंदराव पिंगळे हे भाऊच्या मदतीस पुढे सरकण्याऐवजी मागच्या मागें जीव घेऊन पळाले. या बाबा फडक्याला लढाईचा कांहींच अनुभव नव्हता व हे राव केवळ हरिपंताचे चिरंजीव म्हणून नानांनी लष्कराचे मुख्य व्यवस्थापक नेमले होते. यावेळीं दोन प्रहरचा सुमार होता. उत्तरेकडे जिवबादादानें यापूर्वींच तोफांचा मारा निजामाच्या आघाडीवर चालू केला होता. त्याला ही बातमी कळतांच त्यानें सांडणीस्वार बाबाकडे पाठविला. त्यानें बाबाची बहुत निर्भत्सना केली. तसेंच महादजी शितोळे म्हणून शिलेदार होता, त्यानें तर बाबास शिव्या दिल्या आणि तोंडावर थुंकून कपाळ बडवून घेतले. तेव्हां खजील होऊन मागें एक कोस पळालेले बाबा वीरश्री धरून तरवार उपसून चालले. यावेळेपर्यंत पेशव्यांचा तोफखाना सखारामबापू पानशे यांच्या हाताखालीं दाखल होता तर निजामाचा धुव्वा उडता. पण तो सायंकाळीं निजामाची आघाडी मागे सरल्यावर येऊन दाखल झाला. तेव्हां पाठीमागून हुजरात तयार होऊन पुढें सरली व निजामाच्या आघाडीवर घसरली तेव्हां चकमक होऊन निजामाचा अंबारीतील सरदार लालखान कडपेकर ठार होऊन पटवर्धनाकडे पाडाव झाला व रावरंभा निंबाळकर, भारामल, आसदअली-खान वगैरे घोडदळाचे सरदार जखमी होऊन मागें हटले. मराठ्यांस जय मिळाला. एवढें होईपर्यंत रात्रीची सहा घटका वेळ झाली.

या लढाईत शिंद्यांचा तोफखाना व गारदी व नागपुरकर भोसल्यांचे बाण यानीं मोठी कामगिरी केली. मराठ्यांच्या फौजेची रांग उत्तरेकडून दक्षिणेकडे शिंदे, पेशवे, पटवर्धन, होळकर व भोसले अशी होती. पिछाडी-कडून आघाडीकडून निजामावर मारा झाला व त्याचा पुढील मार्ग खुंटला. तोंड वळवून तो मागें वळतो तों चाळीस हजार घोडेस्वारांचा मार त्यावर येऊन पडला. तेणेंकरून व मुख्यतः काळोखामुळें त्याची फळी फुटली. या गोष्टीचा फायदा मराठ्यांस मिळाला. निजाम बुणगे पुढें घालून आपण मागें जनाना व जवाहिरखाना यांसहित बंदोबस्तानें चालला होता. त्याच्याजवळ यावेळीं ७०० हत्ती होतें असें एक ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. मराठ्यांचें घोडदळ आघाडी मोडून बुणग्यांत शिरलें तेव्हां निजाम डाव्या बाजूकडे वळून खर नदी ओलांडून खड्यांच्या वाटेस

लागला. आरंभीं उजेड अगदींच नसल्यामुळें गोंधळ झाला होता तो चंद्रोदय होऊन वर आल्यावर थोडा कमी झाला. मशाली वगैरे लाऊन निजाम पहाटेस खड्र्यांच्या किल्ल्याजवळ येऊन दाखल झाला. जिवबादादा बक्षी मध्यरात्रीपर्यंत लढून परत छावणींत आले व थोडी विश्रांति घेऊन पुनः प्रातःकाळीं हल्ला चढविण्याची तयारी त्यानें चालविली. पेंढाऱ्यांनीं रात्रींच लूट करून हत्ती, घोडे, उंट जें हातीं लागलें तें पळविलें. दारु-गोळयाचे छकडे व तोफा मागें पडल्या होत्या त्या मग सावकाशीनें मराठ्यांनीं ताब्यांत घेतल्या. इंग्रज वकील कर्कपॅट्रिक याच्या मतें निजामाला असलेल्या जागींच नदीकांठीं मुक्काम करणें अशक्य नव्हतें, पण मुसा रेमूच्या पायदळाला निजामाच्या रक्षणार्थ मागें फिरणें भाग झाल्यामुळें सर्व गोंधळ उडाला व आयता पाण्याच्या कांठीं असलेला तळ खड्र्यांच्या माळावर येऊन मुख्यतः पाण्याच्या अडचणीत सांपडला. या वकिलाच्या मतें लढाई अशी फारशी झालीच नाहीं. लहानशा चकमकीनेंच कच खाऊन निजामाचे सैन्य पळालें. ही गोष्ट दोनहि पक्षीं अकल्पित अशी झाली. मराठ्यांच्या सैन्यांतहि एकजूट वा एक हुकूम नव्हता. पण वेगवेगळे पुढारी आपापल्या रक्षणाविषयीं व स्वार्थाविषयीं जागरूक होते व एकंदरींत मराठ्यांचें सैन्य निजामाच्या सैन्याशीं तुलतां सर्व बाजूंनीं चांगलें होतें. निजामाच्या सैन्यांत मुख्य दोन तट होते. एक मुषीराचा व दुसरा इतरांचा. या सैन्यांतील कोणालाहि राज्याचा, राष्ट्राचा किंवा व्यक्तीचा अभिमान असण्यास कारणच नव्हतें. बहुतेक सारे हंगामी, पगारी नोकर. मुषीरानें जुन्या पागा मोडल्यामुळें त्यांच्या मालकांचा स्वाभिमान दुखविला गेला होता व त्यांची मनांतून इच्छा मुषीर कारभारांतून निघावा अशीच होती. ही गोष्ट लढाईच्या नंतर दिवसें दिवस उघड होत गेली. आधीं भीतीनें जे मुषीराविरुद्ध बोलावयास धजत नव्हते ते हळूहळू धीट झाले व त्याविरुद्ध बोलूंहि लागले. जें निजामाचें सैन्य मोहरीचा घाट उतरतांना लाखावर होतें तें महिन्यानंतर परत जातांना पस्तीस हजारांहून जास्त नव्हतें, या वरून या सैन्याच्या रचनेची कल्पना येईल. अशी स्थिति मराठ्यांची नव्हती. त्यांचें बरेंचसें सैन्य मराठ्यांचेंच असून त्याला कमी जास्त प्रमाणांत राज्याचा, राष्ट्राचा व धर्माचाहि अभिमान होता. व्यवस्थेच्या व तरतुदीच्या बाबत नाना फडणीस अत्यंत जागरूक होता.

स्वाभिमान व स्वार्थ यांचा मेळ सुद्धां यावेळीं मराठ्यांच्या बाजूस पडत होता. यामुळेंच ही मोहीम नुसत्या युक्तीच्या हालचालीनेच यशस्वी झाली असें म्हटलें पाहिजे.

ता. १२ मार्च रोजीं सकाळीं निजाम खर्ड्यास परत गेला ही खात्री होतांच मराठे नदी ओलांडून पुढें सरले व त्यांनीं बाजारबुनगे लुटले, तोफा व दारूचे छकडे तसेच घोडे, उंट व थोडे हत्ती हेहि लुटींत आले. आतां मराठ्यांची आघाडी खर्ड्यापासून एक मैल ते दोन मैल या दरम्यानमधील एका ओढ्यावर आली. खर्ड्याची रचनाच अशी आहे कीं, उत्तर, पूर्व व दक्षिस बाजूस टेकड्या आहेत व पश्चिमेच्या बाजूस मराठ्यांनीं अर्धचंद्राकृति रचना करून त्याचा बाहेरच्या जगाशीं संबंध तोडला. या पहिल्या दिवशीच्या धक्क्यानेच तिसरा हिस्सा लोक सैन्यांतून निघून गेले असावे. निजामाच्या बारा तोफा, सुमारें ८० दारूचे पेटारे व पांचशें छकडे मागें टाकलेले मराठ्यांस आढळले. मेलेल्या लोकांची संख्या दोनशेंवर नसावी. जखमी हजार पांचशें. या युद्धांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, खुद्द पेशवे व नाना फडणीस, तसेंच दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर व रघोजी भोसले हे सर्व रणांगणावर युद्ध करण्यास कधींच पुढें आले नाहींत. मागील छावणींत दहा मैलांपलीकडे राहून ते नुसती बातमी ऐकत बसले होते. एवढा फरक यावेळीं मराठेशाहींत पडला होता! नानासाहेब पेशव्याच्यापासून हा नवा पायंडा पडत गेला, तरी माधवरावाच्या कारकीर्दींत तो स्वतः आघाडीस राहिल्यामुळें इतरांसहि फारशी कुचराई करतां आली नाहीं. पण सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत हा प्रकार जारी झाला. त्याचा परिणाम बाबा फडके यासारखा पालखींतून फिरणारा माणूस युद्धांत प्रमुख करण्यांत झाला. वास्तविक या लढाईचें स्वरूप इतकें सौम्य होतें कीं,खुद्द माधवराव वा दौलतराव व रघूजी हे सैन्यांत असते तरी त्यांच्या जीवास धोका नव्हता. पण आतां हे सर्व राजबिंडे संस्थानिकच झाले होते. जिवबादादा व परशुरामभाऊ यांसारखे सारी हयात सैन्यांत घालविलेले जुने आणि जाणते नेते हजर असल्यामुळेंच या लढाईचा विचका झाला नाहीं एवढेंच. निजामाच्या बाजूचीहि तशीच स्थिति असल्यामुळें मराठ्यांस फारसे श्रम न करतां जय मिळाला. लढाईतील धोक्याचें स्वरूप नाहींसें होण्यास आघाडीचा

तोफखाना व त्यामागील गारदीकंपू ही नवीन रचना कारणीभूत होती. पण त्याबरोबरच जुन्या मराठे घोडदळांतील स्वतःच्या जबाबदारीवर लढाईचें स्वरूप हवें तसें पालटविण्याची अंत:स्फूर्ति समूळ नष्ट झालेली दृष्टीस पडते. निजामाच्या जागीं वेलस्लीसारखे सेनापति जेव्हां मराठ्यांसमोर उभे राहिले तेव्हां मराठ्यांच्या युद्धरचनेंत पडलेला महान् फरक उघडा झाला. त्याचें जणूं छोटेंसें प्रात्यक्षिकच खड्र्यांच्या लढाईत दिसलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

पाठीमागच्या छावणींतील पेशव्यांची दिनचर्या पाहण्यासारखी आहे. पेशवे, नाना फडणीस, इंग्रजांचा वकील मॅलेट व निजामाचा आठ महिन्यापूर्वी बोलाचालीस आलेला वकील मीर आलम, यांचे तंबू सुमारे पाव पाव मैलाच्या अंतराने विंचलनेच्या कांटावर ठोकलेले आहेत. त्यांच्या रक्षणार्थ दहा हजारावर निवडक व विश्वासाची फौज खडी आहे. पेशव्याची निजण्याची कलंद्री, देवपूजेची राहुटी, तालीमखान्याची राहुटी, कचेरीचा मोटा डेरा या ठिकाणीं त्याची छावणीत शक्य ती राजविलासी सोय करण्यांत आलेली आहे. त्याच्या दिमतीस दहावीस ब्राह्मण कारकून मुत्सद्दी असून खेरीज मराठे शिलेदार व सांडणीस्वार, जासूद, पालखी अंबारी वगैरे सर्व सरंजाम आहे. पेशवे प्रात:काली गजर वाजल्यावर उठून बाहेर येत, तेथें रात्रीच्या चौकीच्या लोकांचे नमस्कार व रामराम घेऊन शौचास जात, नंतर देवपूजेच्या राहुटींत स्नानसंध्या करून, तालीमखान्यांत जाऊन पोषाख बदलून बाहेर येऊन बसत. बाहेर कडक ऊन व ओसाड माळ असल्याने तंबूभोंवतीं दोन प्रहरीं भिस्त्याकडून पाणी शिंपडण्यांत येई. १० वाजतां पेशवे भोजन करीत. त्यांच्या पंक्तीस सुमारें वीस लोक आलटूनपालटून खास बोलाविलेले असत. पेशवे स्वतः सोंवळें नेसून आपल्या देवपूजेच्या राहुटींत स्वतंत्र जेवीत व नंतर बाहेर जेवीत असलेल्या लोकांचा परमार्ष घेत. जेवणास दौलतराव निंबाळकरासारखे हुजरातीचे मानकरी असत. त्यांस सावकाश जेवावें म्हणून सांगून पेशवे उठून डेऱ्यांत आपल्या मसनदीवर येऊन बसत आणि मग जेऊन उठलेल्या सर्वांस विडे देत. नंतर पेशव्यानें दिनकरपंतास आज्ञा केली कीं "छबिन्याचे पांच स्वार पाठवून पांचा कोसावरून तोफेचा आवाज ऐकूं येतो कीं काय तें त्यांनी कानानें ऐकावें आणि माघारी यावें." याप्रमाणें सांगोन माधवराव[15] ता. १२ मार्च

१५. पारसनीस रु. ४३, फा. २०, प. ३.

रोजीं दुपारीं नंतर शौचास जाऊन गंजीफा खेळून निद्रेस गेले. सायंकाळीं चारच्या सुमारास नाना फडणीस पेशव्याकडे आले ते आठ वाजेपर्यंत तेथें होते. नंतर पेशवे तालीमखान्याचे राहुटींत पोषाख उतरून देवपूजेचे राहुटींत भोजन करून आपल्या कलंद्रींत बुद्‌बळें खेळून निद्रावश झाले. ता. १४ मार्च रोजी पेशव्याला लढाई समजावून देण्यासाठीं पांडुरंगपंत गोडबोल्यानें अघाडीस जाऊन नकाशा काढला होता, तो त्यास आणून दाखविला. (असा एक मोडी अक्षरांत लिहिलेला नकाशा मेणवली दप्तरांत सांपडला आहे तो पहातां दिशा व अंतर हीं मराठ्यांना किती प्रमाणांत चित्रित करतां येत यांचा बोध होतो.) पेशव्याच्या सहवासांत यावेळीं अप्पा बळवंत मेहेंदळे, गोविंदराव पिंगळे, बाबुराव वैद्य, राघोपंत गोडबोले, विठ्ठलराव पोतनीस, आबा ठोसर प्रभृति मंडळी आहेत. नाना रोज सायंकाळी चार तास येऊन जात व मुद्दाम बोलाविल्यास इतर वेळींहि येत. या दिवशींच्या बोलण्यांत निजामाची व पेशव्याची भेट व्हावयाची व नंतर परस्परांच्या मेजवान्या व्हावयाच्या, असें आहे. पण भेट होईलच अशी खात्री दिसत नाहीं. तहाच्या बोलाचालीचें बोलणें पेशव्यासमक्ष गोविंदराव काळे व नाना करीत. पेशवे स्वतः कोणास चिठ्ठ्या व पत्रें पाठवूं शकत व स्वतंत्र बातमीहि आणवीत. पेशव्याच्या देखत पत्रांवर शिक्के करून तीं पाठवीत. कुचाची नौबत दोन घटका रात्र उरली म्हणजे होत असे व तिला पेशव्याची परवानगी घ्यावी लागे. पेशव्यांच्या देवांची पालखी नेण्यासाठी स्वतंत्र स्वार असत. ता. २७ मार्च रोजीं मुषीर-उल्मुल्क पेशव्यांच्या छावणींत येऊन राहिल्यानंतर मग दोन दिवसांनीं पेशवे, नाना वगैरे मंडळी पुढे आघाडीस जाऊन कोसावरून दुर्बिणीने खर्ड्यांचा किल्ला पाहून व परशुरामभाऊ प्रभृति जखमी लोकांचा समाचार घेऊन परत मुक्कामास आली. हाच काय तो पेशव्याचा लढाईतील स्वतःचा भाग!

ता. १२ मार्च ते २७ मार्च पर्यंत १५ दिवस तहाच्या वाटाघाटींत गेले. या अवधींत निजामाच्या सैन्याची हलाखी दरदिवस वाढत गेली. निजामाने दुसऱ्याच दिवशीं गोविंदराव काळ्यास युद्ध तहकूब करण्याविषयीं सांगितलें व मोघम म्हटलें कीं, सर्व कांहीं तुमच्या इच्छेप्रमाणें होईल. जसा निजामानें ता. ११ रोजीं रात्रीं खर्ड्याकडे परत फिरण्याचा हुकुम सोडला तसा तहाच्या अटींबद्दल त्याचा निश्चय नव्हता. मुख्य अडचण म्हणजे

त्यानें मुषीराला दिलेल्या वचनाची. 'मी तुला स्वतः होऊन कधीं कारभारांतून काढणार नाहीं किंवा शत्रूच्या हवालीं करणार नाहीं किंवा दगाफटका करून तुझा काटा परस्पर काढण्याची तजवीजहि कधीं करविणार नाहीं,' असें[१६] निजामाचें वचन होतें. अर्थात् प्राप्त परिस्थितींत पुढें राज्याच्या व सैन्याच्या सुरक्षिततेसाठीं जे कांहीं करावयाचे तें मुषीरानेंच स्वतः ठरवावयाचें होतें. मराठ्यांनीं प्रत्यक्ष मुषीराला कारभारांतून काढा असें निजामाला कधीं सांगितलें नाहीं. पण वकिलाकडून परस्पर सतत एवढेंच ऐकविलें कीं, दोन दोस्तांत वितुष्ट यावयास हाच एक माणूस कारणीभूत आहे तेव्हां त्याचा बंदोबस्त निजामानें हवा तसा करावा. ज्या पांच इसमांनीं निजामअल्लीला मदत करून मसनदीवर आणलें त्यांतील एक मुषीर होता. पण निजामअल्लीनें पांचांतील दुसरा जो रुक्नुद्दौला त्याचा काटा बारभाईचें कारस्थान ऐन रंगांत असतां मारेकरी घालून अत्यंत क्रूरपणानें काढला होता. व म्हणूनच मुषीरानें निजामाकडून वरीलप्रमाणें वचन घेतलें होतें असें दिसतें. अर्थात् निजाम भारतीय योद्ध्यांप्रमाणें कधींहि वचन मोडणारा नव्हता असें इतिहासावरून म्हणणें कठीण आहे. पण यावेळीं मात्र त्यानें खरोखरीच मुग्ध राहण्याचें धोरण स्वीकारलें. युद्ध आपणाला अशा पेंचांत आणील अशी मुषीराची कल्पना नव्हती व म्हणूनच त्यानें हें मोहरीचा घाट उतरण्याचें साहस केलें होतें. त्याचें मत मुसा रेमू मराठ्यांच्या तोफखान्याला व गारद्यांना व असदअल्ली वगैरेंचे घोडदळ हुजरातीला पुरून उरेल असें असावें. इंग्रज वकील कर्कपॅट्रिक याचेंहि तसेंच मत असल्याचें वर सांगितलेंच आहे. यांत एक तर त्याला शिंद्यांच्या कंपूची नीटशी कल्पना नव्हती व आपापसांत नेहमीं वैमत्य दाखविणारे मराठे सरदार एकत्र येतील वा एकोप्यानें वागतील असेंहि वाटलें नसावें असें दिसतें. म्हणजे ज्या कारणांचा अंदाज न आल्यामुळें व मराठ्यांबद्दल चुकीची समजूत करून घेतल्यामुळें जसा वॉरन हेस्टिंग्ज पेंचांत आला होता तसाच आतां मुषीरहि आला असें म्हटलें पाहिजे. सतराव्या शतकांतील मराठ्यांनीं तीन पिढ्या जो पराक्रम व प्रचार केला त्याचा एवढा ठसा महाराष्ट्रावर उठला आहे कीं, तो आतां तीन शतकांनीं पारतंत्र्यानंतरहि पुसला जाऊं शकत नाहीं. मग जेव्हां स्वातंत्र्य गेलें

१६. पारसनीस रु. ४३, फा. १०, पत्र ७.

नव्हतें तेव्हांची गोष्ट कशाला बोलावयाची आहे? आपण सर्व एक, शिवछत्रपति निर्मित आपलें राज्य ही एक राष्ट्रीय अभिमानाची जतन करण्यासारखी वस्तु आहे, असें मत सर्व मराठ्यांत सारखेंच जागृत होतें. त्यामुळेंच वेलस्लीकृत पराभवानंतरहि पुनः यशवंतराव होळकर, दौलतराव शिंदे, रघूजी भोसले व बाजीराव हे अखेरपर्यंत कारस्थानें करीतच राहिले. हेंच काय, पण प्रत्यक्ष इंग्रजी राजवट झाल्यानंतरहि शिंद्यांनीं लॉर्ड एलन-बरोबर युद्ध पुकारलें व राज्य गेलेले नानासाहेब व लक्ष्मीबाई यांनीं उठाव केला. कल्पनेचा व अभिमानाचा इतिहासांतील परिणाम कसा असतो याचें हें उत्तम उदाहरण होय.

या पंधरा दिवसांतील प्रत्येक छावणींतील हकीकत सांगणारीं वेग-वेगळ्या बातमीदारांचीं शेकडों पत्रें मेणवली दप्तरांत उपलब्ध आहेत. त्यावरून पहातां या युद्धाला कठोरपणाचें स्वरूप कोठेंच आलेलें दिसत नाहीं. निजामाचें आरंभापासून असें मत होतें कीं, मराठ्यांचे फौजेशीं भांडून परिणाम नाहीं असा आपला अनुभव सांगतो. सारी खुमखुम मुषीराचीच होती. त्याने निजामाच्या राज्यांतील मराठे सरदार बहुतेक गुंडाळीत आणले होते. जुने पागेवाले मुसलमान सरंजामदार मोडून त्या जागीं आपल्या अनुयायांची पथकें त्याने पुढें आणलीं होतीं. दर खेपेस मराठे जागिर-दारांचा उणेपणा दाखविण्यास तो टपलेला असे आणि ती गोष्ट खरीच होती. नेमाजी शिंदे, चंद्रसेन जाधव, सुलतानजी निंबाळकर प्रभृति सारे मराठे सरदार पेशव्यांशीं लढतांना कधींच मनापासून काम करीत नसत. अशा स्थितीमुळें निजामी राज्यांतील अर्ध्याहून अधिक सैन्य मुषीराचा पाणउतारा कसा होईल याची मनांतून वाटच पहात होतें. पूर्वायुष्यांत मुषीराने रणांगणावर काय बहादुरी दाखविली असेल ती असो, पण गेल्या पंधरा वर्षांत तो कारस्थानी मुत्सद्दीच बनला होता. त्याचें दुर्दैव असें कीं याचवेळीं मराठ्यांकडे त्याच्या डावपेचांस पुरून उरणारा नाना फडणीस अधिकारावर होता. तसेंच महादजी शिंदे यावेळी मरून शिंद्यांच्या जागिरीचा प्रश्न सोडविण्याचा अधिकार त्याच्याच हातांत आला होता, यामुळें दौलतराव शिंदे व जिवबादादा यांना हवे तसे राबवून घेण्याची संधि त्याला प्राप्त झाली होती. या सर्व गोष्टी मुषीराच्या अंदाजाबाहेर घडल्या व आतां लढाईला मिळालेल्या अनिष्ट कलाटणीमुळें आपला सर्व

अभिमान गुंडाळून पेशव्यांच्या स्वाधीन होण्याखेरीज त्यास अन्य मार्ग उरला नाही.

लढाईपूर्वी दोन दिवस निजामाकडून दौलताबादी द्राक्षांच्या डाल्या मराठ्यांकडे भेट म्हणून पाठविल्या जात होत्या.[१७] यांत निजामाचा हेतू मराठे गाफील रहावे असा असण्याचा संभव आहे असें कोणी म्हणेल तर तें उपलब्ध पत्रव्यवहारावरून टिकणारें नाहीं. पेशव्यांचा वकील गोविंदराव काळेच काय, पण त्याचे व इतर प्रत्येक मराठे सरदाराचे वकील वा हस्तक निजामाच्या छावणींत होते. जासुदांचीं पथकें घटकेघटकेची बातमी त्याच्या छावणीतून मराठ्याच्या छावणींत कळवीत होतीं. बाबा फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, रघूजी भोसले यांच्या मार्फत तहाच्या अटी सौम्य करून घेऊं अशी आशा निजामाकडील सरदारांना व मुत्सद्यांना अखेरपर्यंत वाटत होती. निजाम मोडावयाचा नाहीं, राखावयाचा आहे अशी ताकीद श्रीमंतांनी आपल्या फौजेंत केली होती असें तत्कालीन यादींत स्पष्ट लिहिलेलें आहे.[१८] हेंच काय, पण निजामाची हलाखी ऐकून श्रीमंतानी पाण्याच्या पखाली व मिठाचे छकडे पाठविले अशीहि वदंता या यादींत नमूद आहे. सवाई माधवरावाच्या दिनचर्येची माहिती देणाऱ्या बातमीपत्रांत नबाबाच्या भेटी होऊन परस्परांच्या मेजवान्या होतील असें बोलणें पेशवे व मोरोपंत भावे यांमधे झाल्याचे नमूद आहे. अर्थात् यावेळीं मुषीर पेशव्यांच्या स्वाधीन होईल असा अंदाज नव्हता. पुढें ता. २७ रोजी मुषीर पेशव्यांच्या छावणींत आला तेव्हां त्याच्या मानमरातबांत नाना व पेशवे या दोघांनी कोणतीहि कमतरता दाखविली नाहीं. तो निजामाच्या कारभारांत नसावा हें आपलें म्हणणें तडीस गेल्यानंतर त्याला जास्त कांहीं शासन नानानें घडविलेलें दिसत नाहीं. निजामाचा पाणउतारा आपला दिवाण शत्रूच्या स्वाधीन करावा लागला यांत काय झाला असेल तो असो, पण एरवीं त्यालाहि कोणतीहि अद्दल मराठ्यांनी घडविलेली दिसत नाहीं. अखेर त्याची त्यालाच स्वतःच्या दोषाची जाणीव झाल्यामुळें तो पेशव्यांची भेट न घेता लाज वाटून तसाच परत गेला असा ध्वनि बातमीदाराच्या पत्रांत आहे. निजाम-पेशवे भेट व्हावयाची तर ती कशी व्हावयाची, सर्व सरदारांसह

१७. पारसनीस रु. ४३, फा. २०, पत्र ७.

१८. काव्येतिहाससंग्रह—पत्रे यादी ले. ४६०.

एकदम व्हावयाची कीं अलग अलग एकमेकांची व्हावयाची, याची चर्चा मराठ्यांच्या छावणींत झालेली आढळते. दग्याफटक्याची भीति मराठ्यांना अखेरपर्यंत वाटत होती, कारण मोंगलांचा तसा जन्मस्वभाव असल्याचें मराठ्यांचें त्यांबद्दल कायम मत होतें. त्यामुळें शक्य ती काळजी घेणें हें युक्तच होतें. पण भेटल्याशिवाय निजाम परत गेला ही बरी गोष्ट झाली असें आम्हास ऐतिहासिक दृष्ट्या वाटत नाहीं. यांत नानाचा फाजील शंकेखोरपणासुद्धां आड आला असण्याचा संभव आहे.

ता. १३ मार्च रोजीं सायंकाळीं बाबा फडक्यानें रक्षणार्थ मराठे स्वार पाठवून, गोविंदराव काळयास खर्ड्याहून आपल्याकडे आणविलें. वास्तविक ही गोष्ट नाना फडणीसाला कळविल्याशिवाय परशुरामभाऊ व जिवबादादा यांच्या विचारें त्यानें केली. जयराम गोविंद हा जासूद कारकून प्रथम गोविंदरावाकडून बाबाकडे आला. त्यानें सांगितलें कीं, दौलतरावानें गोविंदरावास पत्र लिहून निजाम **दक्षिणच्या सुभेदारीचा जाबसाल** आमच्या मर्जीप्रमाणें करण्यास राजी असेल तर तुम्ही यावें, नाहींतर येण्याचे कारण नाहीं, असें कळविलें होतें.[१९] यावरून दौलतरावाजवळच्या बाळोबा तात्या पागनीस प्रभृति मुत्सद्यांचें मत दिग्दर्शित होतें. महादजी शिंद्याला पेशव्याच्या वकील–इ–मुत्लकीची नायबी मिळाल्यानंतर त्याचा अधिकार वस्तुतः निजामासारख्या सुभेदाराला बडतर्फ करण्याचा होता. महादजीचा हेतु निजामाला आपल्या ह्या अधिकाराची चुणुक दाखविण्याचा होता असें प्रसिद्ध पत्रव्यवहारावरून दिसतें. पण शिंद्याच्या छावणींतील मुत्सद्दी अजून हा हेतु मनांत धरून असले, तरी आतां खुद्द दौलतरावालाच महादजीचा वारस म्हणून मंजुरी द्यावयाची कीं नाहीं हा अधिकार पेशव्यातर्फे नानाकडे आला होता, त्यामुळें खर्ड्याच्या लढाईतील राजकारण अगदीं वेगळें झालें. शिंदेशाही मुत्सद्यांनीं पेशव्यास कळविलें होतें कीं, निजामाची मोहीम आम्ही एकटेच स्वतःच्या बळावर तडीस नेतों. फक्त पेशव्यानें दौलतरावाकडून मंजुरीबद्दल नजराणा हबकण्याचा विचार मनांत आणूं नये. नानानें नजराण्याची माफी दिली, पण शिंद्यास मोहिमेच्या खर्चाबद्दल मग कांहीं मिळणार नाहीं असेंहि बजाविलें. मात्र मोहिमेचें यश व तदनंतरच्या तहाच्या वाटाघाटीचीं सूत्रें आपल्या हातून

१९, पारसनीस रु. ४३, फा. २०, प. १०६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत क्रमांक २८६११ वि: ९९८२ १२/१०/६५ २५।५।५५

शिंद्याच्या हातांत जाऊं देण्यास नाना राजी नव्हता. कारण त्यामुळें पुण्याच्या ब्राह्मणकंपूचा अधिकार संपुष्टांत आला असता. एकट्या शिंद्याच्या हातून मोहीम तडीस जाणें अशक्य नव्हतें, फक्त त्याला उत्तरेंतून आणखी सैन्य बोलवावें लागलें असतें. या अंतस्थ फुटीचा फायदा निजामाला मिळून तो वांचला. एरवीं बहुधा महाराष्ट्रांतून तरी त्याची हकालपट्टी त्यावेळींच व्हावयाची. आणि तसें होतें तर आजचा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न त्यावेळींच कायम निकालांत निघाला असता. नानानें यावेळीं सवाई माधवराव त्याच्या हातांत असल्यामुळें गप्प बसविलेले शिंदेशाही मुत्सद्दी व सेनानी पुढें संधि येतांच बाजीराव आपल्या हातीं घेऊन नानाशीं कसे वागले तो इतिहास सुविज्ञात आहे.

जसजसे जास्त दिवस जाऊं लागले तसतशी निजामाच्या फौजेंतील हलाखी वाढत गेली. त्या वेळीं बाजाराची पद्धत असल्यामुळें इंग्रजांच्या पद्धतीप्रमाणें सर्वांना असलेलें धान्य सारखें वाटून मिळणें शक्य नव्हतें. एका बातमीपत्रांत निजामाच्या लमाणांत हजारों धान्य लादलेले बैल आहेत पण त्यास हात लावला जात नाहीं, अशी टीका आहे. याचा अर्थ सैन्यांतील दुष्काळ सर्वांना सारखा बाधत नव्हता असा होतो. पण पाण्याची टंचाई मात्र निजामासुद्धां सर्वांनाच बाधली. पलालभर पाण्याची किंमत पंधरा रुपये इतकी वाढण्यांत या टंचाईचा शेवट झाला. किल्ल्यांतील विहीर पहिले कांहीं दिवस पुरली, पण मागाहून खोदखोदूनहि तींत पाणी येईना इतकें तें आटलें. ज्यांच्याजवळ पैसा नव्हता असे शिपाई दीनवाणे होऊन जिवबाच्या तोफांच्या टापूत येत व बंदुका खालीं ठेऊन पाणी पिण्यासाठी नदीवर येऊन गुरांप्रमाणें तोंडानें पाणी पीत. त्यांना प्रतिबंध करणें म्हणजे ठार मारणेंच होतें. तसें करण्याचा मराठ्यांस धीर झाला नाहीं. गोविंदराव काळे १३ मार्च रोजीं मराठ्यांकडे येऊन प्रथम बाबा फडके, परशुरामभाऊ, दौलतराव व रघोजी यांची भेट घेऊन नानाकडे गेला व तेथून अटी ठरवून परत निजामाकडे गेला. तरीहि निजाम मुख्य अट मुषीराची ती कबूल करीना. मध्यंतरीं रावरंभा निंबाळकर यानें बाबाला लिहून 'मला सांगाल तर मी निजामाला एकटा भेटून व मुषीराला उखडून तह घडवून आणतों, मात्र गोविंदरावाला ही गोष्ट कळूं नये' असे[२०] लिहिलें

२०. पारसनीस रु. ४३, फा. २०, प. ३४.

होतें. "नबाबाची दौलत राखावी, केवळ हाउघाय पडूं नये" एवढेंच त्याचें म्हणणें होतें. ता. १८ मार्च रोजी सरबुलंदजंग याने फारसी खलिता लिहून कळविलें कीं खुद्द निजाम दोनतीन हजार स्वार बरोबर घेऊन सडा येऊन नानाशीं बोलून मराठ्यांच्या सर्व तक्रारींचा व हिशेबांचा एका बैठकींत निकाल करण्यास राजी आहे. पण यावर चर्चा होऊन ठरलें कीं असें झाल्यास मुषीराचा मुद्दा बाजूला पडतो व तो अलगद सुटून जातो, म्हणून त्याचें येणें इष्ट नाहीं. तेव्हां नानाने कळविले कीं आधीं तह व मग भेट. त्यामुळें निजाम पेंचांत पडला. तेव्हां युद्धाची तहकुबी मोडून पुनः युद्ध करावें असा पवित्रा घ्यावा लागला. त्यांतहि अमावास्या म्हणून ता. २० ला युद्ध करूं नये, दुसऱ्या दिवशी वर्षप्रतिपदा शनिवार म्हणून बंद, एवंच ता. २२ ला युद्ध करावें असें ठरलें. पण ता. २१ रोजी निजामाने रावरंभास मराठ्यांच्या छावणींत पाठविलें. दुसऱ्या दिवशीं बातमी आली की वऱ्हाडचा माजी सुभेदार सलाबतखान रघोजी भोसल्याचा परम स्नेही असल्यामुळें तो बोलणें करण्यास येणार. पण त्या ऐवजीं गोविंदरावच जाबसाल बनत नाहीं म्हणून माघारा आला. रावरंभा येऊन बाबा फडके, परशुरामभाऊ प्रभृतींस भेटून ता. २५ रोजीं परत गेला. त्यास लाभ एवढाच झाला कीं, जातांना त्याचे शिपाई बरोबर पीठमीठ घेऊन गेले! गोविंदराव उठून आल्यावर निजाम, त्याचा कारकून कोनेरपंत याजवळ म्हणाला कीं "आम्ही आपला हट्ट व अब्रू सोडली, तुम्ही म्हटलें तें कबूल केलें, असें असतांहि तुम्ही ऐकत नाहीं तर आतां युद्धास उभे राहणेंच प्राप्त. हयाती असे तरी दौलत करूं—नाहीं तर खैर."[२१] पण हें नुसतें बोलणेंच ठरलें. मुषीरानें स्वतः आपला दिवाण हरी नारायण नेमिवंत यास भाऊकडे पाठवून बोलणें लावलें. पण सर्वांनी आमच्याकडे कांहीं नाही, नानांची समजूत पाडा, असाच आग्रह धरिला तेव्हां तो माघारा गेला. मुषीराने कारभारांतून निघून आपल्या औशाच्या किल्ल्यांत जाऊन रहावें असा एक बूट त्यानें काढला. पण तें कांहींहि कामास न येतां पट्टराणी बक्षीबेगम व इतर मुत्सद्दी यांच्या विनंतीवरून निजामानें इतरांस मुषीराबरोबर बोलणें करण्यास परवानगी दिली व मुषीरानेहि अखेर सर्व खापर आपल्यावरच फुटतें, गरीबगुरीब व हत्ती-घोडे वगैरे जनावरें

२१. पारसनीस रु. ४३, फा. २०, प. ७०.

अन्नपाण्यावांचून मरून अनर्थ होतो, असें समजून अखेरचा हिय्या केला व स्वतः होऊन मराठ्यांकडे जाण्याचें ठरविलें. निजामाने गोविंदराव काळयाशीं बोलून व हा आमचा जिवाचा कलिजा ठेव म्हणून तुमच्या स्वाधीन करीत आहों, तो तुम्ही जतन करावा, त्याची हालअपेष्टा करूं नये असें त्याकडून कबूल करवून मुषीरास निरोप दिला. तो दोनशें स्वार, सात हत्ती तसेंच घोडे, उंट, तंबू, बाडबिछाईत व नोकर-चाकर सर्व सरंजाम घेऊन ता. २६ रोजी निजामाच्या छावणींतून निघाला. तो बाजारांतून चालला तेव्हां तेथील लोक, वाणी उदमी व शिपाई आदि करून सर्वांनीं त्यावर शिव्यांची वृष्टि केली व ते म्हणाले कीं यानेच सारे लोक बुडविले व निजामासहि खराबींत आणलें. मुषीर मराठ्यांकडील इतर कोणाची भेट न घेतां तडक सैन्याच्या पिछाडीस नानाच्या डेऱ्यापुढें आला. नानाहि त्यास कोसभर सामोरा येऊन सन्मानाने भेटला. नंतर पेशवाहि डेऱ्याबाहेर चार पावलें येऊन त्यास भेटला. हें सर्व येथें विस्ताराने सांगण्याचें कारण एवढेंच कीं महाराष्ट्रांत अलीकडे याबाबत कित्येक हुच्च व्यक्तींनीं खोटें लिहून, गोविंदराव काळ्याने त्याला धरून आणून जणुं त्याची धिंड काढली, असें भोळ्या वाचकांस भासविलें आहे. तसा कोणताहि प्रकार घडलेला नाहीं. हें सर्व होईपर्यंत मराठे व मोगल उभयतां लढाईच्या पवित्र्याने रोज उभे रहात व शंभर प्रकारच्या बातम्या लष्करांत उठत. मराठ्यांच्या छावणींतून कांहीं लोक स्वतःच्या फायद्यासाठीं गुपचुप धान्य, मीठ, पीठ आदि निजामाकडे पाठवून पैसा करीत. त्याच्या तक्रारी एकमेकांविरुद्ध सारख्या चालूच होत्या. पेंढारी तर दोन्ही बाजूचे एकटेदुकटे कोणी सांपडल्यास लुटण्यास कमी करीत नसत. त्यामुळें निजामास फारच त्रास झाला. निजामाने बाहेर कहीसाठी फौज पाठवून दाणा वैरण आणविली. हेंच काय पण मराठ्यांची परत येणारी कहीहि एकदां लुटली. कारण त्याची गरजच तेवढी तीव्र होती. मुषीर गेल्यानंतर निजामाने खट्टु होऊन पेशव्यांच्या भेटीचा नाद सोडला असें दिसतें. त्यामुळें त्याची भेट कशी व्हावयाची याबद्दल नानास वाटणारी अडचण आपोआपच निकालांत निघाली. तोंपर्यंत निजामाचा चोपदार बरोबर मेव्याच्या व द्राक्षांच्या घुरड्या घेऊन मराठ्यांकडे येतच होता. पण या भेटी फार महाग पडत. कारण वस्तूंच्या किंमतीपेक्षां जास्ती अहेर या चोपदार प्रभृतींना द्यावे लागत व खेरीज

शेख रुपयांचें इनामहि त्यांस मिळें. वस्तु जितक्या मोठ्याकडून, तितका तिचा मान घेणाराने ठेवला पाहिजे असा त्या काळचा दरबारी रिवाज. निजामाने एकदां केवळ कच्च्या कैऱ्या एका पाटींत घालून व त्यावर शोभिवंत कापड शिवून आणि त्यावर शोभिवंत रुमाल घालून भेट म्हणून गोविंदरावांकडे ती पाठविली व त्याने ती माणसास पांच रुपये इनाम देऊन घेतली. जासुदाने सांगितलें कीं, मजदेखतच फोडून आंतील जिन्नस पहा! तेव्हां तसें करणें गोविंदरावास भाग पडलें व तो पहातो तों दोन पैशाच्या कैऱ्या आंत! हा विनोद कीं थट्टा याचा उलगडा करणें कठीण! अखेर उभयतां गोविंदरावांनी कैऱ्यांचें रायतें करून खाल्लें!

हिंदु आणि मुसलमान यांतील भेद सर्व गोष्टींत दिसतो. निजामाच्या छावणींत अन्न मिळेनासें झालें तेव्हां तेथील मुसलमानांनी बैल व गुरें मारून खाल्लीं. त्यामुळें त्यांचा कसाबसा गुजारा झाला. पण हिंदु मात्र उपाशीं मेले. मराठ्यांच्या छावणींत मराठ्यांनाहि या दिवसांत मांस मिळत होतें असें दिसत नाहीं. त्यामुळें तहानंतर मराठी सैन्य घरची वाट चालूं लागलें तेव्हां वाटेंत कोठें शेळ्या-मेंढ्यांचें कळप दिसले तर त्यांवर ते तुटून पडत व त्यांचा फन्ना उडवीत. खासे पेशवे, रघूजी भोसले, त्याचा सेनापति विठ्ठलपंत परांजपे, दौलतराव शिंदे, जिवबादादा, बाबा फडके, परशुरामभाऊ प्रभृति खाशांच्या तंबूत कांहीं थोडी भाजी व फळफळावळ दुरून येत असे व ती ते एकमेकांकडे पाठवीत. उत्तर हिंदुस्थानांतून काबुली वा काश्मिरी सफरचंद, डाळिंबे, अंगुर वगैरे दौलतरावाकडे येत व तीं तो इतरांकडेहि थोडथोडीं पाठवी व तीं पोचविणारास वर सांगितल्याप्रमाणें इनामें मिळत. मराठ्यांच्या छावणींत यावेळीं बायका असल्याचें दिसत नाहीं, तरी भोसल्यांच्या छावणींत लढाईनंतर नाच वगैरे झाल्याचे उल्लेख आहेत. मराठे आपलीं धार्मिक व कौटुंबिक कृत्यें छावणींतहि शक्य त्या तऱ्हेने पार पाडीत. जशी होळी व ग्रहण पाळलीं गेलीं त्याप्रमाणेंच भोसल्यांचा रामनवमी उत्सव नऊ दिवस खाशांनी उपवास करून यथासांग पार पडला. त्यासाठी ब्राह्मणभोजन व अखेरच्या पारण्याच्या दिवशीं हजार बाराशें ब्राह्मणांस दक्षिणा हे समारंभ सालाबादप्रमाणें झाले. त्यांत पुराण कीर्तन चालू असून त्याचे सालाबादचे हरदास मुद्दाम वऱ्हाडांतून बरोबर छावणींत आलेले होते. तसेंच प्रत्येक सरदाराचे व संस्थानाचे सावकार त्यांच्या

त्यांच्या छावणींत हजर होते. याहूनहि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे भोसल्यांनी आपल्या ओढिसाच्या सुभ्यांतून तेथील जमेदारांकडून लष्करी मदत मागविली होती ती लढाई झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांच्या छावणींत येऊन पोहोचली. त्यांना कटकहून निघून पांच महिने लोटले होते. पण हें सैन्य खडाईत पायदळाचें असल्यामुळे त्यास इतका वेळ लागला. या संस्थानिकाचें नांव कृष्णमराज व दुसऱ्याचे चैतनसिंग बैरागी. त्यांबरोबर पांचशें भालाईत, हजार बंदुकवाले व शेंपन्नास स्वार व कांहीं हत्ती, कांहीं तीरकमठेवाले असे होते. तसेंच मंडल्याच्या संस्थानिकाकडूनसुद्धां थोडें सैन्य आलें होतें. भोसल्यांच्या सैन्यांत व त्या खालोखाल शिंदे व होळकर यांच्या सैन्यात मुसलमानांची संख्या 'जास्त होती. पण त्यांच्यात कोठें धर्मामुळें मनाची चलबिचल झालेली नमूद नाहीं. ता. १ एप्रिल रोजीं निजाम खर्ड्याहून परत जाण्याच्या मार्गाला लागला, कारण दाणावैरण व पाणी यांची टंचाई पराकाष्ठेस पोहोचली. आधीं तहाच्या अटी ठरण्यांत कांहीं दिवस गेले. या अटी मराठ्यांच्या इतिहासांत सर्वत्र दिलेल्याच आहेत. चौथाई सरदेशमुखीची बाकी व लढाईचा खर्च, तसेंच दरबारखर्च म्हणजे तह ठरविणाऱ्या मोठ्या माणसांची ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे बिदागी, मिळून एकंदर तीन कोटी रुपये. तसेंच चौतीस लक्षांचा मुलुख, खेरीज दौलताबाद किल्ला असे मराठ्यांस मिळाले. पण तह उरकून त्यांच्यावर सही शिक्के होण्यापूर्वीच खर्ड्याहून निघणें निजामास दुष्काळाच्या कहरामुळें भाग झालें. निजामाला आपण आपला किल्ला सोडून निघालों कीं मराठे विश्वासघात करून आपल्यावर हल्ला तर करणार नाहींत ना अशी भीति वाटत होंती. म्हणून प्रथम मराठ्यांनी आपला मुक्काम हलवून दक्षिणेकडे सरकावें व नंतर निजामानें आल्या वाटेनें परत जावें असें ठरलें. त्याप्रमाणें पेशवे, नाना फडणीस, मुषीर, मॅलेट प्रभृति विंचलना नदी सोडून सीनेच्या संगमावर गेले. शिंदे, फडके, पटवर्धन व भोसले, चिंचपूर व नाणज इकडे सरकले. निजामाचा हेतु प्रथम मोहरीच्या घाटानेच जावयाचा होता. पण त्या वाटेने चारा व पाणी नाहीं म्हणून तो आग्नेयेकडील नलीवडगांव मार्गाने वीटचा घाट चढून वर गेला. तेव्हां बाबा फडक्यास वाटलें कीं हा मराठ्यांच्या हातावर तुरी देऊन पळून जातो, म्हणून त्याने त्याचा पाठलाग करण्याची तयारी केली. याचवेळीं पेशव्यांच्या

छावणींत जवळ असलेले निजामाचे वकील मीर आलम, रायरायां रेणुराव व रघुत्तमराव हे निजामाकडे परत गेले. निजामाने कळविलें की मी कोणत्याहि वाटेनें गेलों तरी तह ठरविला आहे त्यांत आतां बदल करणार नाहीं, गोविंदराव काळयास तुम्ही मजकडे पाठवून द्यावें म्हणजे सर्व तह ठरल्याप्रमाणें कलमवार लिहून काढून व त्यावर सहीशिक्के करून मी परत पाठवितों व नंतरच बेदरास जाईन. त्याप्रमाणें निजाम जवळ जवळ आल्या वाटेनेच मांजरेच्या कांठानें मुक्काम करीत परत गेला. निजामाला जातांना मुषीराच्या पक्षाच्या लोकांनी दंगा करूं नये याबद्दल काळजी घ्यावी लागली. त्याचा सरदार असदअल्लीखान वल्गना करीतच होता. परेनांदूर, पारगाव, अडळ बोरगांव, कळंब, सुरडी खडकी या वाटेनें निजाम बेदराकडे परत गेला. ता. १३ एप्रिल रोजी सर्व कागदपत्र तयार होऊन गोविंदरावाच्या स्वाधीन करण्यांत आले. बरोबर पेशव्यांस वस्त्रें जवाहीर व गोविंदरावास त्याचे कुटुंब परत हैदराबादेस आणण्यासाठीं जनान्याचा हत्ती व दीडशें स्वार निजामाने दिले. तसेंच त्याबरोबर घासिमिया हा अनुभवी सरदार निजामाने पाठविला. ते ता. १५ एप्रिल रोजीं पेशव्यांच्या छावणींत येऊन अखेर तहाचे कागद परस्परांच्या सहीशिक्क्याचे एकमेकांच्या स्वाधीन होऊन तह कायदेशीररीत्या पुरा झाला.

निजाम परत फिरल्यावर पेशवे सीनेच्या पाण्याने संगमेश्वर येथे येऊन दाखल झाले. हुजरातीच्या फौजा खरनदीच्या काठाने चिंचपुराहून आव्हाटीस खालीं सरकल्या. तेथे पेशवे येऊन साऱ्या फौजेची हजेरी झाली. या ठिकाणाहून खाशी मंडळी पूर्वेस सहा मैलावरील परिंड्याचा किल्ला पाहून आली तसेच सोनारीच्या देवीचें दर्शन घेऊन स्वारी दक्षिणेकडून पश्चिमेकडे पुण्याच्या वाटेला लागली. रुईदुधी, अंजनडोह, भीमेच्या काठावर सिद्धटेक, आलेगांव, खारेवाडी, नानगांव, हातवळण, देलवडी, खामगांवटेक थेऊर कोलवडी या वाटेने पेशवे १ मे रोजी पुण्यास आले व त्यांनी थाटाने गृहप्रवेश केला. मधील छावण्यांत सरदारांना त्यांचे हिशेब करून रजा देण्यांत आली. त्याप्रमाणे जिवबादादा दक्षिणेकडे पंढरपुरास यात्रेस गेले. भोसल्यांनी विठ्ठलपंतप्रभृति आपल्या सरदारांस वऱ्हाडांत परत पाठविलें व दौलतराव जामगांवास गेले. परत येतांना गारदवंडेस पळून आलेले दिल्लीचे शहाजादे रहात होते म्हणून पेशव्यांची

फौज त्यांना टाळून दक्षिणेकडून पुढे मुळा नदीवर येऊन पोचली. कारण पेशवे दौंडावरून येते तर शहाजाद्याची भेट इतमामाने घेऊन त्यास कुर्निसात करून मोठे अहेरहि करावे लागले असते. हें सर्व टाळण्यासाठीं सैन्याचा मार्गच बदलणें नानांनी युक्तीने घडविलें. पण तरीहि त्या गांवावरून जाताना पेशव्यांच्या नौबती नगारे बंद ठेवावे लागले होते. कारण बादशहाच्या परिसरांत इतरांनी वाद्य वाजवावयास मोकळीक नसे. बरोबर मुषीर-उल्मुल्क अंबारीतून प्रवास करीत होता. शनिवारवाड्यांत शिरण्यापूर्वी मात्र त्याची रवानगी खजिन्याच्या विहिरीजवळील बंगल्यांत करण्यांत आली. त्याला शनवारवाड्यांत जो पेशव्यांच्या नजराण्याचा समारंभ झाला तेथें आणण्यांत आले नाहीं. पण यानंतर दोन वर्षें मुषीराचा मुक्काम पुण्यांत होऊन त्याने पेशवाई खिळखिळी करण्याचा उद्योग पुरा केला. पेशव्यांना खंडणीपैकीं बहुतेक रक्कम मिळाली नाहीं. 'धरलें तर चावतें व सोडलें तर पळतें' या म्हणीचा अनुभव येथें मुषीराच्या दंशाने पूर्णपणें मराठेशाहीच्या अनुभवास आला. तस्मात् भवितव्यता बलीयसी!

---

टीपः—हें सर्व प्रकरण बहुधा अस्सल कागदांवरून लिहिलें आहे. कागद असंख्य व अद्याप छापलेले नसल्यानें आधार दिलेले नाहींत.

खर्ड्याचा जय हा सर्व मराठ्यांनीं एकत्र येऊन मिळविलेला शेवटला जय होय. या जयामुळें पेशवाईची प्रतिष्ठा वाढली. अखिल हिंदुस्थानांत ध्वनि उमटला कीं मराठे अजूनहि प्रबळ आहेत व मनांत आल्यास बलिष्ठ इंग्रजांना न जुमानतां ते आपणांस हवी ती गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासांत घडवूं शकतील. नानाच्या कारस्थानाचा तर हा काळ सर्वोच्च बिंदु होय. सौम्यपणा आणि सामोपचार, तसेंच पेशवाई-बद्दल आत्यंतिक अभिमान आणि मराठेशाहीच्या स्वातंत्र्याबद्दल परमदक्षता या गुणांच्या जोरावर नानाला निजाम–पेशव्यांच्या अखेरच्या मुकाबल्यांत यश मिळूं शकलें. तदनंतर मात्र लवकरच सर्व ग्रह उलटले. येथवर महादजी शिंद्यासारख्या प्रतिस्पर्ध्यास पुरून उरलेला नाना झपाट्यानें ऱ्हासाची वाट चालूं लागला. ज्यावेळीं स्तुतिपाठक सवाई माधवरावाच्या भाग्याचें वर्णन करण्यांत गुंतले होते व खर्ड्याच्या लढाईवर पोवाडे रचले जात होते, तेव्हांच या तरुण पेशव्याच्या मनांत नानाबद्दल विक्षेप निर्माण झाला. पेशव्याला वागविण्याची नानाची जी रीत होती व एकंदर राज्य-प्रकरणीं जो कडेकोट बंदोबस्त होता त्यामुळें या विक्षेपाचें यथातथ्य वर्णन अस्सल कागदपत्रांत सांपडणें अशक्य आहे. पण या घरच्या वितुष्टांत खरा कोण, खोटा कोण, असा निवाडा करण्याच्या भरीस न पडतां परिणामाच्या दृष्टीनें या गोष्टीकडे पाहिलें म्हणजे नानांच्या अंगचे दोष स्पष्ट होतात. "आज बावीस वर्षें मसलतीवर मसलत काय होत गेली व घरचे दारचे फितुर वगैरे बंदोबस्त करितां करितां नबाबाची मसलत जाहली, फारच ओढींत सरकार आलें, तत्राप पुढें निर्वेध दिवस चांगले दिसूं लागले. बोलिल्याप्रमाणें साताऱ्याचे बंदोबस्ताचें करावें हें चित्तापासून, तों श्रीमंतच गेले! यापरतें वाईट कोणतेंहि नाहीं. पराकाष्ठा जाहली! पुढेंहि सर्व मिळून मलाच भरीस घालतात. बरें, ईश्वर काय करील तें खरें."[१] असे

१. ऐ. पत्रव्यवहार नं. ३१९

खुद्द नानाचे सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर दीड महिन्यानें काढलेले उद्गार आहेत. त्याप्रमाणें झाली ही गोष्ट नानालाच अतिशय खेदाची वाटली हें स्पष्ट आहे. पण त्यावरून नानाला आपलें कांहीं चुकलें किंवा चुकतें असा बोध झालेला दिसत नाहीं. "सर्व मिळून मलाच भरीस घालतात" हें जें नानाचें म्हणणें तें सर्वस्वी खरें नाहीं असें इतिहास सांगतो. जर यावेळीं नाना पूर्वसंकल्पिताप्रमाणें कारभारांतून निवृत्त होता, तर मराठेशाहीचें हितच झालें असतें, नानाच्या चरित्रावर पुढील चार वर्षांतील घडामोडीमुळें आणतां येण्यासारखे आक्षेप मुळांतच खुडले गेले असते असें पुढील बनावावरून दिसतें. पण आघातानंतर तरी बदलेल तर तो मनुष्यस्वभाव कसला? नानाला हरिपंताच्या मदतीनें महादजीशीं तोंड देतां आलें, पण यावेळीं खडर्याचा सेनापति परशुरामभाऊ याच्या मदतीनें बाजीरावाला परतें ठेवण्यांत यश मिळूं शकलें नाहीं. याचें कारण मराठेशाहीच्या घटनेबद्दल असलेली त्याची गैरसमजूत हेंच होय. महादजी, सखाराम बापू, अहिल्याबाई, दिवाकर पुरुषोत्तम, मुधोजी भोसले व निजाम आणि हैदर यांच्याशीं नानाचा जो संबंध आला त्यावरून नाना शहाणपणा शिकता तर मराठेशाहीच्या इतिहासास वेगळेंच वळण लागलें असतें.

असें वळण लावावयाचें तर सातारच्या छत्रपतींचा पुनरुद्धार करणें अवश्य होतें. केवळ याच मार्गानें बाजीरावाला टाळणें शक्य होतें. ज्याप्रमाणें छत्रपतींना पेशव्यांकडे सर्वाधिकार देण्याचा अधिकार होता त्याप्रमाणें ते बडतर्फ करण्याचाहि कायदेशीरदृष्ट्या होताच. पण असें करावयाचें तर नानाला पेशवाईचा अभिमान सोडावा लागला असता व आपण तिचे कारभारी म्हणून वंशपरंपरा येणाऱ्या हक्कावर तिळांजलि द्यावी लागली असती. या दोन्हीहि गोष्टी करण्याचें नानाच्या मनांत नव्हतें. स्वतः पेशवाईचीं वस्त्रें घेऊन नानास कारभार चालवितां आला असता, पण याला ब्राह्मणांच्या वंशपरंपरागत अधिकाराला सोडून द्यावें लागलें असतें. हा स्वार्थ सोडण्याची त्याची तयारी नव्हती व म्हणूनच पुढील सर्व खेळखंडोबा निर्माण होऊन त्यांत नानाची सर्वतोपरी हानीच काय पण बेअब्रू होऊन त्याच्या ऐतिहासिक स्थानास कायमचा कलंक लागला.

खडर्याच्या लढाईनंतर मराठ्यांच्या मनांत असतें तर निजामाचा बंदोबस्त कायमचा करणें त्यास अशक्य नव्हतें. जिवबादादा बक्षीप्रभृति

रणशूरांच्या मनांत निजामाची दौलत बुडवावी असेंच होतें, पण नानांनी निजामाने बारभाईच्या मसलतींत येऊन जी मदत केली ती स्मरून त्यास नाहींसें करण्याचें मनांतहि आणलें नाहीं. "मोंगल बुडवूं नये, राखावयाचा आहे"[२] अशी ताकीद लढाईच्या दुसऱ्या दिवशींच पेशव्यानी केली होती असें तत्कालीन लेखांतच म्हटलें आहे. मराठ्यांच्या जागी टिपू असता तर त्यानें मुषीरासच काय, पण त्याला चढविणाऱ्या निजामासहि कैद करून एखाद्या घनगडावर कायमचें कैदेंत ठेवलें असतें. पण नानाने असें सखारामबापू, सखाराम हरि, वगैरेंच्या बाबतींत केलें असलें तरी निजामाच्या बाबतींत तसें करण्याचा त्याला हिय्या झाला नाहीं एवढें मात्र खरें. आणि याचें कारण एकंदर पेशवाईत मोगलाबद्दल असलेली न्यूनगंडाची भावना हेंच होय. निजामाचें पूर्वचरित्र पाहतां व खुद्द नानाशींहि त्याचा एक तप चाललेला लपंडाव लक्षांत आणतां नानाने स्वीकारलेलें धोरण बरोबर होतें असें म्हणणें कठीण आहे. म्हणजे नानाच्या या वागण्यामागें कांहीं राजकारणी डाव असला पाहिजे असें म्हणणें भाग आहे. तो म्हणजे खर्ड्याची लढाई मुख्यतः ज्यांच्या बळावर जिंकली ते शिंदे वरचढ होऊं नयेत म्हणून नानाने निजामाला सौम्य अटी घालून वाचविलें हाच होय. मराठेशाहीच्या हितापेक्षा माझ्या हातांतील पेशवाईची सत्ता कशी राहील हाच विचार प्रामुख्याने अखेरपर्यंत नानाच्या मनांत वागतांना दिसतो. एरवीं बाजीरावशाही झाल्यानंतरहि मुषीराला सोडणें व आपण कवडी कवडी करून सांठविलेला पैसा कारस्थानांत खर्च करणें, या गोष्टींचा उलगडा करतां येत नाहीं. सवाई माधवरावाच्या मृत्यूचें गूढ बाजूस ठेवलें, तरी खर्ड्यानंतर शिंदेच काय पण परशुरामभाऊ, गोविंदराव काळेप्रभृति माणसें नानाविरुद्ध कां झालीं याचें उत्तर वरील तर्काखेरीज अन्य मिळू शकत नाहीं. शहाण्या मुत्सद्यांवर अस्मानी सुलतानीचे प्रसंग इतिहासांत अनेकवार आलेले दिसतात. पण त्यांत ते कसे वागतात यावर त्यांचें शील कसाला लागतें. रामचंद्रपंत अमात्याने ताराबाईने त्याला कैदेंत ठेवल्यानंतर कसें वर्तन ठेवलें होतें हें पाहिलें, म्हणजे या दोन मुत्सद्यांतील फरक लक्षांत येतो. संकुचित दृष्टि व खऱ्या वैराग्याचा आणि निस्पृह-

---

२. का. सं. पत्रे यादी ले. ४६०

पणाचा अभाव यांमुळेंच नानाची कारकीर्द मराठेशाहीला तारक ठरली नाहीं असें म्हणणें इतिहासकारास भाग आहे.

खडर्य्यांच्या तहापैकीं एकच गोष्ट ताबडतोब अमलांत आली व ती मुषीराचें आगमन ही होय. पण हें आगमन परिणामाकडे पाहता मराठेशाही खिळखिळी करण्यास कारणीभूत झालें. मुषीर ही व्यक्ति अशी नव्हती कीं तीं स्वस्थ बसून राहील. खजिन्याच्या विहिरीवरील बंगल्यांत याला आणून ठेवणें म्हणजे पुण्याच्या उदरांत व्याधि निर्माण करून घेणें होतें याचा अनुभव पुढील दोन वर्षांत उत्तम आला. मिळालेल्या संधीचा उपयोग करून घेण्यांत मुषीराचा हातखंडा होता. त्याने पुण्यांतील मुत्सद्यांत अंतस्थ लावालावी सुरू केली. खुद्द सवाई माधवरावाच्या विक्षेपाच्या वेळीं याने कांहीं चिथावणी दिली असल्याचाहि संभव अगदीं नाहींसा नाहीं, कारण निजामाचे हस्तक पुण्यांत वावरत होतेच व त्यांचा मुषीराशीं संबंध तोडला होता असें दिसत नाहीं. इकडे पुण्यास ज्यावेळीं हें विक्षेपाचें प्रकरण चालू होतें त्याच वेळीं हैदराबादेकडे निजामाचा वडील मुलगा जो अलिजाह त्याचें बापाविरुद्ध बंड सुरू होतें. या वडील मुलाला दक्षिणेंतून काढून देऊन उत्तरेंत दिल्लीच्या बादशहाच्या दिमतीस पाठवून द्यावें असा मुषीराचा महादजी शिंदे दक्षिणेंत आल्यापासूनचा उद्योग सुरू होता. यांत हेतु दोन. एक त्याच्या जाण्यामुळें निजामाचा दिल्लीदरबारशीं सुटलेला संबंध पुनः सुरू व्हावा व त्यारूपाने हिंदूंच्या दिल्लीपतीची सत्ता आपल्या हातांत राखण्याच्या कारस्थानास पायबंद बसावा. निजामाचा मुलगा बादशहाच्या सेवेस गेला म्हणजे त्यावरील स्वामिद्रोहाच्या आरोपाचें आपोआपच निरसन होणार होतें. दुसरें, त्याला उत्तरेंत जागीर मिळून सैन्य राखण्याचें सामर्थ्य आलें म्हणजे महादजीच्या व एकंदर मराठ्यांच्या उत्तरेंतील बलिष्ठपणास शह दिल्यासारखें होणार होतें. हा डाव साधल्यास स्वतः मुषीराचाहि मागून दिल्लीस जाऊन मुसलमानी वर्चस्वाची पुनर्रचना करण्याचा विचार होता, यासाठीं त्यानें निजामाला विचारलेंहि होतें. पण निजाम भित्रा व मुषीराच्या वर्तनाविषयींहि साशंक असल्यामुळें त्याने या डावास उत्तेजन दिलें नाहीं कारण त्यामुळें महादजीचें वैर तो दक्षिणेंत असतांना स्वतःवर ओढवून घेण्यासारखें झालें असतें. मुषीराचा अलिजाला राज्यकारभारांतून काढून टाकण्याचा दुसरा हेतु असा कीं, त्यामुळें त्याचा

जावई निजामाचा द्वितीय पुत्र जो मीर पोलादअली उर्फ सिकंदरजाह याला पुढें निजाम करण्याचा आपला डाव मोकळा व्हावा. ज्याप्रमाणें दिल्लीच्या बादशहाने पेशव्याला आपला सर्वाधिकारी केला होता, त्याप्रमाणें निजामानें मुषीराला केला होता. त्यामुळें खुद्द निजामाच्या मुलांच्या जागिरी तुटून नित्य खर्चासाठी त्यांना या दिवाणाकडे याचना करण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. ही गोष्ट अलिजाच्या मनाला फार लागली होती. खड्याच्या लढाईत त्याला यश मिळविण्याची संधि मिळूं नये व तो प्रसंगविशेषी मराठ्यांना मिळाल्यास आपल्या मसलतीस धक्का बसूं नये म्हणून मुषीरानें निजामाकडून त्याला हैद्राबादच्या बंदोबस्तासाठीं मागें ठेवलें होतें. खड्याच्या लढाईनंतर मुषीराचा कांटा परस्पर निघाल्यामुळें अलिजाला नवा हुरूप प्राप्त झाला व त्याने खुद्द म्हाताऱ्या निजामाचेंहि वजन युद्धांतील अपयशामुळें कमी झालें आहे व सैन्याचीहि पांगापांग झाली आहे ही संधि पाहून बंडाचा उपक्रम केला. हैद्राबाद सोडून एकेक गांव घेत तो बेदरास गेला व तेथील नामांकित किल्ला त्याने सहजांत हस्तगत केला. याकामीं त्याला सदाशिव रेड्डी नामक एका बड्या तेलगु जमीदाराचें सहाय्य असून कांहीं मुसलमान सरदारहि त्यास सामील होते. तेथून त्याने सभोंवतालच्या मुलखांत आपला अंमल बसविला व पुढे औरंगाबादेकडे जाण्याचा बेत आंखला. हा प्रदेश या वेळीं पेशव्याचे कमाविसदार खड्याच्या तहांतील अटींनुसार आपल्या ताब्यांत घेण्याच्या प्रयत्नांत होते. त्यांशीं संगनमत करून अलिजाह बलिष्ठ होईल व त्याला कदाचित नानाचें सहाय्य मिळेल अशी भीति निजामास वाटली व त्यानें गोविंदराव काळया-मार्फत नानाशीं या बाबत बोलणें सुरू केलें.

निजामाच्या बोलण्याचा भाव खड्याच्या लढाईआधींच असा होता कीं, पेशव्यांच्या घरांतील दुहीच्या प्रसंगीं आम्ही रघुनाथरावास सहाय्य न करतां सवाई माधवरावाचें केलें ही गोष्ट स्मरून दोन्हीहि राज्यांनीं चालावें. कोणाचें राज्य वा मुलूख घेण्याचा इरादा दुसऱ्यानें मनांतहि आणूं नये. यासाठीं पेशव्याची व माझी एकवार व्यक्तिशः भेट झाली पाहिजे, म्हणजे आम्ही दोघे तोंडीं काय ती व्यवस्था ठरवूं त्याप्रमाणें वागावयास येईल. त्यांत कारभारी व दिवाण यांची मध्यस्थी नको. पण या गोष्टीस नानानें सन १७८२ सालापासून वांधा घातला होता. त्यावेळीं

पेशवा लहान म्हणून भेट होऊं दिली नाहीं व नंतर सवाई माधवराव मोठा झाल्यावर त्याचे कान कोणी फुंकील म्हणून नानानें पेशव्यास दुसऱ्याची भेट घेऊं दिली नाहीं. या जाचांतून सवाई माधवरावाची सुटका महादजी शिंदे पुण्यास आल्यानें झाली. तेव्हांहि नानानें आपला बंदोबस्त ठेवला होताच, पण महादजीनें खाजगी भेटण्याचें मनांत आणण्यास त्यास नको म्हणण्याची नानाचीहि प्राज्ञा नव्हती. आपल्या दीड वर्षांच्या मुक्कामांत महादजीनें पेशव्यावर खूप छाप पाडून त्यास त्याच्या अधिकाराची जाणीव करून दिली होती. त्यामुळेंच कदाचित् खर्ड्यानंतर सवाई माधवरावाच्या मनांत विक्षेप आला असेल. खर्ड्याच्या वेळीं सुद्धां निजाम, पेशव्याची व आपली भेट होऊन नंतर तह व्हावा असें म्हणत होता. पण नानानें तो योग येऊं दिलाच नाहीं. प्रथम नानानें ठरविलेल्या तहाच्या अटींवर निजामाचें शिक्कामोर्तब व्हावें, नंतर भेटीची व्यवस्था पाहतां येईल, असें त्याचें सारखें बोलणें होतें. यांत नानाला सवाई माधवराबाबद्दल कोणत्याहि तऱ्हेची खात्री वाटत नव्हती असा बोध होतो. आणि हीच गोष्ट सवाई माधवरावाच्या मनाला लागण्यासारखी होती यांत संशय वाटत नाहीं. ज्या पेशव्याला गर्भापासून त्याची बाजू घेऊन आपण रक्षिलें व वाढविलें असें निजाम आरंभापासून म्हणत होता, त्याची एकदांहि निजामाला भेट घेतां आली नाहीं ही गोष्ट एकंदरींत गैर झाली असें इतिहासकारास म्हणावेंच लागेल. अशा तऱ्हेचा कारभार नानाचा होता हेंच त्यांतील वैगुण्य. आपण मालक असून आपणास सामान्य नोकराइतकीहि हवी त्याची भेट घेण्यास मोकळीक नाहीं ही गोष्ट पेशव्याच्या मनाला लागण्यासारखी होती यांत संशय कसला ?

वकील गोविंदराव काळे हाहि निजामाच्या बोलण्यास भाळला असें दिसतें. जो निजाम खर्ड्यानंतर चार महिने होऊनहि तहाच्या अटी या नाहीं त्या सबबीवर पुऱ्या करीत नव्हता, त्याच्याच म्हणण्याप्रमाणें गोविंदराव पेशव्यास लिहितांना आढळतो. नानाच्या मनांत निजामाबाबत कठोरपणा नव्हता. तेव्हां तो अलिजाला मराठेशाहींत आश्रय देऊन निजामाच्या राज्यास धोका निर्माण करील असा संभव नव्हताच. उगाच याबाबत निजामास संशय निर्माण झाला होता आणि ज्या दोन दौलतींत जुदाई नाहीं असें निजाम म्हणत होता त्या दौलतींचे वारस, काय ग्रहदशा असेल वी

असो, एकदम एक महिन्याच्या आंत दोघेहि मरण पावले ! सवाई माधवरावाचा मृत्यु झाल्यानंतर अलिजावर निजामाचें सैन्य जाऊन त्याचा कोंडमारा झाला. नाना त्याला पेशव्यांच्या राज्यांत आश्रय देईना व उत्तरेस भोसलेहि त्याला ये म्हणत ना. अशा पेंचांत सांपडून त्यानेहि एक दिवस आत्महत्त्या केली ! पण अशा रीतीनें दोन्ही राज्यांच्या वारसांचा एकदमच अंत झाला तरी त्यांचे परिणाम मात्र एका राज्यास फायदेशीर व दुसऱ्या राज्यास विघातक झाले. अलिजाह मेल्यामुळें निजामाचें राज्य पुढें होऊं घातलेल्या अंतस्थ बंडाळीपासून मुक्त झालें व पेशव्यांच्या राज्यांत मात्र नानाने हरतऱ्हा करून दूर रोखून ठेवलेली अंतस्थ बंडाळी पुनः सुरू झाली. नानाला बाजीराव वारस म्हणून पुढें आल्यामुळें पेंच निर्माण झाला, तर त्याने मोठी मोहीम करून धरून आणलेल्या मुषीराच्या हातांत बाजीराव हा नवा डाव येऊन पडला. या नंतरच्या दोन वर्षांतील कारस्थानांत मुषीराने निजामाकडून नानाची मदत करवून आपली गेलेली दिवाणगिरी पुनः मिळविली आणि कैदी म्हणून पुण्यास आलेला मुषीर जणुं विजयी योद्धा म्हणून सन १७९७ च्या मेंत हैदराबादेस परत गेला. मध्यंतरीच्या काळांत नानानें सांठविलेला खजिना खलास होऊन मराठी राज्य पुण्याच्या लुटीवरच चालविण्याचा प्रसंग ओढवला. खर्ड्याच्या तहानंतर मराठ्यांस मिळावयाचा चौथाईच्या बाकीचा पैसा व मुलूख बहुशः मराठ्यांच्या ताब्यांत आला नाहींच. हीच फलश्रुति नानाच्या कारस्थानी राजकारणाच्या नशिबीं विधात्यानें लिहून ठेविली होती.

या सर्व गोष्टींचें आद्यकारण, पेशवाईंत राष्ट्राच्या ध्येयाची सुस्पष्टता व निश्चितता कधींच नव्हती. मधून मधून खोकल्याची उबळ यावी त्याप्रमाणें शिवकालांतील ध्येयांची पुसट आठवण पेशव्यांनाहि येई. मोगल बुडवावा, होता कीं नव्हतासा करावा, सारी दक्षिण आपली करण्याचा समय आहे, काशीविश्वेश्वराची प्रस्थापना करावयाची आहे, असे उद्गार पेशवाईंत मधून मधून निघतच असत. पण यांतील कोणतीच गोष्ट कायमची निकालांत निघाली नाहीं किंवा पुरी झाली नाहीं. अखेरीस "आम्हांस तर चकतेयाची पातशाही राखणें"[३] हा सदाशिवराव भाऊचा पानपतास जातांना प्रसंगोपात काढलेला राजकारणी उद्गारच खरा झाला !

३. राजवाडे खंड १ ले, १७३

दिल्लीचा बादशहा पेशवाईमुळें अमर झाला. सहजच त्याचा दक्षिणेंतील स्वतंत्र सुभेदार जो निजाम तोहि सर्व लांड्यालबाड्या, छक्केपंजे, कारस्थानें-विश्वासघात सर्व कांहीं करून पुनः पेशव्यांच्याच हातून कायम झाला! हे दोघेहि अखेर इंग्रजांचे आश्रित होऊन त्यांना मोडण्याचें वा ताब्यांत राखण्याचें श्रेय या परक्यांना मिळालें, मराठ्यांना तें मिळूं शकलें नाहीं.

सामान्य विचार करतां पेशवे हें कांहीं इतरांशीं तुलतां केवळ नादान राज्यकर्ते नव्हते. त्यांच्यांत शौर्य, साहस, कारस्थानीपणा, उद्योग यांचा अभाव नव्हता. पण त्यांची सर्व धडपड अस्पष्ट ध्येयाची खेळ टरली. मराठेशाहींतील बहुतेक व्यक्ती बऱ्याच होत्या, पण त्यांचीं कृत्यें राष्ट्राला पोषक टरलीं नाहींत. त्यामुळें मराठ्यांचीं इष्ट तीं कार्यें कधीं तडीस गेलीं नाहींत. शिवाजीचा स्वतंत्र राज्याचा पाया सोडून साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा पाठपुरावा पेशव्यांनीं केला म्हणजे साम्राज्याच्या वळकटीवर मराठ्यांचें स्वातंत्र्य अवलंबून ठेवलें. पण मुसलमानांचें हिंदुस्थानांतील साम्राज्यच अनीतिमूलक पायावर उभें होतें. अनीतिमूलक म्हणावयाचें कारण, तें परधर्माधिष्ठित व परकीय संस्कृतींचा पाठपुरावा करणारें होतें. त्यामुळें हिंदुस्थानांतील बहुसंख्य हिंदु पंगूच राहणार होते. हें पंगुत्व घालविण्याचा शिवाजीचा प्रयत्न होता. पेशवे चुकीच्या मार्गाला लागल्या-मुळें, अनीतिमूलक साम्राज्य टिकविण्यांत त्यांना यश आलें नाहीं यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. पण हें साम्राज्य टिकविण्याच्या प्रयत्नांत स्वराज्यहि डुबलें गेलें एवढें खरें.

ही व्याख्यानमाला ज्यांच्या स्मारकासाठीं गुंफण्यांत येत आहे त्या तात्यासाहेब केळकरांच्या ग्रंथांतहि मराठ्यांच्या पातशाही धोरणाची चर्चा आलेली आहे. केळकरांनी आपल्या एतद्विषयक लेखांची मांडणी अतिशय सुबक व उद्बोधक रीतीने केली असली तरी मूलभूत माहितीच्या अभावामुळें त्यांचा याबाबत गैरसमज झालेला दृष्टीस पडतो. या विषयांत प्रवेश होण्यास त्यांचें विवेचन आजहि उपयुक्त आहे व प्रत्येक महाराष्ट्रीय मुलाने तें अवश्य वाचावें अशी शिफारस मी करतों. केळकरांनीं आपल्या विवेचनांत कायदेशीरपणाने आपली बाजू मांडली आहे. ते जगजाहीरपणें मराठे जें आपलें धोरण आहे म्हणून राजकारणदृष्ट्या बोलत होते व लिहीत होते तेंच त्यांचें खरें धोरण असें धरून सर्व विवेचन करतात व कायद्याच्या भाषेंत

तें बरोबरच आहे. याच्या मागें दुसरें ध्येय असू शकेल—नव्हे होतें याची कल्पना केळकरांना होती व त्यांनी त्याचा उल्लेखहि केलेला आहे. पण त्या दुसऱ्या ध्येयाचा उच्चार मराठ्यांच्या तोंडून उघड झाला नाहीं याचें कारण तत्कालीन परिस्थिति असें ते सांगतात. "जी गोष्ट सर्वस्वी शक्यतेच्या आंवाक्याबाहेरची दिसते ती बोलून दाखविण्यांत तरी काय शहाणपणा? अशक्यप्राय गोष्टी बोलणाऱ्याच्या धैर्याचें कौतुक न होतां त्याच्या मूर्खपणाचें हंसेंच होतें"[४] असें तें म्हणतात. पण खरोखरीच हिंदुस्थान स्वतंत्र करणें व इस्लामपदपादशाही बुडविणें ही गोष्ट १८ व्या शतकांत अशक्य होती काय? आम्हांस तरी ती गोष्ट अशक्य होती असें बिलकुल वाटत नाहीं. दिल्लीची पातशाही बुडविण्याचा विचार त्या काळीं मराठ्यांनीं कां केला नाहीं या प्रश्नाचें केळकरांच्या मतें सरळ उत्तर असें आहे की "ती त्याना त्यावेळीं बुडवितां तर आली नसतीच, पण ती बुडविण्याचा त्यांनीं प्रयत्न केल्याचा जरी नुसता संशय आला असता तरी जें त्यांनी प्रत्यक्ष केलें तेंहि त्यांना करितां आलें नसतें. उलट नवें न मिळवितां जुनें गमावण्याचा प्रसंग मात्र त्यांच्यावर येता."[५]

आम्ही या व्याख्यानमालेच्या आरंभींच पहिल्या व्याख्यानांत राजारामाचें एक पत्र उल्लेखिलें आहे त्यावरून दिल्ली घेण्याची आकांक्षा मराठ्यांत निर्माण झाली होती व त्यांनी पत्रांत या ध्येयाचा अधिकृत उल्लेखहि केला होता हें स्पष्ट आहे. तसेंच त्यानंतर पंचवीस वर्षांनंतर लिहिलेल्या अमात्यांच्या आज्ञापत्रांत "दिल्ली, आग्रा, लाहोर, डाक्का, बंगाल, ठठ्ठा, जलचरादि संपूर्ण देशदुर्ग हस्तवश्य करून वाराणशीस जाऊन स्वामी श्रीविश्वेश्वर स्थापन करितात"[६] असें ध्येयहि छत्रपति कुलांतील राजकुमारांसमोर ठेविलें आहे. "तमाम प्रांतांचे राजपूत एकत्र करून नर्मदापार होऊन नर्मदेअलीकडच्या रामेश्वरपर्यंतच्या राज्याचें संरक्षण करण्यासाठींच उत्तरेस हिंदुस्थानावर स्वारी करावयाची"[७] असा हेतुहि अमात्यांनी आपल्या लिखाणांत स्पष्ट केला आहे. अमात्यांच्या मतें सन

---

४. "मराठे व इंग्रज" (तृतीय मुद्रण) पृ. १०२.

५. मराठे इंग्रज, पृ. १०३.

६. आज्ञापत्र (१९२६) पृ. ८.

७. आज्ञापत्र (१९२६) पृ. ७–८.

१७१५ सालींच दक्षिणेची अशी स्थिति होती कीं, त्यावेळीं मराठे त्यांच्या उपदेशाप्रमाणें बद्धपरिकर होते तर दक्षिण ताब्यांत घेण्यास कसलीहि अडचण राहिली नव्हती. निजामउल्मुल्क आपल्या पहिल्या सुभेदारींतून निवृत्त होऊन यावेळी उत्तरेस परत गेला होता. दिल्लीस राज्यक्रांति होऊन तेथील दरबार अंतस्थ कलहामुळें खिळखिळा झाला होता. अशा वेळीं उत्तरेंतून दक्षिणेंत नवा निजाम येऊच शकणार नाहीं अशी व्यवस्था घडवून आणणें मराठ्यांस अशक्य नव्हतें. पण या ऐवजी शाहूचा नूतन पंतप्रधान बाळाजी याने दुबळया व पडत्या शाहूचें राज्य व त्या रूपाने आपली पेशवाई कायम राखण्यासाठीं सय्यद हुसेनअल्ली या खंडेराव दाभाड्याकडून आरंभीं पराभव पावलेल्या सुभेदाराला मदत करण्याचे ठरविलें व अशा रीतीने पन्हाळयाच्या संभाजीचा पक्ष मोडून काढला. जर यावेळीं शाहू स्वतःच्या दुबळेपणानेच पराभूत होऊन राजकारणाबाहेर फेकला जाता तर सर्व मराठे एक होण्यास कसलीच आडकाठी उरली नसती. चंद्रसेन जाधव, नेमाजी शिंदे प्रभृति जे प्रमुख मराठे सरदार मोगलांकडे गेले होते ते आपोआप छत्रपतींच्या सेवेस रूजू झाले असते. पण दुबळया छत्रपतीच्या सेवेस कंटाळलेले व त्याच्या भट पेशव्याच्या ताबेदारीस नाखूष असलेले हे सरदार ते अधिकारावर असेपर्यंत परत येण्यास राजी नव्हते. म्हणून सर्व राजकारणाचा विचका झाला व यानंतर १५ वर्षें हाच मुख्य झगडा होऊन राहिला. **मोगलांच्या मदतीनें** शाहू स्थिरपद झाला हीच १८ व्या शतकांतील मराठेशाहीवर कोसळलेली महान् आपत्ति होय. बाळाजीच्या मृत्यूनंतर बाजीराव व चिमाजी अधिकारावर आले. त्यांनी तर उरलेले मराठेहि आपल्या उद्दाम व स्वार्थी वर्तनानें दुखविले. त्यामुळें निजाम पुनः दक्षिणेंत आला तेव्हां चिमणाजी दामोदर, सुलतानजी निंबाळकर प्रभृति सरदार शाहूला सोडून मोगलाईंत गेले. उरलेले दाभाडेहि किती नाखूष होते हें पुढें डभईच्या लढाईने सिद्ध केलें. एवंच आपली एकमुखी सत्ता बळकट व्हावी म्हणून पेशव्यांनीं दुबळा छत्रपति गादीवर ठेवण्याची कसून खटपट केली असें इतिहासकारास म्हणावें लागतें. शिवाजीने स्वयंसिद्ध असतां राज्याच्या व राष्ट्राच्या हितासाठी अष्टप्रधान मंडळ निर्माण करून आपला व आपल्या वंशजांचा अधिकार स्वखुषीने मर्यादित करून ठेविला होता. या उलट तो मर्यादित अधिकारहि संपुष्टांत

आणून व इतर प्रधानांना मोडून काढून वा जाग्यावर बसवून पेशव्यांनी बाह्यतः नसला तरी व्यवहारतः स्वतःकडे सर्व अधिकार घेतला. यामुळें मराठेशाहींत कायम दुफळी निर्माण होऊन त्यांत निजाम कायम झाला असा हा खरा इतिहास आहे. आणि ही गोष्ट मागील विवेचनावरून विचारी वाचकांस पटण्यास अडचण असूं नये. पण अजूनहि श्री. तात्यासाहेब करंदीकरांसारखे इतिहासाभ्यासक कोलांटी उडी[८] मारणाऱ्या रियासतकार सरदेसायांचा आधार घेऊन बाजीरावाच्या वर्तनाची चिकित्सा करण्याऐवजीं "जे मराठे सरदार स्वराज्यांतून फुटून निजामाला मिळालेले होते त्यांनाच प्रश्न विचारण्याला सुचवितात !"[९] तेव्हां या गोष्टीला काय म्हणावें तें ठरविण्याचें आम्ही वाचकांवरच सोपवितों.

मराठ्यांच्या राजकारणांत वर सांगितलेली जी गफलत झाली तीमुळेंच तात्यासाहेब केळकर म्हणतात ती 'दिल्लीपतीची सेवा करून मराठ्यांचें साम्राज्य वाढविण्याची' आपत्ति मराठ्यांवर कोसळली. दिल्लीपतीची सेवा करण्यासाठीं शिवाजीनें राज्य स्थापिलेलें नसून हिंदुस्थानांतील मुसलमानांचें राजकीय अस्तित्व नाहीसें करण्यासाठीं तें स्थापिलेलें होतें. याबाबत काय धोरण स्वीकारावयाचें तेंहि शिवाजीनें सुनिश्चित करून त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवून पुढच्या सर्व मराठ्यांस आदर्श धडा घालून दिला होता. मुसलमानांच्या धर्माबद्दल यत्किंचितहि अनादर न दाखवितां, ज्यांना तो धर्म पाळावयाचा आहे त्यांना वैयक्तिकदृष्ट्या तो पाळावयास पूर्ण मोकळीक ठेवावयाची, असें तत्कालीन यूरोपांतहि अस्तित्वांत नसलेलें धर्मविषयक उदार धोरण शिवाजीनें आखलें. तसेंच या मुसलमानांचे हिंदी नागरिक म्हणून असलेले वैयक्तिक हक्क व आर्थिक हितसंबंधहि कोणताहि धक्का लावल्याशिवाय तसेच चालू ठेवण्याचें त्याने ठरविलें. म्हणूनच आपला परराष्ट्रीय महत्वाचा गुप्त पत्रव्यवहार लिहिण्यासाठीं त्याने आगा हैदर नांवाचा मुसलमान मुनशी नोकर ठेवला होता व आपल्या आरमारावरील दोन मुख्य दर्यासारंग सिद्दी मुसलमान ठेवले होते. तसेंच त्याच्या सैन्यांतहि अनेक मुसलमान शिपाई होते व खासगी नोकरांतहि मदारी

---

८. सरदेसाई-मराठी रियासत (पूर्वार्ध १९०२) प्रकरण १२ व बाळाजी विश्वनाथ (१९४२)

९. सह्याद्री, जून १९५५, पृ. ३१.

मेहेतर विश्वासाने ठेवला होता. त्याच्या या नोकरांपैकीं कोणीहि विश्वासघात केल्याचें नमूद नाहीं. शिवाजीने प्रतिबंध करण्याचें ठरविलें होतें तें फक्त एकच गोष्टीबाबत व ती म्हणजे हिंदुस्थानची राजनीति मुसलमानी धर्मावर अवलंबून न ठेवण्याचें होय. अल्पसंख्य मुसलमानानीं वंशाने व बव्हंशी संस्कृतीनेहि स्वतः हिंदी असतां व तेथील भूमीवरच आपला संसार चालू असतां अभिमान मात्र अरबस्तानचा बाळगावयाचा व तेथल्या महंमदाने केवळ तत्कालीन स्थानिक व तात्पुरत्या परिस्थितीस अनुसरून ज्या आज्ञा अरबांना केल्या होत्या त्या या देशांत आपल्याच बांधवावर उपयोगांत आणूं देण्याचा हट्ट धरावयाचा, ही उफराटी सुलतानी चालूं देण्यास मात्र शिवाजी राजी नव्हता. मुसलमानांचे सेवक राहून हिंदुची सर्वांगीण उन्नति व विकास शक्य व इष्ट, अशी जर शिवाजीची समजूत असती तर त्याने आपल्या बापाचेंच अनुकरण चालू ठेवलें असतें. ही गोष्ट अशक्य अशी पांचशें वर्षांचा इतिहास तपासून स्वतःची खात्री पटल्यानंतरच शिवाजीने नवें पाऊल टाकलें. अवरंगजेबाच्या मुसलमानी ध्येयाशीं व पद्धतीशीं शिवाजीचा दाट परिचय होता. त्याने मोगलांची पद्धति सर्वस्वी उचलली व तिचा उलट प्रयोग त्यांवरच करून हिंदूंचे ध्येय गांठण्याचा मार्ग आंखला. त्याचेंच मूर्त संस्थारूप स्वरूप म्हणजेच अष्टप्रधानाधिष्ठित शिवकालीन राज्यघटना होय.

शिवाजीची पद्धति शाहूच्या आगमनानंतर बहुशः मोडल्यामुळें त्या पद्धतीचे फायदे काय होते तें अनुभवानें समजून घेण्याला इतिहासकारास साधनच उरलेलें नाहीं. एकीकडे छत्रपति व दुसरीकडे इतर सात प्रधान यांचे अधिकार संपुष्टांत आणून व डावलून चालविलेलें राज्य ही शिवशाही नव्हे. हेंच काय, एका यजमानाची नोकरी करतां करतां दुसऱ्या यजमानानीहि नोकरी पत्करणें हें कोठल्या राजनीतींत बसूं शकते याचा बोध होत नाहीं. इंग्रजांनीं नानासाहेब पेशव्याला याबद्दल एकदां कायदेशीर पेंचांत धरलें होतें. तो प्रसंग सुरतेचा किल्ला व मोगली आरमाराचें आधिपत्य त्यांनीं मोगल बादशहाच्या सनदेनें सिद्दीकडून आपल्याकडे घेतलें तेव्हांचा, सन १७५९ तील होय. पेशव्याच्या वकिलानें इंग्रजांचा पुण्यास आलेला वकील विल्यम प्राइस याला विचारलें कीं, 'तुम्हांला ही उठाठेव करण्याचा अधिकार काय? मोगल बादशाहीचा सारा कारभार पेशव्यांच्या

मदतीनें व इच्छेप्रमाणें चालत आहे. असें असतां तुम्ही त्यांच्या संमती-शिवाय अशी गोष्ट कशी केलीत?' तेव्हां या वकिलानें खडखडाबून सांगितलें कीं, ज्या बादशहाचे पेशवे नोकर म्हणवितात, त्याच बादशहाच्या सनदेनें आम्हांस हा अधिकार मिळालेला आहे. म्हणून तुमचा अधिकार तेवढा खरा व आमचा खोटा, अशी ओरड आम्ही मानणार नाहीं. इंग्रजांनीं लोभी, दुटप्पी व विश्वासघातकी वजीर जो गाजीउद्दीन त्याच्या कडून बादशाही हुकूम आणविला, तर पेशव्यांचा बहाणा असा कीं, ज्या बादशहाला त्याच्या पूर्वीच्या बादशहाला कैद करून राघोबानें व मल्हाररावानें गादीवर आणला, तो बादशहा पेशव्यांच्या हितसंबंधांविरुद्ध दुसऱ्यांना सनद देईलच कसा? पण इंग्रजांनाहि दुबळ्या बादशहाचा कायदेशीर उपयोग करून घेण्याची विद्या कळून चुकली असल्यामुळें, त्यांनीं पेशव्याचें पत्र दिल्लीला जाण्यापूर्वीच गाजीउद्दीनाला नजराणे पाठवून त्याकडून इष्ट सनदा आधींच आणून जाहीर रीतीनें समारंभपूर्वक त्यांचा स्वीकार सुरतेस केला होता. त्या सनदा पेशवा तरी खोट्या असें कोठल्या तोंडानें म्हणणार? तेव्हां सदाशिवरावभाऊ व नानासाहेब व राघो भरारी हे सर्व हयात व हजर असतांनाहि पेशव्याला इंग्रज वकिलाचें कांहींहि करितां आलें नाहीं व तो मामुली सन्मान घेऊन मुंबईस रवाना झाला. तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या मराठे व इंग्रज या प्रबंधांत या गोष्टीची हकीकत दिलेलीहि आहे, पण तिचें स्वारस्य त्यांच्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं. ते प्राईसची वकिलात फुकट जाऊन तो मुंबईस परत आला असें म्हणतात. पण आम्हास तर अटकेपार मराठ्यांचे घोडे जाऊन पोंचले होते त्या वर्षी क्षुद्र समजल्या जाणाऱ्या इंग्रजांच्या यःकश्चित् वकिलानें पेशव्यास खडखडावावें ही मोठीच सूचक गोष्ट घडली असें वाटतें. आपल्या भोंवतीं असलेल्या व घडणाऱ्या गोष्टींचा अर्थ न समजणें हाच पेशव्यांच्या कारभारांतील सर्वांत मोठा दोष होय आणि ही गोष्ट अथपासून इतिपर्यंत तशीच चालू राहिली होती. इंग्रजांनींच काय, पण निजामांनींहि मुख्यतः कायद्यावर बोट ठेवूनच पेशव्यांना शिस्तींत राखिलें होतें व पेशव्यांचा भोंगळपणा नाना फडणीसासारख्या दक्ष कारभाऱ्याच्या कारकिर्दींत सुद्धां दृष्टोत्पत्तीस येत होता. मुशीरानें "कोठें आहेत तुमच्या बादशाही सनदा?" असें विचारतांच नानाला त्यांची चौकशी करण्याची बुद्धि झाली व त्याने नीलकंठ बाबुराव

अमात्याला लिहून साताऱ्यास त्या सांपडतात कीं काय तें पहाण्यास सांगितलें. पण रामचंद्रपंत अमात्याला डावलून दसऱ्याचा पोषाख घेण्यापुरत्या उभ्या केलेल्या सातारच्या नाममात्र अमात्याजवळ त्या कोठून मिळणार? तेव्हां याबाबत अखेर जुने हिशेब पुरावा समजून त्यावरून चौथसरदेशमुखीची विल्हेवाट नानास लावावी लागली. मराठे पेशवाईंत असें धरीत कीं, सनदा या आपल्या कामापुरत्या खऱ्या मानाव्या व दुसऱ्याचा संबंध त्यांत आला कीं म्हणावयाचें "ऊं? बाहुली बनलेल्या सत्ताहीन बादशहाच्या सनदा कोणीहि मिळवील, म्हणून आम्ही त्या खऱ्या मानूं कीं काय?" ही सर्व आपत्ति एक आद्यतत्त्व सोडल्यामुळें पेशव्यांवर कोसळली होती व तें तत्त्व म्हणजे शिवाजीनें निश्चित केलेलें संपूर्ण स्वातंत्र्याचें तत्त्व हें होय.

शिवाजीच्या राज्यपद्धतीप्रमाणे हिंदुस्थानांत—अल्पसंख्य मुसलमान असलेल्या हिंदुस्थानांतहि—राजसत्ता हिंदूंकडेच रहावी हा मुख्य मुद्दा होता. इस्लामच्या हितासाठीं हिंदी राज्यपद्धत राबवावयाची नाहीं हा तर प्रधान हेतु शिवाजीच्या राज्यपद्धतींत होता. तेवढ्यासाठींच मूळ मुसलमानी नांवें असलेले व मोगली राज्यपद्धतीचें अनुकरण करून त्यांचींच कर्तव्यें पार पाडीत असलेले प्रधान नांवें बदलून संस्कृतनामधारी करण्यांत आले. हिंदु परंपरेने हें राज्य चालावयाचें आहे असें सूचित करण्यासाठी त्यानें स्वतःला कोणताहि मुसलमानी किताब लावून न घेतां क्षत्रियकुलावतंस छत्रपति असें म्हणविलें. नेपाळच्या राण्याप्रमाणे समशेर जंगबहादूर किंवा तिरुवनकोड (त्रावणकोर) च्या राजाप्रमाणे सुलतानमन्ये बहादर (सुलतान-मान्य रणशूर) असें म्हणवून घेतले नाहीं. ही गोष्ट किती मूलभूत आहे याची जाणीव न्यायमूर्ति रानडे, इतिहासमार्तंड राजवाडे व राजकारणपटु केळकर या तिघांच्याहि संपूर्णतया ध्यानांत आली नाहीं. म्हणूनच त्यांचें विवेचन मांडणीदृष्ट्या कितीहि मोहक वाटलें तरी सत्यास धरून झालेलें नाहीं. एरवीं त्यांनी पेशवाईतील चौथसरदेशमुखीचें धोरण व वेलस्लीचें तैनाती फौजेचें राजकारण हीं दोन्हीहि एकाच तऱ्हेचीं होतीं असें म्हणण्याची गफलत केली नसती. तात्यासाहेबांना "सातारची सत्ता पुण्यास येण्याच्या आधीं पुष्कळ दिवस दिल्लीची सत्ता रायगडास आणण्याचा प्रयत्न झाला होता व त्याचा उपक्रम खुद्द शिवाजीने केला होता"[१०] या गोष्टीची जाणीव

१०. मराठे व इंग्रज पृ. १०६.

होती. तरी देखील ते मोंगलांची कार्यकारी सत्ता मराठ्यांच्या हाती आणावी हाच शिवाजीमहाराजांचा मूळ हेतु होता व तोच सिद्धीस नेण्याची खटपट पेशव्यांनी केली असें त्याच परिच्छेदांत खालीं म्हणतांना आढळतात. व वर मखलाशी करतात कीं, "या पातशाही धोरणाच्या कल्पनेचें यश बाळाजी विश्वनाथास देणेंत येते. पण या धोरणाची मूळ कल्पना बाळाजी विश्वनाथाची नव्हे, तर ती शिवाजीचीच होय!"[११] सत्याचा विपर्यास याहून दुसरा मिळणें कठीण आहे. रानडे, राजवाडे व केळकर तिघेही विसरतात कीं, वेलस्लीने बाह्यतः परिस्थितीस अनुसरून तैनाती फौजेखालीं आणलेल्या संस्थानिकांस इंग्रजांचे दोस्त म्हणून संबोधिलें असलें, तरी त्यांच्या दरबारांतील परराष्ट्रसंबंध व लष्करी सत्ता सर्वस्वी आपल्या मुठींत ठेवण्याचा उपक्रम प्रथमपासूनच केला होता. त्यामुळें कोणत्याहि संस्थानिकास इंग्रजांविरुद्ध यशस्वी उठाव कधींहि करतां आला नाहीं. याउलट मराठ्यांच्या चौथाईखालीं आणले गेलेले सर्व संस्थानिक सैन्य परत फिरल्याबरोबर पुढील उठावणीची तयारी करतांना आढळतात. निजाम, अलीवर्दीखान, अर्काटचा नबाब, म्हैसूर व बेदनूरचे राजे, अयोध्येचा नबाब, राजपूत संस्थानिक, बुंदेले राजे, फार काय रानटी मानले गेलेले गोंड व कोळी राजे, हेहि पेशव्याविरुद्ध सतत व पुष्कळदा यशस्वी बंड करतांना इतिहासांत आढळतात. मग या पद्धतीने चौथसरदेशमुखीचा अंमल बसलेलें (खरोखरी हा अंमल बसलेला नसेच) संस्थान पुढें आपलें (मराठ्यांचें) कसें होणार होतें? तात्यासाहेबांनी मराठ्यांच्या पातशाही धोरणाचा महामंत्र म्हणून ठरविलेला हा प्रकार मुळांतच लंगडा होता. महादजी शिंद्याने दिल्लीच्या बादशहाचा सर्वाधिकार आपल्याकडे १७८४ सालीं घेतल्यानंतरच त्याच्याविरुद्ध राजपुतांनी व गुलाम कादरने उठाव करून असा सर्वाधिकार देणाऱ्या पातशहाचेच डोळे काढले व पातशाहीची पूर्वी कोणी केली नसेल एवढी बेअब्रू केली. या गोष्टींतील मर्म वर सांगितलेल्या ढिलाईतच आहे. कॉर्नवालिस व शोअर या दोन गव्हर्नर जनरलांचें धोरणच वेगळें व स्वतंत्रपणाचे असल्यामुळें त्यांनी महादजीला व त्या रूपानें सर्व मराठ्यांना हे बादशाहीचे सर्वाधिकार हातांत घेतल्याचें काल्पनिक सुख अनुभवण्यास मोकळीक दिली पण महादजीने बंगालची

---

११. मराठे व इंग्रज पृ. १०६.

चौथाई व बादशहाचा तनखा याबद्दल गोष्ट काढतांच कॉर्नवॉलिसने त्याला वकिलामार्फत अशी समज दिली कीं, पुनः त्यानें या गोष्टीचा उच्चारहि केला नाहीं. हीच गोष्ट मराठ्यांच्या पातशाही धोरणाचा पोकळपणा दाखविते. जी गोष्ट शंभर वर्षांत घडूं शकली नाहीं ती इष्टहेतुसाधक होती असें म्हणणें हा शुद्ध वावदूकपणा होय. निजामाचें राज्य चौथसरदेशमुखीच्या करारा-प्रमाणे मराठ्यांनी कधीं घ्यावयाचें नव्हतें व म्हणूनच ते कधीं त्यांच्या ताब्यांत येऊं शकलें नाहीं हा इतिहास आहे. केवळ एकाचा प्रयत्न यशस्वी झाला व दुसऱ्याचा फसला असें म्हणण्यासारखा हा साधा प्रकार नाहीं.

बाळाजी विश्वनाथापासून आरंभ करून कोणत्याहि पेशव्यांत शिवाजीचा ध्येयवाद होता असें दिसत नाहीं. हा विसर व शिवाजीने स्थापिलेल्या राज्यघटनेचें अज्ञान हाच मुख्य दोष आम्हांस पेशव्यांच्या धडपडींत निदर्शनास येतो. व्यक्तिशः पेशवे घराण्यांतील पुरुष सामान्य राजपुरुषांपेक्षां कोणत्याहि दृष्टीने कमी नव्हते. शौर्य, स्वाभिमान, हिंदु-धर्माबद्दलची भोळी आपुलकी व शिवकालांत रुजून वाढत आलेला मराठ्यां-तील राष्ट्रभाव,—कीं जो हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि प्रदेशांत उगवला नव्हता—हीं सर्व पेशव्यांजवळ कमीअधिक प्रमाणांत होतीं. अखेरच्या नादान समजल्या गेलेल्या बाजीरावालाहि स्वतःचें राज्य स्वतंत्र रहावें असेंच वाटत होतें व त्यासाठीं त्याची धडपडहि पंधरा वर्षें चालली, असा इतिहास आहे. पण आपला मुख्य शत्रु कोण याची जाणीवच पेशवाईत नव्हती असें पेशव्यांच्या वर्तनावरून वाटतें. हिंदी मुसलमानांचें, म्हणजे त्यांच्यांतील खट्याळ, धर्मवेड्या व सत्ताराखू लोकांचें धोरण उफराटें होतें. त्यांचा नक्शा उतरविणें, त्यांची प्रतिष्ठा कोणत्याहि दृष्टीने न राखणें, हीच मुसलमानी प्रश्न कायमचा निकालांत काढण्याचीं साधनें होतीं. अठराव्या शतकांत शस्त्राच्या धाकानें व जरूर पडल्यास प्रसंगोपात त्याच्या उपयोगानें हा प्रश्न मराठ्यांस सोडवितां येण्यासारखा होता. पण यासाठीं त्यांस प्रथम स्वतःचे इतर हिंदु लोकांशीं वागण्याचे मार्ग निश्चित केले पाहिजे होते. शिवाजीनें ते निश्चित केलें होते. शिवाजीच्या वागणुकींत प्रांतीयतेचा तिलमात्र लेश दिसत नाहीं. मुसल्मानांचें राज्य मोडण्याच्या व घेण्याच्या दृष्टीनें शिवाजीनें स्वाऱ्या केल्या, त्यासाठीं मुसल्मानांचे नोकर म्हणून वागणारे हिंदूहि

त्याला कापून काढावेंच लागले. पण त्यासाठीं तो मराठे व इतर असा भेद करतांना दिसत नाहीं. तो चोलमंडल जिंकण्यासाठीं जिंजीकडे गेला, तेव्हां त्यानें प्रदेश जिंकल्यानंतर तेथें ताबडतोब सुराज्यव्यवस्था स्थापन करण्यासाठीं बरोबर मुल्की कामें करणाऱ्या ब्राह्मणांचा तांडा बाळगिला होता व त्यांनीं उध्वस्त झालेला वा जंगली प्रदेश अगदीं थोड्या दिवसांत लागवडीखालीं आणिला असें शिफारसपत्र पाँदिचेरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्तिन यानें आपल्या दैनंदिनींत लिहून ठेवलें आहे. तसेंच त्यानें तेथील स्थानिक तेलगु व तामिळ ब्राह्मणांना ताम्रपट देऊन त्यांच्या जीविकेची सोय लावून दिल्याचें प्रसिद्ध आहे. मुसलमानांनीं भ्रष्ट केलेलीं देवळें पुनः बांधून त्यानें हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचा उपक्रम जागोजागीं चालू ठेवलाच होता. व ही परंपरा लुटारू म्हटल्या गेलेल्या पेशवाईतील मराठ्यांनींहि थोडीबहुत चालू ठेविली होती. पेशवाईंत अशा तऱ्हेची दक्षता दिसत नाहीं. या उलट मुसलमानांची प्रतिष्ठा पेशव्यांच्या वर्तनांत न्यूनगंड निर्माण करीत असल्याचें पदोपदीं दिसतें. अवरंगजेबानें देवळें मोडण्याची मोहीम सुरू केल्याबरोबर शिवाजीनें त्याला बाणेदारपणानें पत्र लिहून त्याच्या परिणामांचा इषारा त्या प्रबळ बादशहाला जेथल्या तेथें दिला. पण पेशवाईंत टोक्याची देवळें वा पुण्याची पर्वती भ्रष्ट करणाऱ्या निजामाला कोणतेंहि शासन झालेलें दिसत नाहीं. किंवा त्यांच्या वर्तनाविरुद्ध पेशव्यांनीं कोठें गवगवा केल्याचें नमूद नाहीं. तो सुखानें पेशव्यांना अनेकदां डावलून राज्य करतांना आढळतो. मुसलमानांचें प्रस्थ मोडण्याची पहिली पायरी म्हणून शिवाजीच्या प्रधानांनीं राजव्यवहारकोश रचला व फारसी मायन्यांचे व पदव्यांचे संस्कृत पर्याय पत्रव्यवहारांत रूढ केलें. पण पेशव्यांनीं हा उपक्रम पुढें न नेतां मराठ्यांचें राज्य अटकेपार नेऊनहि फारसी भाषेचा उपयोग कायम ठेवला. फारसी, अरबी जाणणाऱ्या मुनशांनाहि काम नाहींसें झालें असतें तर त्या भाषांचा अभ्यास मंदावून येथील बहुसंख्य मुसलमान हिंदी भाषा लिहिण्यास लागले असते. तो प्रकार मोगली राज्य-पद्धति तशीच चालू ठेवण्याच्या उपक्रमामुळें तडीस गेला नाहीं. हें मुसलमानांचें अन्न व त्यारूपानें त्यांची संस्कृति तोडण्याचें कार्य मेकॉलेनें इंग्रजी भाषा प्रचारांत आणून केलें. पेशव्यांना निजामाविरुद्ध तसें करण्याचें महाराष्ट्रांतहि साधलें नाहीं. हा सर्व दिल्लीपतीची सेवा करीत राहण्याचा

वहाणा केल्याचा दुष्परिणाम होय. ही सेवा करण्याची पद्धतच पेशव्यांच्या अंगलट आली व त्यामुळेंच मराठ्यांचें राज्य चिरंतन होण्याऐवजीं दिल्लीची बादशाहीच कायम करण्याचें श्रेय त्यांच्या पदरांत पडलें. म्हणूनच इंग्रज इतिहासकार आम्ही मराठ्यांचें राज्य घेतलें असें म्हणण्याऐवजीं दिल्लीपतीचें राज्य घेतलें असें म्हणतात व तो अभिमान कायम राखण्यासाठीं त्यांनीं दिल्ली राजधानी करून तेथें दरबार भरविण्याचा व कैसर–इ–हिंद असा किताब धारण करण्याचा पायंडा पाडला. ज्याला आतां ( आमच्या मतें चुकीनें ) पहिलें स्वातंत्र्ययुद्ध असें म्हणतात त्या सन १८५७ च्या शिपायांच्या बंडांत नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व झांशीची राणी हीं प्रमुख होतीं, तरी त्यांची घोषणा "मुलुख बादशहाका–" अशीच होती याचें कारण हेंच. या ऐवजीं मुलुख छत्रपतीका अशी घोषणा सर्व हिंदुस्थानांत रूढ करण्याचें कर्तव्य मराठ्यांचें होतें. हें झालें नाहीं म्हणूनच इस्लामचे बीज हिंदुराष्ट्रांत खोल जाऊन आतां पाकिस्तानच्या रूपानें त्याचा वृक्ष झालेला दृष्टीस पडत आहे. अवरंगजेबाशीं वागतांना शिवाजीनें ठरविलेलें धोरण बाळाजी विश्वनाथाच्या नूतन राजकारणामुळें सुटलें व त्याचा परिणाम अवरंगजेबाचे अवतार पुढें हिंदुस्थानांत सतत होत राहण्यांत झाला. पहिला निजाम, अयोध्येचा पहिला वजीर, अलिवर्दीखान, मराठ्यांनीं स्थापिलेला गाजीउद्दीन, नजीबखान, मुषीर-उल्मुल्क, सर सालारजंग, सर सय्यद अहमद, आगाखान व जीना अशी या अवतारांची परंपरा सांगतां येते. इतिहासांतल्या चालू घटनांचें मूळ सूक्ष्म रूपानें किती मागें जात असतें हें दाखविण्यास या प्रकाराएवढें मोठें दुसरें उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासांत दाखवितां येणार नाहीं. जगाच्या इतिहासाचें मंथन करितांनां टॉइनबीलासुद्धां या प्रकाराची दखल घ्यावी लागली आहे व तेथें तो, मराठ्यांनीं चालू ठेवल्यामुळें इंग्रजांनाहि हें दिल्लीच्या बादशहाचें सोंग पुष्कळ दिवस राखावें लागलें, असें म्हणतो. कारण जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांनीं बादशहाशीं जो करार[१२] त्याचें राज्य राखण्याबद्दल नानासाहेब पेशव्याच्या नांवानें महादेव व खंडेराव व धर्म यांच्या शपथेवर केला व जो करार बाळाजी बाजीराव पेशव्याच्या अवलादीकडून व कौमेकडून आम्ही कायम अंमलांत आणला

---

१२. राजवाडे खंड १ नं. १

जाईल याची हमी घेतो असें वेलभंडार उचलून त्यांनी सांगितलें, तो करार अखेरपर्यंत शिंद्यांनीं पेशव्यांकडून राखविला! या इमानाबद्दल त्यांची जी स्तुति कोणास करावयाची असेल त्यांनी ती करावी. पण मग हिंदुपद-पातशाही उर्फ ब्राह्मणपदबादशाही म्हणजें भट्टकुलपातशाही करण्याचा पेशव्यांचा इरादा होता असें राजवाड्यांप्रमाणें त्यांस म्हणतां येणार नाहीं. राजवाड्यांनीं ६० वर्षांपूर्वी ही जी चुकीची इतिहाससरणी लावली त्याचा दुष्परिणाम महाराष्ट्रसमाजास आजतागायत भोंवत आहे एवढें मात्र खरें. याच सरणीच्या दुरभिमानामुळें महाराष्ट्राच्या राजकारणांतील, समाज-कारणांतील व धर्मकारणांतील अनेक चळवळी व उलाढाली चुकीच्या मार्गांवर जाऊन समाजाचा घात करणाऱ्या ठरल्या आहेत.

हिंदुपदपादशाहीची कल्पना महाराष्ट्रांत शिवकालांत किती रुजली होती याचे निदर्शक कागद अजून अस्तित्वांत असून त्यांतील कांहीं छापलेलेहि आहेत. उदाहरणार्थ राजवाड्यांच्या ८ व्या खंडातील लेखांक ४९ पहा. त्यांत इंद्रप्रस्थाच्या युधिष्ठिरधर्मराजापासून अवरंगजेबापर्यंतची दिल्लीच्या सार्वभौम बादशहांची नांवनिशीवार यादी दिली आहे. पृथ्वीराज उर्फ राय पिठोरा यास मारून मुसलमान पातशहा झाले त्यांची त्रेपन्न बादशहांच्या नांवाची यादी या ऐतिहासिक कागदाच्या लेखकाने दिली आहे. हा कागद मूळ १६९७ सालीं राजारामाच्या कारकीर्दीत ईश्वर-नाम संवत्सरीं लिहिलेला आहे. याचा लेखक हिंदु राजांना महाराष्ट्रराजे असें म्हणतांना आढळतो. असे राजे युधिष्ठिरापासून पृथ्वीराजापर्यंत १२० झाले अशी त्याची मोजदाद आहे. या कलियुगांतल्या १७३ सार्वभौमांपैकीं त्रेपन्न मुसलमानांच्या कारकिर्दीस केवळ सन ११९२ पासून सन १६९७ पर्यंत फक्त ५०५ वर्षें खर्ची पडली आहेत. म्हणजे दिल्लीच्या बादशहांच्या सरासरी कारकिर्दी प्रत्येकीं सुमारे २७ वर्षांच्या झाल्या, पण त्यांतील मुसलमानांच्या कारकिर्दीस सरासरी दहा वर्षेंहि पडत नाहींत. पण हा या ऐतिहासिक कागदाचें महत्त्व सांगणारा मुख्य मुद्दा नव्हे. मुख्य मुद्दा असा कीं, या यादीच्या शेवटी लेखकाने एका मुसलमान ज्योतिषाचें त्यांच्या धर्मांप्रमाणेंच केलेलें भविष्य दिलें आहे. तें भविष्य असें "यासी तांब्राचे भविष्य त्यांच्या महजबें शास्त्रप्रमाण कीं:—**दिल्लीस मागतीं हिंदू राजे छत्र धरणार.** गेरासें गेरा सन येतां दिल्ली हातींची

जाईल. त्याप्रमाणें वर्षें ४ चारी व चालतें वर्ष एकूण रमारमीं पांच वर्षें उरलीं आहेत. व ईश्वर संवत्सरीं दिल्लीचा राजा यासी परम पीडा होईल. औरंगशाहाचा पुत्र हल्लीं दिल्लीस आहे, तो रजपुतणीचे पोटींचा, त्यास हिंदूंचा अभिमान असे, त्या फिसातीने भाऊ भाऊ झगडोन हिंदू दिल्लीस जातील, प्रयागीं ३ वर्षें छावणी करतील, फिरोज पटाण व मोगल जमाव करून दिल्लीहून हिंदूंस काढतील. पुढें नर्मदेची सरद पडेल. या वर्षापासून भीमादक्षणप्रांत सोड पडेल. भीमाउत्तरप्रांत तहद प्रयाग (२४॥) साडेचोवीस वर्षें राजीक घाटेल. हें भविष्य असे. यांत कलिराजा चालतो. युगाची संख्या आहे. घडेल तें प्रमाण. परंतु भल्याचें सदरहु भविष्य आहे."

या भविष्यावरून महाराष्ट्रांतील आम जनतेमध्यें काय बातम्या उठत होत्या व लोक कशावर विश्वास ठेवीत होते याचा बोध होतो. मुसलमान ज्योतिषांनाच वाटूं लागलें होतें कीं, आमची पातशाही चालली! अर्थात् हिंदूनींहि तोच पुकार करावा हें त्यांना राजकीयदृष्ट्याच इष्ट होतें. म्हणजे जिंजीहून प्रल्हाद निराजीनें दिल्ली काबीज करण्याची केलेली घोषणा वणव्याप्रमाणें पुढील कांहीं वर्षांत दक्षिणभर पसरून ज्याच्या त्याच्या मुखीं झालेली दिसते. धनाजी जाधव, संताजी घोरपडे प्रभृतींनी यावेळीं औरंगजेबाची अशी हबेलंडी उडवून दिली होती कीं, मोगली छावणींत तो आजारी पडल्याच्या किंवा मेल्याच्या वार्ता नेहमी उठत असत. मग मोगल उमराव कोठल्या तरी निमित्तानें आपण उत्तरेकडे केव्हां परत जातों याची वाट पहात होते. यानंतरच्या दशकांत अवरंगजेबाने महाराष्ट्र जिंकून राजारामाचा पंथ पुरा मोडून टाकण्यासाठी जोराची खटपट केली. पण मध्यंतरी संताजी घोरपडे व राजाराम वगैरे मरूनहि मराठ्यांचा पक्ष मोडला गेला नाहीं. बंदिस्त शाहूचा राजकीय मोहरें म्हणून उपयोग करण्याचा अवरंगजेबाचा प्रयत्नहि मराठ्यांनी साधूं दिला नाहीं. या प्रयत्नांत पुढें शाहूस मिळालेला धनाजी जाधवच पुढारी होता. तो, परशुरामपंत प्रतिनिधि, रामचंद्रपंत अमात्य व ताराबाई, यांनी राजकारण अशा शिताफीने चालविलें कीं, अवरंगजेब टेकीस येऊन अखेर अहमदनगरास येऊन राहिला मराठ्यांनी आपले हातपाय स्वराज्य सोडून पलीकडे वऱ्हाड, खानदेश गुजरात व माळवा या प्रदेशांत पसरण्यास स्वाऱ्या करून सुरुवात केली

म्हणजे खरोखरीच हें राजकारण पुढें चालतें तर दक्षिणेंतून मोगलांची उचलबांगडी होण्यास कसलीच आडकाठी उरली नव्हती. म्हणजे वरील भविष्यांत सांगितल्याप्रमाणें भविष्य अंमलांत येण्यास सुरुवात झाली असती. त्याऐवजीं झुल्फिकारखानाच्या क्लृप्तीनें शाहू मोकळा होऊन दक्षिणेंत आला व हा सर्व प्रकार जणूं एका वर्षांत पालटला. अवरंगजेबाच्या मृत्यूनें त्याचे मुलगे आपसांत लढूं लागल्यामुळें मराठ्यांच्या राजकारणास वस्तुतः जास्तच जोर चढला पाहिजे होता. त्याऐवजीं महाराष्ट्रांत घरभेदी, फितुरी निर्माण झाली व त्यांत दुबळया पक्षाला यश मिळविण्यासाठी मोडक्या मोगल पातशाहीचें सहाय्य घ्यावें लागलें. याच प्रकाराने खरी अस्सल शिवशाही कोसळून पडली, असा हा खरा इतिहास आहे. यानंतरचें पातशाही धोरण म्हणजे छत्रपति स्वतः दिल्लीपति होण्याचें सुटून, मोगल दिल्लीपतीची सेवा करण्याचे ठरलें व तेंच केळकरांनी आपल्या ग्रंथांत मोठ्या चतुराईने मांडलें आहे. पण तें वर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांचें शिवकालांत ठरविलेलें अस्सल बीजाचें पातशाही धोरण नव्हे हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

मानवी इतिहासांत नीतितत्त्वांचा विकास सुरू आहे व गेल्या तीन शतकांत तर त्यामुळें मूळची मूल्यें सर्वस्वी मागें पडत आहेत. आज तर अशी स्थिति निर्माण झाली आहे कीं, तलवारीने वा तलवारीच्या धाकानें कोणतेहि प्रश्न सोडविणें हे मानवाला शोभण्यासारखें नव्हे असें मानलें जातें. पण नवीन मूल्यें व तत्त्वें पुढें आलीं म्हणजे तीं सर्व समाजांत वा राष्ट्रांत एकदम मान्य होतात असें नव्हे. यामुळेंच महाभारतकालापासून दोन प्रतिस्पर्ध्यांतील एक नेहमीं "धर्मयुद्ध नव्हे हें" असें म्हणत आलेला आहे. एकोणिसाव्या शतकांत जीं तत्त्वें आंतरराष्ट्रीय न्यायालयानें मान्य केलीं होतीं तीं न पाळण्याच्या गुन्ह्याबद्दल पहिल्या महायुद्धांत जर्मनीविरुद्ध इतर राष्ट्रांनीं हत्यार उचलिलें. तदनंतर राष्ट्रांराष्ट्रांतील याबाबत ठरणारे कायदे मानण्यास राष्ट्रसंघांत सामील झालेल्या कांहीं राष्ट्रांनी दिरंगाई चालविली. त्यामुळेंच पुढे राष्ट्रसंघ मोडला. इतालीनें अबिसिनियावर निष्कारण हल्ला चढवून लष्करी बळावर तो स्वतंत्र देश आपला गुलाम करून सोडला. ही गोष्ट सन १९३६ इतक्या पुढच्या काळांत घडली. जपाननें चिनी राष्ट्राविरुद्ध प्रत्यक्ष युद्ध न पुकारतांच चीनचे मांचुरिया व इतर प्रांत आपल्या ताब्यांत आणले. हिटलर व मुसोलिनी यांनी स्पेनच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि:
अनुक्रम क्रमांक
नों: दि:


अंतर्युद्धांत मदत करून तेथे फ्रँकोची प्रतिष्ठापना लोकपक्ष चिरडून होवूं दिली. दक्षिण अमेरिकेसारख्या प्रदेशांतील प्रकार तर पुसूंच नये. केवळ अमेरिकेने तिकडे इतर कोणाचा प्रवेश होऊं द्यावयाचा नाहीं असें सक्त धोरण ठेवलें असल्यामुळें परक्यांची मदत पोचून तेथें राज्यक्रांत्या होत नाहींत एवढेंच. पण अंतस्थदृष्ट्या तेथें विसाव्या शतकांतील लोकशाहीचा प्रत्येक नियम कोणीना कोणी अरेराव धुडकावून टाकीत आला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर लोकशाही दोस्तराष्ट्रांनी अण्वस्त्र सोडून जपानला एका दिवसांत भुईसपाट केलें. यापूर्वी अण्वस्त्राचा शोधच लागला नसल्यामुळें त्याच्या उपयोगाबाबत कोणताहि मनाई हुकुम आंतरराष्ट्रीय कायद्यांत सहजच नव्हता. पण झालें हें कृत्य विसाव्या शतकाच्या सुधारणेच्या बढाईस शोभेसें झालें असें कोणीच समजत नाहीं. तीच गोष्ट जर्मन व जपानी युद्धखोरांना न्यायालयाच्या शिक्षा सुनावून मारण्याबाबत घडली. प्रत्येक राष्ट्रांतील वेळोवेळीं होणारे देशभक्त, मुत्सद्दी व कायदेपंडित आपल्याला सोइस्कर अशा नीतितत्त्वांचे पुकारे जरूरीप्रमाणें करीत असतात असें जगाचा इतिहास सांगतो. नीतीची आठवण दुबळयाला प्रथम होते, धटिंगणाला सहसा होत नाहीं. हें एवढें कांहींसें अप्रस्तुत वाटणारें विवेचन येथें अशासाठीं करीत आहों कीं, जुन्या ऐतिहासिक घटना समजण्यास त्यांचा उपयोग व्हावा. जे प्रश्न १८ व्या शतकांत तलवारीनेंच केवळ सोडविले जात होते व तसे ते सोडविल्याबद्दल कोणी तक्रारहि पुढें मांडीत नव्हता ते प्रश्न, म्हणजे मुख्यतः हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमानांच्या त्यांच्या पांचशें वर्षांच्या राजवटीनें निर्माण केलेले प्रश्न, तशा तऱ्हेनें सोडविण्याचा मोका पेशव्यांना त्या शतकांत होता. व यांतील निजामाचा प्रश्न हा मराठ्यांच्या केवळ घरांतीलच होता. तो पेशव्यांनीं न सोडविल्यामुळें पुढें दीडशें वर्षें तसाच चिघळत राहिला व दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळांत सरदार वल्लभभाईनासुद्धां केवळ शांततामार्गानें सोडवितां आला नाहीं. त्याला तलवारीचाच थोडाबहुत तरी उपयोग करावा लागला. आम्ही या व्याख्यानांत आरंभापासून पुनः पुनः सांगत आलों आहोंत कीं, या देशांतील हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडविण्यासाठीं शिवशाही जन्माला आली होती. व हेंच तिचें एकमेव नैतिक अधिष्ठान होतें. पेशव्यांच्या चुकीच्या धोरणामुळें हे प्रश्न सोडविण्याचे राहिले व आतां ते न सोडविलेले प्रश्न नव्या नव्या तत्त्वांस

अनुसरून सोडविण्याची आपत्ति आपणावर कोसळत आहे. ज्यावेळीं व्यंकटराव घोरपड्यानें सन १७३९ सालीं गोवा जवळजवळ घेतला होता, त्याच वेळीं त्याच्या मदतीस कोंकणांत येऊन पोर्तुगीजांची सत्ता महाराष्ट्रांतून समूळ नाहीशीं करण्याची संधि बाजीरावाला आलेली होती. पण त्यावेळीं मराठ्यांची आरंभापासूनची शत्रू जी मोगल पातशाही, तिचें रक्षण नादिरशहाच्या स्वारीपासून करण्याची भाषा शाहू छत्रपति बोलतांना आढळतो व बाजीराव या कार्यासाठी बुऱ्हाणपुरास तळ देऊन बसतो व त्यामुळें पोर्तुगीजांचा प्रश्न सोडविण्याची आपत्ति आतां भारतावर येऊन ठेपली आहे. आतां त्या प्रश्नांना असे फाटे फुटत आहेत कीं, ज्यांची कल्पनाहि जगाला ५० वर्षांपूर्वीं करतां आली नसती. बहुसंख्येचें तत्त्व, स्वयंनिर्णयाचें तत्त्व, मानवतेचें तत्त्व, संयुक्त राष्ट्राचे दंडक, असे कितीतरी अडथळे आतां हे प्रश्न सोडविण्याच्या आड येत आहेत. कश्मीरच्या प्रश्नाबद्दल कोलंबियाच्या बेछूट वकिलानें भारताला वॉशिंग्टनमध्यें छेडावें व भारताला त्यावर अक्षरहि बोलतां येऊं नये अशी परिस्थिति नव्या युगधर्मामुळें व नीतितत्त्वांमुळें निर्माण झाली आहे. या सर्व गोष्टी परसंस्कृतींतून आलेल्या, परांच्या फायद्यासाठीं उपयोगांत आणल्या जाणाऱ्या ध्येयांच्या व राज्य-पद्धतींच्या प्रकाशांत सोडविण्याची आपत्ति मराठ्यांच्या १८ व्या शतकांतील वर्तनामुळें भारतीय संस्कृतीवर ओढवली असें आम्हांस दीर्घ चिंतनानें वाटतें.

अर्थात् याबद्दल पेशवे एकटेच जबाबदार धरतां येतील असें नव्हे. तसेंच नैतिक दृष्ट्या विचार करतव्य तर पेशव्यांनीं यांपैकीं कोणतीहि गोष्ट जाणून बुजून मुद्दाम केली असेंहि सिद्ध करणें कठीण आहे. पण इतिहासांत हेतु विचारांत न घेतां परिणाम लक्षांत आणावे लागतात आणि ते तर सुस्पष्ट आहेत. तसेंच त्यांचे अटळ दुष्परिणाम आपणांस सध्यां भोगावे लागत आहेत हेंहि नाकबूल करतां येणार नाहीं. इतिहासाच्या या काथ्याकुटाचा उपयोग ते परिणाम, मूळ कारणें समजून घेतल्यानें सौम्य करण्याकडे व्हावा, एवढी तरी अपेक्षा त्यापासून करतां येते व तसा तो व्हावा म्हणूनच हा एवढा प्रपंच येथें केला आहे.

---

मराठी ग्रंथ सं... स्थळप्रत.
अनुक्रम २०५१९ वि. ११०९६
क्रमांक ११५२ नों: दि: १५।५।७८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ~~१०२६४~~ १०२६४
REFBK-0010264

# पुणें विद्यापीठाचीं

## कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेंतील प्रकाशनें

विक्रीस तयार :

पुष्प १ ( १९५४ )

**निजाम पेशवे संबंध.**

ले. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर

छापत आहेत :

पुष्प २ ( १९५५ )

**श्रीज्ञानेश्वर वाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास.**

ले. श्री. बाळाचार्य माधवाचार्य खुपेरकर

पुष्प ३ ( १९५६ )

**मराठेशाहींतील दिवाणकारभार, गांवकारभार आणि जातकारभार.**

ले. श्री. शं. ना. जोशी

पुष्प ४ ( १९५७ )

**मराठी नाट्यकला आणि नाट्य-वाङ्मय.**

ले. प्रा. श्री. ना. बनहट्टी

पुष्प ५ ( १९५८ )

**मराठी वाङ्मयाभिरुचीचें विहंगमावलोकन.**

ले. प्रा. रा. श्री. जोग